मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आश्विन - मार्गशीर्ष, 1925

ऑक्टोबर-डिसेंबर, 2004 / खंड 28, अंक 3

- सहकारी लोकराज्य
- सहकारी चळवळ संघटन, व्यवस्थापन आणि न.आ.धो.
- सहकारी अर्थकारण मागोवा आणि भविष्याचा वेध
- सहकार चळवळीची शंभर वर्षे
- सहकारी चळवळीची पर्याप्तता, पर्यायता आणि पुनर्रचना
- सहकार आणि सरकार
- भारतातील सहकारी विपणन
- संघटित स्पर्धा की संघटित सहकार
- नागरी सहकारी बँकांसमोरील आव्हाने



## सहकार शतक महोत्सव

## विशेषांक





लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

ऑक्टोबर - डिसेंबर, 2004 / खंड 28, अंक 3

**प्रमुख संपादक**
विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**
रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**
(2003-06)
कमलाकर हणवंते
रामकृष्ण सोळुंके
आशुतोष रारावीकर
वंदना दांडेकर

**संपादकीय पत्रव्यवहार**
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48 विद्या-विहार
प्रतापनगर, नागपूर - 440022
दूरध्वनी क्र.(95712) 2237042

## अनुक्रमणिका

- **संपादकीय**
  विनायक देशपांडे ........ 193
- **सहकारी लोकराज्य**
  सुलभा ब्रह्मे ........ 194
- **सहकारी चळवळ संघटन, व्यवस्थापन आणि नवीन आर्थिक धोरण**
  सु. गो. भानुशाली ........ 203
- **सहकारी अर्थकारण मागोवा आणि भविष्याचा वेध**
  ज. फा. पाटील ........ 221
- **सहकार चळवळीची शंभर वर्षे**
  श्री. आ. देशपांडे ........ 231
- **सहकारी चळवळीची पर्याप्तता, पर्यायता आणि पुनर्रचना**
  वसंत जुगळे / योजना जुगळे ........ 236
- **सहकार आणि सरकार**
  माधव दातार ........ 258
- **भारतातील सहकारी विपणन : सद्यःस्थिती आणि भविष्यातील वाटचाल**
  रवीन्द्र जोशी ........ 267
- **संघटित स्पर्धा की संघटित सहकार (चर्चा)**
  श्रीनिवास खांदेवाले ........ 283
- **नागरी सहकारी बँकांसमोरील आव्हाने (टिपण)**
  विलास खंदारे ........ 292

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ (2004-05)

............................

● अध्यक्ष
मधुकर नारायणराव शिंदे

............................

● कार्याध्यक्ष
ज.फा. पाटील

............................

● कार्यवाह, खजिनदार
सर्जेराव ठोंबरे

............................

● प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'
विनायक श्रीधर देशपांडे

............................

● सदस्य
चारुदत्त गोखले
विजय कांत
कुंदा दामले
रवीन्द्र जोशी
राम देशमुख
दिनकर टकले
केशव घोरूडे
सुभाष दगडे
बबन आदिक
अर्जुन महाडीक
शिवाजी साळुंखे

............................

● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

● कार्यालयीन पत्रव्यवहार

............................

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, अर्थसंवाद वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी.)

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद-431001
(दूरध्वनी : 95240-2380702)

............................

● परिषदेचे प्रमुख कार्यालय

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर,
बांद्रे(पूर्व), मुंबई 400 051

............................

**वर्गणी**

अ) परिषदेचे सदस्य
1) आजीव सदस्य : रु. 1200 (एकरकमी)
2) साधारण सदस्य : रु. 250 (वार्षिक)
3) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 250 (वार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु. 250 (वार्षिक)
(परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)
आ) अर्थसंवाद वर्गणीदार
ग्रंथालये : रु. 250 (वार्षिक)
इ) वर्षगणना : 1 एप्रिल ते 31 मार्च

............................

कृपया वर्गणी मनीऑर्डर वा डिमांड ड्राफ्ट ने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी. संपादकांकडे पाठवू नये.

# संपादकीय

आर्थिक विकासात तसेच सामाजिक जीवनात मोलाची भूमिका बजावणाऱ्या सहकारी चळवळीचा शतकमहोत्सव सध्या सर्वत्र साजरा होत आहे. ही घटना अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. आर्थिक विकासाबरोबरच नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय आधुनिकीकरणात सहकार चळवळीने मोलाची भूमिका बजावली आहे. या चळवळीमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होण्यास मदत झाली, विविध प्रकारचे उद्योग स्थापन होऊ शकले, जनतेच्या सर्जनशीलतेला, कृतिशीलतेला वाव मिळाला. रोजगाराची नवी साधने उपलब्ध झाली. स्पर्धेतून प्रगती होण्यापेक्षा सहकार्यातून प्रगती होणे समाजास अधिक पोषक ठरते हे प्रत्ययास आले. स्पर्धेविनाही सहकार्यातून प्रगती होऊ शकते याचा वस्तुपाठ मिळाला. लोकसहभागातून, लोकांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढवून व मिळालेल्या आर्थिक लाभाचे सुयोग्य वाटप करण्याचा सातत्याने प्रयत्न करून, सहकाराची चळवळ आकारास आली. ग्रामीण जीवनात लक्षणीय बदल घडवून आणण्याचे एक प्रतिमान या चळवळीच्या निमित्ताने भारतात विकसित झाले. हे सारे लोकशाही स्वातंत्र्याचा संकोच न करता साध्य होऊ शकले. नियोजन आणि आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून सहकाराला मान्यता मिळाली. विकास प्रक्रियेत समाजातील व्यक्तिंना सहभागी करून घेतल्यास विकासाच्या प्रक्रियेला मानवी चेहरा प्राप्त होऊ शकतो.

कष्टकऱ्यांच्या श्रमाचा सन्मान करून एकमेकांच्या सहकार्याने सर्वांचा विकास घडवून आणायचा हे या चळवळीचे मूलभूत उद्दिष्ट साध्य करण्यात ही चळवळ यशस्वी झाल्याचे अनुभवास आले. या यशाची दखल घेतांनाच गेल्या काही वर्षात या चळवळीला स्थितीशीलता आली, ती राजकारण्यांच्या ताब्यात गेली व आर्थिक दुरवस्थेची शिकार झाली ह्या वास्तवाकडे देखील दुर्लक्ष करता येत नाही. आता तर या चळवळीसमोर जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची आव्हाने उभी ठाकली आहेत. सार्वजनिक क्षेत्राचे अपयश आणि खाजगी क्षेत्राच्या मर्यादा लक्षात घेता सहकार क्षेत्र पर्यायी व्यवस्था म्हणून उदयास येऊ शकेल का ? या प्रश्नाचा सर्वांगीण आणि सखोल विचार होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या चळवळीच्या यशापयशाचा चिकित्सक आढावा घेणे उपयुक्त ठरेल. भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेला समताधिष्ठित समाज घडविण्यात या चळवळीला कितपत यश मिळाले? शोषण विरहित अर्थव्यवस्था विकसित करण्यात ही चळवळ कितपत यशस्वी ठरली ? जागतिकीकरणाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी सहकाराची चळवळ उपयुक्त ठरू शकेल का ? या चळवळीतून आर्थिक विषमता दूर करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येईल का ? स्पर्धेच्या युगात सहकार चळवळीचे स्वरूप कसे असावे ? अशा अनेक प्रश्नांचा विचार करणेही गरजेचे आहे. या चळवळीच्या प्रगतीसाठी या प्रश्नांचा उहापोह करणाऱ्या लेखांचा संग्रह प्रस्तुत विशेषांकात करण्यात आला आहे. तो वाचकांच्या पसंतीस उतरेल व या निमित्ताने सहकाराच्या चळवळीच्या मूल्यांकनाची व तत्संबंधी विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याची नव्या संशोधकांना प्रेरणा मिळेल अशी आशा आहे.

**विनायक श्रीधर देशपांडे**
**प्रमुख संपादक**

# सहकारी लोकराज्य

● सुलभा ब्रह्मे, पुणे.
*माजी प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.*

सहकारी लोकराज्याची संकल्पना ध. रा. गाडगीळ यांनी 1959 साली पंजाब विद्यापीठातील ब्रिज नारायण स्मृति व्याख्यानमालेत सविस्तरपणे मांडली. त्या काळापर्यंतचा जागतिक व भारतीय पातळीवरील सहकारी क्षेत्रातील अनुभव व सैद्धांतिक विचार याचा तत्त्वार्थ या संकल्पनेमध्ये प्रतिबिंबित होतो. या संकल्पनेतील मार्गदर्शक मूलतत्त्वे मांडून आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सहकारी संघटनांमार्फत आपण ती प्रत्यक्षात कशी उतरवू शकतो याचे विवेचन प्रस्तुत लेखात केले आहे.

गाडगीळांना सहकारी चळवळीचा सर्वसमावेशक व अत्यंत व्यापक असा आवाका अभिप्रेत होता. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील सावकार व व्यापारी यांचा पगडा कमी करण्यासाठी कृषिव्यवसायामध्ये किमानपक्षी सहकारी पतपुरवठा व सहकारी खरेदी-विक्री यंत्रणा उभारण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादली होती. सहकाराचे क्षेत्र विस्तृत करून शेती उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन हे सहकारी यंत्रणेद्वारे संलग्न व्हावे आणि प्रक्रिया उद्योगांत प्राथमिक उत्पादकांचा सहभाग असावा यावर त्यांचा भर होता. तसेच ग्राहक सहकारी संस्थांचे देशव्यापी जाळे निर्माण करून कृषी व औद्योगिक संघटनांशी त्यांचे प्रत्यक्ष दुवे जोडले गेले पाहिजेत, व अशा रीतीने अर्थव्यवस्थेमधील मध्यस्थांचे व मक्तेदारांचे अडसर दूर करून उत्पादक आणि ग्राहक यांचे परस्पर हितसंबंध लक्षात घेऊन अर्थव्यवस्था संघटित करावी असे त्यांनी सुचवले आहे. अशा संघटना, तालुका व जिल्हा पातळीवर उभारून राज्य पातळीवर त्यांच्या कार्याचे एकसूत्रीकरण केले जावे. निरनिराळ्या राज्यांतून विविध पातळींवर आणि सर्व क्षेत्रांमध्ये सहकारी संघटनांचे व्यापक जाळे निर्माण केल्यास राजसत्ता व अर्थसत्ता यांचे विकेंद्रीकरण परिणामकारकरित्या घडविता येईल असा त्यांचा विश्वास होता. अशा रीतीने विकेंद्रित सहकारी घटकांच्या आधारे सहकारी लोकराज्याची संकल्पना त्यांनी मांडली होती.

गाडगीळांच्या मते, सहकाराचा प्रसार केवळ बहुसंख्य शेतकरी व कारागिरांमध्येच होऊन भागणार

नाही, तर विकेंद्रित स्वरूपाच्या सर्व आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्रात, म्हणजे मासेमारी व जंगलतोड, खाणी व वाहतुक, इमारती व सार्वजनिक बांधकाम इत्यादी सर्व क्षेत्रात त्याचा प्रसार होणे आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत हेच धोरण अत्यंत परिणामकारक ठरेल. कारण त्यामुळे कार्यक्रमांची अंमलबजावणी चांगल्या रीतीने होण्याची खात्री लाभेल, एवढेच नव्हे तर सामाजिक सुरक्षितता व स्वास्थ्य या बाबी त्यामुळे उपलब्ध होतील.

## सहकारी मूल्ये

''सहकारी मूल्ये, समता व लोकशाही या संबंधीच्या सर्वमान्य कल्पनांशी संबद्ध आहेत. समतेबाबत जरी एखाद्या विशिष्ट काटेकोर मांडणीवर सहकाराचा भर नसला तरी, लहान घटकांबाबत त्याचा आग्रह असल्यामुळे, एकाधिकारविरोधी अशी त्यांची मूळ भूमिका असल्यामुळे व सामाजिक नियमनावर विश्वास असल्यामुळे, उत्पादन साधनांची मालकी मोठ्या प्रमाणात विखुरली जावी अशी साहजिकच सहकाराची अपेक्षा असते; आणि जेथे या रीतीने मालकी हक्काचे वितरण होणे शक्य नसते, तेथे सत्तेचे वितरण करण्यावर सहकाराचा भर असतो.... आर्थिक प्रलोभना व्यतिरिक्त इतर प्रेरणा आणि सामाजिक कर्तव्याची व्यक्तिगत जाणीव यांच्या सामर्थ्यावर सहकाराचा विश्वास असल्यामुळे वैयक्तिक वेतनाच्या दरात मोठी तफावत राखणे सहकारात आवश्यक नसते. या सर्वापेक्षाही शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांवर सहकाराचा जो भर असतो, त्यामुळे समाज-गटांची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीचे केवळ संरक्षणच नव्हे तर गुणोत्कर्ष साधण्याचीही आहे असे सहकार मानतो. यामुळे तो समानतेची वाटचाल करू लागतो. पण याबरोबरच असेही सिद्ध होते की समता सहकार-पूर्वप्रस्थापित नसून सहकारी व्यवहारातून व प्रयोगातून निर्माण होणारी असते.''[1]

''सहकार लोकशाहीप्रधान आहे. सहकारातील विनियंत्रण व्यवस्था आणि त्यातील खुल्या सभासदत्वाचे तत्त्व यावरून सहकारी व्यवस्था ही आर्थिक लोकशाहीची आहे आणि तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारची हक्कदारी अगर वतनदारी राहू शकत नाही हे सिद्ध होते. सहकारी व्यवहारात लोकशाहीचा विशिष्ट कल स्पष्टपणे दिसून येतो. याचे मुख्य लक्षण म्हणजे प्राथमिक व स्थानिक गटांच्या मध्यवर्ती आणि महत्त्वाच्या स्थानावर सहकारी रचनेमध्ये दिलेला विशेष जोर. यामुळे सहकारी व्यवस्था केवळ एखाद्या लहान गटाच्या अगर काही मोठ्या व्यक्तींच्या हातात आर्थिक सत्ता केंद्रित होऊ नये एवढ्याबद्दलच नव्हे तर कोणत्याही स्थानी अगर स्तरात ती केंद्रित होऊ नये याविषयीही तत्पर रहाते. समाजरचनेच्या सर्व थरांतून सत्ता खेळली जावी, पसरली जावी अशी सहकाराची भूमिका असते; आणि यासाठी संघ-व्यवस्था ही सहकारात सार्वत्रिक आढळते. प्राथमिक व माध्यमिक गटांच्या स्वायत्ततेचे काळजीपूर्व रक्षण करून जरूर तेवढी किमान सत्ताच केंद्रस्थ संघटना व वरचे स्तर यांजकडे ठेवण्याचे सहकाराचे धोरण असते.''

''सहकाराधिष्ठित जीवनपद्धती मान्य करावयाची म्हणजे परस्पर समजुतीने व देवाणघेवाणीने फायद्याची व मिळकतीची योग्य वाटणी करून घेण्याची कल्पना त्यामध्ये आलीच. हर एक प्रकारच्या आर्थिक हितसंबंधाची वेगळी संघटना उभारून ती कार्यान्वित करण्याची सहकारात शक्यता असल्यामुळे वेगवेगळ्या व्यवहार-व्यवसायांचे दृष्टिकोन सहकारी व्यवस्थेत स्पष्टपणे व्यक्त होऊ शकतात. गटागटांच्या व प्रदेशाप्रदेशांच्या हितसंबंधांमध्ये विरोध असण्याची शक्यता आहे ही गोष्ट उघडपणे मान्य

करण्याची भूमिका सहकार घेत असल्यामुळे साहजिकच विभिन्न दृष्टिकोनांचा समन्वय करून शांततेच्या व तडजोडीच्या मार्गाने ते मिटवण्याची सहकारात खटपट करावीच लागते.''

''सहकाराची भूमिका एकाधिकाराच्या विरूद्ध असल्यामुळे आणि संचालन व मालकी यांची फारकत करण्यावर त्याचा भर असल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील प्रचंड व्यापाचे सर्व उद्योगधंदे, निदान त्यांचे नियंत्रण, सरकारी कक्षेत राज्यसत्तेच्या हाती ठेवणे सहकार पसंत करील. विकेंद्रीकरण, लहान घटक, संयुक्त संघात्मक रचना व स्वयंप्रेरित यत्न यावर सहकाराचा विशेष भर असल्यामुळे साहजिकच राज्यसत्तेला फार महत्त्व न देता ते कमी राखण्याकडे त्याचा कल असतो. न्यायाच्या आणि सामाजिक कर्तव्याबाबतच्या कल्पनांना समाजाच्या आर्थिक रचनेत समाविष्ट करून घेण्यावर सहकाराचा भर असतो आणि आर्थिक जीवन आणि व्यवहार यापासून नैतिक मूल्ये अलग करता येत नाहीत, अशी त्याची धारणा असते ''[2]

सहकारी चळवळ ही मुळाशी एक भक्कम नैतिक बैठक असलेली, माणसाला जबाबदार बनवणारी चळवळ आहे. व्यक्तिगत नफ्यासाठी उद्योग-व्यापार करणे हा खाजगी अर्थव्यवहाराप्रमाणे सहकाराचा हेतू नसून उत्तम माणूस घडवणे हे त्याचे अंतिम ध्येय होय. जो केवळ स्वत:पुरते जीवन जगतो, स्वत:साठीच काम करतो त्याचे जीवन अपुरे असते, एका उदात्त ध्येयासाठी इतरांबरोबर काम करण्याने त्याच्या जीवनाला परिपूर्णता येते अशी सहकाराची धारणा आहे. सहकारी तत्त्वावर ज्यांचा विश्वास असेल त्यांना ही स्फूर्ती देऊन कार्यरत करते.

**भारतातील सहकार**

भारतीय समाजातील पैशाचा हव्यास नसणे, नैतिक मूल्याचे अधिष्ठान आणि स्वातंत्र्य लढ्यात पुढे आलेले सामाजिक जाणिवांनी प्रेरित झालेले नेतृत्व यामुळे गाडगीळांची अपेक्षा होती की हजारो छोट्या एकएकट्या पडलेल्या दुर्बल शेतकरी, कारागीर आदींना सहकारी चळवळीद्वारा सक्षम करता येईल, सचोटीचे नेतृत्व, कार्यक्षम व्यवस्थापन, लोकशाही कारभार, सदस्यांची बांधिलकी आणि संस्था उभारणी काळात, सरकारची मदत या जोरावर सहकारी संस्था भक्कम पायावर प्रस्थापित करता येतील.

प्रवरा सहकारी साखर कारखान्याचा अनुभव यादृष्टीने विशेष उत्साहवर्धक होता. चाळीशीच्या दशकात अहमदनगर जिल्ह्यातील लोणी परिसरातील नेते, बँक अधिकारी व गाडगीळ यांच्या प्रयत्नातून राज्य सहकारी बँक व राज्य सरकारच्या अर्थसाहाय्याच्या आधारे प्रवरा सहकारी साखर कारखाना 1949 साली स्थापन करण्यात आला. कारखान्याच्या उभारणीपासून तो स्वावलंबी होईपर्यंत धनंजयराव गाडगीळ कारखान्याचे अध्यक्ष होते (1960). कारखान्याचे तांत्रिक व आर्थिक व्यवहार आणि सिंचन विकास व ऊस क्षेत्र विस्तार योजनापूर्वक व कार्यक्षमतेने करण्यात आला. कारखाना उभारणी करताना तंत्र कुशल व अनुभवी तंत्रज्ञ सचोटीची व कार्यक्षम व्यवस्थापन व्यवस्था केल्याने कारखान्याच्या व्यवहारामध्ये नोकरशाही दफ्तरदिरंगाई, राजकारण्यांचा हस्तक्षेप, वशिलेबाजी व भ्रष्टाचार याला थारा नव्हता आणि म्हणूनच 1950 साली शेतकऱ्यांनी केवळ 6 लाख रूपये भागभांडवल घातलेले व उरलेले 36 लाख रूपये कर्जाऊ घेतलेले असताना दहा वर्षात सर्व कर्ज फेडून कारखान्याची मालमत्ता 150 लाख रूपयांच्या घरात गेली. शिवाय शेतकऱ्यांनी ऊस शेती विस्तारली व त्यांच्या उत्पन्न पातळीत लक्षणीय वाढ झाली.

प्रवरेच्या यशस्वी प्रयोगामुळे महाराष्ट्र शासनाने सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यास मदत व कर्ज उपलब्ध करून दिल्याने स्थानिक राजकीय पुढाऱ्यांच्या पुढाकारामुळे पश्चिम महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची झपाट्याने वाढ झाली व कारखान्यांच्या परिसरात आर्थिक विकास झाला.

अन्य प्रक्रिया उद्योगांमध्ये सहकारी कारखाने फारसे यशस्वी झाले नाहीत आणि शेतमाल विक्री व्यवहारांमध्ये सहकारी संस्था वाढल्या नाहीत. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेत या सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी खाजगी अनिर्बंध व्यवहाराला मुरड घालुन शासनाने नियमन-नियंत्रणे जारी करणे ही पूर्वअट आहे. त्याशिवाय सहकारी संस्था भक्कम पायावर उभे राहाणे दुष्कर आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशामध्ये कळीचा प्रश्न म्हणजे शेतमालाच्या भावाचा. शेतमालाच्या किंमतीत स्थैर्य लाभावे व व्यापारी पद्धतीमुळे शेतकरी लुबाडला जाऊ नये यासाठी, गाडगीळांच्या मते, "शेतमालाची खरेदी, साठा, रूपांतर व पुढे क्रमाने शेतीमालाची कमी-अधिक विक्री यांची जबाबदारी सरकारवर येते. ही जबाबदारी पार पाडण्यास सहकारी संस्था हे एकच प्रभावी व समाजहित पोषक साधन आहे. सरकारने घालून दिलेल्या किंमतीच्या मर्यादेत सहकारी संस्थांनी सर्व शेतमालाची खरेदी करावी, सरकारी साहाय्याने बांधलेल्या कोठारांत या मालाचा आवश्यक संचय इष्ट काळापर्यंत करावा. ज्या कच्च्या मालाचे काही रूपांतर आवश्यक आहे ते यंत्रसाहाय्याने किंवा इतर मार्गाने घडवून आणावे आणि यथाक्रम त्याच्या विक्रीची व्यवस्था करावी. एका विवक्षित कालातच सर्व शेतीमाल बाजारात येतो याचा अनिष्ट परिणाम घालविण्यास माल कोठारांची तरतूद झाली पाहिजे. परंतु ही मालकोठारे सरकारच्या किंवा सहकारी संस्थांच्या ताब्यात राहिली तरच या योजनेचा खरा फायदा शेतकऱ्यास होईल. हाच न्याय शेतीमालाचे रूपांतर करणाऱ्या अनेक व्यवसायांना लागतो. याबाबतही सहकारी संस्था कार्यक्षम बनू शकतात, परंतु अनिर्बंध व्यवहारांत त्यांना डोके वर काढणे दुरापास्त आहे. कोठारे व शेतीमालाचे रूपांतर करणारे कारखाने यांची संख्या व स्थलनिश्चिती या गोष्टी बहुतांशी पिकांचे क्षेत्रांवर अवलंबून असतात. यामुळे यांची तरतूद व वाढ ही खाजगी व्यक्तींच्या हाती न ठेवता ती नियोजित करणे हेच सोय व खर्च या दोन्ही दृष्टींनी योग्य आहे. एवंच, अडाणी व गरीब शेतकऱ्यास धूर्त व संपन्न खाजगी व्यावसायिकांच्या कचाट्यातून सोडविणे व वाहतूक व यांत्रिक साधनांचा यथायोग्य उपयोग होणे या दोन्ही दृष्टींनी या सर्व क्षेत्रांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. ज्यावेळी हा साधा व शुद्ध विचार राज्यकर्त्यांस पटेल तेव्हाच आपल्या समाजास स्थैर्य लाभेल व सहकारी संस्थांचे कार्य भरीव होईल व टिकून राहील."[3]

परंतु शासन व्यवस्थेवर जमीनदार, बडे व्यापारी, उद्योगपती यांचेच वर्चस्व असल्यामुळे सहकारी संस्था वाढीस सरकारने मदत केली तरी सहकारास पोषक अशी खाजगी अर्थव्यवहारावर नियंत्रणे घातली नाहीत. परिणामी भारतासारख्या अर्थरचनेमध्ये - जेथे विषमता, हक्कदारी व मक्तेदारी उत्कट आहे आणि समाज विस्कळीत मागासलेला व जाती-श्रेणीबद्ध आहे तेथे विकासाचे फायदे सामान्यांपर्यंत पोचणे अधिकच दुष्कर. परिणामी काही थोड्या जमातींच्या हाती सर्व आधुनिक व्यापार-उद्योग केंद्रित होऊन त्यांचे फायदे व सत्ता वाढत गेली. या परिस्थितीच्या संदर्भात गाडगीळ मांडतात की, "भारतातील स्पर्धात्मक व्यवहारांमध्ये अनियंत्रित, अनिर्बंध वर्तणूक जेवढी उघडी-नागडी दिसून येते तेवढी ती इतरत्र जगात कोठेही आढळणार

नाही. भारतातील आजची स्पर्धात्मक अर्थव्यवहाराची वाटचाल नैतिक अगर सामाजिक दृष्ट्या बिलकुल स्पृहणीय नाही. आर्थिक दृष्ट्या तिची क्षमता संशयास्पद आहे''[4]

''विद्यमान परिस्थितीतील खराखुरा धोका म्हणजे एकंदर समाज-जीवनात भ्रष्टाचार व लाचलुचपत यांची जी सर्वत्र वाढ होत आहे ती होय. राजकारणी पुढाऱ्यांच्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या, तसेच बुद्धिवंतांच्या व बौद्धिक व्यावसायिकांच्या शीलभ्रष्टतेस आधुनिक व्यापारउदीम वर्गात केंद्रित झालेली सत्ता हीच बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. विशेषकरून भारतीय नागरसमाज या भांडवलदारांच्या प्रभावामुळे अतिशय भ्रष्ट झालेला आहे. त्यामुळे जी प्रक्षोभक परिस्थिती निर्माण होते त्यातच खरा धोका आहे. विकास खर्चावर मोठा भर देण्यात आला आहे;पण त्यापासून फायदा करून घेण्याची संधी मात्र काही ठराविक वर्गांना अगर जमातींनाच मिळत आहे. त्यामुळेही पुन्हा या वर्गाचे आर्थिक व राजकीय सामर्थ्य वाढत जाते.''

'' जेथे लोकसंख्येच्या मानाने साधन-संपत्ती आणि विस्तार-संधी अत्यंत मर्यादित आहेत आणि जो समाज विषमता व विभिन्नता यामुळे परस्परांबद्दल अविश्वास आणि संशय यांनी सतत ग्रस्त आहे अशा समाजामध्ये स्पर्धाशील मनोवृत्तीला व चढाओढीच्या भावनेला उत्तेजन देणे अतोनात धोक्याचे असते. दाट लोकसंख्या व संकुचित विस्तारसंधी असलेल्या समाजाचा सर्वसमावेशक विकास घडवून आणावयाचा तर परस्परांच्या हितासंबंधी जपणूक, परस्पर सहकार्यावर सतत भर आणि इतरांचे हित डावलून स्वार्थ साधू पाहणाऱ्यांचे कडक शासन, हे सर्व केल्यासच तो साधू शकेल. निदान एवढ्याकरीता तरी भारताच्या सद्यस्थितीत सहकाराचे तत्त्वज्ञान हेच सर्वात अधिक युक्त मानले पाहिजे''[5].

भारतासारख्या जातिबद्ध समाजातील तळागाळातल्या श्रमिक जनतेपर्यंत आर्थिक विकास व सामाजिक न्याय पोचण्यासाठी सहकारी संघटना, गाडगीळ अनिवार्य मानत होते. परंतु प्रत्यक्षात मात्र सहकारी चळवळीने सहकारी तत्त्वे व मूल्ये सांभाळली नाहीत. भांडवलशाही, खाजगी क्षेत्राच्या अर्थवादाच्या मार्गानेच सहकाराने वाटचाल केली. सहकारी संस्थांमध्ये एकाधिकारशाही निर्माण होऊन वशिलेबाजी, भ्रष्टाचार व गैरव्यवहार वाढू लागले. सहकारी संस्था या मोठ्या संख्येने राजकीय पुढाऱ्यांच्या सत्ताकारणासाठी वापरल्या जाऊ लागल्या आणि निवडणुकी लढवण्याचे आखाडे बनल्या. सहकारी संस्थांचे सामान्य सदस्य हे संचालक मंडळावर अंकुश तर ठेऊ शकले नाहीतच; परंतु ते कर्जासाठी, कर्जवसुलीमधील सवलतीसाठी, नोकरीसाठी, पुढाऱ्यांचे अधिकाधिक मिंधे बनत गेले. अशा रीतीने ज्या सहकारी संस्थांमध्ये सहकारी संघटनाची मूलतत्त्वेच धुडकावली गेली, अशा संस्था अडचणीत आल्या. आज अनेक प्रक्रिया उद्योग, बँकिंग, पणन अशा विविध क्षेत्रातील संस्था संकटग्रस्त आहेत.

### जागतिकीकरणाचे गंडांतर

विशेषत: 1991 पासून भारतीय सत्ताधाऱ्यांनी नवीन आर्थिक धोरण स्वीकारून विनियंत्रण, खाजगीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते प्राबल्य आणि बाजारपेठेचा '' बळी तो कान पिळी'' चा अमल जारी केल्याने तर शेतकरी, मासेमारी करणारे, आदिवासी, कामगार, कर्मचारी हे सर्व श्रमिक आर्थिक संकटाने घेरले गेले. भारतीय शेती व शेतकऱ्यांचे भवितव्य तर विशेष धोक्यात आले आहे. शासनाने 1991 पासून खते, वीज, पाणी,

अशा विविध आदानांचे भाव वाढवले, कर्ज सवलती कमी केल्या, शेतजमिनीवरील विक्री बंधने शिथिल केली. 2000 व 2001 मध्ये शेतमालावरील आयात निर्बंध उठवले. परिणामी भारतातील शेतमालाचे भाव कोसळले आणि उत्पन्न व खर्चाची तोंडमिळवणी करणे अशक्य होऊन शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढू लागला. परिणामी जमिनी कंत्राटावर कसणे किंवा जमीन गमावण्यापर्यंत वेळ आली. शेतीचे कंपनीकरण करून फळे, फुले, भाज्या, मसाल्याचे पदार्थ इत्यादी मौल्यवान पिके आधुनिक तंत्राने निर्माण करून त्यांच्या निर्यात व्यवसायात बड्या कंपन्यांनी भरपूर नफा कमवायचा, शिवाय त्यापायी धान्य, तेलबिया आदींचे क्षेत्र कमी झाल्याने बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी अमेरिकेतील गहू, सोयाबीन आदी अतिरिक्त उत्पादने खपवण्यासाठी भारतीय बाजारपेठ बळकवायची असा व्यूह नवीन शेती धोरणामागे आहे. त्यामुळे भारताचे अन्न धान्याबाबतचे परावलंबन वाढेल आणि भारतातील बरेच शेतकरी व शेतमजूर शेतीतून उठवले जातील. खाजगीकरण, उदारीकरण जागतिकीकरणाच्या धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रातीलही रोजगार घटत आहे. त्यामुळे भारतीय श्रमिकांपुढील बेकारीचा प्रश्न उग्र बनत आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सहकारी लोकसंघटनाचा आधार घेता येईल का याचा उहापोह थोडक्यात करू.

## सहकारी संघटन उभारणीचा प्रश्न

शासनाच्या पूरक धोरणाची व मदतीची अपेक्षा नसताना आणि परकीय कंपन्या व वस्तू, सेवांची स्पर्धा तीव्र होत असताना सहकारी संघटना उभ्या कशा राहणार ? ग्रामीण पातळीवर विखुरलेल्या शेतकरी-शेतमजूर आदी उत्पादकांच्या संघटना उभारण्याचा प्रश्न तर विशेषच गुंतागुंतीचा आहे. गाव-तालुका पातळीवरील शिक्षक, प्राध्यापक व संघटित क्षेत्रातील अन्य शिक्षित कर्मचारी व व्यावसायिक यांच्या एकत्रित प्रयत्नांमधूनच असे संघटन बांधणे शक्य आहे. परंतु शिक्षित वर्ग बराचसा उदासीन बनलेला आहे. अनुदानित शिक्षण घेऊन, तुलनात्मक बरी पगारपातळी मिळवून स्वयंकेंद्री जीवन जगत आहे. समाजाने काय दिले व समाजाबाबतची आपली जबाबदारी याची चिंता दिसत नाही. त्यामुळे ग्रामीण समाज विस्कळित व दुभंगलेला राहात आहे. राजकीय हितसंबंधानुसार वापरला जात आहे. लोकहिताचा विचार करायला कोणतेच पुढारीपण खंबीरपणे उभे राहात नाहीत. तेव्हा शिक्षित वर्गाने आपल्या शैक्षणिक व अन्य कसबांचा उपयोग करून सहकारी उपक्रमांचा आरंभ करण्यासाठी स्थानिक पातळीवर लहान लहान उपक्रमांपासून प्रारंभ केला, विद्यार्थ्यांना या नव्या उपक्रमात आकर्षून घेतले तर नवे संघटन उभे राहू शकेल. गावची निसर्गसंपत्ती सांभाळणे, पाणी गावातल्या-गावात अडवणे, मुरवणे, साठवणे व पाण्याचे न्याय्य वाटप, सामाईक जमिनीचा इंधन, चाऱ्यासाठी सुयोग्य उपयोग अशा प्रश्नांवर ग्रामीण श्रमिक चळवळींद्वारा सहकारी संघटन उभे करणे शक्य आहे. तंत्र-वैज्ञानिक माहिती व अनुभव, पारंपरिक बियाणे सांभाळणे व जोपासणे, सेंद्रीय खते बनवणे, शेतकाम यासाठी सहकार्य करून संघटनेचा पाया भक्कम करणे शक्य होईल व शेती-उत्पादन वाढवता येईल.

## विक्री व्यवस्था

शेतीतील दुसरा कळीचा प्रश्न आहे शेतमालाच्या किंमतीचा. भाव पडले तर शेतकरी बुडतो आणि भाव वाढले तर त्याचा फायदा प्रामुख्याने व्यापारी

लाटतात. व्यापारी पाशातून शेतकरी सुटल्याविना या दुष्टचक्रातून तो बाहेर पडू शकणार नाही. शेतकऱ्यांना स्थिर स्वरूपाचे उत्पन्न मिळविण्यासाठी मध्यस्थ यंत्रणेला बगल देणे अगत्याचे आहे. त्यासाठी समुचित उत्पादक-ग्राहक-संघटन बांधण्याची गरज आहे. शेतमाल विक्रीसाठी तालुका-शहर पातळीवरील बँक, विमा, एस्. टी, वीज, राज्य शासन इत्यादीतील पगारदार, कामगार, कर्मचारी शिक्षक आदींच्या सहकारी ग्राहक संघटना नागरी केंद्रात संघटित करणे शक्य आहे. आज या कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतपेढ्या आहेतच. अशा कामगार-कर्मचाऱ्यांनी भ्रातृभावी ग्राहक-संस्था स्थापन करून आपापल्या तालुका-जिल्ह्यातील ग्रामीण उत्पादक संस्थांशी संलग्नित करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांकडून याद्वारे योग्य बांधील (आगाऊ ठरवलेला) भावास धान्य, डाळी, कांदे, शेंगदाणा, भाजीपाला इ. पुरवठा करण्याची यंत्रणा उभी राहिली तर शेतकऱ्यांचे अस्थिर भावामुळे सतत होणारे नुकसान व उत्पन्नातील अनिश्चितता दूर करता येईल. मध्यस्थ, व्यापारी, सावकार यांच्या कात्रीतून सुटण्यासाठी व शेतकऱ्यांनी आर्थिक कुवत कमावण्यासाठी उत्पादक व कामगार-कर्मचारी-ग्राहक संघटना आधारभूत होऊ शकेल. नागरी ग्राहकांनाही किरकोळ दुकानांमधल्या चढ्या किमतीला माल खरेदी करण्याऐवजी सहकारी पद्धतीने विक्री व्यवस्था केली तर तो घाऊक मालाच्या किंमतीत मिळू शकेल. उपभोगाबाबत प्रवाह प्रतितांप्रमाणे जाहिरातबाजीला किंवा 'फॅशन'ला बळी न पडता उत्पादक वस्तूंची चिकित्सक तपासणी करून मानवी गरजा आरोग्यवर्धक पद्धतीने भागवण्याच्या दृष्टीने वस्तूंची निवड करणे, छोट्या उत्पादकांच्या उत्पादनास ('ब्रँड' नसला तरी गुणवता जोखून) उत्तेजन देणे अशा वेगळ्या पद्धतीने उपभोगाचा विचार करणे महत्त्वाचे आहे. अशी सम्यक् दृष्टी बाळगून संघटित क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सहकारी संघटना उभारण्याची जबाबदारी घेणे व ग्राहक सदस्यांनी संघटनांशी एकनिष्ठ राहाण्याचे पथ्य पाळणे अगत्याचे आहे. तरच परस्परहितपोषी सहकारी चळवळ उभी करता येईल.

**ग्रामीण उद्योग**

शेती विकासाबरोबरच ग्रामीण उद्योगीकरणासाठीच्या चळवळीची गरज आहे. आज गावातले उत्पादन पड्या भावाने बाहेर जाते व चढ्या भावाने कारखान्यात बनवलेला माल गावात पुन्हा परत येतो. यामध्ये गावकऱ्यांचे मोठे नुकसान होते. जो साबण पाच रूपयाला बनेल तो लक्सचे वेष्टन गुंडाळून पंधरा रूपयाला मिळतो. लक्सच्या जाहिरातबाजीतून ग्रामीण बाजारपेठही व्यापली जाते. गोड तेल, पेंड, चपला अशा ग्रामीण भागात उत्पादन होण्यासारख्या वस्तू तिप्पट-चौपट किंमतीला कारखान्यातून गावामध्ये येतात. या प्रक्रियेत गावात कोणताच उद्योग शिल्लक न राहिल्याने रोजगार नाहीसा होतो. ग्रामीण पातळीवर प्रक्रिया व इतर उद्योग सुरू झाल्यास शेती-पशुपालन, वने-जंगले यांचे साधारण 30-40 टक्के उत्पादन गावीच वापरले जाईल. अर्थात कोणत्या वस्तूचे उत्पादन गाव पातळीवर करायचे, मंडी पातळीवर करायचे, तालुका पातळीवर करायचे याबाबतचे निर्णय गावात/परिसरात किती मागणी असेल, कोणते तंत्रज्ञान वापरणे कार्यक्षम होईल याचा विचार करून ठरवावे लागेल. अशा विकेंद्रित सहकारी उत्पादन व्यवस्थेमुळे गावोगावच्या महिला, तरूण यांना रोजगार उपलब्ध होईल व गावातला रोजगार वाढविता येईल. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अतिक्रमण थोपविण्यासाठीही

पर्यायी स्थानिक उत्पादने उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. विकेंद्रित उत्पादन व्यवस्थेमुळे अनाठाई वाहतूकीमुळे होणारी उर्जेची उधळपट्टी व वेष्टन (packing) खर्च वाचेल.

**सर्वव्यापी सहकार**

शेती व जंगल उत्पादने यांची सहकारी विक्री व्यवस्था, शेतमाल प्रक्रि या उद्योग व ग्रामीण ग्राहकांच्या गरजांनुसार विविध वस्तूंचे उत्पादन (खाद्यपदार्थ, कापड, तयार कपडे, स्टेशनरी, चपला, साबण, फर्निचर, अवजारे, भांडी, उपकरणे, प्लॅस्टिक सामान इ.) ग्रामीण भागात सहकारी संघटनेद्वारा लोकसहभागाने संघटित करणे जसे शक्य आहे तसेच घरबांधणीतही सहकारी संघटना महत्वाची आहे. सुतार, गवंडी, रंगारी आदी कारागीर यांच्या सहकारी संघटना स्थापन करून सहकारी गृहरचना मंडळाशी त्यांचे थेट संबंध जोडून मध्यस्थांना बगल देणे शक्य आहे. सहकारी पद्धतीने घरे, शाळा वा इतर सार्वजनिक इमारती बांधताना स्थानिक परिस्थितीला अनुरूप अशी रचना स्थानिक बांधकाम साहित्य वापरून करण्यावर भर देणे शक्य होईल. पडजमिनीच्या हरितीकरणाचा कार्यक्रम आणि गावरान लाकडावर व बांबूवर प्रक्रिया करून त्याचा इमारतीसाठी वापर करणे हे बांधकाम खर्च कमी करणे आणि ऊर्जा वाचवणे या दोन्ही दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**आरोग्य व्यवस्था**

सहकारी आरोग्य व्यवस्था उभारण्याचे मोठे आव्हान आपणापुढे आहे. महागाईमुळे आहार निकृष्ट बनत चालला आहे. जाहिरातबाजीमुळे घातक (कोकाकोला, गुटखा) पदार्थसेवन पसरत आहे. शहरांमध्ये प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे प्रकृती खालावत आहे. औषधांच्या वाढत्या किमती आणि डॉक्टरी सेवेला आलेले धंद्याचे स्वरूप यामुळे आजारपणाचा खर्च परवडेनासा होत चालला आहे. यातून आपणास संघटितरित्याच मार्ग काढला पाहिजे. प्रागतिक डॉक्टरांच्या मार्गदर्शनातील सहकारी लोक-आरोग्य केंद्र उभे करणे शक्य आहे. समुचित आहार, पाणी शुद्ध करणे, प्राथमिक काळजी याविषयी मार्गदर्शन, वैद्यकीय सल्ल्याची शास्त्रीय छाननी, घाऊक औषधे आणून त्यांचा स्वस्त किमतीत पुरवठा, गावपातळीवर प्राथमिक उपचार व सल्ला देण्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, प्रश्नमंजुषा अशा उपक्रमांपासून प्रारंभ करून संघटनेची उपयुक्तता शाबीत झाली की सदस्य संख्या वाढवणे व कामाची व्याप्ती वाढवणे शक्य होईल. सहकारी आरोग्य केंद्र सदस्यांना गट-विमा योजनेद्वारे आरोग्यसुरक्षा व्यवस्था करता येईल. या सर्व उपक्रमांमागचे मूळ सूत्र म्हणजे परस्परहिताचा विचार करून व सहकारी संघटनांची पथ्ये पाळून बहुराष्ट्रीय कंपन्या, बड्या कंपन्या, सावकार, व्यापारी, मध्यस्त, कंत्राटदार, नफेखोर डॉक्टर आदींकडून शेतकरी, ग्राहक यांची जी पिळवणूक केली जाते आहे ती रोखणे व शासनाचे देशविकाऊ धोरण हटवणे.

जागतिकीकरणाच्या जमान्यातील बाजार मूलतत्त्ववादामुळे (market fundamentalism) पैसा हे दैवत बनून केवळ आर्थिक जीवनच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्येही बाजारीकरण व विकृतीकरण वाढीला लागून सामाजिक ऱ्हास व राजकीय अराजकाचा धोका वाढत आहे. याची झळ आजच्या सुस्थितीतील, शिक्षित वर्गालाही लागण्याचा संभव आहे. तेव्हा थोडा दूर पल्ल्याचा विचार करून शिक्षित वर्गाने समाजाबाबतची आपापली जबाबदारी माफक प्रमाणात जरी उचलली तरी अशा सामूहिक प्रयत्नातून परस्परहितपोषी सहकारी संघटना उभे करणे शक्य आहे. सहकारी

चळवळीमागील जीवनदृष्टी-स्पर्धेऐवजी सहकार आणि माणूसकी व सामूहिकता जोपासली तर आक्रमक बाजारशाहीशी आपण लढत देऊ शकू. समाज-अर्थव्यवहारामध्ये अशा लोक-सहभागी व लोकहितकारी संघटना उभ्या केल्यास आजच्या दुर्बल, विखुरलेल्या, उध्वस्त होत चाललेल्या श्रमिकांना मोठा आधार मिळेल, त्यांची कुवत वाढून, राजकीय मिंधेपण कमी होईल. अशा मर्यादित प्रयत्नांपासून आरंभ करून आपणास न्याय्य, भ्रातृभावी समानतेवर समाज-अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवून अधिकाधिक व्यापक व भक्कम लोक संघटन उभे करण्याच्या दिशेने वाटचाल करता येईल.

### संदर्भसूची


1. गाडगीळ ध. रा., सहकारी लोकराज्य, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे 4, 1967, पृ. 72-73

2. उपरोक्त, पृ. 73-76

3. ब्रह्मे सुलभा सहकारी चळवळीचे समालोचन, 1948, ध.रा. गाडगीळ लेखसंग्रह: भाग 1, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, 1974, पृ. 202-203.

4. सहकारी लोकराज्य, पृ. 80.

5. उपरोक्त, पृ. 81


●●●

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## घटना दुरूस्ती

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या घटनेत आवश्यक त्या दुरूस्त्या सुचविण्यासाठी श्री. आ. देशपांडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले आहे.

परिषदेच्या ज्या सदस्यांना घटना दुरूस्ती विषयक सूचना करावयाच्या असतील त्यांनी आपल्या सूचना 15 मार्च 2005 पर्यंत खालील पत्त्यावर पाठवाव्यात.

**श्री. आ. देशपांडे**
**481, प्राध्यापक नगरी,**
**हनुमान नगर, नागपूर-440009.**

**प्रमुख संपादक**
**'अर्थसंवाद'**

# सहकारी चळवळ - संघटन, व्यवस्थापन आणि नवीन आर्थिक धोरण

● सु. मो. भानुशाली, पुणे.
*माजी सहायक संपादक, अर्थसंवाद.*

**स**हकार्य ही एक सहज आणि नैसर्गिक मानवी प्रवृत्ती असली तरी सहकार ही तशी मानवी विचारधारा नाही. कारण सहकार्याच्या प्रवृत्तीत तिची परतफेड होण्याची स्वार्थाची प्रेरणा व्यक्तिला कार्यप्रवृत्त करीत असते. सहकाराच्या संकल्पनेत व्यक्तिला स्वार्थाच्या प्रेरणेला मर्यादित करावे लागते, सामायिक लाभासाठी स्वत:च्या लाभावर पाणी सोडावे लागते. सहकार ही आदर्श आणि कल्याणकारी संकल्पना असली आणि त्यातून समाजाचे व्यापकहित मोठ्या प्रमाणात साध्य होत असले तरी सामान्यांना या संकल्पनेत सहभागी करून घेण्यासाठी त्यांची सहज प्रवृत्तीना मुरड घालण्याची मानसिक तयारी करावी लागते. व्यक्तिला सहकाराची संकल्पना वृत्तीत सामावून तिचे संवर्धन करावे लागते. म्हणूनच सहकार ही संकल्पना समाजात मूळ धरून असली तरी भांडवलशाही खाजगी व्यवसायप्रणाली सारखी ती फोफावली नाही. समाजात सहकाराच्या संकल्पनेने मूळ धरावे, तिची चहुबाजुनी भरघोस वाढ व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न करावे लागतात.

सहकार ही संकल्पना सहकारी संस्थेच्या स्थापनेपेक्षा आणि सुचारु प्रशासनापेक्षा तसेच कार्यक्षम व्यवस्थापनापेक्षा जास्त व्यापक आणि गहिरी संकल्पना आहे. सहकारी संस्था सहकाराच्या संकल्पनेचा एक अविभाज्य भाग आहेत, पण सहकार म्हणजे सहकारी संस्था नव्हेत. विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करून जोपासणे व सभासदांचा तसेच समाजाचा लाभ घडवून आणणे अशीच सहकाराची धारणा नेहमीच्या विवेचनात मानली जाते. विविध कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांमध्ये सहकार निर्माण करणे हेही त्या विवेचनात समाविष्ट केले जाते. म्हणूनच कदाचित सहकारी संस्थेची व्याख्याच सहकाराची व्याख्या व त्या संस्थेची ध्येये उद्दिष्टे ही सहकाराची ध्येये, उद्दिष्टे म्हणून मांडली जात असावीत.

सहकार ही संकल्पना, ही चळवळ सर्वप्रकारच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेस पोषक आहे. तसेच विविध प्रकारच्या समाजव्यवस्था साध्य करू पहात असलेली उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी सहाय्यभूत ठरलेली आहे. शुद्ध भांडवलशाही तसेच

शुद्ध साम्यव्यवस्था व या दोन टोकांच्या समाजव्यवस्थांच्या विविध मिश्र व्यवस्थांमध्ये ती सारख्याच कार्यक्षमतेने कार्य करीत असते. या समाजव्यवस्थांमधून निर्माण होणाऱ्या समस्यांचे, दोषांचे गांभीर्य कमी करण्यात सहकारी व्यवस्थेने सक्रीय हातभार लावलेला आहे. पूर्णपणे विकसित, विकसनशील तसेच अविकसित समाजव्यवस्थांमध्ये सहकाराची चळवळ सारखीच लोकप्रिय आहे. अशा विविध समाजव्यवस्थांमध्ये सहकारी प्रणाली कार्य करीत असल्यामुळे तिचे स्वरूप, तिची उद्दिष्टे, आणि संघटन वेगवेगळे राहिले आहे. महत्त्वाचे म्हणजे भांडवलशाही समाजव्यवस्थेला तसेच साम्यवादी समाजव्यवस्थेला सहकारी व्यवस्था समर्थ पर्याय आहे. सरंजामशाहीतील दुष्ट प्रवृत्तींनी केलेल्या पिळवणुकीतून व मनमानी कारभारातून भांडवलशाही व्यवस्थेची निर्मिती होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील श्रमिकांच्या दुरावस्थेतून आणि या समाजव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या विषमतेतून समाजवादी समाजव्यवस्थेची निर्मिती होते. सहकारी प्रणालीच्या कार्यपद्धतीतून कोणतीही नवीन समाजव्यवस्था निर्माण होत नाही. तरीसुद्धा सहकार ही एक अवशिष्ट (residual)समाजव्यवस्था म्हणूनच विचारात घेतली जाते. भारतात गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकापासून राबविण्यात आलेल्या नवीन आर्थिक धोरणात समाजव्यवस्था सुधारण्याचा एक खात्रीशीर मार्ग, किमानपक्षी एक पर्यायी मार्ग म्हणूनही सहकारी व्यवस्थेचा विचार झाल्याचे दिसून येत नाही. इंग्लंड, जपान, स्वीडन, व्हिएतनाम, इस्राइल, इस्टोनिया या देशात मात्र संरचनात्मक सुधारणांच्या अंमलबजावणीमुळे सहकारी व्यवस्थेला जास्त सकारात्मक भूमिका बजावण्याची संधी प्राप्त झाली. या संधीचा या देशातील सहकारी व्यवस्थेने चांगलाच लाभ उठवून आपली ताकद वाढविली, लोकप्रियता वृद्धिंगत केली.

सहकारी व्यवस्थेची तत्त्वप्रणाली मजबूत पायावर आधारलेली आहे. असे असले तरी सहकार व्यवस्थेची सतत उत्क्रांती होत असते. सहकार व्यवस्था खूप लवचिक असून तिच्यात नवीन विचार प्रवाह सामावून घेण्याची क्षमता आहे. सहकारामध्ये सर्वजण तारतम्याने वागतील अशीच या व्यवस्थेची चौकट आहे. उत्पादन साधनांच्या मालकीतून निर्माण होणारा वाढावा, खंड वास्तविक प्राहता समाजाची मत्ता आहे. या विचारातूनच मक्तेदारी उत्पन्नाच्या सामाजीकरणाच्या संकल्पनेचा विकास झाला. शेतजमीन, उद्योग समाजाच्या मालकीचे असावेत, सार्वजनिक मालकीचे नव्हेत. मक्तेदारी असूच नये, असलीच तर ती समाजाची असावी. भांडवली अथवा साम्यवादी व्यवस्थेत निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचे आणि उद्योगांचे सामाजीकरण करणे हा एकमेव रास्त पर्याय आहे. असे केल्यामुळे काम करण्याची प्रेरणा नष्ट होते हा आक्षेप नसून सबब आहे. सुयोग्य व्यवस्थापन आणि प्रशासन यांच्या अंमलबजावणीमधून ही प्रेरणा निर्माण करता येते आणि भांडवलशाही खाजगी व्यवस्थेपेक्षा ही प्रेरणा जास्त प्रभावी आणि शाश्वत असते. वस्तुचे मूल्य त्या वस्तुच्या उत्पादनासाठी लावलेल्या श्रमांवर अवलंबून नसून वस्तुच्या उपयोगितेवर अवलंबून असते, यातूनच जास्तीत जास्त लोकांचे कमाल समाधान साध्य करण्याच्या संकल्पनेचा उदय झाला. सहकाराची व्याख्या आणि सहकाराची तत्त्वे यामध्ये झालेल्या बदलांचा आढावा घेतल्यास सहकार व्यवस्थेच्या लवचिकतेची आणि उत्क्रांतीक्षमतेची कल्पना येते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या 1995 मध्ये

झालेल्या अधिवेशनात सहकाराच्या व्याख्येत एक लहान परंतु महत्त्वाचा बदल करण्यात आला. आपल्या आर्थिक आणि सामाजिक गरजांच्या तसेच आकांक्षांच्या पूर्ततेसाठी सर्वांनी स्वेच्छेने एकत्र येऊन सामायिक मालकी असलेली व लोकशाही पद्धतीने नियंत्रित करता येईल अशा पद्धतीने स्थापन केलेली स्वायत्त संघटना म्हणजे सहकारी संस्था होय. लोकांनी आपल्या सांस्कृतिक गरजांची पूर्तता अशा संस्थांच्या माध्यमातून करावी याचा उल्लेख वरील व्याख्येत नाही. वर उल्लेखिलेल्या अधिवेशनात लोकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या सांस्कृतिक गरजा पूर्ण करणाऱ्या, सामाजिक मालकीच्या लोकशाही पद्धतीने नियंत्रित केलेल्या संस्था सहकारी संस्था म्हणून विचारात घेता येऊ लागल्या.

सहकारी व्यवस्था मूल्याधारीत व्यवस्था आहे. स्वहित, कमाल नफा, संपत्ती व साधनांचे मक्तेदारीकरण या सारख्या संकुचित आणि अशाश्वत अशा निसरड्या तत्त्वांवर आधारलेली नाही. स्व-मदत, स्वतःच्या जबाबदारीची जाणीव, लोकशाही तत्त्वांचा आदर, समता, समानता, एकता या सारख्या सामाजिक मूल्यांवर तसेच सचोटी, नियमांचे पालन करण्याची वृत्ती, कायदा व न्याय याबद्दल आदर, विचारातील व वर्तनातील खुलेपणा, दुसऱ्यांच्या बद्दल काळजी घेण्याची व दुसऱ्यांच्या मतांचा आदर करण्याची प्रवृत्ती या सारख्या नैतिक व्यक्तिगत मूल्यांवर ती आधारलेली आहे. ही मूल्ये शाश्वत, समाजाच्या धारणेला तसेच विकासाला पोषक असणारी असल्यामुळे सहकारी व्यवस्थेचे लोकांवर आणि समाजावर हितकारक परिणाम होत असतात. सहकाराच्या तत्त्वांच्या माध्यमातून ही मूल्ये कार्यान्वित केली जात असतात. अर्थात्, या मूल्यांचे अग्रक्रम कालमानानुसार बदलत गेलेले दिसतात.

## सहकाराची मूलतत्त्वे

सहकाराची रॉशडेल मूलतत्त्वे आणि आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने 1995 च्या अधिवेशनात स्वीकारलेली सहकाराची मूलतत्त्वे यामध्ये काही प्रमाणात मूलभूत आणि काही प्रमाणात तपशीलात फरक आहे. यातून सहकाराची बदलत्या काळातील नवे विचारप्रवाह सामावून घेण्याची आणि सहकाराच्या मूलतत्त्वांतील लवचिकता दिसून येते.

### सहकाराची रॉशडेल मूलतत्त्वे

#### 1. खुले व ऐच्छिक सभासदत्व

सहकारी संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक असावे. कोणालाही सामाजिक, राजकीय, वांशिक अशा कृत्रिम आधारावर भेदभाव न करता सभासदत्व उपलब्ध असावे. सहकारी संस्थेच्या सेवेचा उपयोग करून घेणाऱ्याला आणि सभासदत्वातून येणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास तयार असणाऱ्याला सभासदत्व उपलब्ध असले पाहिजे. सहकारी संस्थांनी समाजात कृत्रिम भेदभावातून निर्माण झालेला पूर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांनाही सहकारी संस्थांचे सभासदत्व खुले असले पाहिजे.

#### 2. लोकशाही नियंत्रण

सहकारी संस्था लोकशाहीवादी असतात. सभासदांनी मान्य केलेल्या पद्धतीने नेमलेल्या अथवा निवडून आलेल्या लोकांनी सहकारी संस्थेचे प्रशासन चालविले पाहिजे. सभासदांना मतदानाचा आणि सहकारी संस्थेची संबंधित निर्णयात सहभागी होण्याचा समान हक्क उपभोगता आला पाहिजे. सहकारी संस्थेत सर्वांना समान वागणूक मिळाली पाहिजे आणि सर्वांना संस्थेवर सारखेच नियंत्रण ठेवण्याचा हक्क असला पाहिजे. सहकारी संस्थेचे

व्यवहार परिणामकारक रीतीने पार पाडण्यात सर्व सभासदांनी सहकार्य दिले पाहिजे.

**3. भागभांडवलावर मर्यादित परतावा**

भागभांडवलावर सभासदांना मिळणारा परतावा मर्यादित असला पाहिजे. याचा अर्थ असा की सहकारी संस्थेने लोकांपेक्षा नफ्याला जास्त महत्त्व देऊन प्राधान्य देऊन सट्टेबाजी करण्यासाठी गुंतवणूक करू नये. सहकारी संस्थेची गुंतवणूक सर्वांच्या हितासाठी, भल्यासाठी असते.

**4. सहकारी संस्थेच्या कार्यातून निर्माण होणारा वाढावा संस्थेच्या व्यवहारात सहभागी होणाऱ्यांचा असतो**

सहकारी संस्थेच्या कार्यातून निर्माण होणारा निव्वळ वाढावा त्या संस्थेच्या कार्यात सहभागी होणाऱ्या सभासदांच्या मालकीचा असतो. त्याचे वाटप समान पद्धतीने झाले पाहिजे. हे तीन प्रकारांनी करता येते. अ) सहकारी संस्थेच्या विकासासाठी निधी बाजूला काढून ठेवणे, ब) सभासदांना सेवा पुरविण्यासाठी त्याचा विनियोग करणे, आणि क) सभासदांनी सहकारी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात त्याचे वाटप करणे.

**5. सहकाराचे शिक्षण**

सर्व सहकारी संस्थांनी आपले सभासद, अधिकारी सेवक आणि जनता यांना सहकाराच्या आर्थिक तसेच लोकशाहीवादी तत्त्वांचे आणि तंत्राचे शिक्षण दिले पाहिजे. सभासदांना सहकारी संस्थांच्या योगदानाची जाण झाली पाहिजे. सहकारी संस्था कशा कार्य करतात याची माहिती असलेले लोक सहकारी संस्थांच्या व्यवहारांचे नियमन करण्यात जास्त प्रत्ययकारी भूमिका बजावू शकतात.

**6. सहकारी संस्थांचा सहकार**

आपल्या सभासदांचे आणि समाजाचे हित जास्त चांगल्या प्रकारे जपण्यासाठी सहकारी संस्थांनी स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांबरोबर शक्य असलेल्या सर्व प्रकारांनी सहकार्य केले पाहिजे. या मूलतत्त्वांच्या कार्यवाहीतून सहकारी संस्था आपल्या सभासदांचे हित साधण्याचा आणि त्यांना मदत करण्याचा जसा प्रयत्न करतात तसाच प्रयत्न त्या इतर सहकारी संस्थांसाठी करू शकतात. परस्परांबरोबर सहकार्य करून सहकारी संस्था सहकारी चळवळीला बळकटी आणू शकतात तसेच सामाजिक दृष्टीकोन विशाल करू शकतात.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या शताब्दि सोहळ्याच्या निमित्ताने मँचेस्टर येथे 1995 मध्ये भरलेल्या परिषदेत विसाव्या शतकाच्या अखेरीस निर्माण होणारी परिस्थिती विचारात घेऊन सहकारी चळवळीची भूमिका स्पष्ट करणारी तत्त्वे पुन्हा मांडण्यात आली. ती तत्त्वे अशी -

**1)ऐच्छिक व खुले सभासदत्व** - सहकारी संस्थेच्या सेवांचा लाभ घेऊ शकणाऱ्या व सभासदत्वातून निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारणाऱ्या सर्वांना सामाजिक, वांशिक, राजकीय, धार्मिक अथवा लिंगभेद न करता सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले असावे. सहकारी संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक आहे.

**2. सभासदांचे संस्थेवरील लोकशाही नियंत्रण**

सहकारी संस्थेचे धोरण ठरविण्यात आणि निर्णय प्रक्रिया निश्चित करण्यात सक्रीय सहभाग घेणाऱ्या सभासदांचे सहकारी संस्थेवर नियंत्रण असते. सभासदांमधून निवडून आलेले स्त्री अथवा पुरूष

प्रतिनिधी संचालक म्हणून कार्य करतात. ते सभासदांना जबाबदार असतात. प्राथमिक सहकारी संस्थांमध्ये सर्व सभासदांना 'एक सभासद-एक मत' असा मतदानाचा समान अधिकार असतो. वरच्या पातळीवरील सहकारी संस्थांमध्येही असेच लोकशाही पद्धतीचे नियंत्रण असते.

### 3. सभासदांचा आर्थिक सहभाग

सहकारी संस्थेमध्ये सभासद समानपणे भांडवल गुंतवितात व त्यावर त्यांचे लोकशाही पद्धतीचे नियंत्रण असते. या भांडवलापैकी काही भाग तरी सर्वसाधारणपणे सामाजिक मत्ता असते. सभासदत्वाची अट म्हणून गुंतविलेल्या भांडवलावर, शक्य असेल तर, मर्यादित लाभांश दिला जातो. सहकारी संस्थेने प्राप्त केलेल्या आणि लाभांश दिल्यानंतर शिल्लक राहिलेल्या वाढाव्याचा पुढील कारणांसाठी विनियोग केला जावा. अ) सहकारी संस्थेचा विकास करणे, ब) राखीव निधी गोळा करणे. यातील काही भाग कोणत्याही कारणांसाठी वर्ग करता येणार नाही, क) सहकारी संस्थेत सभासदाने केलेल्या गुंतवणुकीच्या प्रमाणात परताव्याचे वाटप करावे, आणि ड) सभासदांनी मान्य केलेल्या इतर कार्यासाठी मदत करावी.

### 4. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य

सहकारी संस्था सभासदांच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या स्वायत्त व स्वमदतीवर उभ्या राहणाऱ्या संस्था आहेत. शासन अथवा इतर कोणत्याही संस्थेशी सहकारी संस्थेने करार करताना अथवा बाहेरून भांडवल उभे करताना सभासदांचे लोकशाही नियंत्रण आणि सहकारी संस्थेची स्वायत्तता अबाधित राखली जाईल याची दक्षता घेतली पाहिजे.

### 5. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

सहकारी संस्थेने आपले सभासद, निवडून आलेले प्रतिनिधी, व्यवस्थापक आणि सेवक यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यायोगे सहकारी संस्थेच्या विकासात ते परिणामकारकपणे सहभाग घेऊ शकतील. सहकाराचे स्वरूप व सहकाराचे लाभ याबद्दल सर्वसाधारण जनतेला आणि विशेषत: तरूणांना आणि जनमतावर प्रभाव पाडणाऱ्या नेत्यांना सहकारी संस्थेने माहिती दिली पाहिजे.

### 6. सहकारी संस्थांमधील सहकार

सहकारी संस्थांनी सभासदांना उत्तम सेवा पुरविली पाहिजे. स्थानिक, राष्ट्रीय, विभागीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांबरोबर सहकार्य करून त्यांनी सहकारी चळवळ सक्षम व बलवान केली पाहिजे.

### 7. समाजाबद्दलचे कर्तव्य

सभासदांनी मान्य केलेल्या धोरणात्मक उपायातून सहकारी संस्था आपल्या समाजाच्या कायमस्वरूपी विकासासाठी कार्य करतात.

वरील परिच्छेदात विवेचन केलेल्या रॉशडेल व आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने स्वीकारलेल्या सहकाराच्या तत्त्वांचे परिशीलन केले असता असे दिसून येते की आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने स्वीकारलेली सहकारी संस्थांची तत्त्वे काळातील बदलांची दखल घेणारी तसेच जास्त व्यापक, व्यवहारी आणि प्रत्ययकारी आहेत. संघाच्या तत्त्वाप्रमाणे सहकारी संस्थांचे सभासदत्व महिला व पुरूषांना सारखेच खुले आहे. रॉशडेल तत्त्वांमध्ये सर्वांना समान वागणूक देण्यावर व सर्वांना नियंत्रणाचा सारखाच हक्क असण्यावर भर दिला आहे तर संघाने स्वीकारलेल्या तत्त्वांमध्ये सहकारी संस्थांचे

प्रतिनिधी सभासदांना जबाबदार असण्याचा निगम शासनाचा मुद्दा अधोरेखित केला आहे. शिवाय 'एक सभासद-एक मत' या तत्त्वाचा येथे पुरस्कार केलेला आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने रॉशडेल तत्त्वात समाविष्ट न केलेल्या एक महत्त्वाच्या मुद्याचा अंतर्भाव केला आहे. भागभांडवलावर सभासदांना लाभांश देण्याची कल्पना येथे मांडली आहे. सभासदांना सहकारी संस्थेशीच व्यवहार करण्यास प्रवृत्त करण्यासाठी सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात परतावा देण्याचा भागही समाविष्ट केलेला आहे. सहकारी संस्थेने मिळविलेल्या वाढाव्याचे वाटप करण्याची संघाची पद्धत जास्त शास्त्रशुद्ध वाटते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने स्वीकारलेल्या तत्त्वांमध्ये सहकारी संस्थांना सभासदांशिवाय इतरांकडून भांडवल घेण्याची मुभा देण्यात आली आहे. तसेच इतर संस्थांबरोबर करार करून व्यवहार करण्याची मुभाही दिली आहे. यातून सहकारी संस्था व बिगर-सहकारी संस्था यामध्ये संबंध प्रस्थापित होऊन व्यवहारांची व्यापकता वाढेल. आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने स्वीकारलेल्या तत्त्वांमध्ये तरूणांमध्ये व जनमतावर प्रभाव पाडणाऱ्या नेत्यांमध्ये सहकाराबद्दल जागृती निर्माण करण्याची अपेक्षा आहे. संघाने सहकारी संस्थांची सामाजिक जबाबदारीही स्पष्टपणे मांडली आहे. रॉशडेल तत्त्वात या तीनही मुद्यांचा उल्लेख नाही. याचा अर्थ असा की बदलत्या काळाबरोबर सहकारी संस्थांची प्रवृत्ती, मनोवृत्ती व वर्तणूक बदलत आहे. सहकार ही स्थिर संकल्पना नसून ती प्रवाही, सतत बदलणारी, समाजाभिमुख आहे हे विशेष होय.

**सहकार प्रणाली - एक गतीशील व्यवस्था**

सहकार संघटन पद्धती विकसित होत जाणारी प्रणाली आहे. स्वतःच्या हिताविषयी दक्ष असणारे लोक सहकारी संस्था स्थापन करतात. हे लोक व्यक्तिगतरित्या, स्वतंत्रपणे आपले उद्दिष्ट साध्य करू शकत नाहीत हे त्यांना माहित असल्यामुळे त्यांना सहकाराच्या माध्यमातून उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करावा लागतो. या संस्थांचे व्यवस्थापन आणि प्रशासन या सहकारी संघटनांच्या यशाची गुरुकिल्ली होत. सहकारी संघटन प्रणालीच्या उत्क्रांतीमधून बदलत्या पद्धतीमधील उत्तम गोष्टी स्वीकारण्याची प्रवृत्ती सहकारी संस्थांमध्ये निर्माण होत असते. सहकारी संस्थांची व्याप्ती आणि उत्क्रांती होण्याची क्षमता वाढविता आली तर आपले सर्व व्यवहार आपण सहकारी प्रणालीच्या कक्षेत आणू शकू. सहकारी संस्थांच्या उत्क्रांतीतच समाजाच्या विकासाचा मार्ग आहे. आपल्याला सहकारी प्रणाली सर्वतोपरी अंगिकारली पाहिजे कारण आपला समाज सहकाराशिवाय जगू शकत नाही. आपले भौतिक तसेच भावनिक आयुष्य सहकारावरच आवलंबून आहे. आपले विचार आणि आपल्या कृती याना एकाच सूत्रात गोवणाऱ्या सहकारी प्रणालीतून समाजाची निर्मिती होत असते. आपण सहकारी जीवन पद्धतीतूनच विकसित होऊ शकतो. सहकारी प्रणालीच्या सुधारणेला वाव असल्यामुळे सहकारी संघटन पद्धतीची उत्क्रांती होत राहिली. सहकारी संघटन पद्धतीच्या उत्क्रांत होत जाण्याच्या वैशिष्ट्यांमुळेच सहकार प्रणालीचे जास्तीत जास्त लाभ आपण प्राप्त करू शकतो. त्यामुळेच इतर संघटन पद्धतीपेक्षा सहकारी संघटन पद्धती स्पर्धात्मक दृष्ट्या श्रेष्ठ ठरली आहे.

आपल्या विचारांमध्ये आणि कृतीमध्ये समन्वय साधण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीमुळे सहकारी प्रणाली यशस्वी होऊ शकते. त्यामुळेच व्यक्तिला स्वतंत्रपणे

न करता येणाऱ्या गोष्टी सहकारी प्रणाली करू शकते. खाजगी व्यवसाय संस्थांना एक सशक्त पर्याय म्हणून सहकारी प्रणाली ठामपणे उभी राहू शकली आहे. खाजगी व्यवसाय संस्थांमधील विनाशकारी स्पर्धेचे सर्व घातक परिणाम सहकारी प्रणाली टाळू शकते. आपला नफा कमाल पातळीपर्यंत वाढवू इच्छिणारी खाजगी व्यवसाय संस्था प्रणाली आपला नफा वाढत असेल तर देशाचे कायदे पायतळी तुडविण्यास, समाजाचे नुकसान घडवून आणण्यास तसेच पर्यावरणाचा ऱ्हास करण्यासही कचरत नाही. सहकारी प्रणाली मात्र कायद्यांच्या चौकटीत राहून समाजाचे अधिकतम हित साधण्यास आणि समाजविकास पर्यावरण विकासासह साध्य करता येतो हे सिद्ध करण्यास कटिबद्ध असते. बऱ्याच देशांमधील सहकारी व्यवस्था असे करताना आढळत नाही कारण ती आपल्या ध्येयांपासून दूर गेलेली भ्रष्ट व्यवस्था आहे. सहकारी प्रणालीची व्याप्ती जशी वाढत जाते, सहकाराची तत्त्वे लोक जसजसे जास्त आत्मियतेने अमलात आणू लागतात तशी तिला नवनवीन आव्हाने सहजपणे पेलण्याचे सामर्थ्य प्राप्त होत जाते. हीच सहकारी व्यवस्थेची उत्क्रांती होय. अशी आव्हाने खाजगी व्यवसाय संस्था टाळत आलेल्या आहेत. त्यामुळे सहकारी चळवळीची परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढत जाते. सहकारी प्रणालीची व्याप्ती जसजशी वाढत जाते, सहकारी व्यवस्था जसजशी जास्त सक्षम, सबळ होत जाते तसतसे या प्रणालीपासून मिळणारे लाभ वाढत जातील जास्त लोकांपर्यंत पोहोचत जातील आणि सर्व विश्वामध्ये सहकारी प्रणाली ही एकच प्रणाली व्यापून राहील.

सामायिक ध्येय साध्य करण्यासाठी आपण पूर्णपणे सहकार्य करण्यास तयार नसल्यामुळे सहकारी प्रणालीच्या विकासात अडथळे निर्माण होतात. आपण कोणाबरोबर सहकारी पद्धतीने वागावयाचे याबद्दल आग्रही असतो. आपण केलेल्या सहकार्याची परतफेड करण्यास व सहकारी प्रणालीचे लाभ आपल्यामध्ये वाटून घेण्यास तयार असणाऱ्या लोकांबरोबर सहकारी पद्धतीने वागणे पसंत करतो. आपण ज्यांच्यावर विश्वास टाकू शकतो त्यांच्याशीच सहकारी पद्धतीने वागण्यास तयार असतो. आपण केलेली गंतवणूक आणि त्यातून मिळणारा नफा यांच्यावर अनोळखी लोकांचे नियंत्रण असणार नाही अशा प्रकल्पातच आपण सहभागी होण्याचे मान्य करतो. सहकारी प्रणालीतही विकासाचे सर्व लाभ आपल्याला पूर्णपणे मिळणार नाहीत किंवा आपण प्राप्त करू शकणार नाही याची आपल्याला जाण असली पाहिजे. स्वहित जपणाऱ्या लोकांची सहकारी संस्था बांधण्याचे कौशल्य दाखविणाऱ्या समाजालाच सहकारी पद्धतीचे सर्व लाभ प्राप्त होतात आणि अशा समाजातच सहकारी संस्थांचे भरघोस पीक येते. सहकारी प्रणालीच्या उत्क्रांतीमधून या प्रणालीला नवनवीन क्षेत्रांमध्ये प्रवेश मिळविता येतो, नवनवीन उत्पादने व सेवा उत्पादन करता येतात, वितरीत करता येतात. त्यातून मिळणारे लाभ सहकारी प्रणालीत सहयोग देणाऱ्यापर्यंत पोहोचविता येतात. सहकारी प्रणालीच्या उत्क्रांतीमधून सहयोगी व्यक्तिंना लाभ मिळतात याची खात्री झाल्यावर सहकारी संस्था मोठ्या संख्येने स्थापन केल्या जातात. सहयोगी व्यक्तिंपर्यंत सहकाराचे लाभ पूर्णपणे पोहोचविण्याचे आव्हान सहकारी संस्थांनी पेलल्यास सहकारी संस्थांचा आणि सहकारी प्रणालीचा विकास झपाट्याने होतो. स्वहिताबद्दल दक्ष असणाऱ्या व्यक्तिंच्या प्रवृत्तींना वाव देऊन सहकारी प्रणाली विकसित करण्याचा मार्ग या

चळवळीने सिद्ध करून दाखविला पाहिजे. त्यातूनच सहकारी प्रणालीला पादाक्रांत करता येण्या जोग्या नवनवीन क्षेत्रांची ओळख होते. त्याचबरोबर आपल्याला समाजव्यवस्था गतीशील, स्वागतशील आणि क्रांतीकारी करता येईल. सहकारी संस्था स्थापन करण्याच्या आणि विकसित करण्याच्या मार्गातील स्वहिताच्या अडसराचा सहकारी प्रणालीने असा उपयोग करून घेतला पाहिजे. सहकारी संस्थांच्या विकासाचे लाभ आपल्याला पूर्णपणे मिळतात अशी या स्वहितदक्ष व्यक्तिंची खात्री पटल्यास, स्वहिताची प्रेरणा सहकारी संस्थांच्या स्थापनेमधील अडथळा न ठरता प्रेरक शक्ति बनते. सामायिक हितात स्वहित सामावलेले असते. दुसऱ्यांना मदत करण्यातच स्वतःला अप्रत्यक्ष व प्रत्यक्षपणे सहाय्य होत असते. स्वहित इतरांना सहाय्य करण्यापासून कोणालाही थांबवू शकत नाही. त्यामुळे सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद स्वतःची जशी काळजी घेतो तशीच दुसऱ्याबरोबरची वागणूक ठेवतो आणि असे करताना तो स्वहिताला कोणतीही बाधा आणित नसतो. त्यामुळे सहकारी संस्थेचे सभासद परस्परांना सहाय्य करण्याचे नवनवीन मार्ग शोधून काढतात. इस्त्रायलमधील किबुट्‌झ (kibbutz), मोशॉव्ह, आवडिम (Moshaw ovdim) आणि मोशॉव्ह ऑलिम (Moshaw olim) या तीनही प्रकाराच्या संस्थामध्ये या प्रवृत्ती प्रकर्षाने आढळतात.

आपले जीवन समृद्ध करण्यासाठी, समाजाचा विकास साधण्यासाठी लागणारी साधनसंपत्ती एकटी व्यक्ति गोळा करू शकत नाही. पण आपल्या प्रत्येकाजवळ असलेली अल्प साधन-संपत्ती सर्वांनी गोळा केली तर त्यातून एक प्रबळ, सशक्त, समर्थ, सहकारी संघटना निर्माण होऊ शकते. या संघटनेची तत्त्वप्रणालीच अशी आहे की, 'प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेप्रमाणे साधन संपत्ती गोळा करावयाची व त्यातून 'प्रत्येकासाठी त्याच्या गरजेप्रमाणे' साधने उपलब्ध करून द्यावयाची. अशा संघटित गटातून मोठी शक्ती निर्माण होते. पण अशा गटामध्ये संघटनेतील प्रत्येकाचे नियंत्रण व व्यवस्थापन करण्याची क्षमता असली पाहिजे. तसेच सहकारी संघटनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, कार्य तडीस नेण्यासाठी आवश्यक असलेली साधन-संपत्ती या गटाकडून प्राप्त करण्याची क्षमता मार्गदर्शक नेत्याकडे असली पाहिजे. अशा रीतीने हा मार्गदर्शक नेता सर्व सभासदांची मिळून एक सक्षम सहकारी संघटना निर्माण करू शकतो. सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद स्वहित जपणारा असला तरी हे करणे त्याला शक्य होते. कारण सहकारी संस्थेच्या अशा प्रकारच्या कार्यपद्धतीमध्ये स्वहित जपणाऱ्या व्यक्तिंच्या प्रवृत्तींचे समायोजन होत असते. अशा तऱ्हेने सहकारी संस्थेच्या नेतृत्वाने सहकाराची तत्त्वे व्यवसायात रूजविली पाहिजेत. अर्थात् यासाठी नेतृत्वाची सहकारी तत्त्वांवर अढळ निष्ठा असली पाहिजे. आज शासन आणि समाज, सार्वजनिक क्षेत्र आणि समाज तसेच खाजगी क्षेत्र आणि समाज यांच्यामध्ये आपापले हित जपण्याच्या मुद्यावरून जो संघर्ष होत आहे त्याला अशा प्रकारची सहकारी संघटना हा सशक्त पर्याय आहे. शासन, सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या संस्थांपेक्षा आजच्या सहकारी संस्था जास्त प्रभावी आहेत.

काही सहकारी संस्था डाव्या विचारसरणीच्या असतात, काही मध्यम मार्गी असतात, तर काही उदारमतवादी उजव्या प्रवृत्तीच्या असतात. इस्त्रायलमधील किबुट्‌झ व मोशॉव्ह आवडिम या सहकारी संस्था सुरूवातीच्या काळात डाव्या विचारसरणीच्या होत्या. सर्व सभासदांना सर्वांसाठी असलेल्या सामायिक घरातून रहावे लागे. भोजनगृहे,

स्नानगृहे सामायिक होती. मुलांना पालकांबरोबर न ठेवता पालनपोषण व शिक्षणासाठी वेगळे ठेवले जाई. परंतु बदलत्याकाळाबरोबर त्या उदारमतवादी झाल्या असून सभासदांना स्वतंत्र घरामध्ये रहाता येते. त्यांना बचत करता येते. मुले पालकांजवळ राहतात. अनेकांना किबुट्झच्या बाहेर व्यवसाय नोकरी करून किबुट्झ मध्ये असलेल्या घरात राहता येते. अनेकांना किबुट्झच्या बाहेर तसेच परदेशातही वास्तव्य करता येते.

सहकारी संस्था सभासदांभिमुख असतात; त्या ग्राहकाभिमुख असणेही आवश्यक आहे. सहकारी संस्थांचे ग्राहकत्व सभासदांपुरते मर्यादित करण्यामुळे सभासदसंख्या वाढत असली तरी ग्राहकसंख्या मर्यादित झाल्यामुळे संस्थेचे व्यवहार मर्यादित होतात; विकास खुंटतो. सहकारी संस्थांनी सभासदांना तसेच ग्राहकांना वाजवीदरात वस्तू व सेवा पुरविणे आवश्यक असले तरी त्यांनी नफा मिळविणे आवश्यक आहे. नफा मिळविण्यात गैर काही नाही. कारण सहकारी संस्थेचे स्थैर्य आणि विकासाच्या संधी या नफ्यातूनच उपलब्ध होत असतात. सहकारी संस्था नफा मिळवत असल्या तरी त्या नफेखोर नसतात. या दोहोंमध्ये मूलभूत फरक आहे.

### सहकारी संस्थांचे संघटन आणि व्यवस्थापन

आंतरराष्ट्रीय श्रम संघटना ही, सहकारी संस्थाना संघ (association) आणि उपक्रम (enterprise) असल्याचे मानते. त्यामुळे सहकारी संस्थेला आपल्या व्यावसायिक व्यवहाराबरोबर नैतिक अधिष्ठानही सांभाळावे लागते. सहकारी संस्थेचे संघटन व्यापारी पद्धतीचे पण सहकारी तत्त्वांवर आधारलेले ठेवावे लागते. म्हणून सहकारी संस्थेच्या व्यवस्थापकांना सहकारी तत्त्वांची पूर्ण जाण असून त्यावर संपूर्ण विश्वास असणे जरूरीचे आहे. पण त्याचबरोबर व्यावसायिक व व्यवस्थापकीय तत्त्वांचाही लाभ त्यांना उठविता आला पाहिजे. अशा व्यवस्थापकांनी तथाकथित सहकारी नेत्यांच्या सहकारी संस्थांचा गैरवापर करण्यापासून सहकारी संस्थांना वाचविले पाहिजे. सहकारी संस्थांना वित्तीय स्वायत्तता प्राप्त करून दिली पाहिजे. सहकारी संस्थांकडे हुशार, उच्चशिक्षित व प्रशिक्षित युवकांना आकर्षित करण्याएवढा मोबदला देता येण्याजोगी वित्तीय क्षमता सहकारी संस्थांनी प्राप्त केली पाहिजे. त्यामुळे सहकारी संस्थांना शासनाच्या सहाय्यापासून मुक्त होऊन स्वतंत्रपणे कारभार करता येईल व आपली व्यवस्थापकीय क्षमता सुधारता येईल. सहकारी संस्थांनी पुनर्संघटनाचे तत्त्व अमलात आणले पाहिजे. व्यवस्थापनाच्या मध्यवर्ती नियंत्रण पद्धतीऐवजी विकेंद्रित निर्णय पद्धती सहकारी संस्थांमध्ये रूजविली पाहिजे. आपोआप वित्तीय साधने उपलब्ध होण्याच्या (self-financing) आणि स्वत:ला जबाबदार (self-accountability) असण्याच्या तत्त्वांच्या आधारावर मध्य व निम्नस्तरावरील व्यवस्थापकांच्या निर्णय घेण्याच्या पद्धतीला प्रोत्साहन दिले पाहिजे. व्यावसायिक व्यवस्थापकांच्या चमूची निर्मिती आणि सभासदांचा सहकारी संस्थेच्या व्यवहारात सक्रीय सहभाग घेण्याचा प्रघात यातून हे पुनर्संघटनाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण करता येईल. व्यावसायिक व्यवस्थापकांच्या पद्धतीने प्रशासन केलेली सहकारी संस्थाच आपली आर्थिक व सामजिक उद्दिष्टे पूर्ण करू शकेल. व्यावसायिक व्यवस्थापकही सहकारी कार्यकर्त्यांइतकेच सहकारावर श्रद्धा असणारे आणि सहकार व्यवहारात आणणारे असतात. व्यावसायिक व्यवस्थापक सहकार विरोधी असतात असा पूर्वग्रह

असण्याचे कारण नाही. जागतिकीकरणाच्या कालखंडात संघटनात्मक विकास घडवून आणणारी व्यावसायिक प्रशासन पद्धतीच सहकारी संस्थांचा विकास घडवून आणू शकेल. सहकारी संस्थांनाही सभासदांबरोबरचे आपले संबंध निकटचे, सलोख्याचे व सामंजस्याचे राखणे आणि विकसित करणे जरूरीचे आहे. सहकारी संस्थेने सभासदांपासून दूर जाणे म्हणजे आपल्या ध्येयापासून दूर जाणे होय.

सहकारी संस्थांची संघटन प्रणाली, व्यवसायाची शिस्त आणि व्यवस्थापनाची तत्त्वे याबाबी वेगवेगळ्या असल्यातरी सहकारी संस्थांनी या तीनही घटकांमध्ये समन्वय साधणे सहकारी संस्थांच्या व सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असते. सहकारी संस्था लोकशाही संस्था असतात. 'एक सभासद-एकमत', निवडणूक आणि निवडून आलेल्या संचालक मंडळाने कारभार चालविणे यापुरती लोकशाही मर्यादित नसते. निवडणुका असल्या म्हणजे लोकशाही आहे हा गैरसमज आहे. लोकशाही प्रणालीमध्ये सभासदांप्रती आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी महत्त्वाची असते. संचालक मंडळाचे सभासद व्यक्तिशः आणि संयुक्तपणे आपल्या प्रत्येक धोरणात्मक निर्णयांबद्दल आणि त्यांच्या अंमलबजावणीबद्दल सभासदांना जबाबदार असतात. संचालकांनी आणि अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनांप्रमाणे वागणे आवश्यक असते. असे झाले तरच संचालकांमध्ये परस्परांबद्दल, अधिकाऱ्यांमध्ये संचालकांबद्दल आणि अधिकाऱ्यांमध्ये परस्परांबद्दल विश्वास (Trust) निर्माण होतो. तसेच सभासदांमध्ये व ग्राहकांमध्ये या सर्वांबद्दल विश्वास विकसित होतो. अशा प्रकारचा विश्वास निर्माण करणे तो राखणे आणि वृद्धिंगत करणे हे व्यवस्थापनाच्या जबाबदारीचे महत्त्वाचे अंग आहे. या विवेचनावरून आपल्याला असे दिसून येते की सहकारी संस्थांच्या लोकशाही संघटनातून व्यवसायाची शिस्त म्हणजे जबाबदारी आणि व्यवस्थापनाचे तत्त्व म्हणजे विश्वास या बाबी आपोआप निर्माण होऊ शकतात. मात्र त्यासाठी जाणीवपूर्वक पाठपुरावा करावा लागतो. म्हणूनच रॉशडेल आपल्या लोकशाही प्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विश्वासपात्र व्यक्तिंनाच नेता म्हणून मान्य करा असे म्हणतात. असे विश्वासपात्र संचालक असतील तरच लोकशाही पूर्णपणे अमलात येऊ शकते, सभासदांच्या आशा व अपेक्षा पूर्ण होऊ शकतात.

खाजगी व्यवसाय संस्थांप्रमाणेच सहकारी संस्थांनी आपला व्याप वाढविणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या वातावरणात खाजगी व्यवसाय संस्था ग्राहकाच्या निकट जाण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात तसा प्रयत्न सहकारी संस्थांनी केला पाहिजे. नवीन सभासद मिळवून सहकारी संस्थेच्या दृष्टीने त्याचे संस्थेला लाभ मिळवून देणाऱ्या 'कार्यकर्त्यात' रूपांतर करण्यापेक्षा आता असलेल्या 'कार्यकर्त्या-सभासदांना' संस्थेत राखून ठेवणे संस्थेच्या दृष्टिने लाभकारक असते. म्हणून सद्यसभासदांनी सहकारी संस्था सोडून जाणे संस्थेला परवडण्यासारखे नाही. सहकारी संस्थेने सभासदांबरोबर सतत संबंध राखण्यासाठी, संवाद चालू ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. अशा पद्धतीतून सहकारी संस्थेला तिच्याकडून असलेल्या अपेक्षांबद्दल व त्या गरजा पूर्ण होण्याबद्दलची माहिती (feed back) मिळत असते. वारणा सहकारी संकुलाने आपल्या प्रभावक्षेत्रातील सर्व गावात मुख्य कार्यालयबरोबर जोडलेली संगणकप्रणाली स्थापन करून असा प्रयत्न केला आहे. सभासदांबरोबर संवाद (Communication) करण्याचा, संबंध राखण्याचा कार्यक्रम

सतत चालू राहणारा कार्यक्रम असला पाहिजे. त्याला संशोधनाचा पाया असला पाहिजे. असे केले तरच संस्थेला सभासदांकडून उपयुक्त माहिती मिळू शकेल. हा कार्यक्रम व्यवसायाच्या आणि व्यवस्थापनांच्या भक्कम तत्त्वांवर आधारित असला पाहिजे. सभासदांबरोबर वैयक्तिक पातळीवर संवाद राखला पाहिजे तसेच त्याला व्यक्तिगत संबंधांचा ओलावा असला पाहिजे. यातून सभासदांचे शिक्षणही होत असते. हा संवाद साधण्यासाठी आज उपलब्ध असलेली नवनवीन आणि आधुनिक तंत्रे वापरली पाहिजेत. अशा परिस्थितीतच सभासद संस्थेशी एकनिष्ठ राहतील, त्यांना या सहकारी संस्थेचे सभासद असल्याबद्दल अभिमान वाटेल. सभासदांना संस्थेच्या व्यवस्थापनाबद्दल, संस्थेच्या प्रामाणिकपणाबद्दल विश्वास निर्माण होईल. आपल्या गरजा पूर्ण करण्याच्या मार्गाचे त्यांच्यापुढे पर्याय उपलब्ध असल्यास ते अशा सहकारी संस्थेचीच निवड करतील. सहकारी संस्थेच्या बिकट परिस्थितीत ते संस्थेला साथ देतील. असे सर्व सभासद सहकारी संस्थेचे 'ब्रँड अँबॅसॅडर्स' असतील.

1960 पूर्वी खाजगी तसेच सहकारी व्यवसायात व्यवस्थापक आणि अधिकारी आपल्या हाती असलेल्या सत्तेच्या आणि अधिकाराच्या जोरावर हाताखालील लोकांकडून काम करून घेत असत. मात्र नंतरच्या काळात जागतिक व्यावसायिक क्षेत्रात ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. सहकारी संस्थांमधील सेवकही सुशिक्षित, समजदार आणि ज्ञानी झालेले आहेत. त्यामुळे त्यांची कामाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. केलेल्या कामापासून त्यांना निर्मितीचा आनंद मिळवावयाचा असतो. ग्राहकांच्या अपेक्षा त्यांना बऱ्याच प्रमाणात माहित असतात; कारण ते स्वत:ही ग्राहक असतात. सहकारी संस्थांमधील सेवक ग्राहकांना जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असतात. बऱ्याच वेळी सेवकांना आपल्या कामामधील बारकावे वरच्या अधिकाऱ्यापेक्षा जास्त चांगले माहित असतात. अशा परिस्थितीत सेवकांना वरिष्ठांकडून हुकुमाऐवजी दिग्दर्शनाची, मार्गदर्शनाची अपेक्षा असते. वरिष्ठांकडे हे सेवक मार्गदर्शक नेता म्हणून पहात असतात. अर्थात आपण केलेल्या वक्तव्याप्रमाणे, आपण दिलेल्या आश्वासनांप्रमाणे वर्तणूक असणाऱ्या, कृती करण्याऱ्या व्यक्तिनाच सेवक, मार्गदर्शक नेत्याच्या भूमिकेत स्वीकारू शकतात. म्हणून सहकारी संस्थांमध्ये कनिष्ठ व्यवस्थापकांपासून संचालकांपर्यंत सर्वजणांना नि:स्वार्थी, आदर्श, कुशल, कार्यक्षम आणि कार्यदक्ष असणे जरूरीचे आहे. मार्गदर्शक नेता, नेता म्हणून लायक असला पाहिजे. असेच मार्गदर्शक नेते सहकारी संस्थेला प्रतिष्ठा, नाव प्राप्त करून देऊ शकतात. सहकारी संस्थेशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचे शोषण करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांचा, संचालकांचा सेवक मुलाहिजा ठेवीत नाहीत. म्हणून सहकारी संस्थेच्या सभासदांनी आदर्श, नि:स्वार्थी, कार्यदक्ष, कार्यक्षम तसेच लायक असणाऱ्या व्यक्तिनाच संचालक म्हणून निवडून देणे जरूरीचे आहे.

सहकारी संस्थांच्या संघटनात आणि व्यवस्थापनात सहकाराची तत्त्वे आणि खाजगी क्षेत्रातील व्यवसाय संस्थेची तत्त्वे या दोघांचे समायोजन झालेले असते. सहकारी संस्थांचे सभासद 'एक सभासद-एकमत' या खाजगी संस्थेपेक्षा वेगळ्या पण लोकशाही पद्धतीने आपले संचालक निवडीत असले तरी खाजगी व्यवस्थेतील संचालकांसारखेच सहकारी संस्थेतील संचालक मार्गदर्शक नेता

असणे अत्यंत जरूरीचे आहे. सहकारी संस्थांमधील संचालक सहकारी संस्थेने स्वीकारलेल्या कार्यक्षेत्रातील असल्यामुळे त्यांना त्या क्षेत्रातील चांगलीच माहिती असते. मात्र त्यांना व्यवस्थापनाच्या तत्त्वांची, निर्णय प्रक्रियेची माहिती नसते. तसे त्यांचे प्रशिक्षणही झालेले नसते. हे ज्ञान त्यांनी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांमधील सेवक ज्ञानी सेवक असतात. त्यांना मार्गदर्शन करून त्यांना दिलेले कार्य त्यांच्या पद्धतीने करण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी मार्गदर्शक नेत्याची आवश्यकता असते. सहकारी संस्थेच्या व्यवहारात, व्यवसायात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य हे नेतेच करू शकतात. पीटर एफ् ड्रकर यांनी आपल्या 'Management Challenges for the 21st Century'या पुस्तकात हा मुद्दा विस्ताराने विशद केला आहे. इस्त्रायल मधील किबुट्झ या सहकारी चळवळीने प्रथमपासून अशा मार्गदर्शक नेत्यांच्या हाती सूत्रे सोपविली. पण त्याचबरोबर त्यांच्यावर कायम दबाव व नियंत्रण ठेवून सहकारी चळवळीच्यामाध्यमातून समाजाचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण केले आहे.

सहकारी संस्थाचे उत्पादन व कार्य कार्यक्षमतेने व परिणामकारक रीतीने चालावे म्हणून व्यावसायिक दृष्ट्या शिक्षित व प्रशिक्षित असलेल्या व्यक्तिंकडेच व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविलेली असते. सभासदांमधून निवडून आलेल्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांची अमलबजावणी परिणामकारकतेने करण्याची त्यांची जबाबदारी असते. संचालक मंडळाच्या निर्देशनानुसार, त्यांच्या देखरेखीखाली हे अधिकारी कार्य करीत असतात. काही सहकारी संस्थांमधून असे अधिकारी आणि व्यवस्थापक सहकारी संस्थेचे सभासद असणे बंधनकारक असते. काही सहकारी संस्था शासनातील, सहकार खात्यामधील तज्ज्ञ व्यक्तिंना सहकारी संस्थांमध्ये प्रतीनियुक्तीवर काही मुदतीसाठी घेतात. सहकारी संस्था इतर व्यवसाय संस्थांइतक्याच व्यावसायिकता पाळीत असतात. सहकारी संस्थांना बाजारपेठेत पाय घट्ट रोवून उभे रहाण्यासाठी इतर व्यवसाय संस्थाइतकेच कार्यक्षम व स्पर्धात्मक असावे लागते. सहकारी संस्थांना आपली उत्पादने, व सेवा उत्तम दर्जाची ठेवावी लागते.

सहकारी संस्थांनी व्यवस्थापनाच्या दृष्टीने कार्यक्षम आणि स्पर्धात्मक होण्यासाठी आपल्याला कोणते तंत्रज्ञान माहित असलेले, कोणते कौशल्य धारण करणारे सेवक हवे आहेत याचा आराखडा तयार केला पाहिजे. त्यानंतर आपल्याजवळ ही पात्रता असणाऱ्या, हे कौशल्य धारण करणाऱ्या सेवकांची सूची तयार केली पाहिजे. यावरून संस्थेला आवश्यक असलेल्या कुशल व प्रशिक्षित लोकांचा अंदाज बांधता येईल. तसेच सहकारी संस्थेतून निवृत्त होणाऱ्या सेवकांची, व्यवस्थापकांची जागा भरून काढण्यासाठी एक कृती आराखडा तयार करावा लागेल. अशा प्रकारे आवश्यक असणाऱ्या सेवकांच्या व व्यवस्थापकांच्या नेमणुका करण्यासाठी व्यक्तिनिरपेक्ष नियमावली तयार करून त्या पद्धतीनुसार सेवकांची निवड व नियुक्ति केली पाहिजे. जपान, व्हिएतनाम, स्वीडन, जर्मनी, इंग्लंड या देशातून अशा व्यावसायिक पद्धतीने नेमणुका होत असल्या तरी भारतात आणि इतर विकसनशील देशात संचालकांच्या मर्जीनुसार नेमणुका होत असतात. संस्थेला आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा कितीतरी जास्त सेवक नेमले जातात. संस्थेला आवश्यक नसलेले कौशल्य व आवश्यक नसलेली पात्रता धारण करणारे किंवा कोणतेच कौशल्य आणि

पात्रता नसलेल्यांची भरती होते. अशा सेवकांना सहकारी तत्त्वप्रणालीची काहीही माहिती नसते व त्याना सहकाराशी काही देणेघेणेही नसते. सहकारी संस्थांना हे सेवक भारभूत ठरतात. सहकारी संस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी निवडून आलेले संचालक संस्थेच्या हिताविरूद्ध कृती करताना दिसून येतात. सहकारी संस्था व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी होण्यासाठी कार्य करावयाचे असल्यास या प्रवृत्तीना थारा देता कामा नये.

सेवक नेमणुकीची नेमस्त तत्त्वे पाळून कामावर घेतलेल्या लोकांना सहकाराची तत्त्वे, सहकारी संघटन, कार्यपद्धती यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था संस्थेने करणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे व्यावसायिक कौशल्याचेही शास्त्रोक्त प्रशिक्षण त्यांना द्यावयास हवे. सेवेत असलेल्या सेवकांना, अधिकाऱ्यांना तसेच व्यवस्थापकांना नियमित कालावधीनंतर याबाबींची उजळणी करणारे आणि त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या नवनवीन तसेच आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण देण्याची गुणवत्ताधारक व्यवस्था प्रशासनाने उपलब्ध करून दिली पाहिजे. सहकारी संस्थेला आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लागणारा सेवकवर्ग, त्यांचे ज्ञान व कौशल्य आणि संस्थेत,सेवेत असणाऱ्या सेवकवर्गाची संख्या त्यांचे ज्ञान व कौशल्य यात तफावत असू नये. सेवक हा एका दृष्टिने संस्थेची 'मत्ता' असला पाहिजे, देयता नव्हे. सेवक जर सहकारी संस्थेची देयता असतील तर ती सहकारी संस्था समाजाची देयता होते. आज महाराष्ट्रात आपण याचा अनुभव घेत आहोत. स्वहिताची बेडी तोडून सामायिक हिताची पातळी गाठणे अवघड असते असे सुरूवातीच्या परिच्छेदात मुद्दामच विवेचन केलेले आहे. मानवी संसाधनांचे नियोजन आणि विकास हा मुद्दा सहकारी प्रणालीत नेहमीच कच्चा दुवा राहिला आहे आणि राजकारणी त्याचा गैर फायदा उठवित आहेत.

सहकारी संस्था सक्षम, समर्थ आणि गतीशील होण्यासाठी सहकारी संस्थांचे संचालक ज्ञानी, कुशल, कर्तबगार आणि सहकाराच्या विकासासाठी आपले सर्वस्व पणाला लावणारे, आपल्याजवळ जे उत्तम आहे ते सहकाराला देणारे असले पाहिजेत. अनेक संचालकांकडे असे नेतृत्व गुण असतात, त्यांना पैलू पाडून हे अव्यक्त गुण व्यक्त अवस्थेत आणण्यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाची सोय करणे गरजेचे आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात संचालक नेत्यांना विविध तत्त्वांचा संयोग, सहयोग घडवून आणणाऱ्या बहुकार्यी (multi-functional) बहुशिक्षा (multi-disciplinanry) आणि आंतरशिक्षा (inter-disciplinary) विषयांची ओळख करून दिली पाहिजे. यामुळे सहकारी संस्थांच्या व्यवस्थापना बाबतचा त्यांचा आत्मविश्वास वाढेल. आपल्या या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या आधारे ते व्यवस्थापकांवर तसेच अधिकाऱ्यांवर वचक ठेवू शकतील. सहकारी संस्थांचे संचालकपद आव्हान म्हणून स्वीकारणारी नेत्यांची एक फळी समाजात निर्माण झाली पाहिजे. एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण खाजगीकरण व उदारीकरणातून निर्माण होणारी आव्हाने स्वीकारण्यासाठी सहकारी चळवळीने कटीबद्ध होणे गरजेचे आहे. सहकाराला जीवनमार्ग म्हणून स्वीकारलेले स्वयंसेवक आणि नेतेच हे कार्य तडीला नेऊ शकतील. सहकारातील नेतृत्व सहकारापुरते मर्यादित न रहाता समाजाचे नेतृत्व झाले पाहिजे.

सहकारी संस्था स्व-निर्भर असणे आवश्यक आहे. अशा संस्थांनी सभासदांकडून आपली साधने गोळा केली पाहिजेत. म्हणजे सहकारी संस्थांना स्वतंत्रपणे आपल्या नैतिक तत्त्वांच्या व सहकारी प्रणालीच्या मूलतत्त्वांच्या चौकटीत राहून कार्य करता येते. साधनांसाठी परावलंबी राहिल्यास साधनांच्या वापराबद्दल, ज्या ध्येयांच्या पूर्ततेसाठी ती वापरावयाची त्यावर साधने पुरविणाऱ्या संस्थेची बंधने येतात. भारतात सहकारी संस्थांनी शासनाकडून भागभांडवल, कर्ज घेतल्यामुळे त्या शासनाच्या दावणीला बांधल्या गेल्या आहेत. मात्र जपान, जर्मनी, स्वीडन या देशात त्या स्वावलंबी राहिल्यामुळे स्वतंत्रपणे कार्य करू शकतात. मात्र याचा अर्थ असा नव्हे की सहकारी संस्थांनी बाहेरून साधने व भांडवल घ्यावयाचेच नाही. सहकारी संस्थांनी खाजगी अथवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांप्रमाणे बाजारपेठेतून व्यापारी कर्जे घेणे सहाजिक आहे. असे करण्यामुळे सहकारी संस्थांना आपली कार्यक्षमता टिकवून ठेवणे जरूरीचे होते; त्याशिवाय त्यांना व्यावसायिक कर्जे मिळणार नाहीत. शासकीय वित्तीय मदतीमुळे सहकारी संस्थांची कार्यक्षमता घटली. उदारीकरणाच्या व खाजगीकरणाच्या धोरणाच्या संदर्भात तर सहकारी संस्थांना प्राथमिक भाग बाजारातून भागभांडवल उभे करण्याची मुभा द्यावी अशी मागणी होत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसाय संस्थांना प्राथमिक भाग बाजारातून भांडवल उभे करताना स्वतःची प्रतिमा स्वच्छ करावी लागली; आपल्या कामाचा दर्जा सुधारावा लागला व उत्पादनांची आणि/अथवा सेवांची गुणवत्ता उच्च पातळीवर न्यावी लागली. त्याचप्रमाणे सहकारी संस्थांना आपल्या व्यवहारांची गुणवत्ता सिद्ध करावी लागेल. ते सहकारी संस्थांच्या, सभासदांच्या व समाजाच्या हिताचे होईल. सहकारी संस्थांचे कंपनीकरण करावे असा मतप्रवाह प्रबळ होत आहे.

सहकारी संस्थेने व्यवसायात श्रेष्ठ स्थान मिळविण्याच्या दृष्टिने आपल्या मालमत्तेच्या वाढीचा दर कमाल राहील, भागभांडवलात सतत वाढ होत राहील असे पाहिले पाहिजे. एकूण भांडवलावरील,भागभांडवल तसेच विक्रीवरील सरासरी परतावा वाढत राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. सहकारी संस्थेने आपली मत्ता, आपल्या सेवकांचे ज्ञान कौशल्य, सर्जनशीलता यांचा कमाल उपयोग करून घेतला पाहिजे. तरच नवीन आधुनिक तंत्रज्ञान संस्थेत आणून तिला अद्ययावत पद्धतीने कार्य करता येईल. सहकारी संस्थेची उद्दीष्टे,तीची कार्यपद्धती, सेवकांची मनोधारणा यामध्ये समायोजन असले पाहिजे. म्हणजे सहकारी संस्थेचा विकास वेगाने होऊ शकेल. सहकारी संस्थेने प्रत्येक सेवकामागील, गुंतवणुकीच्या प्रत्येक रूपयामागील तसेच विक्रीमूल्याच्या प्रत्येक रूपयामागील उत्पादकता वाढवून कमाल परताव्याची पातळी गाठली पाहिजे. सहकारी संस्थांनी आपल्याजवळील स्थिर मत्तेच्या दीर्घ कालीन गुंतवणुकीसाठी पूर्ण उपयोग केला पाहिजे. दीर्घकालीन अथवा स्थिर मत्तेचा वापर चालू मत्तेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरू नये. आपली रोखतेची (Liquidity), ऐपतदारीची (Solvency), कार्यक्षमतेची, व लाभतेची (Profitability) गुणोत्तरे, अनुपात जगतमान्य पद्धतीची असतील असे पाहिले पाहिजे. सहकारी संस्थेने आंतरराष्ट्रीय मानक पातळीची लेखापद्धती व लेखापरीक्षण पद्धती स्वीकारली पाहिजे.

व्यवस्थापनाची ही सर्व प्रणाली संघटन तटस्थ (Organisation neutral)असतात. सहकारी संस्थांना इतर संस्थांसारखीच ती पाळावी लागतात. तरच संघटनात्मक उद्दिष्टे साध्य करता येतात. स्पर्धेत

टिकाव धरता येतो.

सहकारी संस्थेच्या कार्यात सर्वसभासदांना सहभागी होता येईल अशा पद्धतीने सहकारी संस्थांनी आपले संघटन बांधले पाहिजे. अशा संघटन पद्धतीमुळे सभासदांना संस्थेच्या कार्यात गुंतवून घेता येईल. त्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य सहकारी संस्थेने सभासदांना प्राप्त करून दिले पाहिजे. त्यांना आपले व्यवहार स्वतः करण्याची जाणीव व क्षमता प्राप्त करून दिली पाहिजे.सहकारी संस्थेच्या कार्यातील सभासदांचा अर्थपूर्ण सहभागही सहकारी संस्थेच्या व्यावसायिक कार्यक्षमतेची गुरूकिल्ली आहे. सहकारी संस्थांनी आपले व्यवहार सभासदेतरांबरोबर प्रमाणाबाहेर वाढविल्यास सहकारी संस्था आपले सहकारीपण हरवून बसेल. सहकारी संस्थेच्या कार्याचा मध्यबिंदू सभासद हाच असला पाहिजे. सभासदांनी आपली साधन संपत्ती, आपली बुद्धिमत्ता व कौशल्य एकवटून दुर्बळ व्यक्तिंची सबळ सहकारी संस्था निर्माण केली पाहिजे. परस्परांची मदत हा सहकारी प्रणालीचा गुरूमंत्र आहे.

सभासदांच्या कल्याणात सुधारणा घडवून आणणे हे सहकारी संघटनेचे उद्दिष्ट आहे. म्हणून सहकारी संघटनेचे प्रत्येक कार्य सभासदांची गरज पूर्ण करण्याच्या दृष्टिने निवडले गेले पाहिजे व पार पाडले पाहिजे. सहकारी संस्थेच्या उत्पादनांचा व सेवांचा उपयोग करणाऱ्या सभासदांच्या सर्व समस्या सोडविण्याकडे सहकारी संस्थेने पूर्ण लक्ष दिले पाहिजे. सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनाची, प्रशासनाची पद्धती त्यादृष्टिने निर्माण करून सभासदाभिमुख राहील अशी काळजी घेतली पाहिजे. त्यादृष्टिने निर्णय प्रक्रियेत व हे निर्णय अमलात आणण्यास सहभागी करून घेतले पाहिजे सभासदांनी निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे सहकारी संस्थेचे आपण अविभाज्य भाग आहोत असे मानणे आहे. सभासदांनी निर्णयाच्या अमलबजावणीत सहभागी होणे म्हणजे सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनात व सहकारी संस्थेच्या कार्याच्या मूल्यमापनात सहभागी होणे होय. सहकारी संस्थांच्या प्रशासनात सभासदांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने संस्थेच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयांची माहिती त्यांना देऊन त्यांची मते टपालाने मागविण्याचा मार्ग सहकारी संस्थांनी अंगीकारला पाहिजे. निगम शासन(Corporate Governance) भागधारकाभिमुख करण्याच्या दृष्टीने कंपनी कायद्यात अशी सुधारणा करण्यात आली आहे. सहकारी संस्थांनी त्याचा स्वेच्छेने स्वीकार करावा. सभासदांना मतदानाचा हक्क टपालाने बजाविण्याचा पर्याय ही खुला ठेवावा. सहकारी संस्थेची उद्दिष्टे ठरविणे, कार्याच्या अग्रक्रमात फेरफार/ बदल करणे, नियम व पोट नियम तयार करणे, संचालकांची निवड करणे ही कार्ये निर्णय प्रक्रियेत येतात. सभासदांनी संस्थेस दिलेल्या भागभांडवलाच्या प्रमाणात वाढाव्यात हिस्सा मिळविणे व सहकारी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात लाभ प्राप्त करून घेणे हे सभासदांचे हक्क आहेत व ते त्यांनी बजावले पाहिजेत. सभासदांनी आपल्या सहकारी संस्थेची सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचा हक्क बजावला पाहिजे. या माहितीच्या आधारे प्रशासनाला व संचालक मंडळाला आपले कार्य कार्यक्षमतेने करण्यास सभासदांनी भाग पाडले पाहिजे.

सहकारी संस्थांमध्ये सभासदाचे स्थान महत्त्वाचे असते. तो केवळ ऋणको अथवा लाभार्थी नसतो. सभासद हेच सहकारी संस्थेचे 'संघटन' होय; तो

सहकारी संस्थेचा 'कणा' आहे म्हणून सहकारी संस्थेने सभासदांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सहकारी संस्थेत सभासद हा 'लाभार्थी व मालक' असतो. सभासद सहकारी संस्थेवर जेवढा अवलंबून असतो त्यापेक्षा सहकारी संस्था त्याच्यावर जास्त अवलंबून असते. सभासदांचे पूर्ण समाधान होईल या पद्धतीने त्यांच्या गरजा पूर्ण करण्यातच सहकारी संस्थेचे हित सामावलेले आहे. सहकारी संस्थेची व्याप्ती वाढत असताना सभासदांच्या हिताकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. सहकारी संस्था आकारमानाने, व्याप्तीने मोठी झाली तरी सभासदांबरोबरचे संबंध निकटचे आणि सलोख्याचे राहिले पाहिजेत.

सभासदांनी आपल्या गरजा कोणत्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी सहकारी संस्थेचे संघटन व व्यवस्थापन कसे असले पाहिजे याचा आराखडा तयार करून त्याप्रमाणे सहकारी संस्थेला आकार दिला पाहिजे. सहकारी संस्थेचे व्यवस्थापन त्या पद्धतीने कार्यान्वित केले पाहिजे. सभासद आणि सहकारी संस्थेचे सेवक तज्ज्ञ असतील तर हे कार्य सहज करता येईल. सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनाने अशा कार्यात सहयोगाची (Facilitation), संवादकाची (Communicator) आणि समन्वयकाची (Coordinator) भूमिका बजावली पाहिजे. व्यवस्थापनाने सभासदांच्या संस्थेबद्दल असलेल्या आपुलकीचा व त्यांच्यामधील सर्जनशीलतेचा लाभ उठविला पाहिजे. सभासदांच्या व सेवकांच्या सहकारी संस्थेमधील सहभागातूनच सहकारी संस्थेबद्दलची निष्ठा निर्माण होते व ती सततच्या संपर्काने वाढविता येते.

एकविसाव्या शतकात निर्माण होत असलेल्या जागतिक पातळीवरील बदलांचा, आव्हानांचा सामना करण्यासाठी सहकारी संस्थांनी सज्ज झाले पाहिजे. ही लढाई सहकारी संस्थांनी स्वबळावर लढली पाहिजे आणि जिंकलीही पाहिजे. त्यासाठी सहकारी संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान, प्रगत विपणन पद्धती यांचा अंगिकार करून नवीन मूल्ये, आधुनिक विचारसरणी आणि प्रगत संघटन यावर आधारलेली प्रणाली विकसित केली पाहिजे. तरच विविध प्रकारच्या उपक्रमांनी भरलेल्या बाजारपेठेत सहकारी संस्थांचा निभाव लागेल. संघटनात्मक विकास घडवून आणून सहकारी संस्थांनी आपली क्षमता वाढविण्यास प्राधान्य दिले पाहिजे. सहकारी संस्थेने परिव्ययात काटकसर करावी पण सभासदांना परिव्ययानुसार किंमत आकारून सेवा पुरवाव्यात. व्यक्तिंच्या गरजांकडे दुर्लक्ष न करता समुहांच्या गरजा भागविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. सभासदांना गुणवत्तापूर्ण सेवा पुरविण्यावर पूर्ण लक्ष केंद्रीत केले पाहिजे. उत्पादक आणि उपभोक्ता यांच्या उद्दिष्टांमध्ये समन्वय घडवून आणून दोघांनाही वाजवी मोबदला मिळवून दिला पाहिजे.

व्यवस्थापनाच्या आधुनिक विचारप्रणाली प्रमाणे व्यवस्थापकांनी उत्पादनाचे अथवा सेवांचे व्यवस्थापन करण्याऐवजी सेवकांचे व्यवस्थापन केले पाहिजे. यातूनच सभासदांचे कमाल समाधान साध्य करता येईल. एकविसाव्या शतकातील व्यवस्थापन मनुष्याभिमुख झाले आहे. सेवकांना जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे ज्या क्षेत्रात, ज्या विभागात काम करता येते तेथे त्याला आवश्यक सेवा पुरवून, सुविधा पुरवून कार्यरत केले तर सेवकाचे काम उत्तम गुणवत्तेचे आणि किमान वेळात होते. सेवकांचे नियंत्रण करून जास्त काम करून घेता येते ही विचारधारा आता मागे पडली असून, सेवकांना त्यांच्याकडे असलेल्या कौशल्याला अनुरूप, विचारधारेला पोषक असणारे

काम दिल्यास सेवकांना श्रमसाफल्याचा अनुभव प्राप्त होतो. सहकारी संस्थेला गुणवत्तायुक्त जास्तीत जास्त उत्पादन करता येते, अथवा सेवा पुरविता येते. सभासदांना वस्तु विकताना ती विकण्याची पद्धती किंवा सेवा पुरविण्याची पद्धती सौजन्यपूर्ण, समाधान देणारी, स्वागतार्ह वाटणारी असली पाहिजे. सभासद ग्राहक फक्त वस्तू अथवा सेवा विकत घेत नसून ती प्राप्त करण्याचा अनुभवही मिळवत असतो. हा अनुभव सुखद असणे सहकारी संस्थेला लाभकारक ठरत असते. वस्तु विक्री पश्चात सेवा ही आपल्या कार्याचा अविभाज्य भाग म्हणून सहकारी संस्थेने स्वीकारली पाहिजे. ही आधुनिक विचारधारा केवळ खाजगी व्यवसाय संस्थांसाठी आहे असे मानणे सहकारी संस्थांच्या दृष्टीने आत्मघातकीपणाचे ठरेल. बाजारपेठेतील स्पर्धेचे नियम, व्यवहारांची पद्धती संघटना निरपेक्ष असते. एकल संस्थेपासून सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांपर्यंत सर्वांना बाजारपेठेचे, स्पर्धेचे नियम सारखेच असतात. त्यांना अनुसरून न वागणाऱ्यांच्या वाट्याला दुरवस्थेशिवाय दुसरे काही येत नाही. आपण सहकारी संस्था असून बाजारपेठेच्या, स्पर्धेच्या नियमांचा आपल्याबरोबर काही संबंध नाही असे म्हणून जागतिकीकरणाच्या मनुष्यातीत बाजारपेठ व्यवस्थेतून सहकारी संस्थांना अंग काढून घेता येणार नाही.

**समारोप**

कोणत्याही व्यवसाय संस्थेचे संघटन साचेबंद आणि कायमचे नसते. सहकारी संस्थेचेही संघटन तसे नसते. सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र, सभासदांच्या गरजा, तंत्रज्ञान, परस्परांबरोबर संवाद साधण्याची साधने, सेवकांची मनोधारणा, त्यांचे ज्ञान कौशल्य यामध्ये होणाऱ्या बदलांप्रमाणे सहकारी संस्थेच्या संघटनामध्ये बदल होत असतात, असे बदल घडवून आणावे लागतात. या दृष्टिने सहकारी संस्थांचे संघटन परिवर्तनक्षम असले पाहिजे. अशा संघटनात परस्परांमधील संवाद अनौपचारिक पातळीवरून करता येतात. सहकारी संस्थेचे आकारमान मोठे असले तरी तिचे संघटन सुटसुटीत व साधे असले पाहिजे. सहकारी संस्थेच्या संघटनात किमान स्तर असले पाहिजेत. अधिकारांची मोठी उतरंड कार्यक्षमतेला बाधा आणते, नोकरशाही वाढविते. सहकारी संस्थेचे सामर्थ्य तिचे संघटन किमान स्तर असलेले, विविध विभागात सहकार्य असलेले आणि माहितीचे सुलभतेने आदान-प्रदान करण्यात असते.

सहकारी संघटनेचे नेतृत्व सुजाण, सुसंस्कृत, सर्जनशील, तत्त्वनिष्ठ आणि प्रामाणिक असले पाहिजे. नेत्याने, सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचे धोरण राखले पाहिजे. सेवकांना आणि सभासदांना नेता मार्गदर्शक, सहयोजक आणि समन्वयक वाटला पाहिजे आणि तशी भूमिका नेत्याने वठविली पाहिजे. नेत्याने सहकारी संस्थेच्या, सहकारी चळवळीच्या व समाजाच्या हितासाठी, भल्यासाठी आपले तन-मन झोकून कार्य केले पाहिजे. स्वसहाय्य आणि सामाजिक मदत या दोहोंच्या मध्ये सार्वत्रिक मदत आणि एकत्र येऊन करावयाची मदत असा भाग असतो. हा भाग नवीन मूल्ये प्रचारात आणण्यास आणि आपल्या कृतींचा आधार होण्यास मदत करतो. एकत्र येऊन करावयाची मदत ही आपल्याला आपोआप जाणवत असते. त्यातूनच आपणास एकत्र काम करण्याची, एकत्र जीवन कंठण्याची उर्मी निर्माण होत असते. सहकारी व्यवस्थेचा हा पाया आहे. नेत्यांची भूमिका हा पाया भक्कम करण्याची विस्तृत व व्यापक करण्याची असली पाहिजे. नेत्याने सेवकांमध्ये ही वृत्ती बाणवली पाहिजे.

21व्या शतकात भांडवलशाही व्यवस्थेत तसेच समाजवादी व्यवस्थेत निर्माण होणारे अंतर्गत तणाव निवळण्यासाठी सहकारी व्यवस्था हाच एक महत्त्वाचा पर्याय आहे. त्यातूनच समाजाला आपला सांस्कृतिक वारसा आणखी बळकट करता येईल. सहकारी आणि स्पर्धा परस्परांच्या सहकार्याने सामाजिक व्यवस्थेत उत्पादकता वाढविण्याची प्रेरणा निर्माण करू शकेल. भारतातील सहकारी चळवळीला मात्र हे कार्य, संधी असूनही, करता आले नाही आणि तिला हे कार्य करता येईल अशी परिस्थितीही दिसत नाही कारण भारतात सहकारी चळवळ तिच्या उद्दिष्टांसाठी कार्यरत करण्याऐवजी सहकारेतर उद्दिष्टांसाठी आणि कार्यांसाठी बहुतांश वापरली गेली. सहकारातील नेत्यानी आणि कार्यकर्त्यांनी तसेच शासनाने यात बऱ्याच अंशाने सक्रीय भूमिका बजावली. भारतात सहकारी चळवळीची व्याप्ती एवढी मोठी असूनही ती स्वत:ची अशी भक्कम फळी निर्माण करू शकली नाही. नवीन आर्थिक धोरणाच्या कालावधीत खाजगी क्षेत्राने स्वत:साठी स्थान निर्माण केले, अर्थव्यवस्थेमधील आपला हिस्सा वाढावा म्हणून एकजुटीने प्रयत्न केले, कायद्यांमध्ये व नियमांमध्ये अनुकूल बदल करून घेतले. मात्र भारतातील सहकारी चळवळीला नवीन आर्थिक धोरणामध्ये आपल्यासाठी स्थान निर्माण करता आले नाही. अनेक सार्वजनिक उपक्रम खाजगी क्षेत्राकडे वळविताना सहकारी क्षेत्राचा विचार केला नाही; सहकारी चळवळीने शासनावर तसा विचार करण्यासाठी दबावही आणला नाही, इंग्लंड, जपान, स्वीडन, व्हिएतनाम या देशांमध्ये नवीन आर्थिक धोरणात सहकारी व्यवस्थेला महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी प्राप्त झाली. त्या संधीचा योग्य लाभ उठवून त्यातून सहकारी चळवळ जास्त प्रत्ययकारी संघटन म्हणून उदयास आली. आयुर्विम्याच्या व्यवसायाचे खाजगीकरण करताना सहकारी संस्थांना सहभागी होण्याची कोणतीही संधी देण्यात आली नाही. 1938 च्या भारतीय विमा कायद्यात सहकारी संस्थांना विमा व्यवसाय करण्याची मुभा देण्यात आली होती. 1956 मध्ये आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करताना सहकारी नेतृत्वाने ही संधी कायम रहावी असा प्रयत्न केला नाही. 1926 व 1955 च्या दरम्यान सहकारी आयुर्विमा संस्थानी चांगली कामगिरी करूनही नवीन आर्थिक धोरणात सहकारी संघटनाला ही संधी नाकारण्यात आली आणि सहकारी नेतृत्वाने अशी संधी मिळावी महणून प्रयत्नही केला नाही.

नवीन आर्थिक धोरणाच्या कालावधीत सहकारी संघटनाने आपले स्वत्व सिद्ध करण्याऐवजी पिछेहाट स्वीकारली. अनेक सहकारी संघटना जागतिकीकरणाचा बागुलबुवा दाखवून स्वत:ची फसवणुक करून घेत आहेत. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी समर्थ नेतृत्त्वाची जरूरी असली तरी सहकारी क्षेत्रात आजतरी असे नेतृत्व उभे असलेले जाणवत नाही. नजिकच्या भविष्यात सहकारी संघटनेला असे नेतृत्व प्राप्त होऊन या चळवळीला भारतीय व्यवस्थेत निर्णायक भूमिका बजावण्याची सुवर्णसंधी मिळेल अशी आशा करूया.

●●●

# सहकारी अर्थकारण - मागोवा आणि भविष्याचा वेध

● ज. फा . पाटील, कोल्हापूर.
*प्राध्यापक, युनायटेड वेस्टर्न बँकेचे रा.ना. गोडबोले अध्यासन*
*वित्तीय व्यवस्थापन व अधिकोष संशोधन*

## प्रास्ताविक

1904 मध्ये भारतात सहकारी चळवळीच्या संदर्भातील पहिला कायदा झाला. साधारणपणे 50 वर्षानंतर अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण ए.डी. गोरवाला यांच्या नेतृत्वाखाली गठित झालेल्या राष्ट्रीय समितीने केले. समितीने आपल्या अहवालात निष्कर्ष असा मांडला की, सहकारी चळवळ अयशस्वी झालेली आहे, परंतु ती यशस्वी झालीच पाहिजे. त्यासाठी सहकारी संस्थांना शासनामार्फत भांडवली मदत, व्यवस्थापकीय मार्गदर्शन तसेच सहकारी नियंत्रण व्यवस्था देणारी कायद्याची रचना निर्माण केली पाहिजे. खेडे, जिल्हा व राज्य अशा तीनस्तरावर सहकारी पतव्यवस्था, सहकारी विपणन व्यवस्था विकसित करण्यात आली. देशातील सहकारी चळवळीचे राष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शन व नियंत्रण करण्यासाठी नॅशनल कोऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया, नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, नाफेड अशा संस्था निर्माण झाल्या. तसेच सहकारी व्यवस्थेत काम करणाऱ्या सभासदांना, कर्मचाऱ्यांना, कार्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना सभासद नियुक्त पदाधिकाऱ्यांना, शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर वैकुंठलाल मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, वेगवेगळ्या राज्यात को-ऑपरेटिव्ह महाविद्यालय तसेच जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी संघ अशा पद्धतीने एक व्यवस्था विकसित करण्यात आली. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने भारतीय रिझर्व्ह बँकेनेही सहकारी पत व्यवस्थेच्या विकासाला मदत केली.

वैकुंठलाल मेहता, धनंजयराव गाडगीळ, वि. म. दांडेकर यासारख्या विचारवंतांच्या मार्गदर्शनाखाली, विशेषत: महाराष्ट्रात, स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण, वसंतदादा पाटील, राजाराम बापू पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे यासारख्या सहकार महर्षींनी जबाबदार पद्धतीने सहकारी आर्थिक प्रकल्पांची मोठ्या प्रमाणात उभारणी व प्रगती केली.

मधल्या चाळीस वर्षात विशेषत: महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांतून

सहकारी अर्थकारणाने मोठ्या प्रमाणात प्रगती केली. पतपुरवठा, कृषी माल प्रक्रिया, नागरी सहकारी बँका, सहकारी गृहनिर्माण संस्था, श्रमिकांच्या सहकारी संस्था, सहकारी वाहतूक संस्था, सहकारी खरेदी-विक्री अशा अनेक क्षेत्रात सहकार मोठ्या प्रमाणात वाढला. अंदाजे 50 लाख सहकारी संस्था 21 कोटी सभासद. दोन हजार नागरी सहकारी बँका, 46% ग्रामीण पतपुरवठा, 37% खत वितरण, 50% साखर उत्पादन, 50% हातमाग उत्पादन, 100% खेड्यांचा सहभाग, तर 67% ग्रामीण कुटुंबांचा सहभाग सहकारी चळवळीत आज दिसून येतो. 1991 नंतर विशेषत: आठव्या पंचवार्षिक योजनेपासून सहकारी चळवळीच्या क्षेत्राचे वाईट दिवस सुरू झाले. आर्थिक नियोजनात सहकाराचे स्थान जवळजवळ नगण्य करण्यात आले. सहकारी संस्थांना भांडवल देताना सरकारचा हात आखडू लागला. सहकारी संस्थांना दिल्या जाणाऱ्या सवलती कमी होत गेल्या. सरकारी मार्गदर्शनाऐवजी सरकारी हस्तक्षेपाचे अडथळे वाढत गेले.

**सहकारातील प्रारंभिक अरिष्ट**

1990 नंतरच्या काळात सहकारी चळवळीत ज्या घटना घडत गेल्या त्यामुळे नागरिकांच्या मनात एक प्रकारचा अविश्वास एवढेच नव्हे तर उबग निर्माण झाला. प्रामाणिक सहकारी कार्यकर्त्यांच्या उमेदीस व महत्त्वाकांक्षेस छेद देणारा संभ्रम त्यातून निर्माण झाला. स्वातंत्र्य चळवळीच्या विशुद्ध प्रेरणांनी प्रेरित होऊन ज्या अनेक कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून सहकारी क्षेत्रात अनेक लहान मोठे पारंपरिक तसेच आधुनिक आर्थिक प्रकल्प उभे केले त्यांच्यातच आता बेबनाव निर्माण झालेला आहे. बेदिलीचे रूपांतर सहकारी क्षेत्रात बेबंदशाही निर्माण करण्यात झाले आहे. सहकारी चळवळीच्या मूळ हेतू बद्दल संशय किंवा संभ्रम निर्माण व्हावा अशी आजची परिस्थिती आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाची संधी सामान्य माणसाला सुलभ करून देणाऱ्या एका आदर्श माध्यमाचा विनाश होण्याची दुरावस्था आज सहकारी क्षेत्रात निर्माण झालेली दिसते. असे का व्हावे ? याची जबाबदारी कोणावर टाकता येईल ? सहकारी चळवळ पुन्हा बळकट करता येईल का असे अनेक प्रश्न आज निर्माण झालेले आहेत.

सहकारी चळवळीत निर्माण झालेल्या आजच्या असंतोषाची कारणमीमांसा करण्यासाठी, या असंतोषाची सकृतदर्शनी लक्षणे मांडणे आवश्यक आहे. ही लक्षणे पुढील स्वरूपात मांडता येतील. (1) सहकारी संस्थांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार दिसतात. (2) सहकारी संस्थांच्या सत्ता संरचनेत विशिष्ट व्यक्तींची, गटांची प्रदीर्घ काळ मक्तेदारी व घराणेशाही दिसते. (3) सहकारी वित्तव्यवस्थेमध्ये सर्वच पातळीवर प्रचंड मोठ्या प्रमाणात थकबाकी आणि अलाभदायी मत्ता यांचे प्रमाण वाढलेले आहे. (4) सहकारी चळवळीच्या विकासामध्ये प्रादेशिक, क्षेत्रीय तसेच आंतरसभासदीय असंतुलन किंवा विषमता निर्माण झालेली आहे. (5) सहकारी संस्थांतून अतिरिक्त नोकरभरती, त्यामधील भ्रष्टाचार आणि वशिलेबाजी आणि सहकारी संस्थांच्या मनुष्यबळाचा व आर्थिक साधनसामग्रीचा राजकीय सत्ता स्पर्धेसाठी केला जाणार वापर.

**सहकाराचे मूळ समर्थन**

सहकाराचे मूळ समर्थन लक्षात घेणे याठिकाणी आवश्यक आहे. रॉबर्ट ओवेन यांची मूळ भूमिका, रॉशडेल प्रणित तत्त्वे, रेफेसन तत्त्वे तसेच शुल्झ डेलिश तत्त्वे आणि 1966 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने

पुनर्मांडणी केलेली तत्त्वे यांचा एकत्रित विचार केल्यास सहकारी चळवळीचे मुख्य सूत्र किंवा मूलभूत प्रेरणा दुर्बलांच्या विकासाचे माध्यम म्हणून कार्य करणे हे होते व आजही तेच असले पाहिजे. यासंदर्भात सी. आर. फे. यांची सहकारी संस्थेची व्याख्या मुद्दाम लक्षात घेतली पाहिजे-

"A co-operative society is an association for the purpose of joint trading, originating among the weak and conducted always in an unselfish spirit on such terms that all who are prepared to achieve the duties of membership, may share in its rewards in proportion to the degree in which they make use of their association."

धनंजयराव गाडगीळ यांनीही याच प्रकारचे विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्यामते, "असमर्थास समर्थ करणे, सहकारितेचे प्रमुख कार्य समजले जाते, समर्थ होण्याकरिता सहकारितेत असमर्थास अनेक पथ्ये पाळावी लागतात. स्वार्थास मुरड घालण्याची तयारी, सामुदायिक हिताबाबत, जागरूकता, संयमी वर्तन ही यातील प्रमुख पथ्ये समजली जातात. परंतु सहकाराची कास धरून जे समर्थ होतात, त्यांनीही पथ्य पालन चालू ठेवावे की नाही... अशा प्रश्नांचा आजवर फारसा विचार केला नाही. समर्थ कारखानदारांनीही सहकारी कार्यक्षेत्रात विभागणीच्या योग्य सीमा पाळल्या पाहिजेत अन्यथा सर्व-व्यवस्थेचा तोल बिघडेल. सहकारितेचे सामर्थ्य संघ शक्तीत आहे . सांघिक एकोपा भंगेल व दुरावेल असे वर्तन सहकारी पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी त्याज्य मानले पाहिजे.

### मार्गविचलन

दुर्दैवाने सहकारी चळवळ सहकाराच्या मूळ तत्त्वापासून बरीच दूर गेलेली दिसते. त्याचे पुरावे म्हणून काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. स्वयं प्रेरित व खुले सभासदत्त्व हे सहकाराचे मूलतत्त्व. परंतु बऱ्याच मोठ्या सहकारी संस्थांमध्ये खुले सभासदत्व हा प्रकार व्यवहाराच्या पातळीवर अनेक मार्गांनी मर्यादित केला जातो. त्यापाठीमागे सत्ता स्पर्धेची गरज किंवा स्थानिक पातळीवरचे राजकारण हे महत्त्वाचे घटक ठरतात. संस्थेचे झालेले सभासद किती प्रमाणात स्वयंप्रेरित असतात हेही तपासून पाहणे गरजेचे आहे. सहकारी संस्था लोकशाही तत्त्वावर चालाव्यात हे दुसरे तत्त्व परंतु जेव्हा खुल्या सभासदत्वावर मर्यादा पडतात, सभासदत्व मर्यादित प्रमाणात स्वयंप्रेरित असते तेव्हा पुढाकार घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या प्रवृत्ती सोयिस्करपणे, हळूहळू हुकुमशाहीच्या होतात. त्यातूनच सत्तास्थानांना चिकटून राहणे, वार्षिक सभांतून विरोधी आवाज दडपून टाकणे, संचालक मंडळाच्या एकमुखी सभा होणे अशा लोकशाहीशी विसंगत पद्धती रूढ होत जातात. तिसरी बाब अशी की बऱ्याच सहकारी संस्थांच्यामध्ये राजकीय, धार्मिक आणि जातीय दबावगट असतात. खरे तर 1937 च्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या ठरावाप्रमाणे सहकारी संस्थांनी राजकीय आणि धार्मिक तटस्थता पाळली पाहिजे असे आज घडत नाही. सहकारी शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रबोधन हा सहकारी चळवळीच्या विकासाचा महत्त्वाचा घटक अलिकडच्या काळात दुर्लक्षित होत चालला आहे. ती व्यवस्था सक्षमपणे, सातत्यपूर्ण काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीची टंचाई वाढत चालली आहे. सर्वात शेवटी हेही दिसते की सहकारी संस्थांच्यामध्ये परस्पर सहकार अभावानेच आढळतो. याला अर्थातच सहकारी पतव्यवस्था आणि इतर सहकारी संस्था यांच्यातील परस्पर सहकार्य अपवाद आहे.

गेल्या 30 ते 40 वर्षांचा अनुभव लक्षात घेता सहकारी चळवळीत दिसून आलेल्या काही विशिष्ट

प्रवृत्ती पुढीलप्रमाणे मांडता येतात.

1. सहकारी कारखानदारीचा फलप्राप्तीदर घटत गेलेला आहे.

2. सहकारी कारखानदारीतील तोट्यातील संस्थांचे प्रमाण चिंताजनक व वाढते आहे.

3. बंद किंवा उत्पादन न करणाऱ्या संस्थांचे प्रमाणही चिंताजनक व वाढते आहे.

4. सहकारी कारखानदारीचे तसेच इतर सहकारी संस्थांचे भांडवलासाठी शासनावरील अवलंबन वाढत आहे.

5. सहकारी कारखान्यांची कार्यक्षमता व पर्यायाने उत्पादकता घटत आहे.

6. बहुसंख्य सहकारी संस्थांच्या बाबतीत स्वत:चे भांडवल नगण्य असते. कर्जाऊ भांडवलाचे प्रमाण जवळजवळ 90 टक्क्यांपेक्षा जास्त असते. त्यातून एक प्रकारची कायमची अंगभूत दुर्बलता निर्माण होते.

**सहकारी चळवळ व राजकारण**

सहकारी चळवळीमध्ये राजकारण मोठ्या प्रमाणात आहे. सहकारी चळवळीचा वापर राजकारणासाठी केला जातो. सहकारी संस्था हे राजकीय सत्ता प्राप्तीचे एक साधन आहे असेच सर्वसाधारण चित्र मधल्या काळात निर्माण झाले. मोठे आर्थिक व्यवहार करणारी सहकारी संस्था ही प्रचंड आर्थिक व सामाजिक शक्तीची गरज असते हे उमजून सहकारी चळवळ आणि राजकारण यांच्यात एक अतूट सांधा घातला गेला. सर्वसाधारणपणे प्रत्येक राजकीय कार्यकर्ता आपल्या प्रभावाखाली किती सहकारी संस्था आहेत यावरून आपल्या राजकीयशक्तीचे गणित मांडतो. महाराष्ट्राच्या राजकारणात झालेली प्रमुख स्थित्यंतरे तपासून पाहिल्यास त्यामध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी बँक जिल्हा सहकारी बँका, भूविकास बँका आणि खरेदी विक्री संघ या संस्थांतील प्रमुख व्यक्तींची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खेळी दिसू येते. प्रत्यक्षात पुरावा देता येणे शक्य नसले तरी मोठ्या सहकारी संस्थांचे नेते आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी व डावपेचासाठी संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध होणारा पैसा (वैध, अवैध ?) भौतिक साधनसामग्री आणि मनुष्यबळ यांचा सरसकट वापर करतात. बऱ्याच सहकारी संस्थांमध्ये आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की सहकारी संस्था आणि सहकारी संस्थेच्या सभासदांचे कल्याण हे उद्दिष्ट दुय्यम होऊन सहकारी संस्थेच्या नेतृत्त्वाची, सत्तासंपादनाची महत्त्वाकांक्षा, पूर्ण करणे हेच उद्दिष्ट प्रधान झाले आहे.

**सहकाराचे लाभधारक**

सहकारी चळवळीत निर्माण झालेल्या सध्याच्या परिस्थितीचे आणखी एका प्रकारे विवेचन करण्यात येईल. त्यासाठी सहकारी चळवळीच्या लाभांचे दोन गटात वर्गीकरण करावे लागेल. (1) सर्वसामान्य सभासदांना होणारे लाभ (2) प्रभावी सभासदांना किंवा त्यांच्या गटांना होणारे लाभ. सर्वसामान्य सभासदांना होणारे लाभ फारसे वादाचे ठरत नाहीत. ऊसाला मिळणारी वाढती किंमत, सभासदाला मिळणारी साखर, दुधाची वाढती किंमत या गोष्टी प्रत्येक सभासदाला प्राप्त होतात. परंतु दुसऱ्या प्रकारच्या लाभामध्ये संस्थेचे संचालकपद, विशिष्ट विभागाचे प्रमुखपद त्यापाठोपाठ येणारे मोफत वाहन, वाहनचालक, ईंधन, भत्ते, दूरध्वनी, नोकरभरतीतील अधिकार, सामान्य सभासदांना उपकृत करण्याची संधी, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय सामर्थ्य, खरेदी-विक्री, व्यवहारातील अयोग्य मार्गाने मिळणारे लाभ,

चैनीचे विलासी स्वरूपाचे परस्पर खर्चाने शक्य होणारे जीवन यांचा समावेश होतो. प्रदीर्घ काळ असे लाभ जेव्हा एकाच गटाच्या किंवा काही बाबतीत एकाच व्यक्तीच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या मर्यादित वर्तुळात केंद्रित होऊ लागतात तेव्हा सत्तास्थान व लाभ न मिळणाऱ्या असंतुष्ट कार्यकर्त्यांच्या वाढत्या आकाराचा गट निर्माण होतो व सहकारी संस्था अंतर्गत संघर्षामध्ये गुरफटून जाते. सामान्य सभासदाचे कल्याण या निकषावर प्रामाणिकपणाने बोलणारे कमीच असतात. अशी एखादी व्यक्ती असलीच तर ती बाजूला फेकली जाते अशा अनेक व्यक्ती असल्यास संस्थेच्या व्यवस्थापनात बदल होतो. परंतु नवा नेता, नवे घराणे ही प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच चालू राहते.

## सहकारातील असमतोल

सहकारी चळवळीमध्ये महिलांचा सहभाग आणि सत्तेच्या पदावर असण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. या गोष्टीकडेही दुर्लक्ष करून चालत नाही. यापूर्वीच आपण असे विधान केले आहे की सहकारी चळवळीत प्रादेशिक विषमता आहे. त्याचबरोबर विविध आर्थिक क्षेत्राच्या बाबतीत सहकारी चळवळीचा असंतुलित विकास झालेला आहे, पण दुर्दैवाने सहकारी चळवळीच्या वाढीमध्ये सहकारी चळवळीच्या मूळ उद्दिष्टांशी विसंगत अशा पद्धतीचा सभासदांतर्गत असमतोल निर्माण झालेला आहे. याचे दर्शन पुढीलप्रमाणे दिसून येते. (1) सहकारीसंस्थेतील दुर्बल घटकांचे एकूण सभासद संख्येशी असलेले प्रमाण तुलनेने कमी असते. या दुर्बल घटकामध्ये मुख्यत: मागासवर्गीय सभासद, भूमिहीन सभासद, सीमांत शेतकरी सभासद, अल्पभूधारक तसेच कामगार आणि शहरातील कनिष्ठ उत्पन्न गटातील सभासद यांचा समावेश असतो. (2) पतपुरवठ्याच्या क्षेत्रात कर्जवाटपातील वरील घटकांचा हिस्सा कमी असतो. (3) सहकारीसंस्थांच्या वाढाव्यामध्ये वरील घटकांचा हिस्सा कमी असतो (4) सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात वरील घटकांचा हिस्सा कमी असतो. (5) सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये वरील घटकांचा सहभाग कमी असतो. (6) सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यामध्ये तसेच प्रवर्तक मंडळात किंवा संचालकात वरील घटकांचे प्रमाण अल्प असते.

## प्राथमिक निष्कर्ष

सर्वसाधारण निष्कर्ष मांडायचे झाल्यास असे म्हणता येते की वर व्यक्त केलेली निरीक्षणे राष्ट्रीय, राज्य, जिल्हा एवढेच नव्हे तर तालुका पातळीलाही लागू होतात असे पुरावे उपलब्ध आहेत. एकंदरीत पाहता सहकारी चळवळीत सर्वच क्षेत्रात दुर्बल घटकांचा सहभाग व विशेषत: सहकारी चळवळीच्या लाभातील त्यांना मिळालेला वाव अत्यल्प आहे. स्थूलमानाने सहकारी चळवळीमुळे विषमता कमी होण्याऐवजी वाढलेली आहे असेच म्हणावे लागेल. मागासवर्गीय लोक, भूमिहीन शेतमजूर, सीमांत शेतकरी, अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर कमी उत्पन्न गटातील औद्योगिक कामगार व सेवा क्षेत्रातील कर्मचारी समाजाचे दुर्बल घटक आहेत. या घटकांना सहकारी चळवळीचे अधिक लाभ मिळणे आवश्यक होते व आजही आहे. किंबहुना सहकारी चळवळीची व्यवस्था प्रकर्षाने किंवा पूर्णत: या लोकांच्यासाठीच वापरली जाईल अशी कायदेशीर व्यवस्था करणे गरजेचे आहे. काही वेळेला सहकारी चळवळ अशा दुर्बल सामाजिक घटकांच्या विकासासाठी किंवा त्यांच्या दारिद्रय निर्मूलनासाठी जन्माला आलेली नाही, ती जबाबदारी शासनाची आहे. असा

विश्वामित्री आव काही वेळेस संभावित सहकारी कार्यकर्ते घेतात. वरवर पाहता हे आकर्षकही वाटते पण सहकारी चळवळीला भांडवल, संघटन, तांत्रिक व व्यवस्थापकीय मार्गदर्शन व सार्वजनिक वित्तिय संस्थांकडून मदत ज्या प्रमाणात दिली जाते ती लक्षात घेता सहकारी चळवळीला आपले मूलभूत उत्तरदायित्व टाळता येणार नाही. सबळांच्या आर्थिक संघटनासाठी भांडवलशाही स्पर्धात्मक मार्ग आहेच. परंतु समाज व शासनाचा मदतीचा हात मोठ्या प्रमाणात वापरणाऱ्या सहकारी संस्थांचे उद्दिष्ट मूलतः दुर्बल घटकांच्यासाठी विकासाच्या संधी अधिक प्रमाणात निर्माण करणे हेच असले पाहिजे.

### असंतुलन/विषमतेचे मूळ कारण

आपल्या सहकारी चळवळीची आजची परिस्थिती लक्षात घेतल्यास तिची निर्मिती, तिचे प्रत्यक्ष कामकाज व त्यातून निर्माण होणाऱ्या लाभांची वाटणी अपरिहार्यपणे विषमच होणार, कारण शेती क्षेत्राशी संबंधित असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या सभासदांच्या आर्थिक परिस्थितीत अंगभूत विषमता गुंतलेली आहे. त्याचे कारण जमीन मालकीच्या अत्यंत विषम वाटणीच्या वास्तवात मिळते. गेल्या काही दशकात जमीन मालकीची विषमता आणखी वाढली आहे तर दुसऱ्या बाजूस भूमिहीन शेतमजूरांची संख्या वाढत आहे. जोपर्यंत प्रत्येक सभासदाला मिळणारा लाभ त्याच्या मालमत्तेच्या प्रमाणात संलग्न असेल तोपर्यंत सहकारी चळवळीचे लाभ विषम पद्धतीनेच वाटले जाणार व त्याअर्थाने सहकारात देखील भांडवलशाहीचेच दोष निर्माण होणार (मक्तेदारी, घराणेशाही इ.)

### नवे आर्थिक धोरण व सहकार

1991 नंतर सहकारी चळवळीची आणखी वाताहात झाली त्याचे मुख्य कारण उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारलेल्या नवीन आर्थिक धोरणांच्या वाढत्या अंमलबजावणीत मिळते. खरे तर 1990 मध्ये मध्यवर्ती सरकारने आदर्श सहकारी संस्थेचे प्रारूप तयार करण्यासाठी एक समिती नेमली. सामाजिक सहकारी रचना विकसित करणे, राष्ट्रीय व राज्य पातळीवर संघ रचनेच्या सहकारी संस्था तयार करणे, सरकारी नियंत्रण व हस्तक्षेप कमी करणे व सहकाराचे राजकीयीकरण किमान करणे या हेतूसाठी आदर्श सहकारी कायद्याचा मसूदाही तयार झाला पण 1991 च्या नव्या आर्थिक धोरणाच्या स्वीकारानंतर सहकारी अर्थकारणाकडे बघण्याचा एकूण दृष्टिकोन बदलू लागला. जानेवारी 1996 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने ब्रिटिश कोलंबिया सहकारी अभ्यासक्रमाचे संचालक इयात मॅक्फरसन यांच्या अध्यक्षतेखाली तयार केलेला सहकारी संघटनेबद्दलचा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल देखील एका अर्थाने बदलत्या आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरणाचा परिपाकच होता. सहकारी संस्था स्वायत्त, स्वेच्छापूर्वक, सभासदांच्या संयुक्त मालकीच्या व लोकशाहीच्या नियंत्रणाच्या माध्यमातून सभासदांच्या आर्थिक, सामाजिक, तसेच सांस्कृतिक दर्जा, इच्छा व आकांक्षा यांच्या पूर्तीचे साधन मानले. स्वयं सहाय्यता, आत्मजबाबदारीचे भान, लोकशाही, समता, समन्याय, बंधुभाव तसेच सचोटी, मोकळेपणा, सामाजिक जबाबदारी व इतरांची काळजी या नैतिक मूल्यावर सहकारी चळवळ आधारित असावी असे मानले गेले. खुले, स्वेच्छेचे, कोणताही भेदभाव न करणारे सभासदत्व, संपूर्ण लोकशाही नियंत्रण, कुवतीप्रमाणे सभासदांचा आर्थिक सहभाग, स्वायत्तता आणि स्वातंत्र्य, शिक्षण-प्रशिक्षण आणि माहिती, सहकारांतर्गत

सहकार आणि सामुदायिक कल्याणाची कार्ये ही सहकाराची सुधारित सप्तसूत्री स्वीकारण्यात आली.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या दृष्टीकोनातून बदललेल्या परिस्थितीत पुढील पाच कारणासाठी सहकारी संस्थांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

1. सहकारी संस्था सामुदायिक उपक्रम असतात.
2. सहकारी संस्था लोकशाहीचे पोषण करतात.
3. सहकारी संस्था खुली बाजारयंत्रणा संवर्धित करतात.
4. सहकारी संस्था मानवी प्रतिष्ठा वाढवितात.
5. सहकारी संघटन विकासाची योग्य व्यवस्था ठरते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे एक प्रवक्ते जॉन लॅगमोर यांच्या मते, सहकारी संघटनेच्या माध्यमातून अधिक मुक्तपणे उच्चतर राहणीमान उपभोगता येते. संयुक्त राष्ट्रसंघ व आंतरराष्ट्रीय सहकारी संघटन यांनी संयुक्तपणे स्वीकृत केलेल्या सामाजिक विकासाचा '' कोपनहेगन'' जाहीरनामा जर लक्षात घेतला तर हे स्पष्ट होते की सहकारी संस्था किंवा सहकारी अर्थकारणच दारिद्र्य निर्मूलन, पूर्ण उत्पादक रोजगार आणि परिपूर्ण सामाजिक एकात्मता या उद्दिष्टांच्या प्राप्तीचे सर्वात प्रभावी साधन ठरू शकते.

1991 नंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्या संयुक्त पुढाकाराने आर्थिक धोरणाच्या संदर्भात जे ''वॉशिंग्टन एकमत'' तयार झाले आणि जागतिक व्यापार संघटनेच्या करारामुळे ज्या मर्यादा आल्या त्यामुळे सरकारला समाजाच्या आर्थिक जीवनातून वाढत्या प्रमाणात माघार घ्यावी लागली, राष्ट्रांतर्गत मोठ्या निगम संस्था आणि अवाढव्य बहुराष्ट्रीय कंपन्या, त्यांच्यामुळे बाजारातील वाढती जीवघेणी स्पर्धा याचा एक परिणाम म्हणून सहकाराकडे वाढत्या प्रमाणात दुर्लक्ष झाले. सहकारी संस्थांना सोयी सवलती किंवा मदत देण्याची वेगळी व्यवस्था करण्याचे समर्थन राहिले नाही उलट सहकारी संस्थांना भांडवली मदत वा हमी देऊ नये. अशा मदतीमुळे सरकारच्या अर्थसंकल्पीय तूटीत वाढ होते. म्हणून ही मदत जितकी वेगाने कमी करता येईल तितके बरे असेही समर्थन केले गेले. खरे तर अर्थसंकल्पीय तुटीच्या वाढीमध्ये सहकारी चळवळीचा दोष किती हा अभ्यासाचा विषय व्हावा परिणामी एका बाजूला उत्पादन वाढेल परंतु त्याचबरोबर मालमत्ता, उत्पन्न आणि आर्थिक संधी याबाबतीत प्रचंड विषमता निर्माण झाली, ती वाढत गेली.

**सहकारी व्यवस्थेच्या पुनर्सक्षमीकरणाच्या दिशा**

दुर्दैवाने आज सहकारी तत्त्वज्ञान पराभूत होण्याच्या अवस्थेत आहे. सर्वसामान्य माणसाला स्वतःचे अल्पभांडवल, कष्ट तसेच सहकारी माध्यम यातून स्वाभिमानाने जगता यावे यासाठी कल्याणकारी राज्याने भांडवली मदत, आर्थिक मार्गदर्शन आणि कायद्याचे संरक्षण सहकारी संस्थांना देणे आवश्यक आहे. त्यासाठी होणारा सार्वजनिक खर्च ही उत्पादक गुंतवणूक आहे असेच मानले पाहिजे. आज मात्र हे तत्त्वज्ञान मागे पडत चालले आहे. शासनाचे सहकारी उत्तरदायित्व नाकारण्यात आले आहे. शासनाकडून सहकारी संस्थांना कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत देण्याची नैतिक आवश्यकता आज मानली जात नाही. अशा परिस्थितीत सहकारी चळवळीच्या कल्याणकारी सामर्थ्यावर ज्यांचा विश्वास आहे अशा लोकांनी वास्तवाची जाणीव ठेवून, बदललेले संदर्भ लक्षात घेऊन आपली कार्यपद्धती सुधारली पाहिजे. एका अर्थाने एकविसाव्या शतकामध्ये सहकारी

अर्थकारणामुळे उभे राहिलेली हीच महत्त्वाची आव्हाने आहेत. शासनाच्या किंवा इतर कुणाच्याही मदतीची अपेक्षा न करता सहकारी संस्थांना स्पर्धात्मक बाजार यंत्रणेच्या जागतिक व्यवस्थेत स्वत:च्या सामर्थ्यावर उभे रहावे लागणार आहे. त्यासाठी साहजिकच पुढील गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील.

1. सहकारी संघटनांचे माध्यम दुर्बल घटकांना सर्व निकषावर अधिक वाव देईल अशा प्रकारचे बदल सहकारी कायद्यात करण्यात यावेत. दुर्बल घटक ओळखण्याची वस्तुनिष्ठ पद्धत ठरवावी लागेल. उत्पादन किंवा कारखानदारी क्षेत्रात अशा कायदेशीर मर्यादा घालणे कदाचित अव्यवहार्य ठरेल याला पर्याय म्हणून पुढील दोन तरतूदी सहकारी कायद्यात करता येणे शक्य आहे.(अ) सभासदांची आर्थिक कुवतीनुसार वर्गवारी करून भांडवल उभारणीत दुर्बल घटकांना अधिक कर्जपुरवठा व वाढत्या आर्थिक कुवतीप्रमाणे घटता कर्जपुरवठा असे तंत्र वापरता येईल. (ब) नवा सहकारी प्रकल्प मान्य करण्यासाठी सभासदांमध्ये दुर्बल घटकांचे एकुण किमान प्रमाण व प्रत्येक दुर्बल घटकाचे विशिष्ट किमान प्रमाण अशा अटी कायद्यात समाविष्ट करण्यात याव्यात.

2. सहकारी क्षेत्र व राजकारण यांच्यातील संबंध कमी करणे शक्य आहे पूर्णत: नष्ट करणे शक्य नाही. व्यापक प्रबोधनाच्या माध्यमातून कोणत्याही पातळीवर शासन व्यवस्थेत लोकप्रतिनिधी किंवा पदाधिकारी म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तिला संचालक किंवा पदाधिकारी होता येणार नाही असा कायदा केला पाहिजे. कोणत्याही व्यक्तीस सहकारी संस्थेचे अधिकारीपद सलग दोन वेळा मिळू नये व जास्तीत जास्त दोन वेळाच मिळावे अशा प्रकारची कायदेशीर तरतूद केली गेली पाहिजे.

3. सहकारी संस्थांना शासनामार्फत दिली जाणारी मदत ठराविक मुदतीनंतर विशिष्ट कालखंडात परत घेतली जाईल अशी तरतूद करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नवीन सहकारी संस्थांच्या वर्गीकरणासाठी सभासदांच्या सरासरी आर्थिक परिस्थितीचा दर्शक वापरून वाढत्या क्षमतेप्रमाणे घटती शासकीय मदत या सूत्राचा वापर करावा.

4. कर्जपुरवठ्याच्या बाबतीत तारणमूल्यापेक्षा उत्पादनाची व विपणनाची गरज व त्यातून निर्माण होणारी परतफेडीची कुवत यांना अधिक महत्त्व दिले जावे.

5. सहकारी पतपुरवठा व्यवस्थेत वाजवीकरणाची गरज आहे. कर्जक्षमतेच्या निकषावर किमान आवश्यक आकार ठरवून त्यातून गरज पडल्यास लहान लहान संस्थांचे एकत्रीकरण करून त्यांचे रूपांतर सहकारी बँकामध्ये करणे व त्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांचे स्वरूप देणे योग्य ठरेल.

6. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाची पद्धत स्वीकारता येईल का, सभासदांचे वर्गीकरण त्यांच्या धारणक्षेत्राच्या प्रमाणात करणे हा निकष वापरता येईल का व या मार्गाने संचालक मंडळामध्ये दुर्बल घटकांचे अधिक प्रमाण निर्माण करता येणे शक्य आहे का हेही तपासून पाहिले पाहिजे.

7. सहकारी संस्था या मूलत: आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था आहेत. साहजिकच कार्यक्षमता, काटकसर, बचत, स्पर्धात्मकता या मूल्यांचे संवर्धन सहकारी कार्यकर्त्यांना देखील करावे लागेल. सहकारी संस्थांचे हिशोब नियमितपणे त्रयस्थ परीक्षकांकडूनच तपासले गेले पाहिजेत.

8. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन स्पर्धात्मक करण्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची नियुक्ती त्रयस्थ निवड मंडळामार्फत केली जावी.

9. सहकारी चळवळीच्या तात्त्विक अधिष्ठानाबद्दल, बदलत्या अपेक्षा बद्दल आणि संभाव्य लाभाबद्दल सातत्याने शिक्षण, प्रशिक्षण संशोधन आणि प्रबोधन घडविण्याची गरज आहे व त्या दृष्टिने सध्याची सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण व्यवस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे.

10. भारतातील शेतीमध्ये कोरडवाहू शेतीचे महत्त्व आहे ते तसेच पुढेही राहणार आहे. त्यादृष्टिने कोरडवाहू भागात सहकारी पतपुरवठा, सहकारी शेती, सहकारी जलसिंचन संस्था, सहकारी दूध प्रकल्प, सहकारी फळ बागायत, सहकारी विपणन या क्षेत्रांना अधिक प्राधान्य आणि मदत देण्याची गरज आहे.

## समारोप

गेल्या पंधरा वर्षात जे वैचारिक, राजकीय व आर्थिक बदल झाले, ज्या प्रमाणात माहिती-तंत्रज्ञान विकसित होत आहे, जगाच्या बाजारपेठेचे एकत्रीकरण होत आहे ते लक्षात घेता यापुढच्या काळात सहकारी चळवळीला आपले अर्थकारण स्वतःच्या सामर्थ्यावरच उभे करावे लागेल. त्यादृष्टिने सहकारी संस्थांना आपल्या वित्तव्यवस्थेत सभासद भांडवलाचे प्रमाण वाढवावे लागेल आणि निखळ आर्थिक निकषावरच खुल्या बाजारातून स्पर्धात्मक व्याजावर मर्यादित मुदतीसाठी व उत्पादक कारणासाठीच कर्जाऊ भांडवल उभे करावे लागेल. दुसरा महत्त्वाचा भाग असा की अशा जागतिक स्पर्धेच्या बाजारात स्पर्धात्मकता प्राप्त करण्यासाठी सहकारी संस्थांना अत्याधुनिक उत्पादन तंत्र स्वीकारावे लागेल तसे करण्यासाठी आवश्यक असणारे उत्पादनाचे किमान प्रमाण पत्करावे लागेल तरच उत्पादनखर्चाचे किमानीकरण व वाढती स्पर्धात्मकता हे सहकारी संस्थेचे सामर्थ्य ठरेल. याचबरोबर अशा मोठ्या सहकारी संस्था कार्यक्षमतेने चालविण्यासाठी वाजवी किंमतीवर उत्तम प्रतीने व्यवस्थापन कौशल्य सातत्याने विकसित करावे लागेल. त्यातूनच उत्पादनाचा दर्जा सर्वोत्तम ठेवण्याची शक्यता निर्माण होईल. वस्तु आणि सेवेची उत्पादन करणारी कोणतीही व्यवस्था, योग्य विपणन व्यवस्था नसल्यास अडचणीत येऊ शकते. म्हणून अशा सहकारी संस्थांना उत्पादित मालाची बाजारपेठ, तंत्रविज्ञानाची बाजारपेठ आणि मनुष्यबळाची बाजारपेठ चांगल्या पद्धतीने शोधून देशातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात वाजवी नफ्याने व्यवसाय करण्यासाठी स्थानिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अद्ययावत माहितीतंत्र ज्ञानाचा वापर करून सहकारी विपणन संघटन विकसित केले पाहिजे. अर्थात या बदललेल्या परिस्थितीत देखील सरकारची जबाबदारी संपत नाही. सार्वजनिक धोरणाचे अस्तित्व साहजिकच सार्वजनिक धोरण व त्यातून निर्माण होणारे कार्यक्रम राबविण्यासाठी सहकारी संस्थांना शासनाने प्राधान्य दिले पाहिजे ही आवश्यक बाब ठरते.

## संदर्भसूची

1. शिंदे अण्णासाहेब -फ्युचर ऑफ को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन इंडिया - इन सर्च ऑफ को-ऑपरेटिव्ह एक्सलन्स - द महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक - प्लॅटिनम ज्युबली कमोमरेटिव्ह व्हॉल्यूम - संपादक जी. एस. शेंदुरनीकर, पी. एस. शेंदुर्नीकर 1987.

2. सी. आर.फे - को ऑपरेशन अॅट होम अॅन्ड अॅब्रॉड स्टॅम्पल्स प्रेस लि. लंडन.

3. एस्. डी. तुपे - नगर जिल्ह्यातील सहकारी साखर

कारखान्यांच्या सामाजिक, आर्थिक प्रभावांचा अभ्यास - पीएच्. डी प्रबंध पुणे विद्यापीठ 1981.

4. जे. एफ्. पाटील - महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी -काही समस्या, सह्याद्री चॅरिटेबल ट्रस्ट चर्चासत्र- शोधनिबंध सांगली 1988.

5. नेहरू जवाहरलाल - इंडियन कोऑपरेटिव्ह काँग्रेस, चौथे अधिवेशन 1993 उद्घाटनपर भाषण.

6. गाडगीळ ध. रा. - कॉमनवेल्थ, रायटिंग ॲन्ड स्वीचेस ऑफ प्रो. डी. आर. गाडगीळ ऑन को-ऑपरेशन, गोखले अर्थशास्त्र संस्था/ओरिएन लॉंगमन मुंबई.

7. कुलकर्णी पी.बी. - ए स्टडी ऑफ इमबॅलन्सेस इन द ग्रोथ ऑफ को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन सांगली डिस्ट्रीक्ट - पी. एचडी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर 1987.

8. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑन अर्बन को ऑपरेटिव्ह बँक 1979.

9. नाबार्ड - स्टॅटिस्टिकल स्टेटमेंटस् रिलेटिंग टू द को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन इंडिया.

10. महाराष्ट्र शासन - को ऑपरेटिव्ह मूव्हमेंट ॲन्ड द प्लान्स 1986.

11. एम्. व्ही. नाडकर्णी व जी. ओझा - को ऑपरेटिव्हज् ॲन्ड सोशल ऑबजेक्टिव्हज् 1976.

12. व्ही. बी. जुगळे - सोशो इकॉनिक ॲन्ड टेक्नॉलिजिकल इम्पॅक्ट ऑफ को-ऑपरेटिव्ह क्रेडिट ऑन ॲग्रिकल्चरल. पी. एचडी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ 1987.

13. जे. एफ पाटील व पी बी. कुलकर्णी - सहकार्यातील अरिष्ट कारणे व उपाय. समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी 1989.

14. जे. एफ. पाटील , व्ही. बी. ककडे, वसंत जुगळे, प्रा व्ही. आर. खानाज - सहकारी क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन , समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी 1996.

●●●

## अर्थसंवाद चा अंक मिळत नसल्यास

अर्थसंवाद आपणास नियमितपणे प्राप्त होत नसल्यास त्या बाबतची विचारणा प्रमुख संपादकांकडे करावी. आपण परिषदेचे आजीव सदस्य असल्यास किंवा वार्षिक वर्गणीदार असल्यास सदस्य क्रमांक देउन पत्रव्यवहार प्रमुख संपादकाकडे करावा. आपला पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. अंक पाठविण्याची व्यवस्था प्रमुख संपादकामार्फत करता येईल. अर्थसंवादसाठी वर्गणी मनीऑर्डर ने पाठविल्यास आपला पत्ता सुस्पष्ट लिहावा.

अंक पाठविणे सोयीचे व्हावे या दृष्टिने सहकार्य करावे. वर्गणी कार्यवाहांकडेच पाठवावी. प्रमुख संपादकांकडे पाठवू नये.

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह/खजिनदार

# सहकार चळवळीची शंभर वर्षे

● श्री. आ. देशपांडे, नागपूर.
*भूतपूर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,*
*नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि भूतपूर्व अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद.*

भारतात सहकार चळवळीची सुरूवात इ.स. 1904 साली सहकारी पतपेढ्यांच्या कायद्याने झाली. या कायद्याचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून सोडविणे हा होता. जर्मनी हे राष्ट्र आधुनिक सहकारी चळवळीचे जन्मस्थान आहे. एकोणविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात रफेसनने, जर्मनीत, सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. इंग्लंडमध्येही याच सुमाराला सहकारी चळवळीचा पाया घातला गेला. इंग्लंड-जर्मनीतील सहकारी चळवळ अशा रीतीने 150 वर्षे पूर्ण करीत आहे. भारतात सहकार महोत्सव आपण यंदा साजरा करीत आहोत.

सहकारिता किंवा सहकार्याने कामे करणे, ही भारतीयांसाठी नवीन गोष्ट नाही. आपली कुटुंबव्यवस्था परस्पर सहकार्यावरच अवलंबून आहे. ब्रिटिश राज्यापूर्वी भारतीय खेड्यांची रचना व व्यवस्था सहकारितेवरच आधारलेली होती. खेड्यांतील सर्व व्यवहार परस्पर सहकार्याने चालत. गावात कुणाकडेही लग्न असो ती सर्व गावाची जबाबदारी समजली जाई. धंदा आणि उद्योग करणाऱ्या लोकांच्याही 'गिल्ड' सारख्या धंदेवाईक संस्था होत्या. ब्रिटिशांचे राज्य आल्यावर ही सर्व व्यवस्था हळुहळु नष्ट झाली.

1904 च्या कायद्यानुसार पतपेढ्या स्थापन करण्यात आल्या. परंतु या कायद्यात बिन-कर्जाऊ संस्थांना स्थान नव्हते. तसेच सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवून त्यांना भांडवल पुरविण्याचीही सोय नव्हती. सन 1912 च्या सहकारी संस्थांच्या कायद्याद्वारे हा दोष दूर करण्यात आला. या कायद्यान्वये खरेदी-विक्री, उत्पादन, विमा, घरे इ. सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांची तरतूद करण्यात आली. दुसरे, सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवून त्यांना भांडवलाची मदत करण्यासाठी जिल्हास्तरावर केन्द्रीय आणि राज्यस्तरावर प्रादेशिक सहकारी बँका काढण्यात आल्या. सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारची नेमणूक करून सहकारी संस्थांची नोंदणी व पाहणी करण्याचे व सहकाराचा प्रसार करण्याचे काम त्याचेकडे सोपविण्यात आले.

'परस्पर सहकार्याने आणि स्वावलंबनाने कार्य करणारी संघटना' म्हणजे सहकारी संस्था होय. भारतासारख्या बहुतांश गरीब लोक असणाऱ्या देशाला सहकारिता हे वरदान आहे. या संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक असते. व्यवस्थापन लोकशाही पद्धतीचे असते आणि एक व्यक्तीला एकच मत देण्याचा अधिकार असतो. एक व्यक्ती एक मत. व्यक्तीजवळ कितीही शेअर्स असले तरी प्रत्येक व्यक्तीला एकच मत असते. 'एकमेका सहाय करू, अवघे धरू सुपंथ' अशी ही जीवनप्रणाली आहे. स्वावलंबन आणि परस्पर सहकार्य हा सहकारी चळवळीचा आत्मा आहे. सहकारी व्यवस्थेमुळे सदस्यांचेच नव्हे तर एकंदर समाजाचे कल्याण व्हावे, हा सहकारी संस्थेचा दृष्टीकोन आहे.

1935 साली रिझर्व्ह बँक स्थापन झाल्यावर बँकेने 'शेतकी पत विभाग' काढला. या विभागाने सहकारी संस्थांच्या प्रसारावर भर दिला. शेतकऱ्यांना केवळ कर्जच हवे असे नव्हे तर शेतीची अवजारे, जीवनावश्यक वस्तू, सेवा याचीही गरज असते. अशा 'बहु-प्रयोजक' (multi-purpose) संस्थाही सहकारी क्षेत्रात काढण्यात आल्या. परन्तु अजूनही कर्ज पुरविणाऱ्या संस्थांनाच सहकारी चळवळीत महत्त्वाचे स्थान आहे.

**स्वराज्यानंतर सहकारी संस्थांचा विकास**

स्वराज्यानंतर सहकरी संस्थांचा प्रचंड विस्तार झाला. आता सहकारी संस्थांची संख्या जवळपास सहा लाख असून सदस्य संख्या 20 कोटी पर्यंत पोहचली.

सरकारने सुरवातीपासूनच संस्थांना आधार आणि उत्तेजन दिले. सरकार आणि सहकारी संस्था यांचा संबंध इतका घनिष्ठ होता की सहकारी संस्था या सरकारी संस्थाच आहेत असे लोकांना वाटू लागले.

तात्त्विक दृष्टीने सहकारी चळवळ चांगली आहे, यात वादच नाही. गरीब आणि मागासवर्गीय लोकांना, आर्थिक दृष्ट्या संपन्न उद्योगपती आणि व्यापाऱ्यांशी स्पर्धा करावयाची असेल तर सहकारितेशिवाय पर्याय नाही. एका व्यक्तीचे साधनधन किंवा सामर्थ्य कमी पडू शकते परन्तु दहा व्यक्ती एकत्र आल्या तर सर्व मिळून एखादा उद्योग किंवा व्यवसाय यशस्वी रीतीने करू शकतात. समाजातील निर्बल, निर्धन आणि मागास वर्गाच्या उन्नतीचे सहकार हे एक साधन आहे.

**सहकारितेची 100 वर्षे**

100 वर्षात भारतात 6 लक्ष सहकारी संस्था स्थापन झाल्या.सदस्य संख्या सुमारे 20 कोटीचे आसपास झाली. सहकारी संस्थाचा विस्तार झाला, पण विकास झाला का? हा प्रश्न आहे, काही सहकारी संस्थांनी स्पृहणीय कामे केली यात शंका नाही.

पश्चिम महाराष्ट्राचा विकास धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रेरणेने सहकाराच्या माध्यमातून झाला. तेथील साखर कारखाने महाराष्ट्राचा मानबिंदू आहेत. भारतातील एकूण साखर उत्पादनापैकी 48 टक्के उत्पादन सहकारी क्षेत्रात होते. पश्चिम महाराष्ट्रात 150 सहकारी साखर कारखाने आहेत. या कारखान्यांमधून भारताच्या साखर उत्पादनाच्या 35% ते 40% साखर निर्माण होते, ही अभिमानाची बाब आहे. वारणा, पंचगंगा अशा काही साखर उत्पादन करणाऱ्या सहकारी संस्था आदर्श आहेत. साखर निर्मिती संस्था व्यतिरिक्त दूध सहकारी संस्था अत्याधुनिक आणि उत्कृष्ट आहे. वारणा सहकारी संस्थेचे दूध रोज टँकरने मुंबईपर्यंत जाते. वारणाजवळच्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली स्पष्ट दिसते. बहुतेक शेतकऱ्यांजवळ ट्रॅक्टर्स दिसतात.

अशा यशस्वी व चांगल्या सहकारी संस्थांची उदाहरणे कमी आहेत. आजही पश्चिम महाराष्ट्रातील 150 साखर कारखान्यांपैकी 56 सहकारी साखर कारखाने आजारी किंवा नुकसानीत आहेत. विदर्भाची स्थिती तर विशेषच शोचनीय आहे. येथील 14 सहकारी साखर कारखान्यांपैकी 4 कारखाने जेमतेम चालत असून बाकीचे 10 जवळजवळ बंद आहेत.

**आत्मपरीक्षणाची गरज**

गेल्या 100 वर्षात सहकारी संस्थांचा विस्तार झाला. परन्तु सहकारी संस्था भारतात रूजल्या का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. गेल्या 100 वर्षात विस्तार होत असताना सहकारी संस्थांमध्ये काही दोषही शिरले. यामुळे सहकारी चळवळ कमजोर झाली, या दोषांचा विचार करुन पुढील वाटचाल करणे उपयुक्त ठरेल.

1. सहकारी संस्थांचा उद्देश शेतकऱ्यांनी काटकसर करून स्वावलंबी व्हावे, हा होता. परंतु सहकारितेचे तत्त्व शेतकऱ्यांच्या मनात कधीच बिंबले नाही. सहकारी संस्था म्हणजे कर्ज देणारी सोसायटी असेच शेतकऱ्यांना वाटते, सोसायटीत ठेवी ठेवल्या नाही तर सोसायटी चालणार नाही, याची जाणीव शेतकऱ्यांना अजूनही नाही, यामुळे ठेवी गोळा होत नाहीत. बहुतेक पतपेढ्या जिल्हा केन्द्रीय सहकारी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जावरच अवलंबून आहेत.

2. शेतकऱ्याला दिलेले कर्ज आणि त्यांच्या मालाची विक्री यात समन्वय नाही. तसेच सहकारी उत्पादन संस्था आणि विपणन संस्था यांच्यातही समन्वय नाही. उदा. विदर्भातील सहकारी तांदुळ गिरण्या घ्या. या नावाच्या सहकारी गिरण्या आहेत. काही मोठे व्यापारी शेतकरी एकत्र येवून सहकारी तांदुळ गिरणी काढतात, या गिरण्या सहकारी संस्थांना मिळणारे सवलतीच्या दराचे कर्जे जिल्हा सहकारी केन्द्रीय बँकेकडून मिळवितात आणि सहकारी संस्थांना मिळणारे इतर फायदेही घेतात. या सहकारी गिरण्यांचा माल खाजगी व्यापाऱ्यांना विकल्या जातो. हे व्यापारी वाटेल त्याभावाने तांदूळ ग्राहकांना विकतात. अशाप्रकारे सहकारितेचा दुरूपयोग होऊन त्याचे विकृत स्वरूप झालेले आहे. जोपर्यंत उत्पादन आणि विपणन यांचा समन्वय होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने सहकारी चळवळ यशस्वी होणार नाही.

3. काही राजकारणी आणि स्वार्थी लोकांनी सहकारी संस्थावर ताबा मिळवून आपले नातेवाईक आणि मित्रांसाठी सहकारी संस्थांचा दुरूपयोग केला आहे. सहकारी संस्था स्वाहाकारी झाल्या आहेत.

4. सहकारी संस्थाचे सदस्य घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरत नाहीत. यामुळे अनेक पतपेढ्या व सहकारी संस्था डबघाईला आल्या आहेत. भारतात सध्या बंद पडलेल्या पतपेढ्यांची संख्या 12,000 चे वर असून अर्ध्या पतपेढ्या तोट्यात चालत आहेत.

5. कर्ज देतांना वशिलेबाजी आणि दिरंगाई होते असा आरोप केला जातो. सहकारी संस्थेत विश्वास आवश्यक असल्याने असे आरोप होणे धोक्याचे आहे.

6. सहकरी संस्थांमध्ये कमी योग्यतेचे कमी पगारावरील लोक नेमण्यात येतात. त्यामुळे कार्यक्षमता कमी असते. व्यापारी बँका आणि सहकारी बँका यांचेतील सेवांचा फरक स्पष्टपणे जाणवतो.

7. सहकारी संस्थांचा विकास सरकारी पाठिंब्यावर व पुढाकारावरच झाला. अनेक लोक सहकारी संस्थेला सरकारी संस्थाच समजतात. हे अनिष्ट आहे. सहकारी संस्था स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही.

### आजची स्थिती - सहकारी संस्थामधील घोटाळे

गेल्या काही वर्षात नागपूर, औरंगाबाद आणि इतर काही ठिकाणच्या सहकारी संस्थांमधील घोटाळे पुढे आले आहेत. यामुळे सहकारी संस्थावरील विश्वास ढळू लागला आहे. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे नागपूर महिला सहकारी बँकेतील घोटाळा. काही लोकांना बँकेने कोट्यावधी (रू. 5 कोटीपर्यंत) रूपयांची कर्जे दिली. पुरेसे तारण (Security) ठेवण्यात आले नाही. बँक अडचणीत आली. याबाबत गुन्हेगार असणाऱ्या बँकेच्या अधिकाऱ्यांवर अटक आणि इतर कारवाई करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने या परिस्थितीची दखल घेवून प्रत्येक ठेवीदाराला एका वेळी 1000 रू. पेक्षा अधिक रक्कम काढू देऊ नये, असा आदेश काढला आहे. याचा ठेवीदारांवर काय परिणाम झाला असेल, याचा विचार करा. ज्याचे लाखो रू. बँकेत आहेत, त्याला त्याचेच पैसे काढता येत नाहीत.

नागपूर महिला सहकारी बँक नागपुरातील एक प्रतिष्ठित आणि नावाजलेली संस्था आहे. या बँकेतील घोटाळ्यामुळे सहकारी चळवळीला बराच धक्का बसला आहे. अनेक महाविद्यालये व इतर संस्था सहकारी बँकेत 1 टक्का जास्त व्याज मिळत असूनही तेथील ठेवी काढून राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये पैसे ठेवीत आहेत. ही परिस्थिती सहकारी संस्थांसाठी अत्यंत धोक्याची आहे. या संदर्भात काही महत्वाचे प्रश्न निर्माण होतात.

### सहकारी संस्थावरील नियंत्रणाचे काय ?

सहकारी संस्थांवर नियंत्रण दोन प्रकारचे असते. एक,सहकार खाते. प्रत्येक सहकारी संस्थेला रजिस्ट्रारकडे नोंदणी करावी लागते. सहकार खात्याला प्रत्येक सहकारी संस्थेची तपासणी करून आदेश देण्याचा अधिकार आहे. दुसरे, रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण. 1965 च्या बँकिंग कायद्यानुसार सहकारी बँकांनाही बँकाविषयक सर्व कायदे लागू झाले आहेत. रिझर्व्ह बँकेला सर्व सहकारी बँकांवर रोख निधी, तरलता, कर्जावर नियंत्रण इत्यादी बाबतचे नियम लागू असून रिझर्व्ह बँकेला सहकारी बँकांच्या तपासणीचेही अधिकार आहेत.

आता प्रश्न निर्माण होतो की, सहकारी बँकांमध्ये नियमबाह्य व्यवहार होताना सहकार खाते आणि रिझर्व्ह बँक काय करीत होते ? महिला सहकारी बँकेत जे कर्ज देण्याचे नियम बाह्य व्यवहार झाले, ते सहकार खात्याच्या कसे लक्षात आले नाही ? महिला सहकारी बँकेचे व्यवस्थापक आणि संचालक मंडळ हे अर्थातच याला जबाबदार आहेत. परंतु सहकार खात्याला ही अनियमितता तपासणीत का लक्षात आली नाही?

रिझर्व बँकेची भूमिका तर अधिकच आश्चर्यकारक आहे. माझ्या माहितीनुसार नागपूर महिला सहकारी बँकेची पाहाणी रिझर्व बँकेने केली होती. या पहाणीत कर्जाचा घोटाळा, रोख पैशाचे खालावलेले प्रमाण इत्यादी बाबी कशा लक्षात आल्या नाहीत ? नागपूर महिला सहकारी बँकेच्या ठेवीदारांनी रिझर्व बँक तसेच सहकार खात्याच्या भूमिकेबाबत आणि बेजबाबदार व्यवहाराबाबत चौकशीची मागणी करणे आवश्यक आहे.

### सहकारी संस्था उत्पन्नाची साधने शोधत नाहीत

सहकारी संस्था आर्थिक अडचणीत असूनही उत्पन्नाचे नवीन मार्ग स्वीकारत नाही. उदा. साखर आयुक्त श्री. अपूर्व चंद्रा यांनी साखर कारखान्यांनी विद्युत निर्मिती प्रकल्प हाती घ्यावे,असा प्रयत्न केला. यामुळे एकतर साखर कारखान्यांना अनायासे विद्युतशक्ति मिळून त्यांचा वीज खर्च वाचेल. दुसरे महाराष्ट्र वीज नियामक मंडळ ही वीज 3 रू.5 पैसे

दर युनिट या आकर्षक दराने खरेदी करावयाला तयार आहे. परंतु साखर कारखाने ही योजना स्वीकारावयाला तयार नाहीत. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची वीज निर्माण करण्याची क्षमता 1000 ते 1200 मेगॅवॅट आहे. सध्या हे कारखाने फक्त 35 मेगॅवॅट वीज निर्माण करतात. साखर कारखान्यांनी वीज निर्मिती प्रकल्प स्वीकारला तर प्रत्येक साखर कारखान्याचा बॉयलर आणि टरबाईनवर होणारा 50 लक्ष रू. खर्च वाचेल. शिवाय या कारखान्यांचा गाळप झालेल्या प्रतिटन उसामागे 70 रू. ते 90 रू. खर्च वाचेल. सहकारी साखर कारखाने कोणताही फायदेशीर उपक्रम हाती घ्यावयाला तयार नाहीत, हा याचा अर्थ आहे.

### कर्जमाफीची सवय वाईट

सध्या प्राथमिक सहकारी पतपेढ्या जिल्हा केन्द्रीय सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना कर्ज देतात. शेतकऱ्यांना कर्जाचे सुलभ रीतीने हप्ते फेडण्याची सवलत आणि कमी व्याजाने कर्ज देणे हे बरोबर आहे, परंतु कर्जमाफ करणे ही शेतकऱ्यांसाठी वाईट प्रथा होईल. कर्ज माफ, व्याज माफ, फुकट वीज अशा धोरणांमुळे शेतकऱ्यांना अनिष्ट सवयी लागतील शेवटी संस्था बुडतील आणि शेतकऱ्यांचेच नुकसान होईल. सहकारी संस्था या धर्मादाय संस्था नसून धंदेवाईक वित्तीय संस्था आहेत, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

### सहकारितेशिवाय तरणोपाय नाही

भारतात सद्यपरिस्थितीत सहकारितेशिवाय दुसरा मार्ग नाही. एकटा शेतकरी किंवा छोटा व्यापारी बाजारातील स्पर्धेत टिकणार नाही. उपभोक्त्यांचीही पिळवणूक थांबवावयाची असेल आणि त्यांना योग्य भावाने वस्तु व सेवा मिळवून द्यावयाच्या असतील तर सहकारी संस्था हाच एकमेव मार्ग आहे. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था सहकारितेवर आधारित असावी, असे आपल्या पुढाऱ्यांना वाटत होते. सहकारी सामायिक संपत्ती (Co-operative Common-wealth) हे आपले स्वराज्यपूर्वीपासून स्वप्न होते. 'एका बाजूने भांडवलवाद आणि दुसऱ्याबाजूने साम्यवाद या दोहोंमधील सुवर्णमध्य म्हणजे सहकारी संस्था' आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकारितेचा अवलंब केला तर शेतकरी, उपभोक्ते आणि सर्व गरीब व मागासवर्गीय जनतेचा फायदा होईल. रेल्वे, कारखाने, विद्यापीठ, महाविद्यालये, शाळा अशा प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी सहकारी संस्था स्थापन करून त्यांना लागणाऱ्या उपभोगाच्या सर्व वस्तु व सेवा या संस्थाद्वारे मिळविल्या तर त्यांना योग्य भावाने चांगल्या वस्तू मिळतील. याचबरोबर लक्षावधी लोकांना या संस्थामध्ये रोजगार मिळून सहकारितेवर आधारलेला आदर्श समाज आपण निर्माण करू शकू. असा समाज निर्माण होण्याचे स्वप्न साकार होईल आणि भविष्यात सर्व सहकारी संस्था कार्यक्षम होवून सर्व लोकांना चांगल्या सेवा पुरवितील अशी अपेक्षा या सहकारितेच्या शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने करू या.

●●●

# सहकारी चळवळीची पर्याप्तता, पर्यायिता आणि पुनर्रचना

● वसंत जुगळे, कोल्हापूर.
*प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

● योजना जुगळे, कोल्हापूर.
*यु. जी. सी. टीचर फेलो, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

## I

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्याच्या विकास प्रक्रियेत कृषि औद्योगिक सहकारी समाजाची संकल्पना महत्त्वाची ठरली आहे. विशेषत: त्याला योग्य दिशा देणारे नेतृत्व लाभल्यामुळे या संकल्पनेची परिणामकारकता वाढली. पण दुसऱ्या पिढीतील नेतृत्व या संकल्पनेच्या अंमलबजावणीमध्ये अपयशी ठरले, शासकीय धोरणांचा पाठींबा देखील पूर्वीसारखा मिळत नाही. उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या त्सुनामी लाटेमध्ये कृषि औद्योगिक सहकारी समाजाची संकल्पना पर्यायतेच्या(Substitutability) परिणामाने बळी जात आहे. या संकल्पनेच्या छत्राखाली बसून राजकीय अर्थशास्त्राचे डावपेच आखून अर्थकारण +राजकारण + समाजकारण करणाऱ्यांची धार देखील बोथट झाली आहे. सहकारी चळवळीतील अव्यक्त सामर्थ्याने त्यातील पर्याप्तता(optimality) निदर्शनास आणून देण्याची वेळ आली आहे.

इ.स.2004-05 च्या अर्थसंकल्पामध्ये कृषि वित्त पुरवठ्याच्या पुनर्रचनेसाठी केंद्र व राज्य सरकारांच्या विशिष्ट हिश्याच्या अधिभाराने सहकारी पतपुरवठ्याच्या पुनर्रचनेसाठी रु.15000 कोटींची तरतूद आहे. यासंबंधी निर्णय घेण्यासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे ए.वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यदल (Task force) नियुक्त करण्यात आले होते. या कार्यदलाच्या शिफारशीनुसार रु. 15000 कोटींच्या पुनर्वाटपाचा निर्णय झाला आहे. या कार्यदलाचा अहवाल अलीकडेच सादर झाला आहे. कमकुवत राज्य शिखर बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या पुनर्रचनेसाठी हा पैसा वापरला जाईल असे सुतोवाच करण्यात आले आहे. तळातल्या पतसंस्थांच्या पुनर्रचनेची गरज असूनदेखील अद्याप हे क्षेत्र दुर्लक्षित आहे. सहकारी पत चळवळीच्या पुनर्रचनेचा विषय ऐन वित्तीय उदारीकरणाच्या टप्प्यावर आलेला आहे. त्यामुळे सहकारी पतपुरवठा संस्थांच्या पुनर्रचनेची ही संधी दवडू नये. प्रत्येक राज्यांनी आपल्या आर्थिक सुधारणांच्या विषयपत्रिकेत सहकारी पत

चळवळीच्या पुनर्रचनेचा विषय अग्रक्रमाने घ्यावा. कारण यापुढचा काळ हा राज्यांतील आर्थिक सुधारणांचाच काळ आहे.

सहकारी चळवळीची पर्याप्तता आणि पर्यायतेचा विचार करुन तिच्या पुनर्रचनेची गरज असल्याचे चिंतन प्रस्तुत लेखामध्ये केले आहे. विकास व्यवस्थेमध्ये सहकारी क्षेत्राला एक विशिष्ट मर्यादा आहे का ? विकास व्यवस्थेला ही चळवळ पर्याय देऊ शकते का ? आणि गरज पडल्यास सहकार क्षेत्राची पुनर्रचना कशी करावी याची मांडणी या लेखामध्ये केली आहे.

## II

**सामुहिक कृति गटविषयक सिध्दांत** (Collective Action Group Theories)

आर्थिक विकासाचे व्यवस्थापन करण्यासाठी एका विशिष्ट आर्थिक पध्दतीचा अवलंब नेहमी होत असतो. त्यालाच आपण अर्थव्यवस्था संबोधतो. भांडवलशाही, समाजवादी, संमिश्र व्यवस्था हे त्या व्यवस्थेचे प्रस्थापित प्रकार आहेत. त्या त्या तत्त्वप्रणालीच्या वैशिष्ट्यांनी संबंधित अर्थव्यवस्थांचे संघटन होऊन आर्थिक विकासाची चौकट उभी केली जाते. खुली बाजार व्यवस्था आणि नियोजित बाजार व्यवस्था या दोन्हीमध्ये सुवर्णमध्य साधणारी बाजार व्यवस्था म्हणजे संमिश्र व्यवस्था होय. सहकार ही संमिश्र व्यवस्थेतील तिसरी शक्ती आहे. संमिश्र बाजार व्यवस्थेमध्ये या तिसऱ्या शक्तीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि समन्वयक स्वरुपाचे असते. संमिश्र बाजार व्यवस्थेच्या चौकटीतून आर्थिक विकासाची प्रक्रिया व्यक्त करणारी अनेक प्रतिमाने व सिध्दांत मांडले गेले आहेत. पण व्यावहारिक दृष्टीकोनातून 'एकमेका साहाय्य करु, अवघे धरु सुपंथ' या उक्तीप्रमाणे होणाऱ्या समाज व्यवस्थेच्या विकासाकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळेच तत्त्व आणि व्यवहार यामध्ये फारकत होऊन विकासातील विकृती अथवा अस्वीकृती (Non-applicability) अनुभवायला येते. कागदावरचा आराखडा व्यावहारिक वास्तवावर आणि परिणामकारकतेवर आधारलेला असावा असे नेहमी विकास प्रक्रियेतील अभिकर्त्यांना वाटते. आर्थिक व्यवहाराच्या या पध्दतीवर आधारलेली वैचारिक मांडणी सिध्दांतकारांनी लक्षात घेतली पाहिजे. सिध्दांतकारांनी मांडलेली प्रतिमाने व्यवहाराच्या आणि प्रशासनाच्या सुलभतेच्या कसोटीत उतरली पाहिजेत.

कोणताही सिध्दांत हा ठराविक गृहितकाच्या चौकटीतच तपासला जातो. पण व्यवहाराला कोणतीही चौकट नसते, त्याची व्याप्ती मोठी असते. शिवाय ती स्थळ-काळ-व्यक्ति सापेक्ष असते. सिध्दांत ही एक आंतर-दृष्टी असते. व्यवहाराला बाह्य दृष्टी आवश्यक असते. यथातथ्य आणि वस्तुनिष्ठ अशी ही दृष्टी असते.

फलप्रामाण्यवाद्यांनी (pragmatism) या बाह्य दृष्टीकडे पाहूनच आपल्या व्यावहारिक बाबींचे विवेचन केलेले आहे.

सामुहिक कृती गटाच्या सिध्दांतकारांनी या दिशेने थोडासा प्रयत्न केलेला आहे. सामुहिक कृती क्षेत्रामध्ये बिगर सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था (Voluntary) व सहकारी संस्थांचा प्रामुख्याने समावेश होतो. उपयोजित अर्थशास्त्रातून निर्माण झालेला हा संप्रदाय आर्थिक विकासाचे व्यवहारवादी सूत्र घेऊन लोकशाहीच्या चौकटीमध्ये, जनकल्याणाच्या मोहिमेमध्ये (चळवळीमध्ये) गुंतलेला आहे. याला सिध्दांतापेक्षा व्यवहार महत्त्वाचा असला तरी व्यवहारातूनच सिध्दांत येतात

हेही संप्रदाय विसरत नाही.

चालू दशकाच्या प्रारंभापासून विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये काही नवे प्रवाह आले. भांडवलशाही आणि समाजवादी अर्थरचनेच्या प्रक्रियेतून होणारा आर्थिक विकास काही मर्यादित अर्थाने लोकाभिमुख होत नाही हे प्रत्ययाला आले. 1940 ते 1970 या तीस वर्षातील विकासाच्या प्रक्रियेमध्ये खुल्या बाजाराऐवजी नियोजित पध्दतीने होणारा विकास प्रभावी असतो, हे सिध्द करणारी अनेक प्रतिमाने अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुध्दानंतर विकासाची प्रतिमाने तयार करण्याचा उद्योगच अर्थशास्त्रज्ञांनी केला. त्यातली काही प्रतिमाने भांडवलशाहीच्या चौकटीतली होती, तर काही नियंत्रित अर्थव्यवस्थांच्या संरचनेतली होती. पण दोन्ही प्रकारांना फाटा देऊन व्यावहारिक पातळीवर विकासाची कामे सामुहिक प्रयत्नातून होत होती. अल्पविकसित व विकसनशील देशामध्ये असे अनेक प्रयोग अस्तित्वात आले. नागरिकांच्या सांघिक प्रयत्नातून त्यांच्या इच्छेचा, गरजेचा विकास घडून येऊ लागला. विभागीय पातळीवरच्या विकासामध्ये अशा सांधिक प्रयत्नांना महत्त्व प्राप्त झाले. पण दुर्दैवाने विकासाच्या या तिसऱ्या शक्तीकडे अर्थशास्त्रज्ञांनी दुर्लक्ष केले (Janery, Sad Onlet and Thor Becke, 1993).

1970 नंतर जगभर खाजगीकरणाची लाट आली. विशेषत: 1972 मध्ये नाणेनिधीच्या प्रयत्नाने स्थिरीकरण धोरणाचा अवलंब सुरु झाला. स्थिरीकरणाचे उपाय खास करुन विकसनशील व अल्पविकसित देशांसाठीच अंमलात आणले गेले. 1980 नंतर अल्पकालीन स्थिरीकरण धोरणांचा जगभर प्रसार झाला. व्यापारातील आणि अर्थसंकल्पातील तूट भरुन काढण्यासाठी या धोरणांचा अल्पकाळापुरताच का असेना पण अनुकूल परिणाम दिसून येऊ लागला. पूर्णत: नियोजित पध्दतीमध्ये थोडेसे शैथिल्यही आले. तसे पाहिल्यास अल्पविकसित राष्ट्रांनी अगदी सुरुवातीपासूनच नियोजनाचा मार्ग स्वीकारलेला होता. नियोजनामुळेच त्या देशांची आर्थिक प्रगती खुंटली आणि अर्थव्यवस्थांमध्ये अनेक विसंगती निर्माण झाल्या. अपुरा निधी, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा, साधनसामग्रीचा अपव्यय, विकास कामामधली अकार्यक्षमता व परिणामशून्यता हे सर्व नियोजित अर्थव्यवस्थांचे दुष्परिणाम आहेत अशी जोरदार टीका होऊ लागली. या दरम्यान खुला बाजार व नियोजित बाजार यातील मधला मार्ग म्हणून सेवाभावी व सहकारी क्षेत्राचा झपाट्याने विकास झाला. सेवाभावी क्षेत्राचा प्रयोग खूपच परिणामकारक ठरला. व्यक्तींच्या सामूहिक अथवा संघटनात्मक प्रयत्नांमुळे खर्च कमी आणि फायदे जास्त अशी स्थिती निर्माण झाली. शिवाय खुल्या व नियोजित व्यवस्थांमधील संभाव्य अडथळे यामुळे हळूहळू दूर होऊ लागले (Bardhan 1989, Hoff Braverman and Stiglitz 1993).

1990 च्या दशकामध्ये जागतिक पातळीवर देखील आमूलाग्र असे बदल घडून येऊ लागले. विकेंद्रित शासन पध्दतीचे महत्त्व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या तज्ज्ञांनी मान्य केले. विकेंद्रित स्वरुपाच्या विकास कार्यक्रमामध्ये स्थानिक स्वयंसेवी संस्था व संघटनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. नव्या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणा, रुपांतर खर्च (Conversion cost), कार्यक्षमता, आपलेपणाची भावना, इतरांच्या कल्याणासाठी झटण्याची सेवाभावी प्रवृत्ती इत्यादि गोष्टींमध्ये अनुकूल वातावरण निर्माण झाले. विश्वास आणि

आपलेपणाच्या प्रक्रियेतूनच सहकारी संस्थाचे परिणामकारक योगदान ठरु लागले. विकास कामातील त्यांची भूमिका विस्तारत गेली. अंशत: नियोजित व अंशत: खुली अशी व्यवस्था निर्माण करुन सामुहिक हिताचे प्रयत्न वाढले. विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये कल्याणकारी राज्याची संकल्पना आणून लोकाभिमुख विकास कार्ये, नियोजनाने आखली जाऊ लागली. सहकारी कार्याचा प्रभावीपणा स्वयंसेवी संस्थांनी व सहकारी संस्थांनी व सहकारी संस्थांनी वाढविला. सरकार आणि जनता यांच्यामध्ये या संस्थांच्या माध्यमाने तयार झालेला दुवा अत्यंत प्रभावी ठरल्याचे काही दाखले अभ्यासातून मिळाले. आशिया खंडातील 16 राष्ट्रांचा तौलनिक अभ्यास करुन (Up hoff - 1982-83) हे सिध्द करता आले. त्या काळात अशा सहकारी व सेवाभावी संस्थांचे अस्तित्व असणे सामाजिक व आर्थिक विकासाचे निदर्शक बनले. राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या नियोजनामध्ये स्थानिक समस्यांना न्याय मिळू शकत नाही अशावेळी स्वयंसेवी क्षेत्राव्दारे त्यांचा पाठपुरावा करणे सुलभ होते. सप्टेंबर 1844 च्या मानवधर्म सभेनेदेखील हाच विचार मांडून समाजव्यवस्थेला कामाला लावले होते. संघटन, विकासाचा मार्ग बनलेला होता. स्वयंसेवी सहकारी संस्थांच्या अस्तित्वाचे दुसरे एक महत्त्वाचे फलित म्हणजे खाजगी, सरकारी आणि सेवाभावी क्षेत्रांचे एकत्रीकरण करुन आर्थिक विकासाचा अभिप्रेत टप्पा त्या माध्यमाने गाठता येतो. त्यामुळेच कोणी त्याला विरोध करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. खाजगी व सरकारी क्षेत्रातूनही त्याला पाठिंबा मिळत गेला. हे विशेष होते. लोकांचा भरीव पाठिंबा, त्यांचा सक्रीय सहभाग, यामुळे विकासाच्या कामामध्ये प्रभावीपणा आला आणि आर्थिक विकासाचे स्थानिक ईप्सित साध्य होऊ लागले.

नोकरशाहांच्या तावडीतून सुटका झाली हा एक फायदा या सेवाभावी क्षेत्राला मिळाला. व्यवहारातला तांत्रिकपणा संपुष्टात आणला गेला. तसेच खाजगी क्षेत्रातील किंमत यंत्रणेचा प्रभावही संपुष्टात आला. खाजगी फायद्यांची व्यक्तीगत मोजदाद सुरु झाली. तसेच व्यापक अर्थाने लोककल्याणाच्या घडामोडी सुरु झाल्या. हेच 1990 च्या दशकातील विकास प्रक्रियेचे फलित आहे.

सामूहिक कृती क्षेत्र अथवा विकासातील ही तिसरी शक्ती म्हणजे ऐच्छिक अथवा स्वयंसेवी यंत्रणा होय. या यंत्रणेमध्ये सामुहिक सौदाशक्ती चर्चेव्दारे निर्धारित होते. व्यक्तिगत हिताबरोबरच सामुहिक हिताचा विचार या क्षेत्रामध्ये केलेला असतो. (Apthorn and Gasper, 1982) निवडीच्या प्रक्रियांमध्ये व्यक्तिगत हितापेक्षा सामुहिक हिताचा विचार, राज्य निर्देशनाचा अभाव, आणि नफ्याच्या अतिरेकाचा अभाव ही त्रिसूत्री अंगीकारुन हे सामुहिक कृतीक्षेत्र वाढते. याची दखल अलिकडच्या विकासाच्या अर्थशास्त्रज्ञांनी घेतली ही वस्तुस्थिती आहे आणि ती विशेषत्वाने नमूद करण्यासारखी आहे. पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष आता अल्पविकसित व विकसनशील राष्ट्रांकडे वळले आहे. सामाजिकशास्त्र शाखेतल्या अनेक विषयांची सैध्दांतिक व व्यावहारिक संपन्नता या देशातच आहे. हे आता त्यांना पटले आहे. या देशातली सामाजिक शास्त्रे श्रीमंत आहेत असे उद्‌गार काढण्यापर्यंत शास्त्रज्ञांमध्ये एकमत झालेले दिसून येते.

सामुहिक कृती क्षेत्रामध्ये तसे पाहिल्यास विकेंद्रित शासन व्यवस्थेतील सर्व घटक, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था यांचा समावेश होतो. लोकांनी लोकांच्यासाठी लोकशाही पध्दतीने

एकमेकांच्या सर्वांगीण विकासाचे निर्णय घेऊन त्यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता या क्षेत्रामध्ये निर्माण झाली आहे.

सहकारी चळवळीसंबंधींच्या पूर्वीच्या अक्षर साहित्याने (यशोगाथा) सहकाराला कैद करुन ठेवलेले होते. लोकांच्या गुणाला, शक्तीला आणि मनोबदलाला प्रारंभीच्या सहकारी चळवळीने म्हणावी तशी प्रेरणा मिळाली नाही. आजसुध्दा ती कितपत मिळते हा संशोधनाचा विषय आहे. सर्वांच्या मालकीच्या साधनसंपतीचा व्यक्तीगत पातळीवर अधिकाधिक कसा उपयोग करुन घेता येईल या उद्देशानेच चळवळीचे प्रयत्न झाले आहेत. खरे म्हणजे असा स्वार्थीपणा सामुहिक हिताला अडथळाच आहे. सामुहिक हिताची भावना अद्यापही सामुहिक कृती क्षेत्रामध्ये आलेली नाही. (Olson, 1985) शासनाच्या हस्तक्षेपाशिवाय ही सामुहिक हिताची भावना अस्तित्वात येणार नाही. ही भावना जेंव्हा अस्तित्वात येईल तेव्हा मानवी चेहरा पूर्णपणे बदललेला असेल आणि स्वयंपोषित विकासाची प्रक्रिया प्रत्यक्षात अस्तित्वात आणता येईलल. मनुष्यबळ विकासाची संकल्पना त्यामुळेच महत्त्वाची बनली आहे. इतरांची अडचण होऊ नये किंवा इतरांना त्रास होईल असे आपण काही करु नये असे जोपर्यंत प्रत्येकाला वाटत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येणार नाही. त्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी सामुहिक कृती क्षेत्राला फार मोठी भूमिका पार पाडता येईल. सहकारातून ही भावना निर्माण व्हावी असा सामुहिक कृतिगट विषयक सिद्धांताचा दृष्टीकोन आहे. त्यांच्या मते (Bardhan 1993, Necent 1993) सामुहिक कृतीच्या मागची प्रेरणा लक्षात घेऊन समूहाची वैशिष्ट्ये अभ्यासली जावीत आणि त्यांच्या मार्फतच अभिप्रेत असलेला भावी विकास साध्य केला जावा. त्यासाठी समूहाचा आकार लहान असावा, तो एकजिनसी लोकांचा असावा, त्यांच्यामध्ये जवळीक असावी, एकमेकांमध्ये प्रत्यक्ष संबंध असावेत त्यांच्यातील व्यवहारामध्ये पारदर्शीपणा असावा असे काही निकष तज्ज्ञांनी सुचविले आहेत. अशा छोट्या समूहाची अथवा संघटनांची वरच्या पातळीवर शिखर संस्था असावी. सामुहिक कृतीमध्ये असहकार पुकारणाऱ्यांचे सामुहिक प्रबोधन व्हावे, अधिक विश्वासार्हता निर्माण करण्याच्या दृष्टीने काही प्रलोभने, नियम, कायदे अस्तित्वात आणणे, शासनालाही गरजेचे वाटेल. बऱ्याच वेळा लोकवस्तू पेक्षा लोकगटाची वस्तू बरीच प्रभावी ठरते. (Bardhan 1989) कारण समूह लहान असतो त्यांचे हित मर्यादित असते. मोठ्या समूहामध्ये सुरुवातीचा उत्साह अखेरपर्यंत टिकत नाही. परंतु मर्यादित समूहामध्ये मात्र तो टिकू शकतो. म्हणून अशा समूहांची शिखर संस्था बांधणे आवशयक असते.

महाराष्ट्रातल्या सहकारी चळवळीवर अनेकांनी संशोधन केले आहे. हे संशोधन प्रामुख्याने सहकारी संस्थाची यशोगाथा मांडणारे विश्लेषणच आहे. पण एखादी सहकारी संस्था का यशस्वी होते अथवा अयशस्वी ठरते? त्याच्यामागील प्रेरणा, नीतीमूल्ये कोणती ? त्याग कोणता ? एकमेकांमध्ये गुंता कसा निर्माण होतो? यासंबंधीचा चौकसपणा कमी झाला आहे. या पध्दतीचा अभ्यास या अगोदरच झाला असता तर सहकाराच्या भावी विकासासाठी शासकीय पातळीवर योग्य धोरणात्मक निर्णय घेता आले असते. त्यामुळेच अलीकडे सहकाराच्या अभ्यासकांनी सहकाराच्या पारंपरिक पध्दतीच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले आहे. सहकारातील अव्यक्त सामर्थ्याकडे संशोधकांचे लक्ष लागले आहे. सामाजिक जीवनामध्ये अनेक घडामोडी नेहमी घडत

असतात. त्यांचा अभ्यास करुन सहकाराची नवी क्षितिजे शोधणे सोपे होते. पण हा व्यवहारवाद मात्र प्रत्येकाला समजला पाहिजे. त्यादृष्टिने महाराष्ट्रातली सहकारी चळवळ वाढू शकली नाही, ती एका विशिष्ट प्रकारच्या पारंपरिक पिंजऱ्यामध्येच कैद झाली आहे. त्यातील सामर्थ्य कुणालाही ओळखता आलेले नाही हीच या राज्यातल्या चळवळीची शोकांतिका आहे. राज्यातली सहकाराची संख्यात्मक वाढ ज्या गतीने झाली तेवढ्याच गतीने गुणात्मक घसरणही झाली.

सामुहिक प्रयत्नाला नेहमीच लोकांचा पाठिंबा आणि सहकार्य असते.(Bennett 1989) दीर्घ पल्ल्याच्या विकासाच्या योजना आखून त्यात सातत्य ठेवल्यास त्याची एक वैभवशाली परंपरा निर्माण होऊ शकते. म्हणून समूहाची निर्मिती अल्पकाळासाठी असू नये. सहकारी संस्था स्थापन करणे सोपे आहे पण ती टिकविणे आणि त्याचबरोबर सहकाराची मूल्ये जोपासणे हे मात्र अवघड आहे. एखादी सहकारी संस्था यशस्वी किंवा अयशस्वी का होते? यासंबंधीचा नमुनाअभ्यास काही शास्त्रज्ञांनी केला आहे. (Robert Wade, Baviskar) सहकार आणि दारिद्र्य निर्मूलन, सहकारातील सहकार, सहकाराच्या पारंपरिक पध्दतीचे संघटन यासारख्या सहसंबंधावर आधारित अभ्यास होणे आवश्यक आहे. सहकाराच्या पारंपरिक संघटनांद्वारे नव्या सामर्थ्यांची जाणीव होऊ शकते ( North 1991).

सहकाराचे यश हे उत्पादनातील ताळमेळ, अंतर्गत व बाह्य बचती, भौतिक व भौगोलिक संरचना, उर्ध्वमुखी आणि समांतर सहसंबंध, पणन व प्रक्रिया यासारख्या एकात्मिक कार्याच्या सहसंबंधावर अवलंबून असते.

## III

### सहकाराची तात्त्विक बैठक

अलीकडची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिल्यानंतर असे दिसून येते की, सहकाराचा तात्त्विक उगम हा भांडवलशाही व्यवस्थेच्या दुष्परिणामातून झाला आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या दुष्परिणामामुळे त्रस्त कमजोर श्रमिक वर्गाचे रक्षण व्हावे म्हणून 18 व 19 व्या शतकापासूनच पर्यायांचा शोध आणि बरेच विचारमंथन चालू होते. 19 व्या शतकामध्ये सहकाराला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले असले तरी, काही समाजव्यवस्थेमध्ये पारंपरिक स्वरुपाच्या सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. मनुष्य हा समूहप्रिय प्राणी असल्यामुळे समाजातील अनेकांचे साहाय्य एकाला किंवा एकाचे साहाय्य अनेकांना, अशी परंपरा अगदी पूर्वीपासूनच चालत आलेली आहे. जसे शेतीतील सावड घालण्याची पध्दती, पैरा पध्दती, बैल-बारदान वापरायला देण्याची पध्दती, रशियातील मीर पध्दती, सर्बियातील झाड्रुग पध्दती, कोल्हापूरातील बुडकी पध्दती, फंड पध्दती, धान्य बँक इ. ची उदाहरणे देता येतील.

वरील पार्श्वभूमीवर व्यवहारातल्या बाजू व अडचणी नीटपणे समजून घेऊन त्यावर सार्वत्रिक उपाय शोधणे आवश्यक बनले होते. आर्थिक व्यवहारातील घडामोडी कमजोर वर्गाला त्रस्त करणार नाहीत आणि दुर्बलांचे रक्षण होईल अशी जी व्यवस्था 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात शोधून काढली तिला आपण सहकार म्हणतो. सामाजिक सद्गुणांचा निर्देश करणारी ही चळवळ आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या अतिरेकी पिळवणूकीतूनच ही सामाजिक संस्था निर्माण झाली. समाजवादातून निर्माण होणाऱ्या साम्यवादी व्यवस्थेतील सामुदायिक

व सार्वजनिक क्षेत्राला मात्र सहकारामुळे अडथळे येतील असे वाटते. तरी सुध्दा समाजवादी तत्त्वांची सद्‌भावना सहकारात असल्यामुळे आणि सहकारातून सामुदायिकता पाळली जाणे शक्य असल्याने समाजवाद्यांनीही या चळवळीला पाठिंबा दिला. क्रांतीनंतर सहकारातून समाजवादी ध्येय गाठणे सोपे होईल असे समाजवाद्यांना वाटत होते.

भांडवलशाहीच्या दुष्परिणामांमुळे पर्यायाचा शोध घेतला जात असताना संयुक्त भांडवली संस्थांची व्यवस्था पुढे आली. संयुक्त भांडवली संस्था ही एक आर्थिक व्यवहार करणारी मर्यादित लोकांची आर्थिक व्यवस्था आहे. ही व्यवस्था सामुहिक आर्थिक उपक्रमासाठी असू शकते. या उपक्रमामध्ये कौटुंबिक भांडवल कमी पडत असते म्हणून त्यामध्ये भागीदारी भांडवल घेऊन तो उपक्रम चालू ठेवला जातो. जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या हेतुने संयुक्त भांडवली संस्थांचे संघटन झालेले असल्याने, व्यापक समाजहितावर त्याचे विपरित परिणाम होऊ लागले. श्रीमंतांकडून गरीब व कमजोरांचे शोषण होऊ लागले. हा पर्याय कामगार आणि दुर्बलांच्या हिताचा नव्हता त्यामुळे कमजोर आणि शोषित श्रमिकांच्या भल्यासाठी सामूहिक प्रयत्नांची तीव्र गरज निर्माण झाली. कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींकडून कामगारांच्या सामूहिक प्रयत्नातून सहकार जन्माला घालण्याचे प्रयोग झाले. आपणच आपले कल्याण एकमेकांच्या सहकार्याने करु शकतो ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण झाली. भांडवलदारांचे जिथे सामुहिक प्रयत्न होतात तिथे कामगारांचे सामुहिक प्रयत्न का होऊ नयेत ही भावना त्यामागे होती. भांडवलशाहीच्या दुष्परिणामातून साम्यवाद जन्माला येतो ह्या मार्क्सवादी तत्वज्ञानाला सहकारामुळे खरे तर अडथळेच आले. पण कमजोर आणि शोषित श्रमिक स्वत:च्या भल्यासाठी एकत्र येत होते. क्रांतीकारी समजल्या जाणाऱ्या साम्यवादी नव्या व्यवस्थेच्या निर्मितीऐवजी कामगारांचे आर्थिक संघटन झाले. कामगार एकत्र येतात ही गोष्ट काही कमी नव्हती. साम्यवादी व्यवस्थेच्या निर्मितीसाठी कामगारांचे संघटन आणि विकेंद्रित व्यवस्था आवश्यक होतीच. सहकाराला सुरुवातीला विरोध करणाऱ्या समाजवाद्यांनी नंतर सहकार स्वीकारला आणि त्या चळवळीला पाठिंबाही दिला.

लोकशाही ही एक राज्यकारभाराची पध्दती आहे. सर्वांच्या मताने आणि सहकार्याने राज्ये चालविली पाहिजेत हा लोकशाहीचा मूलमंत्र आहे. पण ती विकासाची प्रेरणा बनत नाही. अशी पाश्चिमात्य विचारवंतांनी हाकाटी सुरू केली होती पण सामुहिक निवड योग्य असल्यास त्याच्या इतक्या ताकदीचा दुसरा मार्ग नाही. दुर्दैवाने, त्याला आवश्यक असलेला सामुहिक विवेक निर्माण होत नाही. सामुहिक संकट आल्यामुळेच समूह निर्माण होतो, आणि मग विवेकवादाची आठवण होते. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये व्यक्तिवादी विवेक प्रभावी आणि प्रखर असतो. तो प्रभावीपणा अथवा प्रखरपणा सामुहिक गटामध्ये सहजासहजी निर्माण होत नाही. तो राज्यसत्तेव्दारा निर्माण केल्यास समाजवादी व्यवस्था बनते. स्थानिक पातळीवर अशा स्वार्थी सामुहिक गटामध्ये दुर्गुण उतरु शकतात. सहकारी चळवळीबद्दलची अनास्था यातूनच निर्माण झाली आहे. कारण काही गटाने विशेषत: राजकीय गटानेच सहकारी चळवळीच्या प्रगतीत हस्तक्षेप केला आहे. सहकारामध्ये लोकशाहीचे मूलतत्त्व असल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सामूहिक प्रयत्नाने दूर करता येतात. त्यामुळेच लोकशाही दृढ होते आणि संस्थात्मक परिवर्तन घडून येऊ शकते. सहकारात सर्वांनी एकत्र येऊन सामुहिक आर्थिक हिताची संघटना निर्माण केलेली

असल्यामुळे त्याचा कारभार हा लोकशाही पध्दतीनेच झाला पाहिजे. समाजवाद हे लोकशाहीचे साधन असल्यामुळे जवाहरलाल नेहरुंनी लोकशाही समाजवादाची संकल्पना मांडली आणि त्याचाच आग्रह धरला. भारतामध्ये बहुसंख्य लोकांच्याकडे संपत्ती नाही किंवा संपत्तीचा साठा कमी आहे त्यामुळे त्यांना मेहनत व कष्ट जादा करावे लागतात. आणि त्यातूनच कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळवावे लागते. संपत्तीधारकांचे उत्पन्न अधिक वेगाने तर बिनसंपत्तीधारकांचे उत्पन्न कमी वेगाने वाढते. अशा विषम वाटणीमुळे शोषण व शोषणामुळे पुन्हा विषमता वाढत राहते. हे एक दुष्टचक्र आहे. रॉश्डेल पायोनिअर्सनी या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचे ठरविले. समूहाच्या प्रेरणेने एकीकरुन आपणच आपल्या लोकांचे प्रश्न सामुहिकरित्या सोडवू हा त्यामागचा तत्कालिन दृष्टिकोन होता.

भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थांची परस्परविरोधी तत्त्वे अंगीकारुन ही अर्थव्यवस्था चालविली आहे. या दोन्ही व्यवस्थांमध्ये सुवर्णमध्य साधणारी व्यवस्था सहकाराने निर्माण केली आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या दुष्परिणामाला शेवटी सहकाराचा पर्याय मिळाला. भारतासारख्या संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे एक वेगळेच स्थान निर्माण झाले आहे.

## IV

### सहकाराची कूळ कथा

तसे पाहिल्यास सामुहिक गरजेतून निर्माण झालेला सहकार हा प्राचीन सद्गुणांचा आविष्कार आहे. जाणीवपूर्वक आर्थिक उपक्रमांची सुरुवात व संघटन करण्याचा प्रयत्न प्रथम 17 व्या शतकात झाला. पी.सी.प्लॉक नाये, या इंग्लंडमध्ये वास्तव्य करुन असलेल्या डच माणसाने 1659 साली एक पुस्तिका लिहून त्यामध्ये शेतकरी आणि कारागीर यांचा उद्योगधंदा चालवण्यासाठी संघ स्थापण्याची कल्पना मांडली (पन्नालाल सुराणा). जॉन बेलर्स या क्वेकर पंथाच्या अनुयायाने 1695 साली या कल्पनेची सांगोपांग चर्चा करणारी पुस्तिका प्रसिध्द केली. स्वावलंबन आणि परस्परसहकार्य, आर्थिक उद्दिष्टांसाठी लोकशाही व समतावादी पध्दतीने संघटना चालविणे, उत्पादक व उपभोक्त्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे व मध्यस्थाला हटविणे इत्यादी सहकारी चळवळीच्या मूळ कल्पना त्यात मांडल्या होत्या. पण प्रत्यक्षात पारदर्शी कृती मात्र केली गेली नाही. बेलर्सची ही पुस्तिका रॉबर्ट ओवेनच्या हाती लागली आणि पुढचे चित्र बदलत गेले.

रॉबर्ट ओवेन हे सहकारी चळवळीचे जनक मानले जातात. एका दुकानातला नोकर एकविसाव्या वर्षी स्कॅटलंडमधील एका गिरणीसमूहात भागीदार बनला. लहान मुलांना कामावर घ्यायचे नाही, कामाचे तास 17 वरुन 10 वर आणणे अशा कांही सुधारणा त्यांनी केल्या होत्या. न्यू लॅनार्क येथील त्यांचा कारखाना त्यांनी कामगारांच्या मालकीचा केला होता. अमेरिका व मेक्सिको येथे अशा स्वरुपाच्या कांही वसाहती त्यांनी निर्माण केल्या होत्या. पण त्यामध्ये त्यांचा तोटा झाला. 1832 मध्ये लंडन येथे लेबर एक्सचेंजची स्थापना केली होती. ज्याने त्याने आपल्या वस्तू आणाव्यात व श्रमहुंडी घेऊन त्या विकाव्यात अशी पध्दती तेथे सुरु झाली. प्रत्येक वस्तू तयार करायला जेवढे श्रम खर्ची पडले असतील तेवढ्या श्रमाची ती हुंडी असे. पण दोन वर्षानंतर हा कार्यक्रमही फसला.

सहकार हा शब्दप्रयोग ओवेननीच अगदी प्रथमत: उच्चारला. जीवनकलहाच्या अनुभवातून निर्माण झालेली तत्त्वे, चिंतन व विचार यांना एकत्र आणून नफापिपासू बाजारपेठेतल्या प्रवृत्तींपासून

संरक्षण देण्याच्या दृष्टिने रॉश्डेलच्या 28 कामगारांनी एकत्र येऊन 21 डिसेंबर, 1844 मध्ये इक्विटेबल पायोनिअर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. त्यांनी स्वीकारलेली मूलतत्त्वे कित्येक वर्षे अनेक देशातल्या सहकारी चळवळीला मार्गदर्शक ठरली. खुले सभासदत्व, एकाला एकच मत, भांडवलावर ठराविक व्याज, व्यवहारांतून शिल्लक राहिलेले उत्पन्न त्यांच्या खरेदीच्या प्रमाणांत वाटून घ्यायचे अशी काही आदर्श मूलतत्त्वे या संस्थेने निर्माण केली.

प्रत्येक देशातला अथवा प्रांतातल्या सहकारी चळवळीचा उगम एका विशिष्ट परिस्थितीत झालेला दिसतो. सर्वांगीण विचार करुनच या पध्दतीचा स्वीकार झाला. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही देशाच्या सहकारी चळवळीला सुरुवातीपासूनच मार्गदर्शी ठरली आहे. प्रत्येक प्रांतात पारंपरिक स्वरुपाच्या संस्था कार्यरत होतात आणि त्या संस्था सहकारी संघटन पध्दतीमुळे अधिक शक्तीशाली आणि प्रभावशाली बनतात.

## V

### महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा उगम

मराठी सत्तेच्या अस्तानंतर मराठी रियासतीत आर्थिक शोषणास प्रारंभ झाला. इतर अनेक कारणांबरोबरच आर्थिक शोषणाचा परिणाम (उद्रेक) म्हणून 1857 चा पहिला स्वातंत्र्य लढा झाला. या लढ्याचा उलटा परिणाम म्हणून ब्रिटिश कंपन्या भारतात स्थिरस्थावर झाल्या. 'ब्रिटिशराज'च्या स्थापनेसाठी हा लढा अनुकूल ठरला. 1857 नंतर देखील जनतेचे आर्थिक शोषण चालूच राहिले. 1870 नंतर सतत पडणाऱ्या दुष्काळ, रोगराई यामुळे, दख्खनची जनता हैराण झाली होती. सामान्य माणसाची दैना न बघवून काही बुध्दीवादी, ब्रिटिशांना न घाबरता सामाजिक प्रबोधनातून जनजागृती करण्यासाठी पुढे आले. त्यातले पहिले प्रबोधनकार भास्कर पांडुरंग (प्रसिध्द व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांचे लहान बंधू) यांनी जुलै 1841 च्या 'बॉम्बे गॅझेट' मध्ये 'ए हिंदू ' या टोपण नावाने सलग काही लेख प्रसिध्द केले. (सेवन डिकेडस् ऑफ इनोवेटिव्ह बँकिंग - जी.एम.लाड, दि महाराष्ट्र स्टेट को. बँक लि. 1983, पान 1) त्यामध्ये तत्कालीन अर्थव्यवस्थेची भीषणता, त्यातून निर्माण झालेल्या समस्या आणि त्यावरील उपाय यासंबंधी चर्चा केली आणि लोकांना एकत्र येण्यास आवाहन केले. त्यावर विचारविनिमय करण्यासाठी मानवधर्म सभेच्या वतीने 8-9-1844 रोजी सुरत येथे पश्चिम भारतातील नामवंत पुढारी एकत्र जमले. परकीय सत्तेमुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीत जनता समाधानी नव्हती. व्यापार, लघुउद्योग, कुटीरोद्योग, कलाकुसरीच्या वस्तू यांचा ऱ्हास झाला होता. ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. भारताच्या अर्थव्यवस्थेची दयनीय अवस्था तेंव्हापासूनच सुरु झाली (टी.एन. श्रीनिबासन, 2004). हे सर्व सावरुन त्यातून मार्ग काढयचा असेल तर लोकांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार आणि तंत्रज्ञानाचा विकास घडवून लोकांचे नीतीधैर्य वाढविले पाहिजे, अशा आशयाचा निष्कर्ष व निर्णय मानवधर्म सभेने घेतला आणि कार्याला सुरुवात करायचे ठरविले. दरम्यान सामाजिक प्रबोधनाची लाट देशभर पसरलेली होती. राजाराममोहन रॉय, बॉम्बे असोसिएशन, सार्वजनिक सभेचा अहवाल, ग्रामीण विकासासाठी सादर केलेले तीन प्रकल्प (दि वेस्टर्न इंडिया कॅनॉल अँड इरिगेशन कंपनी, दि बॉम्बे पेपर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी व दि बॉम्बे स्पिनींग मिल) अहवाल यावरुन विकासाची निकड, त्याची दिशा, त्याचे महत्त्व यासारख्या गोष्टी लोकांना पटवून देण्याचे

काम सुलभ झाले. ग्रामीण विकासामध्ये हिंदुस्थानचा विकास कसा दडलेला आहे याची माहिती तत्कालीन सरकारला देण्यात यश आले.

इ.स. 1876-78 या काळातील भीषण दुष्काळामुळे दक्षिणेकडील भागाची अपरिमित हानी झाली होती. गोपाळकृष्ण गोखले यांच्या एका अभ्यासावरुन असे निदर्शनास आणले गेले की, त्या दशकात दक्षिणेकडील 50 कोटी रुपये किंमतीची पिके नष्ट झाली, उपलब्ध पशुधनापैकी 42 टक्के पशुधन नाश पावले आणि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा शिगेला पोहोचला होता. मुंबई राज्य आणि कोकण येथे प्रति कुटूंब सरासरी कर्ज अनुक्रमे 115 रुपये आणि 225 रुपये या प्रमाणात होते. डेक्कन रॉयट कमिटीच्या अहवालानुसार मुंबई राज्यातील 87 टक्के लोक कर्जबाजारी होते. सिंध प्रांतातील 77 टक्के लोक, दक्षिण गुजराथ येथील 79 टक्के लोक आणि उत्तर गुजराथ आणि कोकण भागातील 71 टक्के लोक कर्जबाजारी होते. यावरुन कर्जबाजारीपणाचे प्रमाण लक्षात येते. थोडक्यात दुष्काळी स्थितीने शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात आणले असे म्हणता येईल.

सततचा दुष्काळ व साथीचे रोग यामुळे दख्खनच्या जनतेचे नीतिधैर्य खचले होते. कसे तरी करुन जगले पाहिजे हा एकमेव हेतू ठेवून लोक रोजगार प्राप्त करण्याच्या प्रयत्नात होते. उपलब्ध दागदागिने, भांडी-कुंडी, शेतीवाडी यासारख्या मालमत्ता सावकारांकडे गहाण पडू लागल्या. सावकारांची परिस्थिती मात्र त्यावेळी चांगली होती. सावकारांच्या अव्यवहार्य व्याजदराच्या आकारणीमुळे (30 ते 60 टक्के) सामान्य शेतकऱ्यांच्या पुढील पिढीला सुध्दा कर्जाची परतफेड करता येणार नव्हती. काहींनी तर शेतजमीन विकून टाकली होती. मुंबई प्रांतातील सुमारे 9/10 शेतकरी कर्जबाजारी झाले होते. त्यापैकी सुमारे एक चतुर्थांश लोकांनी जमिनी विकून टाकलेल्या होत्या. लोक सावकारांविरुध्द चिडून होते. शेवटी ही चीड शेतकऱ्यांच्या बंडामध्ये रुपांतरीत झाली. मे 1875 मध्ये पुण्यापासून 40 कि.मी. अंतरावर असलेल्या सूपा या खेड्यात शेतकऱ्यांनी बंड केले. या बंडात शेतकऱ्यांनी, गहाण कागदपत्रे नष्ट करणे, आपआपल्या गहाण वस्तु परत मिळवणे असे प्रकार केले. याला प्रतिकार करण्याची ताकद सावकारांकडे नव्हती. कारण हे जन आंदोलन होते. पुढील तीन वर्षात असे प्रकार संपूर्ण दक्षिणेत व उत्तरेकडे फैलावण्याची चिन्हे दिसू लागली. म्हणून सरकारने डेक्कन रॉयट कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनने केलेल्या पाहणीनुसार बंडाचे मुख्य कारण म्हणजे दुष्काळी स्थितीमुळे वाढलेला कर्जबारीपणा हे होते.

## VI

### सहकाराची नांदी

19 व्या शतकाच्या उत्तरार्धातील शेतकऱ्यांच्या कर्जबारीपणाचा प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने न्या. वेडूरबर्न आणि न्या. रानडे यांनी पुरंदर तालुक्याचा नमुना अभ्यास करुन शेतकी बँकेचा प्रस्ताव भारत सरकार व मुंबई प्रांताधिकाऱ्यापुढे मांडला होता. या प्रस्तावाने बडोद्याचे महाराज फत्तेसिंह गायकवाड प्रभावित झाले आणि राज्यातील सोनगड (राणीमहल) येथे शेतकी बँकेची कल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली. रानडे वेडूरबर्न यांचा शेतकी बँकेचा प्रस्ताव भारत सरकारने काही प्रमाणात स्वीकारला. इ.स. 1883 व 1884 च्या शेतकी सुधारणा कर्ज कायदा आणि शेतकी कर्ज कायद्यामध्ये जो बदल केला त्यामध्ये वरील प्रस्तावाचा प्रभाव जाणवतो. तसे पाहिल्यास 1793 पासून भारतात तगाई अनुदान पध्दती अंमलात आहे.

त्या अंतर्गत विहिरी खोदणे, तळे, नदीच्या किनाऱ्यावर मातीचा भराव बांधण्यासाठी कर्जे दिली जात होती. (हिस्ट्री ऑफ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, 1935-51)

दरम्यानच्या काळात जर्मनीचे रायफेशन व शुल्झ यांनी आपल्या सरकारी सेवेतील निवृत्तीनंतर सहकारी पध्दतीची ग्रामीण व शहरी अशा पतसंस्थांची स्थापना केली. त्याही अगोदर रॉबर्ट, ओवेन यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडमध्ये सहकारी चळवळ आकार घेत होती. त्याचा अभ्यास करण्यासाठी मद्रास प्रांताने फ्रेड्रिक निकोलसन यांना इंग्लंडला पाठविले होते. भारताच्या ग्रामीण विकासात काम करण्याची निकोलसन यांची इच्छा होती. म्हणून निवृत्तीनंतरही ते भारतात राहिले होते. इंग्लंडहून परतल्यानंतर त्यांनी 'फाईंड रायफेशन' चा सल्ला दिला.

डेक्कन रॉयट कमिशनच्या शिफारशीनुसार डेक्कन ॲग्रीकल्चरल रिलिफ ॲक्ट 1879 नंतर झाला. शेतकऱ्यांना वाचविणारा भारतातील हा पहिला कायदा ठरला. नंतर यामध्ये सुधारणा करण्यात आली. इ.स.1899 नंतर शेतसारा माफ करण्याचा प्रस्तावही अंमलात आला (1990)

फॅमिन कमिशनपुढे अनेकांनी ज्या साक्षी दिल्या त्यामध्ये 1880 मध्ये सर सय्यद अहमद यांनी ॲग्रीकल्चरिस्ट रिलीफ बँकेच्या स्थापनेची मागणी केली होती. 1889 मध्ये विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या प्रयत्नाने बडोद्यात अन्योन्य सहकारी मंडळी स्थापन झाली. बडोद्यातील मराठी लोकांचा हा उपक्रम होता. इ.स.1900 मध्ये युनायटेड प्रॉव्हिन्स गव्हर्नमेंटने नियुक्त केलेल्या एच्.ई.एल.डुपरनेक्स या विशेष अधिकाऱ्याने युरोपमधील चळवळीचा अभ्यास करुन पीपल्स बँकेची कल्पना उत्तर भारतासाठी म्हणून मांडली होती. लालूभाई सामलदास यांची को-ऑप.क्रेडीट सोसायटीज बिल 1901 व्दारे संबंध भारतासाठी शेतकी बँकेची कल्पना मद्रास सरकारला मान्य असली तरी मुंबई सरकारला मान्य नव्हती. म्हणून भारत सरकारने स्थानिक सरकारे, अधिकारी यांचा विचार जाणून घेऊन सहकाराचा कायदा संमत करण्याच्या उद्देशाने सर एडवर्ड यांची एक सुकाणू समिती नियुक्त केली आणि कायद्याचा कच्चा मसुदा सरकारला सादर केला. हा प्रयोग यशस्वी होईल असे सरकारला वाटत नव्हते. कारण या मसुद्याने फक्त भूमीधारक शेतकऱ्यांनाच कर्ज देण्याची व्यवस्था होणार होती. संख्येने मोठ्या असलेल्या कारागीर, भूमिहीन व अल्प भूधारकासाठी काहीही तरतूद नव्हती. शिवाय शहरात राहणाऱ्यांसाठी त्यामध्ये उल्लेख नव्हता. एकमेकाच्या सहकार्याने, मदतीने परिस्थिती सुधारली पाहिजे. त्याबरोबर बचत, काटकसर यासारख्या प्रवृत्ती लोकांच्यामध्ये निर्माण झाल्या पाहिजेत हा सरकारचा संकल्प होता.

शेवटी गोपाळकृष्ण गोखले यांच्या सूचना (प्राथमिक संस्थांना वरच्या वित्तीय संस्थांनी मदत करावी), आणि सुधारित सहकारी कायद्याचा मसुदा यांचा विचार करुन 25 मार्च 1904 रोजी 28 विभागात विभागलेला पहिला सहकारी संस्थांचा कायदा संमत झाला. ग्रामीण सहकारी संस्था अमर्याद देयतेच्या असतील आणि शहरी सहकारी संस्था मर्यादित किंवा अमर्यादित देयतेच्या असतील असे कायद्यात म्हटले होते. तसेच ग्रामीण संस्थांसाठी 'एक सदस्य एक मत' हे तत्त्व लागू झाले.मात्र शहरी संस्थांना ते ऐच्छिक राहिले. प्रारंभीच्या काळात तारणावर कर्ज देण्याची संमती मिळाली.

एप्रिल 29,1904 सालच्या भारत सरकारच्या करारामध्ये (Resolution) सहकारी चळवळीच्या

यशासंबंधी कांही मार्गदर्शक मुद्दे मांडले आहेत. 'शेतकरी कर्जे' ही उद्योगांना दिल्या जाणाऱ्या कर्जापेक्षा पूर्णत: भिन्न आहेत. शिवाय साध्या आणि छोट्या प्रमाणातील कर्जे छोट्या आणि साध्या समूहाच्या गरजा भागविण्यासाठी दिली जाणारी आहेत. याचा विचार करुन संस्थांच्या व्यवस्थापनासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी योग्य पात्रतेच्या माणसाची निवड करावी. यावरुन सहकारी चळवळीची नजाकत आणि सखोल व्यापकता लक्षात येते. म्हणूनच जगातील अन्य सहकारी चळवळीपेक्षा भारतातील सहकारी चळवळ भिन्न स्वरुपाची आहे. विशेषत: ग्रामीण विकासाची (जी संपूर्ण देशाच्या विकासाचे प्रतीक आहे) सर्व जबाबदारी सहकारी चळवळीवर सोपविलेली आहे. संपूर्ण देशासाठी हा कायदा असला तरी त्याच्या अंमलबजावणीचे अधिकार प्रांताकडेच दिले होते. रजिस्ट्रारनी कलेक्टरच्या मार्गदर्शनाने काम करावे असे कायद्यात नमूद केले होते.

प्रारंभीच्या काळात काही जिल्ह्यासाठीच सहकारी कायदा लागू करावा असे सरकारला वाटले. मुंबई प्रांतासाठी 4 मे, 1904 रोजी सहकारी कायदा लागू केला. अहमदाबाद, कैरा, पुना, अहमदनगर, सोलापूर व धारवाड जिल्ह्यासाठी हा कायदा लागू केला गेला. सहकारी संस्थांच्या स्थापनेसाठी लल्लुभाई सामलदास यांची मदत घेऊन अहमदाबाद व कैरा येथे सहकारी संस्था काढाव्यात असे तेथील कलेक्टरना मुंबई सरकारकडून आदेश आले होते. जे. मॅकनील हे पहिले रजिस्ट्रार म्हणून नियुक्त झाले. (14 जुलै, 1904) रेव्ह. सी.एस.कैनोन रिव्हींग्टन, शिवाजी रामचंद्र कुलकर्णी, कांगिनहाळचे सिदगोंडा पाटील यांच्या मदतीने मॅकनीक यांनी मुंबई प्रांतातील पहिल्या संस्थेची स्थापना केली. तेलंग स्कुल कार्यकर्त्यांची शिबिरे घेऊन सहकारी विचार पसरवण्याचे कार्य हे करीत होते.

धारवाड जिल्ह्यातील कांगिनहाळ गावचे सिदगोंडा पाटील यांच्या संघटनात्मक कार्यकौशल्यातून मुंबई प्रांतातील पहिली ग्रामीण सहकारी पतसंस्था 8 मे, 1905 रोजी स्थापन केली. पुढे 15 दिवसांनी हुलकोटी सोसायटी स्थापन झाली. त्याचप्रमाणे रिव्हींग्टन यांच्या प्रयत्नाने 18 ऑक्टोबर, 1905 रोजी गदग तालुक्यातील (धारवाड जिल्हा) बेटगेरी येथे मुंबई प्रांतातली पहिली नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली गेली. 21 डिसेंबर, 1905 रोजी राव बहादूर पी.एन.पंडित यांनी सिरसी ग्रामीण सहकारी पतसंस्था, सिरसी (जि.कारवार) या गावी स्थापन केली. त्याचा कार्यभार व्यवस्थित न झाल्याने एस्.एन.केशवायन यांनी 1906 साली नागरी पतसंस्था म्हणून पुनर्नोंदणी करुन घेतली. यानंतरच्या काळात कांही संस्था स्थापन झाल्या. त्या अशा..

1. पायोनियर बॉम्बे - 11 नोव्हेंबर, 1905

2.नं. 1 मिलटरी अकौटस् म्युच्युअल हेल्प को-ऑप. क्रेडीट सोसायटी, पुना- 9 जानेवारी, 1906(ही पहिली पगारदारांची संस्था होय)

3. कॉसमॉस, पुणे- 18 जानेवारी,1906.

4. गोकाक अर्बन- 15 फेब्रुवारी, 1906.

5. बेळगांव पायोनिअर्स - 23 फेब्रुवारी,1906.

6.कणकवली मठ को-ऑप. क्रेडिट सोसायटी- 13 मार्च, 1906

7.वरवडे विव्हर्स अर्बन क्रेडिट सोसायटी - 13 मार्च, 1906.

8.विठ्ठल ठाकरसी आणि लल्लूभाई सामलदास यांच्या प्रेरणेने निघालेली बॉम्बे अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी- 23 जानेवारी, 1906 इ. (आजची महाराष्ट्र बँक)

## VII

**सहकाराची धोरणात्मक आगेकूच**

सातत्याने पडणारा दुष्काळ आणि रोगराई यातून निर्माण झालेल्या ग्रामीण कर्जबाजारीपणावर उपाय/इलाज म्हणून सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला. तारणावर कर्ज देण्याची व्यवस्था यामुळेच निर्माण झाली. प्रारंभीच्या काळात शेतकऱ्यांना सावकारांच्या तावडीतून वाचवायचे असल्यामुळे सहकारी चळवळीच्या पहिल्या टप्प्यात सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सोसायट्यांनी भू-तारणावर शेतकऱ्यांना कर्जे दिली.

दुसऱ्या टप्प्यात पिकांच्या विक्रीवर आधारित पीक कर्ज पध्दती सुरु केली गेली. अनेकदा या पध्दतीत बदल करण्यात आले. तरी सुध्दा या पध्दतीमध्ये दोष राहिलेले आहेत( 1956 साली क्रॉप लोन इव्हॅल्युएशन कमिटी नेमली होती. त्याचा अहवाल 1958 ला सादर झाला. 1964 साली नाशिक जिल्हा सहकारी बँकेने चार सहकारी संस्थांचा अभ्यास करुन ते या निर्णयाला पोहोचले की, निव्वळ स्वस्त व सोप्या पद्धतीने कर्जे देउन ग्रामीण दारिद्रय नष्ट करता येणार नाही. गरिबांच्या संसारातील तुटीचे दुष्टचक्र जर संपवायचे असेल तर एक तर शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविली पाहिजे, अथवा अन्य पूरक व्यवसाय त्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजेत, अशा महत्त्वपूर्ण निर्णयाला नाशिक बँक आल्याचे स्पष्ट झाले आणि त्या दृष्टीने बँकेने मार्गदर्शक तत्त्वे निर्माण केली.

सहकारी चळवळीच्या तिसऱ्या टप्प्यात शेतमालाच्या विक्री व प्रक्रियेवर कर्ज देण्याची सुविधा केली. सोसायट्यांमार्फत शेती आदाने पुरवून शेतकऱ्यांचा विक्रेय वाढावा सुलभ होण्याच्या दृष्टीने मदत केली. पुण्याजवळच्या हडपसर सोसायटीने शेतकऱ्यांना बियाणे व साधी अवजारे पुरविण्याचा पहिला प्रयोग केला. तसेच बक्रोळ विलासपूर रूरल सोसायटी (जि. अहमदाबाद) व कोडणे सोसायटी (जि. बेळगांव) ने सभासद शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्री करण्यासाठीची मध्यस्थी केली. लघु व सीमांत शेतकऱ्यांना शेती आदाने पुरविण्याचा उपक्रम या टप्प्यात हाती घेतला. असे झाले अनसते तर सहकारी चळवळ श्रीमंत वर्गाच्या सोयीची झाली असती. अर्थात सध्याच्या स्थितीमध्ये संपूर्ण सहकारी चळवळ ही मध्यम व उच्च वर्गीयांच्या फायद्याची आहे.

सहकारी चळवळीच्या धोरणाचा एक तात्विक भाग म्हणून राजय पातळीवर एक शेती पत महामंडळाची स्थापना करावी अशी शिफारस शेत-वित्त-उपसमिती, भारत सरकार (1944) ने केली होती. खरे म्हणजे सहकारी संस्थांच्या वर सरकारी नियंत्रण असल्यास त्यांना सहकारी संस्था कसे म्हणता येईल ? पण राज्य सरकारांची भागीदारी पद्धत लागू झाली. त्यामुळे विभागीय गरजा लक्षात घेऊन सहकारी संस्थांच्यामार्फत सर्व सेवा दैनंदिन गरजा, शिक्षण इ. सुविधा पुरविण्याची व्यवस्था झाली.

1961 साली को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रीज कमिशनद्वारा तयार केलेले प्रकल्प अहवाल, आर्थिक व तांत्रिक सर्वेक्षण व मार्गदर्शन इ. गोष्टी प्रसृत केल्या गेल्या. त्यामुळे औद्योगिक सहकारी समाजरचना निर्माण होण्यास मदत झाली. पण स्थानिक पुढाऱ्यांनी त्याला विरोध केला. ग्रामीण भागात मात्र साखर कारखान्यांच्या माध्यमातून कृषि औद्योगिक समाजरचनेची स्थापना झाली. आज सहकारी चळवळ मानवी जीवनाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचली आहे.

प्रारंभीच्या काळातील पहिल्या दशकांत समाज

सुधारक आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने आणि सरकारच्या प्रेरणेने सहकारी चळवळीचा पाया घातला गेला. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सहकारी चळवळ प्रेरणादायी ठरली. भारतातील सहाकरी चळवळ ही खऱ्या अर्थाने पतपुरवठ्याची चळवळ म्हणूनच नावारुपाला आली. 1914 नंतर जागतिक महायुद्धामुळे आणि काही क्षेत्रातील संप स्थितीमुळे आर्थिक विकासात काही अडथळे निर्माण झाले. पण किंमत वाढत राहिल्याने औद्योगिक क्षेत्राला नवचैतन्य लाभले. रोजगार वाढून लोकांच्या हातात पैसा खेळू लागला. शेतीक्षेत्रामध्ये नाविन्य येऊ लागले. नगदी पिकांची लागवड होऊ लागली. गोकाक, मुठा, नीरा, गोदावरी आदी योजना कार्यान्वित झाल्या. त्यामुळे सिंचनक्षेत्र वाढले. शेती किफायतशीर होऊ लागली. सहकारी चळवळ अन्न, कृषि व कृषिपूरक क्षेत्रामध्ये पसरु लागली. याचे महत्त्व लक्षात घेऊन सहकारी संस्थांमध्ये शासनाची भागीदारी ही कल्पना मूर्त रुपात कार्यान्वित झाली. आज महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या संस्थांमधील शासनाच्या भाग भांडवलापैकी सुमारे 95 टक्के भाग भांडवल कृषि औद्योगिक सहकारी संस्थांमध्ये गुंतले आहे. त्यामध्येही सहकारी साखर कारखान्यांच्या भाग भांडवलामध्ये सुमारे 60 टक्के भाग भांडवल गुंतले आहे. यावरून शासनाला अभिप्रेत असलेली कृषि-औद्योगिक सहकारी समाज रचना साध्य करण्याच्या उद्देशाने सहकाराला दिलेले महत्त्व लक्षात येते.

1966 साली सहकाराची तत्त्वे बदलण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर प्रयत्न झाले. डी. जी. कर्वे यांच्याकडे त्याचे यजमानपद आले. नव्या तत्त्वांमुळे सहकाराला नवे चैतन्य प्राप्त झाले. डिसेंबर 1967 साली व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण लादणारा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. अग्रक्रम क्षेत्राला पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा होत नसल्यामुळे सामाजिक नियंत्रण लादावे लागले. पण तेवढ्याने भागले नाही म्हणून 14 बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घ्यावा लागला. 1975 साली ग्रामीण विभागी बँकांच्या स्थापनेचा निर्णय झाला. जिथे मध्यवर्ती बँकांचे कार्य अत्यंत मर्यादित होते तिथे प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना झाली. एप्रिल 1980 मध्ये आणखी सहा व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले.

1980 च्या दशकामध्ये सहकाराची तत्त्वे व कायदे बदलण्यासंबंधी पुन्हा एकदा प्रयत्न झाले. आयसीएच्या जकार्ता अधिवेशनामध्ये सहकाराची तत्त्वे बदलण्याची घोषणा झाली आणि त्या दृष्टिने संशोधन सुरु झाले. त्याच दरम्यान भारतातील कृषी पतपुरवठ्याचा समग्र अभ्यास करण्यासाठी अभ्यास समिती नेमण्यासाठी जागतिक बँकेने 36 कोटी रुपये दिले. त्यानुसार ए.एम. खुस्त्रो यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. या समितीने कृषी पतपुरवठ्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण अशा काही शिफारशी केलेल्या आहेत.

अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक समायोजन कार्यक्रमांतर्गत वित्तीय सुधारणा सुचविणाऱ्या नरसिंहम समितीच्या अहवालात भारतातील वित्तीय क्षेत्रामध्ये अनेक बदल सुचविले. त्यानुसार टप्प्याटप्प्याने अनुकूल अशी पावले टाकली जाऊ लागली आहेत. ग्रामीण पतपुरवठा करणाऱ्या बँकांचा व्याजदर खुला झाला आणि सहकारी पतपुरवठ्याच्या पद्धतीपुढे कांही आव्हाने उभी राहिली.

यानंतर सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेची जोरदार तयारी आणि मांडणी करणारे संशोधन पुढे आले. चौधरी ब्रम्हप्रकाश समितीच्या अहवालाने सहकारी

चळवळीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. काही राज्यामध्ये काही महत्त्वपूर्ण समित्यांची नियुक्ती केली गेली. नाबार्डने व्ही. एस. व्यास यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. अगदी अलिकडे 2003-04 च्या अंदाजपत्रकीय अहवालानुसार ए. वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची नियुक्ती केल्याचे दिसते. या सर्व समित्यांनी पुनर्रचनेच्या मुद्याला बगल देऊन, आहे त्या चौकटीमध्येच सहकारी चळवळ कशी नेटाने चालविता येईल याचाच प्रामुख्याने विचार केला. वित्तीय उदारीकरणाच्या चौकटीत पुनर्रचनेची संधी लाभलेली असताना ते होऊ शकले नाही. सहकारी चळवळीच्या शंभर वर्षानंतर यांचा अग्रक्रमाने विचार झाला पाहिजे.

## VIII

### विकेंद्रीकरण आणि सहकार

अलिकडे जागतिक बँकेच्या वित्तीय सहाय्याने ए. एन. पारकर यांनी एक धोरणात्मक संशोधन प्रकल्प जागतिक बँकेला सादर केला. (Decentralisation : The Way Forward for Rural Development, June - 1995) त्या मध्ये ते म्हणतात की, कोणत्याही देशाचे आर्थिक धोरण आखतांना शेतीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते. बहुतेक देशांच्या विकास कार्यक्रमांमध्ये व्यापार व वाणिज्य, उद्योगधंदे व सेवाक्षेत्रावर भर देण्यात येतो. त्यामुळे समग्रलक्षी चलांमध्ये अनेक विसंगती निर्माण होतात.

विकेंद्रीत पद्धतीने आर्थिक विकास घडवून आणण्याचा नवा डावपेच विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये लोकप्रिय होत आहे. सामुहिक कृती गट विषयक दृष्टिकोनही असाच आहे. ग्रामीण भागातील परिस्थितीला योग्य असे विकासाचे धोरण म्हणजे विकेंद्रीकरण होय. ग्रामीण दारिद्र्याची तीव्रता त्यामुळे कमी होणार आहे. विकेंद्रीकरणाची पार्श्वभूमी भारताच्या प्रशासकीय व्यावस्थेमध्ये पूर्वीपासूनच निर्माण झालेली आहे. पण सध्याच्या विकेंद्रीकरणाचे स्वरुप वेगळे आहे. विसाव्या शतकाच्या मध्यावधीमध्ये निर्माण झालेल्या विकेंद्रीकरणाच्या पहिल्या लाटेमध्ये विकेंद्रीत प्रशासनव्यवस्था, वित्त व्यवस्था, उच्चस्तर संघटन संस्थेला मदत करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

अलीकडच्या (1981) विकेंद्रीकरणाच्या अर्थामध्ये पूर्वीच्या गोष्टी गृहित धरुनच त्यामध्ये काही सरकारी-निमसरकारी सत्ता आणि साधने, खाजगी व्यक्ती व संस्थांच्याकडे वर्ग करणे यासारख्या तरतुदींचा उल्लेख होऊ लागला आहे. पंचायतराज व्यवस्थेत वित्तीय विकेंद्रीकरण करण्यामध्ये अकार्यक्षमता दिसून येते कारण वरच्या संस्थांच्या वित्तीय मदतीवरच खालच्या संस्थांचे कार्य चाललेले असते. तरीसुद्धा भारतातील सध्याची पंचायत राज व्यवस्था कुचकामी आहे असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पंचायत राज व्यवस्था भारताच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आणि लाभकारक आहे. अर्थात ती अधिक व्यापक व परिणामकारक कशी करता येईल यासंबंधी विचारविनिमय व्हायला हरकत नाही.

ग्रामीण भागातील साधनसामग्रीवर आधारित, आर्थिक अथवा औद्योगिक प्रक्रियेचे संघटन करण्यासाठी सहकाराची मदत होऊ शकते. स्थानिक गरजा व साधनसामग्री यामध्ये मेळ घालून त्याचे संघटन करण्यासाठी सहकार हे एक वरदान आहे. सध्याच्या विकेंद्रीकरणातल्या नोकरशाहीचा प्रभाव कमी करण्यासाठी सहकारी संघटन पद्धतीचा उपयोग करुन घेता येईल. खाजगीकरणाच्या प्रक्रियेकडे

वळण्यापेक्षा सहकारीकरण हा परिणामकारक हुकमी इलाज असताना खाजगीकरणाचा आग्रह धरणे बरोबर नाही. खाजगीकरणामुळे वेगळीच सामाजिक व आर्थिक विकृती येईल आणि ती भारतीयांना सोसणार नाही. जकात ठेक्याच्या अथवा खाजगी क्षेत्राने चालविलेल्या रस्त्यावरच्या वाहनधारकांच्या पिळवणुकीवरुन आणि त्याला होणाऱ्या सामुहिक विरोधावरुन हे लक्षात येऊ लागले आहे.

देशाच्या भावी विकासासाठी शेती क्षेत्राचे विकेंद्रीत नियोजन करणे गरजेचे बनले आहे. विशेषत: पिकांचे नियोजन करणे क्रमप्राप्त झाले आहे.अन्न व कृषि संघटनेने (F.A.O.) देखील त्याचा आग्रह धरला आहे. त्यासाठी-

1. शेतीचा विकास हा साधनसामग्रीवर आधारित असला पाहिजे.

2. उपलब्ध बाजार व्यवस्थेमार्फत शेती क्षेत्राला योग्य नफा मिळाला पाहिजे.

3. शासनामार्फत योग्य आणि आवश्यक अशा सोयी निर्माण केल्या पाहिजेत.

या त्रिसूत्रीनेच शेतीचा विकास होऊ शकतो. हवामान व मातीवर आधारित पिकांचे नियोजन हा एकमेव पर्याय आता राहिलेला आहे. पीक नियोजन अथवा विकेंद्रीकरण विभागीय पातळीवर हाताळले जावे असा आग्रह वाय. के. अलघ समितीने (1990) या अगोदर धरला आहे.

नव्या जाणीवा आणि प्रेरणा घेऊन शेती व पाण्याच्या नियोजनामध्ये सहकारी संघटनांनी प्रवेश करावा. पारंपरिक पद्धतीने काहीच साध्य होणार नाही. मृद संधारणाचे कार्यक्रम, पाण्याचे वितरण संधारण व नियोजन, पीक नियोजन यासारख्या स्थानिक पातळीवरच्या आर्थिक प्रक्रियेमध्ये विकेंद्रीत पद्धतीने निर्णय घेणे आणि त्याचे नियोजन करणे आवश्यक बनले आहे. अशा उपक्रमातील विकेंद्रीकरणाचे संघटन खाजगी क्षेत्राकडे न देता सहकारी क्षेत्राकडे दिले जावे. सहकारी चळवळीने देखील तशी तयारी दाखविली पाहिजे. यापुढे अशा उपक्रमांची गरज आहे. नव्या पाश्चिमात्य दृष्टिकोनामध्ये हे हळूहळू रूढ होत आहे. भारतात व्यावहारिक पातळीवर हे पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. पण नव्या व्यवस्थेचा परिचय करून देऊन त्यात सामावून घेण्याची तयारी संयोजकांनी अथवा स्थानिक नेतृत्त्वानी दाखविली पाहिजे. याला आता विलंब होऊन चालणार नाही. वैश्विकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्थानिक अथवा विभागीय विकासाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. त्यासाठी विकेंद्रीत पद्धतीचा सहकारी दृष्टिकोन कार्यान्वित केला पाहिजे.

कारागिरांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी सहकारी संघटन पद्धतीचा स्वीकार करावा म्हणजे वैश्विकरणाच्या प्रक्रियेमध्ये हा वर्ग शक्तीशाली होईल. वैश्विकरणाची नागरी बाजू लोकांच्या निदर्शनास आली असली तरी त्याला सामोरे जाण्याचे सामर्थ्य ग्रामीण भागात दडलेले आहे. सीमांत व लघु शेतकऱ्यांच्या प्रभावी पुनरूत्थानामुळेच त्यांची शेती व्यवस्था सुधारते आहे. हा जागतिक अनुभव आहे. (अलघ 20/1/96) त्यातूनच सामूहिक बळावर आधारित विकेंद्रीत नियोजनामुळे वैश्विकरणाला तोंड देता येऊ शकते ही भावना लोकांच्यामध्ये निर्माण केली पाहिजे. औद्योगिक क्षेत्रात सुद्धा Small is beautiful हे सिद्ध व्हायला लागले आहे.(Pyke and Sengenberger 1990) या संदर्भात विकेंद्रीत सहकारी औद्योगिक संस्थांचे प्राबल्य वाढेल याची खात्री देता येते.

सहकारी चळवळीची पर्याप्तता (Optimalities)

आणि पर्यायता (substituability) संमिश्र व्यवस्थेमध्ये आर्थिक उलाढाली करणाऱ्या ज्या प्रमुख व्यवस्था सध्या प्रचलित आहेत, त्यामध्ये संतुलन साध्य करण्यासाठी बऱ्याचवेळा उजवे-डावे करावे लागते. हा भाग नैसर्गिक असला तरी एखाद्या बाजूकडे गरजेपेक्षा जास्त झुकल्यामुळेच त्याच्या उलट दिशेला अधिक झुकावे लागते. ही सुयोग्य नियोजनाची (संतुलनाची) कसोटी होऊ शकत नाही. पण त्याला पर्यायच राहत नाही म्हणून संतुलनाच्या दिशेने जावे लागते. पण संमिश्र बाजार व्यवस्थेमध्ये व उजव्या-डाव्यांतील अतिरेकी दिशेने जाण्यापेक्षा सहकाराच्या तिसऱ्या शक्तीचा वापर करून संतुलन प्रस्थापित करता येते. ही या व्यवस्थेतली पर्याप्तता म्हणता येईल.

राष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेच्या वेळी धनंजयराव गाडगीळांनी संभाव्य राष्ट्रीयीकरणाची क्षेत्रे सहकारी क्षेत्राकडे वर्ग करण्याचे सूचित केले होते. तसेच सध्याच्या उदारीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहकार हा खाजगीकरणाला पर्याय ठरु शकतो. या सामर्थ्याचा परिचय झाला पाहिजे. पण सध्याच्या चौकटीतील सहकाराच्या कक्षेत ती लोकांना अडचणीची वाटते. कारण सहकारातील पुढाऱ्यांनी ही चळवळ जवळजवळ बदनाम केली आहे. पन्नास वर्षांपूर्वी ''सहकार चळवळ अयशस्वी झाली आहे पण ती यशस्वी झालीच पाहिजे'' असे उद्‌गार गोरवाला समितीने काढले होते. पण सहकार ही एक व्यवस्था म्हणून ती कधीच अयशस्वी होऊ शकत नाही. तथापि तिचे नेतृत्व अयशस्वी झाले असे म्हणायला हरकत नाही. सहकारातली अव्यक्त सामर्थ्ये अद्यापपर्यंत व्यक्त झालेलीच नाहीत. उलट या सामर्थ्याला या नेतृत्वाने कैद करुन ठेवले आहे. त्यामुळेच सध्याची दुरावस्था निर्माण झाली आहे.

अनेक आर्थिक उलाढालीमध्ये सहकारी व्यवस्था कुठपर्यंत मजल मारू शकते यासंबंधीची पर्याप्तता आजपर्यंतच्या सहकारी चळवळीच्या विस्तारावरून लक्षात येते. पण काही क्षेत्रामध्ये या व्यवस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे. शेती, ग्रामीण विकास आणि ग्रामीण बिगर-कृषी क्षेत्रामध्ये सहकाराचे योगदान मोठे आहे. इतर क्षेत्राबरोबर खांद्याला खांदा लावून कार्य करण्याची क्षमता सहकाराने निर्माण केलेली आहे. त्यामध्ये काही क्षेत्रीय आणि विभागीय असमतोल असला तरी तिच्यातील कार्यगुणांमुळे ही चळवळ अधिक लोकाभिमुख झाली आहे. खाजगी अथवा सरकारी क्षेत्रापेक्षाही ही चळवळ सरस ठरली आहे.

कृषी-औद्योगिक सहकारी समाज निर्माण करण्यामध्ये देखील या चळवळीचे योगदान मोठे आहे. महाराष्ट्राच्या विकासाचा तो मूलमंत्र ठरला आहे. गोपाळ कृष्ण गोखले, एम. जी. रानडे, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण यासारख्या विचारवंतांनी महाराष्ट्राला तारणारी कृषी-औद्योगिक समाजाची संकल्पना मांडली होती. सहकारी चळवळीनेच ती यशस्वी करुन दाखविली आहे. सुरुवातीच्या काळात त्या पद्धतीचे नेतृत्वही महाराष्ट्राला लाभले.

सहकारी चळवळीने काही मर्यादेतच कार्य करावे की शक्य तितक्या सर्वच क्षेत्रामध्ये या चळवळीने शिरकाव करावा ? याबाबतीत अनेक मतमतांतरे असू शकतात. सहकारातल्या पारंपरिक क्षेत्राबरोबर इतर अनेक क्षितिजे सहकारासाठीच पात्र आहेत. त्याचा परिचय होणे आवश्यक आहे. कृषी, ग्रामीण विकास व ग्रामीण बिगर-कृषी क्षेत्रामध्ये देखील अनेक नवे बदल आणावे लागतील. जुन्या व्यवस्थांची पुनर्रचना अग्रक्रमाने करावी लागणार आहे.

भविष्यातील आर्थिक उलाढालीमध्ये सहकारी बाजारव्यवस्थेला शिरकाव करण्याची संधी आहे. विशेषत: विमा क्षेत्र, आपत्कालीन व्यवस्थापन (disaster management), अचूक शेती इ. क्षेत्रे उपलब्ध आहेत. विशेषत: सहकारी शेती ही कंत्राटी व प्रमंडळीय शेती पद्धतीला (contract and corporate farming) पर्याय ठरु शकते. शहर वाहतुक व्यवस्था, सेवाक्षेत्रे, गट पणन व्यवस्था (Group marketing), बचत गट, विकेंद्रित छोट्या उद्योगव्यवस्थांचे संघटन, ग्रामीण बिगर कृषी क्षेत्र, आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण, महिला व बालविकास, पशुव्यवस्थापन, आयात-निर्यात, श्रम-व्यवस्थापन, रोजगार विनिमय केंद्रे, ग्रामीण विद्युत पुरवठा, आजारी उद्योग, व्यवसायाचे पुनर्वसन, कृषि व्यापार, वनस्पती, वाण संरक्षण हक्क, अन्न सुरक्षितता अशा अनेक क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण आणि उल्लेखनीय कार्य करण्याची संधी सहकाराला आहे. त्यासाठी नवा उत्साह आणि नवी प्रेरणा मात्र नव्या पिढीला मिळाली पाहिजे. भूतकाळ बदलता येत नाही पण भविष्यकाळ आपल्या हातात आहे. या उक्तीप्रमाणे कार्य करण्याची हिंमत नव्या पिढीमध्ये असली पाहिजे.

कंपनी (दुरुस्ती) कायदा 2002 हा आता नव्या रूपात आलेला आहे. उत्पादक सहकारी संस्थांना ह्या कायद्याप्रमाणे नव्या रूपात येता येईल. नवी क्षेत्रे या कायद्यांतर्गत आणता येतील. हा कायदा 6 फेब्रुवारी, 2003 पासून अंमलात आला आहे. राजकीय पुढाऱ्यांनी उभारलेली सहकारांतर्ली साम्राज्ये यामुळे उध्वस्त होतील आणि खऱ्या अर्थाने व्यावसायिकता येईल. सदरचा कायदा वर्गीस कुरियन आणि वाय. के. अलघ यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला आहे. त्याची परिणामकारकता हळूहळू सिद्ध होईल.सहकारी चळवळीला सरकारी नियंत्रणातून काही प्रमाणात (पूर्णत: नसले तरी) खुलेपणा दिला पाहिजे.

**पुनर्रचना**

सहकारी चळवळीची पुनर्रचना पतसंस्थाशी अधिक निगडित आहे. पतसंस्थांची स्थिती उच्चस्तरीय संस्थांच्या दबावामुळे अत्यंत दयनीय झाली आहे. संस्थांची उतरंड वरुन खाली का खालून वर याबाबतीत व्यवहार तपासण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्राला 9 टक्के व्याज दराने पतपुरवठा करण्याची घोषणा जुलै 2003 मध्ये झालेली आहे. त्याप्रमाणे नाबार्डच्या कायद्यात दुरुस्तीदेखील केलेली आहे. इ.स. 2004-05 च्या अर्थसंकल्पामध्ये 9 टक्यां पेक्षा कमी व्याज दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याची घोषणा झालेली आहे. त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांची कर्जदेय क्षमता निर्धारित करुन त्याप्रमाणे कर्ज पुरवठा केला जावा, ही भूमिका केंद्र सरकारने मान्य केली आहे. सध्या, कर्ज मागणी पत्रकाबरोबर तारणाचा तपशील शेतकऱ्यांना द्यावा लागतो. भू-धारणावरुन तारणाची स्थिती निश्चित करावी अशी सूचना अर्थसंकल्पात आहे.

किसान पतपत्रिका (Kisan Credit Card) मुळे शेतकऱ्यांची चांगली सोय झाली आहे. पण, सहकारी पतसंस्था मात्र या पद्धतीला विरोध करीत आहेत. कारण पतसंस्थांना प्रत्यक्षात किसान पत पत्रिकेचा लाभ होत नाही. किसान पत पत्रिकेचा वापर ए.टी.एम. वर करण्याच्या हेतूने तरतूद केलेली आहे. 31 मार्च, 2004 पासून सर्व शेतकऱ्यांना किसान पत पत्रिकेची सोय उपलब्ध केलेली आहे.

वरील धोरणाला अनुसरुन काही व्यापारी बँकांनी 7.50 व 8.50 टक्के व्याज दराने किसान पत पत्रिकेद्वारे

कर्ज पुरवठा करण्याची योजना जाहीर केलेली आहे. किसान पतपत्रिकेद्वारे शेतकऱ्याला योग्य दराने, योग्य त्या बाजारातून त्याला हव्या असलेल्या सेवा, आदाने खरेदी करता येतात. त्याच्या परतफेडीची सुयोग्य व्यवस्था देखील विकसित केली आहे.

सहकारी पतसंस्थांकडील कर्ज मागणी कमी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे असे झाल्यास त्या संस्था नष्ट होण्यास विलंब होणार नाही. वस्तुत: ग्रामीण पतपुरवठ्याचा व्याजदर पूर्णत: खुला झालेला आहे. तो निर्धारित करण्याचा अधिकार हा ज्या त्या बँकेचा आहे. असे असताना देखील शेतकऱ्याला अधिक महागडे कर्ज घ्यावे लागते. प्राधान्य क्षेत्र या गोंडस नावाखाली शेतीची दुरावस्था चालूच आहे. गृहकर्जावरचे व्याज दर 7.5 टक्क्यापर्यंत खाली आले आहेत. तरीसुद्धा पतसंस्थांच्या पीक कर्जावरचा व्याज दर 13 टक्के आहे. एकूण पीक कर्जाच्या 50 टक्के हिस्सा मात्र वस्तुरूपात (उदा. खते, बियाणे, औषधे इ.) व उर्वरित कर्ज रक्कम रोखीने मिळते. मात्र वस्तुरूपामध्ये जी आदाने पुरविली जातात, त्यांच्या किंमती स्थानिक बाजारपेठेतील सरासरी किंमतीपेक्षा जास्त असतात. शेतकऱ्याला नाईलाजास्तव महागड्या मालाची खरेदी करावी लागते. कोणताही माल पुरवठादार मोठ्या प्रमाणावर माल खरेदी करणार असल्यास तो कमी दराने माल पुरवठा करु शकतो. पण तो अनुभव या व्यवहारात आढळून येत नाही. शिवाय पतसंस्था देखील फारसा विचार न करता आपल्या अकार्यक्षमतेचा भार सर्वसामान्यावर लादून मोकळे होतात. नडलेला शेतकरी या परिस्थितीला निमूटपणे तोंड देत राहतो.

वर्षाअखेरीस जुन्याचे नव्या कर्जामध्ये रुपांतर करण्याच्या प्रयत्नात सर्वच पतसंस्था गुंतलेल्या असतात. सर्व कागदपत्रे नवी आणि कमाल मर्यादापत्रक नव्याने तयार करुन त्यापुढील प्रक्रिया पतसंस्थाच करतात. उद्देश एवढाच असतो की कर्जाची वसुली शंभर टक्के व्हावी. वस्तुत: पीक कर्ज पंधरा महिन्यांसाठी असते. पण प्रत्यक्षात जून ते मार्च या काळातच कर्ज देणे व वसूल करणे या गोष्टी घडतात. या काळात काही सावकारांचा धंदाही जोरात चालतो. जुने कर्ज फेडून शेतकऱ्यांच्या नावाने नवे कर्ज मिळेपर्यंत सावकाराला पैसे गुंतवावे लागतात. ह्या दरम्यान बऱ्याच मोठा व्याज दराने हे व्यवहार होतात.

पतपुरवठ्याच्या व्यवहारातील कमिशन घेणाऱ्या संस्थांचा धंदा व्यवस्थित चालतो. नाबार्ड 6 टक्के व्याज दराने राज्य शिखर बँकांना कर्ज पुरवठा करते. त्या शिखर बँका प्राप्त निधीचे जिल्हा मध्यवर्ती बँकांकडे हस्तांतर करण्यासाठी दोन-सव्वादोन टक्क्याचे कमिशन घेतात. जिल्हा मध्यवर्ती बँका प्राप्त निधी पतसंस्थांच्याकडे वर्ग करताना दोनअडीच टक्क्याचे कमिशन घेतात. प्राथमिक सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी 3 टक्क्याचे कमिशन घेतात. निधी हस्तांतराचे काही निकष प्रत्येक स्तरावर तपासून पाहिले जातात. नाबार्डच्या व्याजदराच्या जवळजवळ दुप्पट व्याजदर कमिशन म्हणून मध्यस्थ संस्था घेतात. पतपुरवठ्याची त्रिस्तरीय संरचना निर्माण करण्याची प्रेरणा गोपाळ कृष्ण गोखले यांची होती. ती धनंजयराव गाडगीळांनी प्रत्यक्षात अंमलात आणण्यासंबंधीचे मार्गदर्शन केले. त्यामागचा उद्देश असा होता की, वरच्या संस्थांनी खालच्या संस्थांना मदत करावी. या व्यवहारात असे घडत नाही. उलट प्राथमिक सहकारी पतसंस्थांवर अविश्वास दाखवून वरिष्ठ संस्था कमिशनची कमाई करतात.

सहकारी चळवळीच्या शंभर वर्षाच्या वाटचालीनंतर पतसंस्थांच्या पुनर्रचनेचा विचार अग्रक्रमाने होणे गरजेचे आहे. प्रत्येक स्तरातील

संस्था आपआपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतात. तळातील पतसंस्थांच्या कार्यावर वरच्या संस्था मोठ्या झाल्या. पतसंस्था या खऱ्या अर्थाने स्वायत्त संस्था आहेत. पण त्यांची स्वायत्तता कुठेच प्रकट होत नाही. मध्यंतरी (दोन-तीन वर्षापूर्वी) नाबार्डकडून थेट कर्ज पुरवठा होणार अशी नुसती घोषणा झाल्याबरोबर जिल्हा मध्यवर्ती बँकांनी परिषदा घेवून प्रत्येक पतसंस्थांकडून ठराव संमत करवून घेतले की, पतसंस्थांचा कर्जपुरवठा जिल्हा मध्यवर्ती बँकामार्फतच व्हावा. ही परावलंबी स्थिती नाहीशी केली पाहिजे. वित्तीय उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर सहकारी चळवळीची पुनर्रचना होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा खाजगी वित्तीय संस्था अथवा व्यापारी बँका, ग्रामीण वित्तीय बाजार काबीज करतील. त्यामुळे सहकारी चळवळीचे मूळ तोडल्यासारखी स्थिती होऊन वरच्या संस्थादेखील डबघाईला येतील.

गेल्या शंभर वर्षांमध्ये पतसंस्थांचे पुनर्संघटन करण्याचे सुमारे 30 वेळा प्रयत्न झाले. पण पतसंस्थांच्या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. वस्तुत: पुनर्रचना कधी झालीच नाही. गोरवाला समितीने सूचित केल्याप्रमाणे सहकार अयशस्वी होऊ शकत नाही. त्यातल्या माणसांच्या अयशस्वीतेमुळे सहकाराला दोष देता येणार नाही. पतसंस्थांच्या पुनर्रचनेचा पुनर्विचार झाला पाहिजे. विशेषत: खालील मुद्यांवर विचार होणे आवश्यक आहे.

अ. सहकारी पतसंस्थांना ग्राम सहकारी बँका म्हणून दर्जा दिला पाहिजे. त्या पद्धतीने कायद्यात बदल करावा लागेल (Jugale, 2004).

ब. सहकारी पतसंस्थांचे उर्ध्वसंबंध (Verticle relations) सध्या जिल्हा मध्यवर्ती बँकेशी अधिक निगडीत आहेत असे उर्ध्वसंबंध कोणत्याही बँकेकडे (खाजगी, सरकारी अथवा सहकारी) प्रस्थापित करण्याचा अधिकार सहकारी पतसंस्थांना द्यावा. अगदी अलिकडच्या वैद्यनाथन समितीनेही अशी शिफारस केली आहे.

क. ठेवी स्वीकारण्याचे अधिकार ग्राम सहकारी बँकांना द्यावेत आणि त्यावर आधारित कर्ज व्यवहार करण्याची मुभा पतसंस्थांना दिलेली असावी.

ड. गावातील सर्व भू-धारक शेतकरी, भूमिहीन, कारागीर, या संस्थांचे (ग्राम सहकारी बँक) सभासद असावेत.

इ. पतसंस्थांच्या संख्येवर मर्यादा असू नये. एखाद्या गावात लोकांना हव्या तेवढ्या पतसंस्था काढण्याची मुभा असावी. अर्थात, त्या अर्थक्षम असण्याचे नियम नव्याने तयार करावे लागतील.

ई. ठेवी व कर्जावरील व्याज दर निश्चित करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य ग्राम सहकारी बँकांना असावे.

प. ग्राम सहकारी बँका, ज्या उर्ध्व बँकेशी संबंध प्रस्थापित करतात, त्या बँकांमार्फत नाबार्डने कर्ज पुरवठा करावा. अशी बँक फक्त 0.5 टक्के किंवा त्याहून कमी कमिशन घेण्यास पात्र राहील. म्हणजे नाबार्ड जर 4 टक्के दराने पतपुरवठा करीत असेल तर उर्ध्व बँक अथवा मध्यस्थ बँक 0.5 टक्के व सहकारी पतसंस्था 1 ते 1.5 टक्के म्हणजे सरासरी 6 टक्के दराने कर्ज पुरवठा झाला पाहिजे. कालांतराने निवडक पतसंस्थांना नाबार्डने थेट पतपुरवठा करावा.

फ. ठेवींच्या व्यवहारामधून पतसंस्थांना बराच आर्थिक लाभ मिळू शकतो. जमा होणाऱ्या ठेवींमधून रोख कर्ज, भाडे खरेदी, खावटी, छोटे उद्योजक, व्यापारी, भूसारव्यवहार, पणन, प्रक्रिया यासारख्या कृषी व अकृषी व्यवहारावर कर्ज व्यवहार करावा.

ब. प्रत्येक शेतकऱ्याला ग्राम सहकारी बँकेने पतपत्रिका, नावे पत्रिका (Debit card), बचत पुस्तिका गरजेप्रमाणे उपलब्ध करुन द्यावे.

भ. ग्राम सहकारी बँक ही सभासदांच्या सर्व व्यवहारांची नोंद करणारी ग्रामीण बँक ठरली पाहिजे.

यासंबंधीचा उपयोजित तपशील करता येतो. पतसंस्थांच्या पुनर्रचनेची ही एक संधी आहे.

**उपसंहार**

सहकारी चळवळीने संमिश्र बाजार व्यवस्थेला एक वेगळे योगदान दिले आहे. आणखी देण्याची क्षमता या चळवळीत आहे. सहकारी चळवळीचे संघटन फार मोठे असल्यामुळे ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक नाड्या सहकारी व्यवस्थेकडे आपोआपच येतात त्यामुळे सहकारांतर्गत अनेक दबाव गट तयार झाले. यातूनच आर्थिक विकासाचे प्रादेशिक राजकारण सुरु झाले. विकासवादी राजकारणाने सामान्यांचे हित झाले असले तरी त्यातल्या विकृतीलाही हा सामान्य माणूस बळी पडलेला आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत जी तिसरी शक्ती निर्माण झालेली आहे त्यामुळे विकासाचे सर्व संदर्भ बदलून गेले आहेत. दुर्बलांच्या विकासाचा मार्ग यातूनच शोधण्याची संधी आहे. दुर्बल (सरकारी व्याख्यानुसार) हे दुर्बल नसतात, त्यांच्यामधील उत्पादकतेला वाव मिळत नाही त्यामुळे त्यांची दुरावस्था झालेली दिसते. पतहिनांना पतवान (Credit Worthy) बनविण्याचे कार्य हेच खऱ्या अर्थाने विकासाचे प्रतीक आहे. जागतिक सुधारणांतर्गत येणाऱ्या नव्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेमध्ये सहकारी व्यवस्थे प्रतिबिंब उमटलेले असावे. ती एक प्रभावी व्यवस्था म्हणून मान्यता पावली जावी आणि सहकारी व्यवस्थेने स्वतःचे एक अढळ स्थान निर्माण करावे, तरच सहकारातून समृद्धी साध्य होईल.

## संदर्भ सूची


1. Apthorn and Grasper (1982)-Policy Evaluation and Meta-Evaluation : The Cage of Rural Co-operatives, World Dev. 10 : 651-68.

2. Attwood, Donald (1993) Raising Cane : The Political Economy of Sugar in Western India - Oxford University Press.

3. Bardhan, Pranab (1989) - The New Institutional Economics and Development Theory : A Brief Critical Assessment, World Development, 17(9), 1989-95.

4. Baviskar B. S. (1980). Politics of Development, Oxford Press.

5. Bavaskar B. S. and Attwood D.W.(ed) (1988) - Who Shares ? Co-operatives and Development, Oxford University Press.

6. Cantanack, I.J. (1970) - Rural Credit in Western India - 1875-1930, University of California press, Berkeley.

7. Douglass, North (1990) - Institutions Institutional change and Economic performance - Cambridge University Press.

8. GoI (2005) - Vaidhyanathan Committee Report - www.rbi.org.in.

9. John Vincent (1982) - Peso-in Transformation : The Political Economy of Peasant and Class in Eastern Africa, Berkeley University of California Press.

10. Jugale, V.B. (1991) - Theories of Agricultural finance - Atlantic Publishers and Distributors, New Delhi.

11. Jugale, V.B. (1993) -Co-operative Credit in Indian Agriculture, Mittal Publications, New Delhi.

12. Jugale, V.B. (1998) - Restructuring the PACS, NABARD Chair VAMNICOM, Pune.

13. Jugale, V.B. (1998) - Model of PACS, Occasional Paper, Department of Economics, Shivaji University, Kolhapur.

14. Jugale, V.B. (2004) - Towards Village Banking - Atlantic Publishers and Distributors, New Delhi.

15. Karve D. G. (1960) - Failure and Success in Indian Co-operative Movement, Third Inter National Congress on Co-operation.

16.Land, G.M(ed)(1983) - Seven Decades of Innovative Banking - Maharashtra State Appex Bank.

17. Mancur, Olson (1965)- The Logic of Collective Action - Harvard University Press.

18. NABARD (2001) Report of the Expert Committee on Rural Credit (Vyas Committee), July.

19. Parkar, A.N. (1995) - Decentralisation : The Way Forward for Rural Development, June, World Bank.

20. RBI - History of RBI - 1935-51.

21. RBI (1998) - Report of the High Level Committee on Agricultural Credit Through Commercial Banks (Gupta Committee).

22. Shah Tushar (1995) - Making Farmers' Co-operatives Work, Sage Publication, New Delhi.

23. Shah, Tushar (1996) - Catalysing Co-Operation : Design of Self-Governing People's Organisation, Sage Publication, New Delhi.

24. जुगळे वसंत व जुगळे योजना (1996) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दिशा आणि दशा, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

25. सुराना पन्नालाल - लोकशाही समाजवाद व सहकारी चळवळ - महाराष्ट्र राज्य सहकारी संघ प्रकाशन, मुंबई.

●●●

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**प्रकाशन पाचवे व सहावे**

**मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2) लेखक : ग. प्र. पिंपरकर**

बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ

या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रू. 200/- आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल.

पुस्तकांच्या प्रतींसाठी वितरकांकडे मागणी करावी. कार्यवाहांकडेही मिळेल.

**वितरक : अनमोल प्रकाशन, आप्पा बळवंत चौक, पुणे- 43002.**

**सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह -खजिनदार

# सहकार आणि सरकार

● माधव दातार, मुंबई.
*भारतीय औद्योगिक विकास बँक, मुंबई.*

सहकार चळवळीचे हे महोत्सवी वर्ष चालू असताना समारंभ साजरे होणे साहजिक असले तरी तेवढेच करणे पुरेसे नाही. सहकारी चळवळीची मूळ कल्पना सध्याच्या परिस्थितीत पूर्वीप्रमाणेच साजेशी ठरेल, का तिच्यात कालानुरूप बदल व्हायला हवेत हा एक विचारणीय मुद्दा आहे. बदल आवश्यक असतील तर त्यांचे स्वरूप काय असावे याचाही विचार होणे आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत सहकाराच्या कल्पनेचा फेरविचार करावा असे सुचविण्याचा अर्थ सहकारी चळवळीने आजवर केलेल्या चांगल्या कामगिरीला कमी लेखणे असा होत नाही. महाराष्ट्र, पंजाब, तामिळनाडू, गुजराथ या राज्यात साखर, कापड, दुग्ध व्यवसाय व बँकिंग अशा क्षेत्रात सहकारी चळवळीने, सुरूवातीच्या काळात लक्षणीय कामगिरी केली हे कुणीच नाकारणार नाही. पण याच कारणामुळे या संस्थांच्या आजच्या कामगिरीचे परखड मूल्यमापन करून या संस्थाच्या कारभारात सुधारणा सुचविणे म्हणजे सहकार क्षेत्राचे शत्रुत्व पत्करणे असे समजण्याचेही कारण नाही. सहकारी क्षेत्राने आजवर निरनिराळ्या क्षेत्रात चांगली प्रगती केली हे मान्य करूनही या क्षेत्रात कालानुरूप काय बदल वा सुधारणा करता येतील याचा विचार होणे आवश्यक आहे या भूमिकेतून हा निबंध लिहिला आहे. सर्वप्रथम बाजारपेठीय व्यवस्थेच्या चौकटीत सहकाराच्या कल्पनेची आवश्यकता आहे का या प्रश्नाचा व त्या नंतर सहकारी क्षेत्राच्या संदर्भात सरकारच्या भूमिकेचा विचार केला आहे. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात सहकार क्षेत्राबाबत सरकारची जी भूमिका होती त्यात जागतिकीकरण व स्पर्धात्मक बाजारांच्या संदर्भात काय बदल आवश्यक ठरतात या प्रश्नाचा विचार केला आहे. या शिवाय या लेखात जी तात्विक भूमिका मांडली आहे तिचा सहकारी बँकींग उद्योगाच्या संदर्भात उहापोह केला आहे.

### सहकाराची आवश्यकता

अर्थव्यवहारांचे संघटन करण्यासाठी परस्पर सहकार्याची आवश्यकता आहे का? हा प्रश्न कदाचित योग्य वाटणार नाही. निरनिराळ्या आर्थिक

घटकांनी घेतलेल्या निर्णयात सुसूत्रता राखणे आवश्यक असते याबाबत दुमत होणार नाही. अर्थव्यवहारांचे प्रमाण अल्प असताना ही सुसूत्रता राखणे सोपे जाते. कुटुंब वा गावपातळीवरील पंचायत या सारख्या संस्थांच्या मार्फत हे काम काही प्रमाणात होउ शकते - होत असते. पण अर्थव्यवहारांचे प्रमाण वाढू लागले, अर्थव्यवहारांतील गुंतागुंत वाढली की हे सुसूत्रीकरण राखण्याची निराळ्या संस्थागत व्यवस्थेची जरूरी भासते. बाजारपेठांचा विकास होऊ लागला म्हणजे बाजारपेठांमार्फत निरनिराळ्या आर्थिक घटकांनी घेतलेल्या निर्णयात सुसूत्रता राखली जाते-निदान तसे होणे अपेक्षित असते. बाजारात वस्तू विकून नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्य करणाऱ्या उद्योजकांना उत्पादन पद्धती, विक्री व्यवस्था यांची आखणी करून लोकांना हव्या असणाऱ्या वस्तु स्पर्धात्मक बाजारात विकाव्या लागतात. हे काम योग्यरित्या होण्यासाठी बाजारपेठांतील किंमती मधील बदलांचा दिशादर्शक म्हणून उपयोग होतो. बाजारपेठा जर व्यवस्थित कार्यरत असल्या, त्यातील स्पर्धा टिकून राहिली तर भिन्न आर्थिक घटकांच्या निर्णयात सुसूत्रता राखण्याचे काम बाजारपेठांमार्फत केले जाईल त्यासाठी वेगळे काहीच करण्याची गरज नाही. बाजारपेठांचे नियम सर्वांनी पाळावे या साठी काही नियंत्रणाची गरज भासली तर ते काम सरकारने करावे. ही एक भूमिका. ही मान्य असेल तर वेगळ्या सहकारी क्षेत्राची गरज भासणार नाही. पण बाजारपेठेद्वारे जे काम अपेक्षित आहे ते जर योग्यरीतीने होणार नसेल तर बाजारपेठीय व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था उभारावी लागेल. समाजवादाची कल्पना यामुळेच पुढे आली.

समाजवादाच्या भिन्न कल्पना मांडल्या गेल्या त्या सर्वांचा नुसता निर्देशही इथे करता येणार नाही. मार्क्स यांच्या कल्पनेनुसार प्रगत भांडवलशाहीच्या अंतर्विरोधातून, संघटित कामगारवर्गाने सत्ता हस्तगत केल्यावर समाजवादाकडे -याला ते शास्त्रीय समाजवाद असे नाव देत-वाटचाल सुरू होईल. पण समाजवादाच्या इतर अनेक कल्पना मांडण्यात आल्या त्याच्या मुळाशी बाजारपेठीय व्यवस्थेत निर्माण होणाऱ्या बेकारी, असमानता, दारिद्र्य या समस्या टाळण्याचा मुख्य उद्देश होता. समतेवर आधारित न्याय्य व्यवस्था या स्वरूपात समाजवाद या कल्पनेचा सतत विचार होत राहिला. समाजवादाची ही आदर्शभूत व्यवस्था प्रत्यक्षात कशी आणता येईल याचा पुरेसा स्पष्ट विचार होत नव्हता व त्यामुळे या विचारांची संभावना मार्क्स यांनी ''स्वप्नाळू समाजवाद'' अशी केली होती. भांडवलशाहीचा विकास होऊ लागल्यानंतर पारंपरिक समाजव्यवस्था बदलण्यास सुरूवात झाली व वाढत्या औद्योगिकरणाबरोबरच गरिबी, बेकारी व शहरीकरणातून उद्भवणाऱ्या निरनिराळ्या सामाजिक समस्यांकडे लक्ष केन्द्रित झाले. या समस्या नसतील अशी अवस्था या स्वरूपात समाजवादाचा विचार मांडला गेला पण रशियन क्रांतीनंतर सोविएत युनियनमध्ये जी व्यवस्था निर्माण झाली ती भांडवलशाहीला पर्यायी असलेली समाजवादी व्यवस्था मानली गेली. या व्यवस्थेत बाजारपेठेची भूमिका नगण्य म्हणावी अशी होती. बाजारपेठेमार्फत निर्धारित होणाऱ्या आर्थिक निर्णयात सुसूत्रता राखण्याचे काम समाजवादी व्यवस्थेत केन्द्रीय योजनाद्वारे केले जाणार होते. समाजवादी व्यवस्थेच्या उभारणीत व व्यवस्थापनात शासनव्यवस्था, सरकार व कम्युनिस्ट पक्ष यांना महत्त्वाचे स्थान होते. पण कालांतराने सरकारकडे राजकीय सत्तेबरोबरच आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या स्पष्ट झाल्या. या स्थितीत बाजारपेठा व शासनयंत्रणेला अतीव महत्त्व

असलेला समाजवाद या दोहोंना पर्याय ठरेल अशा बाजारपेठा व नियोजन या दोन्ही व्यवस्थांमधील दोष टाळून त्यातील केवळ चांगल्या गोष्टींचे एकत्रीकरण करणाऱ्या व नियोजन व बाजार या दोन्ही पद्धतीना आवश्यक वाव मिळेल अशा विकेन्द्रीत व्यवस्थेचा विचार सुरू झाला. स्थानिक साधनांचा पुरेपूर व योग्य वापर करण्यासाठी भिन्न पातळीवरील नियोजनाची गरज जाणवली व या विभिन्न निर्णयात सुसूत्रता राखण्यासाठी बाजारपेठांना मर्यादित प्रमाणात का होईना वाव देणे आवश्यक वाटले. समाजवादी व्यवस्थेत उत्पादन साधनांवरील खाजगी मालकी नष्ट करण्याची अट होती. यामुळे समानता निर्माण होण्यास मदत झाली तरी उत्पादन घटकांचा योग्य वापर करता येईल का हा प्रश्न निरूत्तरीत होता हे रशियातील शेती क्षेत्रातील परिवर्तनांच्या संदर्भात स्पष्ट झाले होते. खाजगी मालकी समूळ नष्ट न करता छोट्या उत्पादकांचे प्रश्न सोडविताना परस्परांचे सहकार्य ही कल्पना पुढे आली. लहान उत्पादक एकत्र येउन सर्वांच्या साधनांचा एकत्रित उपयोग करू शकले तरच त्यात परस्परांचे हित साधले जाईल. शिवाय खाजगी उपक्रमशीलतेला आवश्यक असणारी प्रोत्साहने कायम ठेवून एकत्रित, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळतील हा सामाजिक पातळीवरील लाभ आहे. विकेन्द्रीत आर्थिक निर्णय घेतले जात असल्याने लोकशाही राज्यव्यवस्था राखता येईल. या प्रकारच्या लोकशाही आधारित, समानशील अर्थरचनेचे फायदे सर्वांनाच मिळतील. ''एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' या काव्यपंक्ती सहकारामागील तात्त्विक अधिष्ठान स्पष्ट करतात. मात्र एकमेकांना सहाय्य करण्यास तयार असणारे समाज घटक विशेषत: उत्पादक-छोटे असले पाहिजेत. केवळ स्वत:च्या कुवतीवर उभे रहाता येणार नसल्याने एकमेकांना सहाय्य करण्याची आवश्यकता निर्माण होते. बाजारपेठेवर आधारित उपायही छोट्या उत्पादकांना फारसे उपयोगी पडणार नाहीत कारण पुष्कळदा छोट्या उत्पादकांना मोठ्या उत्पादकांशी स्पर्धा करायची असते. आपले हित साधण्याचा एक मार्ग एवढ्यापुरतेच सहकाराचे महत्त्व नसते तर आपल्या हिताबरोबरच (आपल्या सारख्याच) इतरांचेही हित साधले जाईल हा विचारही तेवढाच महत्त्वाचा असतो. हा विचार जोपर्यंत बळकट असेल तोपर्यंतच परस्पर सहकार्याची भावना प्रबळ राहिल. स्वहित साध्यकरण्याची प्रेरणा सर्वांत असतेच व बाजारपेठेचे कार्य या भावनेच्या बळावरच चालते. पण सहकार्यातून इतरांनाही सुपंथ धरता येईल यावर सहकाराची कल्पना आधारित असली तरच ती बाजारपेठेपेक्षा सरस ठरू शकेल.

मोठे उत्पादक एकत्र आले तर बाजारपेठेतील स्पर्धा कमी होईल; मोठ्या उत्पादकांची मक्तेदारी निर्माण झाली तर त्यातून समाजाचा लाभ होणार नाही. पण लहान उत्पादक एकत्र आले तर त्यांना एकत्रितपणे मोठ्या उत्पादकांच्या स्पर्धेत टिकाव धरता येईल व त्यामुळे बाजार स्पर्धात्मक राहण्यास मदत होईल व ते सामाजिक हिताचेही ठरेल. या स्थितीत सरकारकडे होणारे आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण टाळून छोट्या उत्पादकांना स्पर्धात्मक राखण्याचा एक मार्ग या स्वरूपात सहकाराचा विचार झाला. प्रत्यक्षात असे साध्य करता आले तर शासनाधारित समाजवादातील केन्द्रीकरण टाळून बाजारपेठीय व्यवस्थेमार्फत समानता निर्माण करता येउ शकेल.

छोट्या उत्पादकांनी एकत्र येउन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळविण्याचे प्रयत्न सहकारी संस्थामार्फत करता येतात. युरोप मध्ये

विविध देशांत हे प्रयत्न व्यापक प्रमाणात केले गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर विकसनशील देशातही सहकारी संस्थाचे महत्त्व ओळखले गेले. या देशात विशेषत: भारतात आर्थिक विकासाचा विचार करतानाच नुसत्या वाढीचा विचार करणे पुरेसे नाही तर आर्थिक समानता, लहान, दुर्बल घटकांचा विकास या गोष्टींना महत्त्व दिले पाहिजे याची जाणीव सुरूवातीपासून होती. सहकाराची कल्पना या संदर्भात विशेष महत्त्वपूर्ण ठरत होती. ग्रामीण भागात विकासाला चालना देण्यासाठी छोट्या उत्पादकांनी एकत्र येउन आपल्या उत्पादनाची विक्री, आवश्यक त्या, आदानांची खरेदी केली तर शेती व इतर ग्रामीण उद्योग जास्त किफायतशीर बनतील. खुद्द शेती सहकारी पद्धतीने करण्याचे थोडेसे प्रयत्न झाले पण त्यात मर्यादित यश मिळाले. पण शेती क्षेत्राशी संबधित साखर, सूत उत्पादन, दुग्ध उद्योग व बँका या उद्योगात सहकारी क्षेत्राने आघाडी घेतली. कमी प्रमाणात का होईना पण पाणी पुरवठा, खत उत्पादन या क्षेत्रातही सहकारी संस्था आढळतात. सहकारी क्षेत्राला उत्तेजन देण्याचे सरकारचे धोरण राहिले आहे व त्याचा परिणाम सहकारी क्षेत्राच्या विस्तारात कमी अधिक प्रमाणात पण सर्व देशभर दिसतो. सहकार हा राज्यांच्या अखत्यारातील विषय असल्याने सहकारी संस्थाच्या वाढीत, नियंत्रण पद्धतीत राज्यागणिक भिन्न स्थिती आढळते. पण जिथे सहकाराची चळवळ फोफावली तेथेही या संस्थांची राजकीयपक्षांची जवळीक, या संस्थाचा कारभार सर्व सभासदांच्या वा ग्राहक वा कर्मचारी यांच्या दीर्घकालिन हिताचा विचार न करता चालणे किंवा सरळ सरळ भ्रष्टाचार होणे या सारख्या समस्या निर्माण झाल्या व त्याचे प्रमाण वाढते आहे ही समान बाब आहे. सहकारी संस्थांच्या नियंत्रणाची जबाबदारी राज्य सरकारवर असल्याने सहकारी क्षेत्र व सरकार यांच्यातील संबंधांचा फेरविचार होणे आवश्यक आहे.

**सहकार व सरकार**

सहकारी क्षेत्राच्या विकासाला सरकारने प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले याला तत्त्वत: आक्षेप घेता येत नाही. सहकार क्षेत्राच्या नियमनासाठी कायदे करणे व त्या कायद्यांची अंमलबजावणी होण्याची व्यवस्था करणे आवश्यकच होते. पण सरकारचे प्रोत्साहन कायमस्वरूपी बनून या संस्थांच्या चालू राहण्याची पूर्वअट बनले तर परस्पर सहकार्यातून प्रगती असे सहकारी क्षेत्राचे स्वरूप न रहाता त्याला सरकारपुरस्कृत आस्थापनांचे स्वरूप प्राप्त होते. सहकारी संस्थांच्या सभासदांनी भाग भांडवल गोळा करावे व नंतर बँका वा वित्तीय संस्थांकडून कर्जे उभारून प्रकल्प उभारावे ही मूळ कल्पना. भाग भांडवलाच्या स्वरूपात सभासदांचे पैसे गुंतले जातात व प्रकल्पाची जोखीम ते उचलतात. प्रकल्पांच्या मालकांनी जोखीम उचलावी व प्रकल्प यशस्वी झाल्यावर नफ्यात वाटा मिळावा हे रास्तच आहे. पण सहकाराला उत्तेजन म्हणून आवश्यक भांडवलाचा अल्पसा भाग सभासदाने द्यायचा व उर्वरित भांडवलाचा भरणा सहकारी बँकांनी कर्ज देऊन करायचा ही पद्धत सर्वमान्य झाल्याने सहकारी संस्थांच्या स्थापनेला चालना मिळाली असेल पण प्रकल्प उभारणीत सभासदांनी उचललेल्या जोखमीचे प्रमाण अतिशय कमी झाले. मुख्यत: बँका व वित्तिय संस्थांनी पुरवलेली कर्जे यातून प्रकल्प उभारला गेल्याने प्रकल्पाची जोखीम सभासदांनी न उचलता कर्जे देणाऱ्या धनकोंनी उचलली. या स्थितीत प्रकल्प उभारणीत वा नंतर तो चालविण्यात अडचणी आल्या तर सभासदांच्या जोखमी पेक्षा धनकोंची जोखीम जास्त झाली . या स्थितीत प्रकल्प उभारणीत वा नंतर तो चालवण्यात अडचणी आल्या तर सभासदांच्या

जोखमी पेक्षा धनकोंची जोखीम जास्त झाली. जी कर्जे दिली ती पुष्कळदा राज्य सरकारच्या हमीवर दिली असल्याने ही जोखीम अंतिमत: राज्य सरकारांची बनली. प्रकल्प अडचणीत आले की कर्जावरील व्याज व मुद्दल परत करणे कठीण बनते. राज्य सरकारने हमी दिली असल्याने राज्य सरकारांना हे कर्ज परत करावे लागते. आर्थिक अडचणींमुळे राज्य सरकारांनाही आपल्या हमीचे पालन करता न आल्याने धनको बँका व संस्थांना न्यायालयात जावे लागण्याची उदाहरणेही आहेत. पण या प्रकारात सभासदांवरील प्रकल्पाची जबाबदारी कमी होते. प्रकल्प चांगला चालला तर फायदा मिळेल पण तोटा झाला तर त्याचा मोठा वाटा धनको उचलतील या स्थितीत प्रकल्प उभारणी व ते चालवणे यासाठी सभासदांनी रस घेणे व संचालकांवर वचक ठेवणे या बाबी प्रत्यक्षात येउ शकत नाहीत. सभासदांकडून पुरेसे भांडवल गोळा करण्याचे बंधन शिथिल झाले की नवीन संस्थांची उभारणी बँकाकडून कर्जे मंजूर करवून घेण्याच्या क्षमतेवर अवलंबून राहाते. या स्थितीत सहकारी संस्थाच्या कार्यपद्धतीत निगम शासन (Corporate Governence) बाबत समस्या उत्पन्न होतात यात नवल नाही.

सहकारी संस्थाचे नियमन करण्याचे महत्त्वाचे काम राज्य सरकारांकडे आहे. पण हे कामही सहकार खात्यांमार्फत काटेकोरपणे होत नसल्याने सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत दोष निर्माण होतात. राजकीय नेत्यांचा प्रवर्तकांशी जवळचा संबंध असल्याने राज्य सरकारची भूमिका निष्पक्ष नियंत्रकाची राहात नाही. या घटकाचाही परिणाम सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत होणे अटळ आहे. सहकारी बँकांच्या बाबतीत एक सहकारी संस्था म्हणून राज्य सरकारचे तर एक बँक म्हणून रिझर्व्ह बँकेचे अशी दुहेरी नियंत्रणाची पद्धत बनली आहे. या दुहेरी नियंत्रणामुळे नियंत्रणाची परिणामकारकता कमी होते याबाबत अभ्यासकांचे एकमत आहे.

सहकारी संस्थांचे प्रवर्तक राजकारणाशी संबंधित असल्याने राज्य सरकारची सहकारी संस्थाच्या कामकाजावरील देखरेख नि:पक्षपातीपणे होते असे मानणे कठीण आहे. राज्य सरकार सहकारी संस्थांना जी मदत करते तिचा किती फायदा सामान्य सभासदांना होतो या प्रश्नाच्या उत्तरावर सहकारी क्षेत्र व सरकार यांच्या भावी (ईष्ट) संबंधाचे स्वरूप अवलंबून राहील. सरकारने सहकारी संस्थांच्या विकासाला पोषक भूमिका घ्यावी, की घेउ नये याबाबत फारसे दुमत असणार नाही पण सरकारला कोणत्या मार्गाने सहकारी संस्थांना परिणामकारक मदत करता येईल याबाबत चर्चा झाली पाहिजे. विविध सभासदांना विवक्षित उद्दिष्टांसाठी उत्पादन, वितरण, वाहतूक यासारख्या क्षेत्रात सामुहिकरित्या कृती करता यावी यासाठी आवश्यक असणारी कायद्याची चौकट उभारणे व सहकारी संस्था सभासदांच्या व्यापक हिताच्या दृष्टीकोनातून चालवली जाईल याबाबतचे नियम बनवून त्यांची अंमलबजावणी करणे हे सरकारचे मुख्य कर्तव्य होय. यापुढे जाउन सहकारी संस्थांसाठी सरकारी अंदाजपत्रकातील वा बँकाचे निधी वापरणे यामुळे सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत सुधारणा होत नाहीत असा पूर्वानुभव आहे. शिवाय सभासदांनी परस्पर सहकार्याच्या बळावर आरंभ केलेला उद्योग चालू राहाण्यासाठी सरकारी मदतीची सातत्याने गरज भासत असेल तर ते सहकारी संस्थेचे अपयशच मानायला हवे.

सहकारी संस्था व्यवस्थित चालण्यासाठी सभासदांत ऐक्य भावना व सहकाराच्या तत्त्वावर

विश्वास असायला हवा. असा विश्वास निर्माण करणारे व टिकविणारे प्रवर्तक/व्यवस्थापक लाभले तर बहुतांशी या संस्थांचे कामकाज व्यवस्थित चालू राहते. असे प्रवर्तक व्यवस्थापक नसले तर संस्था सर्वांना समाधानकारक वाटतील या पद्धतीने चालत नाहीत. हे सर्वच संस्थाच्या बाबतीत खरे असते पण सहकारी संस्थात सभासदांची भूमिका विशेष महत्त्वाची बनते. सुरूवातीच्या काळात ध्येयवादी विचारसरणीचा प्रभाव कायम असेपर्यंत सभासदांच्याहिताच्या दृष्टीकोनातून संस्था चालविण्याला महत्त्व मिळाले. पण कालांतराने हा विचार मागे पडून सहकारी संस्थांच्या स्थापना आपल्या मतदार संघटातील शक्तीसंचयाचे एक साधन म्हणून करण्यात येऊ लागल्या. सहकारी संस्थाच्या विकासाला जी मानवी साधने आवश्यक आहेत त्याची पूर्तता सरकार करू शकते का हा खरा प्रश्न आहे. ते करता येत नसेल तर केवळ वित्तिय सहाय्य देत राहून परिस्थिती सुधारते अशी आशा करता येत नाही. किंवा असे सहाय्य मिळण्याची खात्री असेल तर या संस्था त्याच्या घोषीत उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी चालविण्याऐवजी त्या वैयक्तिक वा सभासदांच्या छोट्या गटाचा लाभ साध्य करण्यासाठी चालविल्या जातील. या स्थितीत सरकार व सहकारी संस्था यांच्यातील संबंधांचा फेर विचार करणे अगत्याचे होत आहे.

सहकारी संस्था जशा मोठ्या होतात तशी त्यांची कार्यपद्धती कोणत्याही मोठ्या आस्थापनेसारखी होते. त्यामुळे त्यांचे व्यवस्थापन सारख्याच पद्धतीने व्हायला हवे. खाजगी कंपन्यांना आपल्या भाग धारकांना जबाबदार रहावे लागते, किंवा बाजार पेठेतून वा बँकांकडून पैसे उभारायचे असतील तर कंपनीचा कारभार चोख चालला आहे हे गुंतवणुकदारांना पटवून द्यावे लागते. या दबावामुळे कंपन्यांचा कारभार व्यवस्थितपणे चालविणे व्यवस्थापनावर बंधनकारक ठरते. ज्या कंपन्यांच्या समभागांची भांडवल बाजारात खरेदी विक्री होते तेथे कंपनीचे भाग भांडवल खरेदी करून व्यवस्थापन बदलण्याची शक्यता असते. याचाही व्यवस्थापनावर संभाव्य दबाव पडू शकतो. अशा प्रकारची कोणतीच यंत्रणा सहकारी संस्थाबाबत प्रभावी ठरत नाही असे दिसते.

**सहकार व स्पर्धात्मकता**

सहकारी संस्था यशस्वी झाल्या की त्यांचा व्याप वाढतो व त्यांना त्या क्षेत्रातील उत्पादकांशी स्पर्धा करावी लागते. ज्या संस्थांमध्ये व्यवस्थापनात बाह्य हस्तक्षेप न होता व्यावसायिक तत्त्वाचे पालन केले जाते. त्या यशस्वीपणाने आपला व्याप वाढवून बाजारपेठेत स्वत:चे विशिष्ट स्थान निर्माण करू शकतात. गुजराथमधील अमूल हे याचे ठळक उदाहरण आहे. सहकारी संस्थांना केवळ सरकारची मदत व सवलती यावर आपले उत्पादन कार्य चालू ठेवता येणार नाही. शिवाय सरकारची मदत देखील अंतिमत: सामान्य जनतेकडूनच होत असल्याने सरकारी मदत वा संरक्षण यावर कायमस्वरूपी अवलंबून राहणाऱ्या सहकारी संस्था चालू ठेवायच्या का या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर द्यायला हवे. सहकारी संस्थांना यशस्वीपणे कार्य करताना म्हणजे सभासदांचे हित साधताना व्यावसायिक व्यवस्थापन तंत्राला प्राधान्य देण्यात येऊनश्या संस्था कार्यक्षम पद्धतीने चालविल्या जाणे आवश्यक आहे. तशा त्या चालल्या व वाढावा निर्माण झाला तर या वाढाव्याचा उपयोग सभासदांच्या इच्छेनुरूप करता येईल. पण असा वाढवाच निर्माण झाला नाही तर सभासदांच्या हिताचे रक्षण कसे होऊ शकेल हा प्रश्न उरतोच.

सहकारी संस्थाचा कारभार व्यवस्थित

चालण्यासाठी या संस्थांच्या कारभारात सभासदांना जास्त परिणामकारक वाटा मिळाला पाहिजे. संस्थेच्या कारभारांची सभासदांना वेळोवेळी माहिती मिळणे, संचालक मंडळावर भिन्न व्यावसायिकांचा व तज्ज्ञांचा समावेश होणे व व्यावसायिक व्यवस्थापकांना संस्थेच्या दैनंदिन कारभारात समाविष्ट करून घेण्याबाबत कायदेशीर तरतूदी होणे आवश्यक आहे. खाजगी कंपन्यांच्या संदर्भात जसा निगम शासनाचा(Corporate Governance) मुद्दा उपस्थित केला जातो तो सहकार क्षेत्राच्या संदर्भातही तितकाच महत्त्वाचा आहे. या संस्थांचे नियंत्रण व त्यावर देखरेख ठेवण्याचे काम अधिक चोखपणे होणे आवश्यक आहे. सहकार खात्याचे स्वरूप सरकारच्या अनेक खात्यांपैकी एक एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता सहकारी संस्थांना मदत करण्याची इच्छा व क्षमता असलेली पण त्याच वेळी गरज पडली तर योग्य तो वचक ठेवण्याचे सामर्थ्य असलेली यंत्रणा असे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे. हे परिवर्तन होण्यासाठी सरकारचे खाते हे स्वरूप बदलून त्याला सेबी किंवा इरडा यासारख्या स्वायत्त संस्थेचे स्वरूप देणे आवश्यक असेल तर ते करण्यात काहीच आडकाठी असता कामा नये.

सहकारी संस्था नेहमीच स्पर्धात्मक वातावरणात चालतील किंवा चालतात असे नाही. उदा. सहकारी गृह निर्माण संस्था. या संस्था सभासदांना विशिष्ट बाबतीत मदत करण्यासाठी कार्य करतात व त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. अशा संस्थांचा-ज्या बाजारपेठेत आपले उत्पादन वा सेवा विकत नाहीत -विचार निराळ्या पद्धतीने व्हायला हवा. पण अशा संस्थांच्या यशस्वीतेसाठी मुख्यत: सभासदांतील सहकार्याची भावना टिकून रहाणे आवश्यक असते. सरकारची भूमिका केवळ कायद्याची अशी चौकट पुरविण्याची असेल की ज्या चौकटीत सभासदांच्या हिताला बाधा आणता येणार नाही व कुणी तसा प्रयत्न केल्यास त्याला आळा घालता येईल. ज्या संस्थांना आपले उत्पादन बाजारात विकायचे आहे त्या संस्थांना बाजारपेठेची शिस्त पाळावी लागेल व या शिस्तपालनात सूट देणारी सरकारी नियंत्रणे व नियम असतील तर त्याचा फेरविचार करायला हवा. सहकारी संस्थांना खाजगी क्षेत्रातील कंपन्यापेक्षा आपले वेगळेपण दाखवून द्यावयाचे असेल तर ते सभासदांमधील सहकार्याची भावना व दीर्घकालिन लाभ व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तात्कालिक लाभांचा त्याग करण्याची सभासदांची तयारी यातून दिसायला हवी.

### सहकारी बँकींग

ज्या भिन्न क्षेत्रात सहकारी संस्था कार्यरत आहेत त्यापैकी पतपेढ्या व बँका यांचा क्रम बराच वरचा आहे. सहकारी तत्त्वावर बँक चालवणे यात खूप सोयी आहेत. बँक व्यवसायात कर्ज देणे या प्रकारात खूप जोखीम असते. ज्या व्यक्तीला कर्ज द्यायचे ती प्रामाणिक आहे ना ? ज्या प्रकल्पासाठी कर्ज द्यायचे तो प्रकल्प कर्ज देण्यायोग्य आहे ना म्हणजे या प्रकल्पाचे अपेक्षित फायदे खर्चापेक्षा जास्त असतील ना ? प्रकल्प उभारणीत कोणते अडथळे येऊ शकतात? प्रकल्पाची यशस्वी उभारणी करण्याची कुवत कर्जदाराकडे आहे ना ? या सर्व बाबींचा विचार करून कर्ज देण्याचा निर्णय बँक व्यवस्थापकास घ्यावा लागतो. कर्जदारांची निवड यशस्वी झाली तर कर्जाची वेळेवर सव्याज फेड होते व त्यातून ठेवीदारांना ठेवीवरील निर्धारित व्याज देऊन शिल्लक राहते. व्यवस्थापकांचे सर्व निर्णय सदैव बरोबर येणार नाहीत. काही वेळेस प्रकल्प उभारणीत अनपेक्षित अडचणी येतील तर काही वेळेस कर्जदार विश्वासपात्र

नव्हता असे आढळेल. काही कर्जे वा प्रकल्प याबाबतीत व्यवस्थापनाचे निर्णय चुकतील ही बँक व्यवसायातील न टाळता येण्याजोगी जोखीम आहे. जो पर्यंत बँक व्यवस्थापन जाणून बजून अपात्र प्रकल्प वा प्रवर्तकांना कर्ज देत नाही व थकीत कर्जांचे प्रमाण मर्यादित आहे तोवर बँकेचे काम ठेवीदार व कर्जदार या दोहोंना समाधानकारक वाटेल अशा पद्धतीने चालू शकते.

बँक व्यवसायाची ही लक्षणे विचारात घेतली तर सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या स्थानिक कार्यक्षेत्र असलेल्या बँकांची संभाव्य बलस्थाने स्पष्ट होतात. या बँकेचे सर्व वा बरेचसे व्यवहार सभासदांबरोबर होत असल्याने प्रवर्तकांचे/प्रकल्पांचे मूल्यमापन तुलनेत सोपे असेल. स्थानिक पातळीवरील बाजारपेठा, उत्पादक, व्यापारी यांची माहिती बँकेला असेल. याबाबतीत बँकेच्या सभासदांचीही मदत होऊ शकते. जे व्यवहार ओळखीच्या लोकांमध्ये होतात ते जास्त विश्वासाचे व म्हणून सहज, कमी गुंतागुंतीचे वा कमी खर्चाचे असू शकतात. याबाबतीत स्थानिक सहकारी बँका स्थानिक परिस्थितीची चांगली जाण या बळावर मोठ्या बँकाना वर चढ ठरू शकतात. परंतु परस्पर विश्वासाच्या ओळखीचा गैरफायदा बँक व्यवस्थापन वा सभासदांना घेता येण्याची शक्यता असतेच. पण सभासदांचे बारीक लक्ष असेल व बँकेची अंतर्गत कार्यपद्धती चोख असेल तर हा धोका टाळता येतो.

अलिकडच्या काळात सहकारी बँका तेथील गैर प्रकारामुळे ''बातमी'' बनत आहेत कारण त्यांनी वाटलेली कर्जे थकित बनली व काही कर्जे व्यवस्थापनाने जाणून बुजून दिली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही वेळेला सहकारी बँकानी ज्या क्षेत्रातील माहिती अपुरी आहे तिथे सरकारी कर्जरोखे वा समभाग यांत गुंतवणूक केली व त्यांच्या अज्ञानामुळे वा मिळणाऱ्या प्रलोभनांमुळे त्यांची फसवणूक झाली. या चुकांची किंमत अर्थातच ठेवीदारांना तरी द्यावी लागते किंवा ठेवीदारांच्या हितांचे रक्षण व्हावे म्हणून सरकारला तरी. बिगर वित्तिय आस्थापनांना तोटा झाला व त्या बंद पडल्या तर त्यांची किंमत फक्त त्या आस्थापनाशी संबंधितांना (ग्राहक, कामगार, गुंतवणूकदार वा भागधारक) द्यावी लागते. वित्तिय संस्थाचे संबंध इतर वित्तिय संस्थाशी व त्याद्वारे इतर अनेकांशी असतात. त्यामुळे एखाद्या मोठ्या बँक वा वित्तिय संस्थेत काही समस्या उद्भवल्या तर त्याचे संभाव्य व्यापक दुष्परिणाम टाळण्यासाठी सरकार वा मध्यवर्ती बँक हस्तक्षेप करतात. याच कारणामुळे बँक व वित्तिय संस्था यांच्या कारभारावर मध्यवर्ती बँकेमार्फत नियंत्रणे घातली जातात व त्यांच्या व्यवहारांवर नियमितपणे देखरेख ठेवण्यात येते. सहकारी बँकांच्या कामावर राज्य सरकारच्या सहकार खात्याचे एक सहकारी संस्था या नात्याने तर रिझर्व्ह बँकेचे एक बँक या नात्याने नियंत्रण असते. या दुहेरी नियंत्रणामुळे नियंत्रणाची परिणामकारकता कमी होते असा अनुभव आल्याने सहकारी बँकावर इतर बँकांप्रमाणे फक्त रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असावे हा विचार पुढे आला आहे.

मुळात व्याज दर नियंत्रित असताना सहकारी बँकांना इतर मोठ्या, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांशी स्पर्धा करता यावी म्हणून या बँकांना इतर बँकापेक्षा 1/2 ते 1% जास्त व्याज देण्याची मुभा असे. तसेच कर्जावरील व्याजही जास्त आकारता येत असे. आता व्याज दर नियंत्रित झाल्यावर जास्त व्याज देऊन ठेवी मिळविणे सोपे झाले आहे पण या ठेवींची गुंतवणूक चढत्या व्याजाच्या कर्जात होऊ शकली तरच

ठेवीदारांना आश्वासित जादा व्याज मिळू शकते. जे प्रकल्प जादा जोखमीचे आहेत अशाच प्रकल्पांत जादा दराची कर्जे वापरता येतात कारण जे प्रकल्प तुलनेत कमी धोकादायक आहेत त्यांनी कमी दराची कर्जे उपलब्ध होतील व कमी दराच्या ठेवी स्वीकारणाऱ्या बँकांना अशी कर्जे देता येतील. त्यामुळे जादा व्याज देऊन ठेवी मिळाल्या तरी त्या कुठे गुंतवायच्या हा प्रश्न शिल्लक राहतो. अपेक्षित लाभ व संभाव्य जोखीम यातील निवड खुला व्याज दर असताना अधिकच जटील बनते. या स्थितीत प्रकल्प मूल्यमापन कौशल्य, प्रकल्प निवडण्याच्या पद्धती व अंतर्गत कामकाज पद्धत या गोष्टी महत्त्वाच्या. अलिकडेच विविध सहकारी बँकात जे घोटाळे झाले त्यातून ज्या मार्गाने ठेवी गुंतविण्यात आल्या त्यातील जोखीम बँक व्यवस्थापनाला, समजली नव्हती वा जाणून बुजून तसा निर्णय घेतला गेला असे दिसते. रिझर्व्ह बँक इतर बँकांच्या व्यवहारांचे जसे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नियंत्रण करते त्याच पद्धतीने सहकारी बँकांच्या व्यवहारांवर रिझर्व्ह बँकेची देखरेख व नियंत्रण असावे यांत कांहीच गैर नाही. सहकार खात्याचे नियंत्रण अपुरे व निष्पक्ष असण्याची जास्त शक्यता असल्याने, दुहेरी नियंत्रण थांबवून फक्त रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आले तर सहकारी बँकांचा कारभार योग्य पद्धतीने चालण्यास मदतच होईल.

बँकेने आपल्या संचालकांना वा त्यांच्या नातेवाईकांना कर्जे देऊ नये कारण या कर्जाच्या प्रस्तावांचा विचार झुकते माप देऊन केला जाईल अशी शक्यता असते, निदान लोकांना तसा संशय वाटेल. त्यामुळे बँकेने आपल्या संचालकांना वा त्यांच्या नातेवाईकांना वैयक्तिक कर्जे देऊ नयेत असा नियम आहे. संचालकांशी संबंधित कंपन्यांना कर्जे द्यायची असल्यास त्यांची माहिती भागधारकांना द्यावी लागते. संचालकांना वैयक्तिक कर्जे हवी असतील व ती "सरळ" असतील तर ती देण्यासाठी कोणतीही इतर बँक तयार होईल व या नियमामुळे बँक संचालकांना वैयक्तिक कर्जे मिळणार नाहीत असे समजणे बरोबर नाही. बँकेच्या कार्यपद्धतीविषयी ठेवीदार व इतरांच्या मनात कोणताही किंतू राहू नये हा या नियमाचा हेतू आहे. रिझर्व्ह बँकेने हा नियम सहकारी बँकांना लागू करण्याचा मानस जाहिर केल्यावर एवढी हाकाटी झाली की हा नियम लागू करायलाच हवा असेच कुणालाही वाटेल !

सहकारी बँकांना आपले वैशिष्ट्य स्थानिक पातळीवरील आपले ज्ञान, माहिती, ओळखी यांचा उपयोग करून प्रकल्प वा प्रवर्तकांची योग्य निवड करून दाखवून द्यावे लागेल. मोठ्या बँकाशी स्पर्धा करायला देखील हाच घटक उपयोगी पडणार आहे. व्यवस्थापनात नियमबाजी न आणता व्यावसायिक दृष्टीकोनाचा अवलंब करावा लागेल. जास्त व्याज आकारायची परवानगी वा (deduction tax at source) कर आकारण्याच्या तरतूदीतून सूट या मार्गाने ठेवी वाढल्या तरी त्या सुयोग्य रितीने गुंतवायच्या कशा हा प्रश्न अनुत्तरीतच रहातो. त्यासाठी इतर बँकाप्रमाणे व्यावसायिक व्यवस्थापन व रिझर्व्ह बँकेचे परिणामकारक नियंत्रण यांची मदतच होईल.

●●●

# भारतातील सहकारी विपणन : सद्य:स्थिती आणि भविष्यातील वाटचाल

● रवीन्द्र दोशी, कोल्हापूर.
*भूतपूर्व प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि भूतपूर्व प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.*

## 1. कृषी विपणन : कृषी उत्पादनाचा पुढचा दुवा

कोणत्याही क्षेत्रातील उत्पादनकार्याची अखेर, ही त्या वस्तूंच्या विपणनात होते. या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी होत असल्याने आणि त्यांच्यामध्ये एक तार्किक साखळी असल्यामुळे, कोणत्याही वस्तूच्या विपणनाची प्रक्रिया जेवढी कार्यक्षम (efficient) असेल तेवढा तिच्या उत्पादन व्यवस्थेवर अनुकूल परिणाम घडत असतो. त्यासाठी उत्पादन वाढविण्याची कोणतीही योजना असली तरी तिला कार्यदक्ष विपणनाची जोड दिली गेली पाहिजे; म्हणजेच विपणनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकडे विशेष लक्ष द्यावयास हवे. शेतीमालाच्या बाबतीत तर याची विशेष गरज असते, कारण त्याचे उत्पादन हंगामी असते आणि एकंदर उत्पादन निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. शेतीमाल नाशवंत असतो, तो असंख्य शेतांमधून उत्पादित केला जातो, तो व्यापक प्रदेशात उत्पादित होतो आणि तो बाजारापर्यंत पोचविण्यासाठी विशेष प्रकारची साठवण आणि वाहतूक व्यवस्था असावी लागते. शेतीमालाची उत्पादन व्यवस्था अल्पसूचनेने बदलता येत नाही. उत्पादनकार्याचा बदलत्या किंमतीशी मेळ बसण्यास वेळ लागतो. थोडक्यात, शेतीमालाची मागणी सामान्यत: अलवचिक असते. मालाची प्रतवारी (grading), प्रमाणीकरण (standardisation) आणि साठवण या तीन बाबी शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेचा अपरिहार्य घटक आहेत.

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात, शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेला अनेक उणीवांचे ग्रहण लागलेले असते. संस्थात्मक संरचना परंपरागत असते, अकार्यक्षम (inefficient) असते आणि ठिसूळ पायावर आधारलेली असते. देशातील सर्व लोकांना अन्न सुरक्षितता देण्याच्या दबावाखाली भारताने सर्वसाधारण शेती उत्पादनाच्या आणि विशेषत: धान्य उत्पादनाच्या वाढीवर भर दिला आहे. देशातील पिकाखालील एकंदर शेतजमिनीपैकी मोठा भाग धान्य उत्पादनासाठी, त्यातही गहू आणि तांदूळ या तृणधान्यांच्या उत्पादनासाठी, वापरला जात

असल्यामुळे देशात धान्योत्पादन वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले गेले आहे. एकोणीसशेसाठच्या दशकाच्या मध्यापासून अनुसरलेल्या नवीन कृषी नीतिमुळे (new agricultural policy) धान्योत्पादनाच्या आघाडीवर भारताला उत्साहवर्धक यश लाभले. एकोणीसशेनव्वदीच्या दशकात उदारीकरणाचे धोरण अवलंबिले गेल्यामुळे धान्येतर पिकांच्या उत्पादन वाढीसाठीही प्रयत्न केले जात आहेत.

भारताने धान्योत्पादनाच्या वाढीत लक्षणीय यश मिळविले आहे हे नि:संशय. तथापि, देशाच्या कृषी विकास कार्यक्रमात कृषी विपणनाची बाजू अजूनही बरीचशी कमकुवत राहिली आहे. सहकारी विपणन संस्था आणि विनियमित बाजार या दोनच संस्था या क्षेत्रात जवळपास शतकभर कार्यरत आहेत. त्यांनी कार्यदक्ष विपणन व्यवस्था पुरवून उत्पादनकार्याला भक्कम आधार द्यावा अशी अपेक्षा होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात नाफेड, अन्न महामंडळ आणि अन्य संस्था उदयाला आल्या. प्रसंगोपात एकाधिकार खरेदीच्या योजनाही राबविल्या गेल्या. असे सर्व असूनही, अजूनदेखील शेतीमालाच्या विपणनाची देशातील एकंदर व्यवस्था पुरेशी समाधानकारक नाही; त्यामुळे त्यात बरीच सुधारणा होणे अपेक्षित आहे. गेल्या दीड दशकात भारतात कार्यान्वित असलेल्या नवीन आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर तर सुधारणेची गरज प्रकर्षाने जाणवते.

कोणत्याही कृषीमाल विपणन व्यवस्थेच्या माध्यमातून उत्पादकाला उत्पादनवाढीची प्रेरणा मिळावी, त्याच्या उत्पादनाला रास्त भावाची खात्री असावी आणि ग्राहकांना ती वस्तू रास्त भावात पुरविता यावी अशी अपेक्षा असते. याकरिता कार्यक्षम विपणन व्यवस्था निर्माण व्हावी लागते. तसे झाल्यासच भारताला कृषी क्षेत्राच्या आघाडीवरील विद्यमान आणि भविष्यकालीन आव्हाने पेलता येतील. शेतकऱ्यांच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्याच्या हेतूने सहकारी विपणन संस्था निर्माण होऊन त्यांनी आतापर्यंत सुमारे नऊ दशकांची वाटचाल पूर्ण केली आहे. यास्तव या लेखात या संस्थेची अलीकडील स्थिती आणि भविष्यातील वाटचालीची अपेक्षित दिशा यांचा ऊहापोह केला आहे.

## 2. सहकारी विपणन संस्थांचे दृश्य

### 2.1 सर्वसाधारण संरचना

भारतातील सहकारी संस्थांच्या पिरॅमिड पध्दतीच्या संरचनेमध्ये प्राथमिक विपणन संस्था या आधारभूत असून त्याच शेतीमाले उत्पादकांच्या प्रत्यक्ष संपर्कात येतात. मध्यवर्ती, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरच्या संस्था या त्यांच्या उतरंडीतील वरच्या पातळीवरील संस्था होत. या चारही पातळ्यांवरील संस्था एकत्रितपणे सहकारी विपणन संस्था या प्रवर्गात मोडतात. लक्षात घेण्याची बाब म्हणजे, या सर्व संस्थांचे सर्वसाधारण संस्था(general purpose societies) आणि विशेष संस्था (specialised societies)असे वर्गीकरण केले जाते. ज्या संस्था विशिष्ट शेतीमालाच्याच विपणन व्यवहारात गुंतलेल्या असतात त्यांचा उल्लेख 'विशेष संस्था' असा केला जातो. तक्ता 1 वरुन या दोन्ही प्रवर्गातील संस्थांची सापेक्ष स्थिती कशी आढळते ते पाहता येईल.

तक्ता 1 ची आकडेवारी सहकारी संस्थांच्या मूलभूत संरचनेवर प्रकाश टाकते. वरिष्ठ पातळीवरील संस्थांमध्ये सर्वसाधारण संस्थांचा गटच नजरेत भरतो; कारण, एकूण संस्थामध्ये त्यांची संख्या 77.25 टक्के, सभासद संख्येचा वाटा 85.69 टक्के तर उलाढालीतील

तक्ता 1

भारतातील सहकारी विपणन संस्थांचे दृश्य (31 मार्च, 1996 )

| प्रवर्ग | संस्थांची संख्या | सभासद संख्या | उलाढाल (कोटी रूपये) |
|---|---|---|---|
| **(अ) राष्ट्रीय राज्य आणि मध्यवर्ती संस्था** | | | |
| 1. सर्व विपणन संस्था .......... | 501 | 13,61,151 | 10,590 |
| पैकी | (100.00) | (100.00) | (100.00) |
| 2. सर्वसाधारण संस्था | 387 | 11,66,436 | 8,382 |
| | (77.25) | (85.69) | (79.15) |
| 3. विशेष संस्था | 114 | 1,94,715 | 2,208 |
| | (22.75) | (14.31) | (20.85) |
| **(आ) प्राथमिक संस्था** | | | |
| 1. सर्व विपणन संस्था .......... | 8,049 | 40,02,849 | 5,479 |
| पैकी | (100.00) | (100.00) | (100.00) |
| 2. सर्वसाधारण संस्था | 2,692 | 29,15,041 | 4,981 |
| | (33.45) | (72.82) | (89.09) |
| | 5,357 | 10,87,808 | 598 |
| 3. विशेष संस्था | (66.55) | (27.18) | (10.91) |

**टीप :** कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

स्रोत : Important Items of Data : Credit and Non-Credit Co-operative Societies, 1995-96, NABARD, Mumbai, July, 1997

हिस्सा 79.15 टक्के होता. प्राथमिक विपणन संस्थांच्या बाबतीतही सभासद संख्या आणि उलाढाल यातील हिस्सा सर्वसाधारण संस्था प्रवर्गाचाच लक्षणीय आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे एकूण संस्थांमध्ये या संस्था अवघ्या 33.45 टक्केच आहेत. याचा अर्थ असा की, विशेष संस्था प्रवर्गातील संस्था एकूण संख्येच्या दृष्टीने जास्त असल्या तरी त्या सामान्यतः आकाराने लहान होत्या आणि त्यांची सभासद संख्या आणि आर्थिक उलाढाल बेताचीच होती. याउलट, सर्वसाधारण संस्था संख्याबळाने कमी आढळल्या तरी त्या आकाराने तौलनिक दृष्ट्या मोठ्या असून त्यांची सभासद संख्या जास्त तसेच उलाढालही अधिक होती.

**2.2 राज्यसापेक्ष परिस्थिती**

भारताच्या विविध राज्यांमध्ये सहकारी विपणन संस्थांचा विस्तार कसा झाला आहे याचा तपशील तक्ता 2 मधील आकडेवारीच्या आधारे पाहता येईल. ही आकडेवारी वरिष्ठ पातळीवरच्या संस्थांची (राष्ट्रीय, राज्य व मध्यवर्ती पातळीवरच्या संस्थांची) आहे. आपण केवळ अशा संस्थांची संख्या आणि सभासद संख्या या दोन निकषांचा आधार घेतला तर सर्वसाधारण संस्था प्रवर्गामध्ये तसेच विशेष संस्था प्रवर्गामध्ये उत्तरप्रदेश आघाडीवर असल्याचे

## तक्ता 2

### सहकारी विपणन संस्थांची राज्यनिहाय स्थिती:
### (1) राष्ट्रीय, राज्य मध्यवर्ती संस्था (31 मार्च, 1996)

| राज्य/केन्द्रशासित प्रदेश | सर्वसाधारण संस्था | | | विशेष संस्था | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | सभासद | उलाढाल (कोटी रू.) | संख्या | सभासद | उलाढाल (कोटी रू.) |
| 1. आंध्रप्रदेश | 22 | 11,339 | 56 | 1 | 1,486 | 118 |
| 2. अरूणाचल प्रदेश | 1 | 68 | 16 | - | - | - |
| 3. आसाम ++ | 1 | - | - | - | - | - |
| 4. बिहार | 1 | 7,110 | 8 | - | - | - |
| 5. गुजराथ | 19 | 52,635 | 783 | 31 | 78,293 | 1,024 |
| 6. हरियाणा * | 1 | 78 | 879 | - | - | - |
| 7. हिमाचल प्रदेश | 10 | 2,618 | 54 | 1 | 6 | - |
| 8. कर्नाटक | 5 | 8,285 | 34 | 16 | 86,509 | 218 |
| 9. केरळ * | 1 | 114 | 98 | 1 | 37 | 88 |
| 10. मध्यप्रदेश | 1 | 2,087 | 781 | - | - | - |
| 11. महाराष्ट्र | 25 | 93,398 | 650 | 2 | 2,620 | 570 |
| 12. मणिपूर | 9 | 1,797 | 2 | - | - | - |
| 13. नागालँड | 12 | 300 | 2 | - | | - |
| 14. ओरिसा | 2 | 57,775 | 13 | 1 | 290 | - |
| 15. पंजाब | 1 | 2,979 | 4,165 | | | - |
| 16. राजस्थान * | 1 | 182 | 43 | 2 | 1,250 | 119 |
| 17. तामिळनाडू | 2 | 4,173 | 232 | - | - | - |
| 18. त्रिपूरा | 1 | 138 | 2 | - | - | - |
| 19. उत्तरप्रदेश | 266 | 9,19,000 | 77 | 56 | 24,000 | 54 |
| 20. पश्चिम बंगाल | 1 | 382 | 130 | - | - | - |
| 21. अंदमान निकोबार बेटे* | 1 | 124 | 3 | 2 | 30 | 9 |
| 22. चंदिगड + | 2 | 574 | 349 | - | - | - |
| 23. दिल्ली | | - | - | - | - | - |
| 24. मिझोराम ++ | | - | - | - | - | - |
| 25. पॉंडिचेरी | 1 | 1,280 | 5 | - | | |
| 26. मेघालय | | - | - | 1 | 194 | 8 |
| एकूण | 387 | 11,66,436 | 8,382 | 114 | 1,94,715 | 2,208 |

टीप : * या खुणेची माहिती 1994-95 या वर्षाची आहे. +या खुणेची माहिती 1992-93 या वर्षाची आहे. ++ या खुणेची माहिती उपलब्ध नाही. विशेष संस्थांमध्ये कापूस, फळे व भाजीपाला, तंबाखू, सुपारी, नारळ आणि ऊस पुरवठा या वस्तूंची स्वतंत्रपणे उलाढाल करणाऱ्या संस्थांबरोबर इतर संस्थांचा समावेश होतो. स्रोत : तक्ता 1 प्रमाणे.

तक्ता 3

सहकारी विपणन संस्थांची राज्यनिहाय स्थिती:

(2)प्राथमिक संस्था (31 मार्च, 1996)

| राज्य/केन्द्रशासित प्रदेश | सर्वसाधारण संस्था | | | विशेष संस्था | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | सभासद | उलाढाल (कोटी रू.) | संख्या | सभासद | उलाढाल (कोटी रू.) |
| 1. आंध्रप्रदेश | - | - | - | 30 | 23,256 | 5 |
| 2. आसाम ++ | 57 | - | - | - | - | - |
| 3. बिहार | 475 | 1,36,915 | 15 | - | - | - |
| 4. गोवा | - | - | - | 8 | 7,564 | 28 |
| 5. गुजराथ | 179 | 81,848 | 345 | 2,041 | 3,01,378 | 1,99 |
| 6. हरियाणा * | 78 | 1,00,248 | 1,734 | - | - | - |
| 7. हिमाचल प्रदेश | 37 | 4,181 | 27 | 45 | 8,721 | 18 |
| 8. कर्नाटक | 183 | 3,68,699 | 374 | 322 | 1,63,578 | 71 |
| 9. केरळ * | 266 | 1,50,550 | 134 | 123 | 83,993 | 97 |
| 10. मध्यप्रदेश | 295 | 3,78,000 | 136 | 1,946 | 2,41,000 | 166 |
| 11. महाराष्ट्र | 302 | 6,33,783 | 798 | 715 | 1,80,281 | 126 |
| 12. मणिपूर | 19 | 5,250 | अत्यल्प | - | - | - |
| 13. मेघालय | 27 | 2,708 | 2 | - | - | - |
| 14. नागालँड | 27 | 685 | - | - | - | - |
| 15. ओरिसा | 56 | 26,824 | 8 | 32 | 23,379 | 8 |
| 16. पंजाब | 95 | 9,500 | 711 | - | - | - |
| 17. राजस्थान + | 181 | 1,26,863 | 361 | - | - | - |
| 18. सिक्किम | 6 | 72 | - | - | - | - |
| 19. तामिळनाडू | 195 | 7,90,429 | 462 | 55 | 51,182 | 73 |
| 20. त्रिपूरा | 14 | 2,755 | 7 | - | - | - |
| 21. पश्चिम बंगाल | 269 | 93,871 | 113 | - | - | - |
| 22. अंदमान निकोबार बेटे* | 2 | 43 | - | 30 | 3,476 | 5 |
| 23. अरूणाचल प्रदेश | 3 | 500 | अत्यल्प | - | - | |
| 24. दिल्ली | 14 | 1,317 | - | | - | - |
| 25. मिझोरम | 2 | - | - | - | - | - |
| **एकूण** | **2,692** | **29,15,041** | **4,881** | **5,357** | **10,87,808** | **598** |

टीप :* या खुणेची माहिती 1994-95 या वर्षाची आहे. +या खुणेची माहिती 1993-94 या वर्षाची आहे. ++ या खुणेची माहिती उपलब्ध नाही. स्रोत : तक्ता 1 प्रमाणे.

आढळते. मात्र आपण आर्थिक उलाढालीचा निकष लावला तर हे चित्र बदलते आणि सर्वसाधारण संस्था प्रवर्गात पंजाब तर विशेष संस्था प्रवर्गात गुजराथ ही राज्ये आघाडी दाखवितात. वरिष्ठ पातळीवरील संस्थांची कार्यपातळीची तीव्रता जाणण्यासाठी आर्थिक उलाढाल हाच निकष अधिक संयुक्तिक वाटतो. या निकषाच्या संदर्भात, सर्वसाधारण संस्था प्रवर्गाच्या बाबतीत राज्यांची उतरती क्रमवारी अशी आढळते: पंजाब, हरियाणा, गुजराथ, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र. विशेष संस्था प्रवर्गातील उतरती क्रमवारी पुढीलप्रमाणे होती. गुजराथ, महाराष्ट्र आणि कर्नाटक. या तीनच राज्यांमध्ये विशेष संस्थांचा प्रसार झालेला आहे; इतरत्र त्यांचे अस्तित्व एकतर नगण्य आहे अथवा अभावानेच आढळते.

प्राथमिक सहकारी विपणन संस्थांचे प्रवर्ग आणि राज्यनिहाय विभाजन तक्ता 3 मध्ये दिलेले आहे. तक्ता 2 शी तुलना केल्यास, या तक्त्यात उत्तरप्रदेश आढळत नाही, तथापि गोवा आणि सिक्किम यांचा मात्र प्रवेश झालेला आहे. गोव्यात विशेष संस्था तर सिक्किममध्ये सर्वसाधारण संस्था प्रथमत:च आढळल्या. सर्वसाधारण संस्थांच्या बाबतीत संख्येनुसार बिहार आघाडीवर असून त्यापाठोपाठच्या क्रमवारीत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, राजस्थान आणि गुजराथ आहेत. याउलट, सभासद संख्येच्या बाबतीत मात्र तामीळनाडू आणि महाराष्ट्र यांचे स्थान लक्षणीय स्वरूपाचे आहे. उलाढालीचा संदर्भ घेतल्यास हरियाणा सर्वांत पुढे आहे आणि महाराष्ट्र व पंजाब पाठोपाठ आहेत. विशेष संस्थांच्या प्रवर्गामध्ये संख्या, सभासद आणि उलाढाल या तिन्ही निकषांच्या आधारावर गुजराथ आणि मध्यप्रदेश ही राज्ये आघाडीवर आहेत.

आता वरिष्ठ पातळीवरच्या आणि प्राथमिक सर्वसाधारण तसेच विशेष संस्थांच्या उलाढालीचा एकत्रित निकष वापरुन सहकारी विपणन संस्थांचा विचार केल्यास आंतर-राज्य तुलना करता येईल. त्यादृष्टीने पंजाब आघाडीवर असून त्यानंतरच्या उतरत्या क्रमवारीत हरियाणा, गुजराथ, महाराष्ट्र, तामीळनाडू, कर्नाटक आणि राजस्थान ही राज्ये आढळतात. यातून निघणारा अर्थ म्हणजे, सहकारी विपणनाचे कार्य याच राज्यात बरेचसे सक्रिय आहे; इतर राज्यांत ते मर्यादितच आहे.

**2.3 कार्याचे स्वरुप**

सहकारी विपणन संस्था नेमके काय करतात याचा मागोवा घेणे जरुरीचे आहे. वास्तविक पाहता, सभासद, शेतकऱ्यांचा माल खरेदीदार अथवा अभिकर्ता (agent) या नात्याने गोळा करुन त्या मालाला किफायतशीर किंमत मिळवून देणे हे सहकारी विपणन संस्थाचे मूलभूत कार्य आहे. हे कार्य करीत असतानाच, संस्थेने सभासदांकरिता काही जास्तीच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या तर उत्तमच. यादृष्टीने तक्ता 4 मधील माहितीच्या आधारे सहकारी विपण संस्थांच्या एकंदर कार्याबद्दल काही निष्कर्ष मांडता येतील.

सहकारी विपणन संस्थांच्या एकंदर कार्याचे वर्गीकरण सामान्यत: तीन गटात करता येईल: (1) शेतीमालाचे विपणन, (2) कृषी उत्पादनासाठी बियाणे, खते, कीटकनाशके, यंत्रे, इत्यादी निविष्टींचा रास्त दरात पुरवठा करणे आणि (3) ग्राहकोपयोगी वस्तूंचे वितरण करणे. या संदर्भातील कल (trends) पाहण्यासाठी राज्य विपणन संघ तसेच मध्यवर्ती व प्राथमिक विपणन संस्था यांच्या 1985-86 पासूनच्या एक दशकाच्या माहितीचा आधार घेतलेला आहे. या दोन्ही संस्था गटांच्या बाबतीत एक समान गोष्ट

तक्ता 4

सहकारी विपणन संस्थांच्या कार्याचे स्वरूप

(कोटी रूपये)

| वर्ष | राज्य विपणन संघ | | | | मध्यवर्ती व प्राथमिक विपणन संस्था | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कृषी मालाचे विपणन | कृषी निविष्ठींचा पुरवठा | ग्राहकोपयोगी मालाचे वितरण | एकंदर उलाढाल | कृषी मालाचे विपणन | कृषी निविष्ठींचा पुरवठा | ग्राहकोपयोगी मालाचे वितरण | एकंदर उलाढाल |
| 1985-86 | 980 (42.68) | 978 (42.60) | 338 (14.72) | 2,296 (100.00) | 1,485 (47.14) | 817 (25.94) | 848 (26.92) | 3,150 (100.00) |
| 1986-87 | 1,356 (47.88) | 955 (33.72) | 621 (18.40) | 2,832 (100.00) | 1,563 (48.15) | 814 (25.08) | 869 (26.77) | 3,246 (100.00) |
| 1987-88 | 1,431 (38.80) | 880 (23.86) | 1,377 (37.34) | 3,688 (100.00) | 1,671 (17.50) | 782 (22.23) | 1,065 (30.27) | 3,518 (100.0) |
| 1988-89 | 1,977 (56.16) | 1,011 (28.72) | 532 (15.11) | 3,520 (100.0) | 1,695 (47.56) | 862 (24.19) | 1,007 (28.25) | 3,560 (100.0) |
| 1989-90 | 3,459 (57.14) | 1,144 (18.90) | 1,450 (23.96) | 6,053 (100.00) | 2,436 (52.81) | 1,070 (23.20) | 1,107 (24.00) | 4,613 (100.00) |
| 1990-91 | 3,626 (56.03) | 1,196 (18.48) | 1,650 (25.49) | 6,472 (100.00) | 2,460 (53.44) | 1,089 (23.66) | 1,054 (22.90) | 4,603 (100.00 |
| 1991-92 | 4,411 (57.93) | 1,580 (20.75) | 1,624 (21.33) | 7,615 (100.00) | 4,180 (62.65) | 1,333 (19.98) | 1,159 (17.37) | 6,672 (100.00) |
| 1992-93 | 3,577 (52.89) | 1,703 (25.18) | 1,483 (21.93) | 6,763 (100.00) | 3,518 (56.98) | 1,294 (20.96) | 1,361 (22.05) | 6,173 (100.00) |
| 1993-94 | 2,309 (50.87) | 1,912 (42.18) | 312 (6.88) | 4,533 (100.00) | 3,600 (55.77) | 1,461 (22.63) | 1,394 (21.60) | 6,455 (100.00) |

स्रोत : :National bank for Agricultural & Rural development, statistical tables relating to co-operative movement in India, Part II, Non credit Societies, for the years 1992-93 (June,1996) and 1993-94(January, 1997).

आढळते ती म्हणजे, त्यांची एकंदर उलाढाल वाढत्या कलाची निदर्शक आहे;या दशकाच्या कालखंडातील शेतीमालाच्या आणि इतर वस्तूंच्या किंमतीतील वाढ ध्यानात घेतल्यानंतर देखील हीच स्थिती आढळते. आता तीन गटांचा स्वतंत्रपणे विचार करु. कृषी मालाचे विपणन या गटाचा एकंदर उलाढालीत वरचष्मा आढळतो हे खरे आहे. राज्य विपणन संस्थांच्या बाबतीत,1993-94 मध्ये एकंदर उलाढालीतील त्यांचा हिस्सा मूळच्या (1985-86) 43 टक्क्यांपासून 51 टक्क्यांपर्यंत वाढला. दरम्यानच्या काळात तर तो 58 टक्क्यांपर्यंत पोचला होता. ग्राहकोपयोगी मालाच्या वितरणाच्या टक्केवारीत वाढता कल दिसतो तर कृषी निविष्टी पुरवठ्याच्या बाबतीत घटत्या कलाची प्रवृत्ती आढळते. शेतीमालाच्या विपणनाचा हिस्सा 1987-88 पर्यंत 50 टक्क्यांच्या खाली होता, परंतु 1988-89 पासून पुढे त्याने ही मर्यादा ओलांडली आणि 50 ते 60 टक्क्यांच्या दरम्यान वर खाली होत राहिला. दुसऱ्या बाजूने, मध्यवर्ती व प्राथमिक संस्थांच्या गटात कृषी मालाचे विपणन वाढता कल दर्शवितो, मात्र इतर दोन्ही कार्यांच्या बाबतीत घटता कल स्पष्टपणे आढळतो. या गटातील संस्थांचा शेतीमाल विपणनाचा हिस्सा 1988-89 पर्यंत 50 टक्यांहून कमी होता, परंतु नंतरच्या वर्षांत तो 52 ते 63 टक्यांच्या दरम्यान बदलत राहिला.

### 2.4 व्यापार आणि अभिकर्ता कार्य

सहकारी विपणन संस्था या आपल्या उत्पादक सभासदांचा कृषी माल विकण्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करुन देण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या असतात असे मानले तर, वास्तविक परिस्थितीच्या संदर्भात मात्र दिसून येते की, आपले अंगीकृत उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये या संस्थांनी आखडता हात घेतलेला आहे. आपण व्यष्टीय पातळीवरुन अनेक प्राथमिक विपणन संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला तर कृषीमालविपणनाचे कार्य अजिबात न करणाऱ्या अथवा अत्यल्प प्रमाणात करणाऱ्या बऱ्याच संस्था आढळतील. अखिल भारतीय स्तरावर, जवळपास 40 टक्के विपणन संस्था शेतीमालाचे विपणन कार्य अजिबात करीत नाहीत! कृषी निविष्टींची विक्री तसेच ग्राहकोपयोगी मालाचे वितरण या इतर दोन कार्यात जोखीम (risk) काहीच नसते. उलट, त्यापासून कमिशनच्या रुपाने संस्थांना ठरविलेले निश्चित उत्पन्न मिळत राहते. दुसऱ्या बाजूने, विशेषतः खरेदी-विक्रीचा व्यवहार मोठया जोखमीचा असतो यास्तव विपणन संस्था असा व्यवहार करण्याचे एकतर टाळतात किंवा तो कमीतकमी राहील याची दक्षता घेतात. परिणामी, उत्पादकांचा साहाय्यकर्ता म्हणून त्यांचे कार्य शक्य तेवढे कमी राहते. तक्ता 5 मधील माहितीचा अभ्यास केल्यास या अनुषंगाने अधिक प्रकाश टाकता येईल. यातून निघणारे महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होत:

(1) या संस्थांना सरकार आणि इतर सरकारनिर्मित संस्थांचा अभिकर्ता (agent) म्हणून काम करण्यात अधिक रस आहे;

(2) मालक या नात्याने शेतीमालाची जी खरेदी केली जाते ती सर्व प्रकारच्या मालाच्या एकंदर खरेदीचा अल्पसा हिस्सा असते;

(3) राज्य विपणन संघ आणि प्राथमिक विपणन संस्था यांच्या बाबतीत अभिकर्ता (agent) म्हणून खरेदी केलेला शेतीमाल मालक (owner) म्हणून खरेदी केलेल्या मालापेक्षा जास्त असतो;

(4) मालक म्हणून खरेदी केलेल्या कृषी निविष्टी आणि ग्राहकोपयोगी माल अभिकर्ता म्हणून खरेदी

## तक्ता 5

### सहकारी विपणन संस्थांच्या विपणन कार्याचा तपशील

(कोटी रूपये)

| कार्याचा तपशील | राज्यसंघ | | | मध्यवर्ती संस्था | | | प्राथमिक संस्था | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1991-92 | 1992-93 | 1993-94 | 1991-92 | 1992-93 | 1993-94 | 1991-92 | 1992-93 | 1993-94 |
| (1) मालक म्हणून खरेदी केलेल्या मालाचे मूल्य | | | | | | | | | |
| (अ) कृषी माल | 451 | 903 | 422 | 404 | 285 | 651 | 430 | 433 | 532 |
| (ब) कृषी उत्पादनांच्या निविष्टी | 1,324 | 1,713 | 1,691 | 474 | 241 | 336 | 660 | 920 | 959 |
| (क) ग्राहकोपयोगी वस्तू | 1,473 | 1,223 | 256 | 134 | 117 | 135 | 814 | 689 | 897 |
| (2) प्रापित (Procured) वस्तूंचे मूल्य (शासन आणि शासनाचे अभिकर्ता यांच्या वतीने तसेच वरिष्ठ पातळी वरील विपणन संस्था आणि इतर संस्थांच्या वतीने) | 923 | 334 | 1,455 | 11 | 2 | 2 | 929 | 1,162 | 1,312 |
| (3) अभिकर्ता म्हणून खरेदी केलेल्या मालाचे मूल्य (शासन आणि शासनाचे अभिकर्ता यांच्या वतीने तसेच वरिष्ठ पातळी वरील विपणन संस्था आणि इतर संस्थांच्या वतीने) | | | | | | | | | |
| (अ) कृषी माल | 948 | 783 | 281 | 83 | 119 | 171 | 576 | 802 | 612 |
| (ब) कृषी उत्पादनांच्या निविष्टी | 52 | 6 | 5 | 192 | 167 | 146 | 141 | 72 | 104 |
| (क) ग्राहकोपयोगी वस्तू | 14 | 33 | 27 | 8 | 17 | 40 | 198 | 159 | 161 |

स्रोत : तक्ता 4 प्रमाणे

केलेल्या मालाच्या किंमतीपेक्षा अधिक असतो. कारण अशा तऱ्हेचा व्यापार संस्थेच्या दृष्टीने जोखीमरहित असतो.

**2.5 कार्याचा आवाका**

विपणन संस्थांच्या शेतीमालाच्या वार्षिक उलाढालीच्या आधारावर या संस्था किती मोठ्या आहेत याचा अंदाज घेता येईल. यासाठी तक्ता 6 मधील माहिती पहा.

प्रथमत: महत्त्वाची गोष्ट म्हणजे, 1993-94 या वर्षामध्ये 55 टक्के संस्थांनी शेतीमालाची विपणनक्रिया अजिबात केली नाही; मागच्या वर्षी ही टक्केवारी 60 टक्के होती. या टक्केवारीत मोठा हिस्सा प्राथमिक संस्थांचा होता. सर्वच पातळीवर या संस्था कृषीमालाच्या विपणनासाठी स्थापन झालेल्या आहेत. असे असूनही शक्य तेवढ्या लवकर त्यांनी आपले हे अंगीकृत कार्य सोडून देऊन पूर्णतया कृषी उत्पादनांच्या निविष्टी आणि ग्राहकोपयोगी मालाचे वितरण यावरच लक्ष केन्द्रित केले आहे. यामुळे शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेत शेतीमालाचे विपणनकार्य न करणाऱ्या संस्थांची खूप मोठी संख्या असणे हा या व्यवस्थेच्या दौर्बल्याला कारणीभूत असणाऱ्या प्रमुख घटकांमध्ये या घटकाचे स्थान महत्त्वाचे आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, मध्यवर्ती विपणन संस्थांपैकी 20 टक्के संस्थादेखील अशा 'कार्य-न-करणाऱ्या' संस्थांच्या प्रवर्गात मोडतात!

**तक्ता 6**

**सहकारी विपणन संस्थांनी उलाढाल केलेला शेतीमाल (1993-94)**

| पातळी | संस्थांची एकूण संख्या | शेतीमालाचे विपणन न करणाऱ्या संस्थांची संख्या | शेतीमालाचे विपणन करणाऱ्या संस्थांची संख्या (उलाढालीच्या प्रवर्ग निहाय) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रू. 1 लाख पेक्षा कमी | रू. 1 ते रू. 5 लाख | रू. 5 ते रू. 10 लाख | रू.10 ते रू. 20 लाख | रू.20 लाख पेक्षा अधिक |
| राष्ट्रीय | 1 | - | - | - | - | - | 1 |
| राज्य | 28 (100.00) | 7 (25.00) | - | - | - | - | 21 (75.00) |
| केन्द्रीय | 275 (100.00) | 53 (19.27) | 6 (2.18) | 9 (3.27) | 4 (1.45) | 8 (2.91) | 195 (70.91) |
| प्राथमिक | 7,215 (100.00) | 4,064 (56.33) | 721 (9.99) | 843 (11.68) | 322 (4.46) | 245 (3.40) | 1,020 (14.14) |
| एकूण | 7,519 (100.00) | 4,124 (54.85) | 725 (9.64) | 852 (11.33) | 326 (4.34) | 253 (3.51) | 1,237 (16.45) |

टीप : कंसातील आकडे संस्थांच्या एकूण संख्येशी टक्केवारी दर्शवितात.

स्रोत : National Bank for Agriculture & Rural Development, statistical Tables Relating to the Cooperative Movement in India; 1993-94, Part-II, Non-Credit Societies, Mumbai, January 1997

आता प्रत्यक्ष शेतीमालाच्या विपणनात गुंतलेल्या उर्वरित 45 टक्के प्राथमिक संस्थांचा विचार करु. यासंबंधीचा तपशील तक्ता 6 मधून मिळेल. संबंधित संस्थापैकी 29 टक्के संस्थांनी रु.20 लाखापर्यंतच उलाढाल केली; दुसऱ्या पध्दतीने पाहिल्यास, प्रत्यक्ष शेतीमाल खरेदी करणाऱ्या संस्थांपैकी 63.51 टक्के संस्थांची वार्षिक उलाढाल रु.20 लाखांच्या आतमध्ये होती. प्राथमिक विपणन संस्थांच्या बाबतीत ही एक गंभीर समस्या आहे. अशा प्रकारच्या न्यून उलाढालीची परिणती उत्पन्नाच्या न्यून पातळीत होते एवढेच नव्हे तर अनेकांना आपला संबिंदू (break-even point) गाठता न आल्यामुळे वर्षानुवर्षे तोटा सोसावा लागतो. थोडक्यात, सहकारी विपणन संस्थांची व्यवस्था अंतर्यामीच दुर्बल आहे.

### 2.6 सहकारी विपणनाची अर्थक्षमता (Viability)

वरील निष्कर्षाचा तार्किक अन्वयार्थ एवढाच की, सहकारी विपणन संस्था एकंदरीने सक्षम (Viable) नाहीत. तक्ता 7 मधील आकडेवारी याला पुष्टी देईल.

तोट्यातील संस्थांची संख्या आणि त्यानी सोसलेला तोटा आपल्या निष्कर्षाला बळकटी देईल. किमान 25 टक्के राज्य संघ तोट्यात होते आणि त्यांचा

**तक्ता 7**

**सहकारी विपणन संस्थांची अर्थक्षमता**

| वर्ष | नफा | | तोटा | | नफा/तोटा नसलेल्या संस्थाची संख्या | संस्थांची एकंदर संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थांची संख्या | रक्कम (कोटी रू) | संस्थांची संख्या | रक्कम (कोटी रू.) | | |
| (1) राज्यसंघ | | | | | | |
| 1991-92 | 24 | 98 | 10 (41.66) | 13 | - | 34 |
| 1992-93 | 17 | 113 | 6 (25.00) | 7 | 1 | 24 |
| 1993-94 | 19 | 116 | 7 (25.00) | 7 | 2 | 28 |
| (2) मध्यवर्ती संस्था | | | | | | |
| 1991-92 | 191 | 11 | 226 (46.31) | 21 | 50 | 488 |
| 1992-93 | 108 | 9 | 145 (51.60) | 30 | 28 | 281 |
| 1993-94 | 111 | 10 | 142 (51.63) | 29 | 22 | 275 |
| (3) प्राथमिक संस्था | | | | | | |
| 1991-92 | 3,916 | 21 | 2,240 (26.4) | 26 | 2,299 | 8,455 |
| 1992-93 | 3,630 | 22 | 2,107 (27.2) | 23 | 2,007 | 7,744 |
| 1993-94 | 3,335 | 23 | 2,269 (31.4) | 28 | 1,611 | 7,215 |

टीप : कंसातील आकडे संस्थांच्या एकूण संस्थेशी टक्केवारी दर्शवितात

स्रोत : तक्ता 4 प्रमाणे

संकलित तोटा किमान 7 कोटी रुपये होता साधारणत:27 ते 30 टक्के प्राथमिक संस्था तोट्यात राहिल्या आणि त्यानी जवळपास 28 कोटी रुपये गमावले. सर्वात वाईट स्थिती मध्यवर्ती विपणन संस्थांची होती. जवळपास निम्म्या संस्था तोट्यात चालल्या; त्यांचा तोटा 30 कोटी रुपयांच्या दरम्यान होता. थोडक्यात तोट्यात असलेल्या संस्था सर्वच पातळ्यांवर संख्येने लक्षणीय होत्या; त्यांचा तोटाही बराच जास्त होता. मुळातच कमी उलाढाल असलेल्या आणि मोठ्या संख्येने तोट्यात चाललेल्या सहकारी विपणन संस्थांमुळे त्यांचा वित्तीय पाया ठिसूळच राहिला आहे. त्यातच भर पडली आहे ती त्यांनी सभासदांना दिलेल्या अग्रिम रकमेच्या वाढत्या थकबाकीची, मध्यवर्ती संस्थांची थकबाकी 31 ते 36 टक्क्यांच्या दरम्यान तर प्राथमिक संस्थांची 17 ते 23 टक्क्यांच्या दरम्यान होती.

### 3 भविष्यातील वाटचाल

सहकारी विपणन संस्थांचे जे वास्तववादी चित्र मागच्या भागात रेखाटलेले आहे ते फारसे उत्साहवर्धक नाही. महत्त्वाचे म्हणजे, आपली आकडेवारी जरी 1990 च्या दशकातील काही वर्षांपुरतीच मर्यादित असली तर निष्कर्षांना बाधा येणार नाही. सुमारे सात ते आठ दशकांच्या अस्तित्वानंतरची स्थिती त्यातून प्रतीत होते. पुढच्या आठ-दहा वर्षांच्या कालात त्यामध्ये फार मोठे बदल घडण्याची सुतराम शक्यता नव्हती. बदल हा आकड्यांमध्ये दिसेल आणि वास्तव हे फारसे वेगळे असण्याची शक्यता नाही. कारण, दरम्यानच्या कालखंडात जादूची कांडी फिरुन काही विलक्षण घडलेलेच नाही. म्हणून काढलेले निष्कर्ष आजही फारसे बदललेले आढळणार नाहीत.

आजही आढळणारे वास्तव म्हणजे सहकारी विपणन संस्था या कृषी विपणन कार्यातील प्रभावशाली संस्था म्हणून उभ्या राहिलेल्या नाहीत; त्यानी बहुसंख्य उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या सेवेच्या माध्यमातून मदतीचा हात दिलेलाच नाही. या पार्श्वभूमीवर, आणि एकापरीने निराशाजनक अवस्थेत, या संस्था नवीन आर्थिक धोरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला कसे काय सामोरे जातील? उदारीकरणाच्या नव्या वातावरणात आपल्यालाही आमूलाग्र बदलून नव्या संधीचे लाभ उठवावयाला हवेत याची पुसटशीही जाणीव या संस्थांमध्ये निर्माण झाली आहे असे आशावादी चित्र दिसत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सहकारी विपणन संस्थांना या नव्या वावटळीत टिकून राहावयाचे असेल आणि आपली कामगिरी भविष्यात उंचवावयाची असेल तर त्यांनी आपली संरचना, व्यावसायीकरण, व्यवस्थापकीय, वित्तीय आणि विपणन क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याला पर्याय नाही. ही त्यांच्या अस्तित्वासाठीचीच लढाई असेल.

तसे पाहिले तर नवव्या आणि दहाव्या पंचवार्षिक योजनांमधून कृषी आणि ग्रामीण विकासावर भर दिलेला आहे. परिणामी, या क्षेत्रांसाठी खूप जास्त निधी उपलब्ध झालेला आहे. कृषी उत्पादनाला चालना देणे, कृषी-उद्योगांचा विकास करणे, कृषीमालाची निर्यात वाढविणे आणि या सर्वांमधून ग्रामीण रोजगारात वाढ करुन दारिद्र्याचे प्रमाण घटविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. या धोरणात्मक चौकटीचा सरळसरळ परिणाम सहकारी विपणन व्यवस्थेवर होणार आहे. या संधीचा लाभ सहकारी विपणन संस्थांनी उठविला पाहिजे. हे त्यांना शक्य आहे, परन्तु त्यासाठी त्यांना आपली जुनी वस्त्रे टाकून देऊन नव्या रुपात पुढे यावे लागणार आहे. ते कसे काय?

पहिली गोष्ट म्हणजे, या संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व उत्पादक शेतकऱ्यांचा सक्रिय पाठिंबा मिळवून एक बळकट आणि बलाढ्य संस्था म्हणून पुढे यायला पाहिजे. याकरिता त्यांनी सभासद वाढविण्याची जोरदार मोहीम चालवून जास्तीत जास्त उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या कवेत घेतले पाहिजे. असे केल्याने त्यांना बऱ्याच अंशी सबळ संस्थात्मक अधिष्ठान लाभेल या संदर्भात कटाक्षाने पाळावयाची बाब म्हणजे संस्थेत सत्तास्थान मिळविण्याच्या लोभापाई खुल्या सभासदत्वाचे सहकाराचे मूलभूत तत्त्व पायदळी तुडविले जाणार नाही. कारण, सहकारी संस्था या लोकांच्या संस्था असतात, त्यामुळे समान हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्यासाठी निर्माण केलेल्या व्यवस्थेमध्ये प्रवेश नाकारणे संयुक्तिक होणार नाही. जेवढ्या जास्त संख्येने उत्पादक शेतकरी सहकारी विपणन संस्थेत सहभागी होतील तेवढी ती संस्था आणि एकंदर सहकारी विपणन व्यवस्था बळकट होण्याला मदत होईल.

सभासद वाढीची मोहीम हे पहिले पाऊल. त्यापाठोपाठ विपणनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकडे लक्ष द्यावयाला हवे, कारण शेतीमालाच्या विपणन सेवा उपलब्ध करुन देणे हे सहकारी विपणन संस्थांचे आद्य कर्तव्य आहे. या संस्थांनी खाजगी व्यापाऱ्यांपेक्षाही अधिक चांगल्या पध्दतीने प्रतवारी व प्रमाणीकरण, साठवण, वाहतूक, बाजाराची माहिती, वित्तीय साहाय्य, इत्यादी सेवा उत्पादक शेतकऱ्यांना पुरविण्यासाठी धडपड केली पाहिजे. उत्पादक- व्यापारी यांच्यातील परंपरागत दुवा तोडावयाचा असेल तर विपणन संस्थांनी आपल्या सभासद शेतकऱ्यांना शेतीमाल उत्पादनाच्या काळात वित्तपुरवठा केला पाहिजे. सभासदांनी त्यांचा शेतीमाल पूर्णतया विपणन संस्थेच्या माध्यमातूनच विकला पाहिजे असे बंधन मात्र त्यांच्यावर असावे. विपणन संस्था या सर्व सेवा कितपत कार्यक्षमतेने पुरवितील यावर उत्पादक शेतकऱ्यांचा त्यांना मिळणारा प्रतिसाद अवलंबून असेल. विपणन संस्थांनी ध्यानात ठेवावे की त्यांना उत्पादक शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांच्या मगरमिठीतून आपल्याकडे खेचून घ्यावयाचे आहे आणि नंतर त्यांच्याशी स्पर्धा करावयाची आहे. आता तर व्यापारी वर्ग हा फक्त एतद्देशीय नसेल, तर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रुपाने विदेशीही असेल. अशा बलाढ्य व्यापाऱ्याला यशस्वीपणे तोंड देण्यासाठी सहकारी विपणन संस्थांनीही आकाराने मोठे झाले पाहिजे.

स्वत:ची शक्ती वाढविण्यासाठी सहकारी विपणन संस्थांनी लहान आणि अत्यल्प शेतकऱ्यांचा शेतीमाल संकलित करण्याची एक स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावयाला हवी. हे सभासद शेतकरी अनेक गावांतून विखुरले गेलेले आहेत. म्हणून त्यांनी आपल्या वाहनांमधून गावागावातील थोडाथोडा माल गोळा करावयाला हवा. त्यासाठी वाहने स्वत:च्या मालकीचीच असावीत असे नाही, भाड्यानेही घेता येतील. शेतीमालाचे संकलन करताना उत्पादकांच्या इच्छेनुसार तो विपणन संस्थेने सरळसरळ खरेदी करावा अथवा कमिशनवर घ्यावा. पर्याय म्हणून विपणन संस्था आपल्या कार्यक्षेत्रातील महत्त्वाच्या खेड्यांमध्ये संकलन केन्द्रे उघडू शकतील आणि सभासदांनी आपला माल त्या केंद्रावर संस्थेकडे सुपूर्द करावा. संस्था स्वखर्चाने तो माल आपल्या मुख्य कार्यालयात आणेल आणि त्यापुढील कार्यवाही करील. मालाची प्रतवारी व प्रमाणीकरण करुन तो चांगल्या रीतीने आवेष्टित करुन विपणन संस्था प्राप्ति सर्व माल अथवा त्याचा भाग योग्य वेळी बाजारात आणील जेणेकरुन त्या मालाला चांगली किंमत मिळेल. बहुतेक वेळा संस्थेला असा संकलित

केलेला प्रमाणित शेतीमाल जवळच्याच बाजार आवारात नेता येईल. सद्य:स्थितीत, बाजार आवारातील एकंदर आवकेमध्ये विपणन संस्थामार्फत आवक होणाऱ्या काही शेतीमालांचा हिस्सा 10 ते 20 टक्क्यांच्या दरम्यान आहे. हा हिस्सा वाढायला हवा. तो लक्षणीय झाला तर विपणन संस्था शेतीमालांच्या पुरवठ्यावर बरेच नियंत्रण मिळवून स्वत:ची बाजारातील शक्ती निर्माण करु शकतील आणि व्यापाऱ्यांना एक प्रभावी पर्याय म्हणून पुढे येतील. थोडक्यात, विपणन संस्थांनी व्यापाऱ्यांना स्पर्धक म्हणून आपली प्रतिमा निर्माण करावयाला हवी.

जर एखाद्या शेतीमालावर विक्रीपूर्वी प्रक्रिया करण्याची गरज असेल तर सहकारी विपणन संस्थेने स्वत: अथवा एखाद्या प्रक्रिया संस्थेच्या सहकार्याने ही सेवा पुरवावी. इथे बाह्य संस्थेकडून प्रक्रिया करुन घेण्याचा पर्याय अधिक सोईचा आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होऊ शकेल. अशी प्रक्रिया संस्था खाजगी, सहकारी किंवा सरकारी क्षेत्रापैकी कोणतीही असली तरी चालेल. सारांश, उत्पादक शेतकऱ्याच्या दृष्टीने विपणन संस्थेकडून मिळणाऱ्या सेवा म्हणजे विपणन सेवांचे एकत्रीकरण असावे आणि सर्व सेवा सहजगत्या मिळाव्यात.

संकलित केलेला शेतीमाल दूरच्या बाजारांमध्ये विकण्याच्या बाबतीत सहकारी विपणन संस्थांना स्वत:ची विक्रीव्यवस्था निर्माण करण्यात अडचणी येण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत या संस्थांनी त्या त्या मोठ्या बाजारातील विश्वासार्ह खाजगी व्यापाऱ्यांची साखळी निर्माण करण्याची शक्यता अजमावावी. अशा तऱ्हेचा यशस्वी प्रयोग महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब आणि बोरे उत्पादन करणाऱ्या उत्पादक शेतकऱ्यांनी केलेला आहे. तो प्रयोग समाधानकारकपणे गेली 15-20 वर्षे चालू आहे. दुसरा प्रयोग महाराष्ट्रातील द्राक्ष बागायतदारांचा. त्यांनी एकत्रितपणे स्वत:ची 'महाग्रेप' नावाची संघटना स्थापन करुन त्या माध्यमातून देशात आणि देशाबाहेर द्राक्ष विक्रीची व्यवस्था निर्माण केली आहे. सहकारी विपणन संस्थांनी गरजेनुसार असे प्रयोग करावयाला हवेत.

सारांशाने, आपण मोठ्या प्रमाणावर कार्य करणाऱ्या सहकारी विपणन संस्थेचे चित्र रेखाटतो आहे. वास्तव, आज ज्या बऱ्याच प्राथमिक विपणन संस्था मृतवत आहे त्या एक तर अवसायानात (liquidation) काढाव्यात अथवा शक्यतेप्रमाणे त्या सम्मीलित कराव्यात (merger). ही विपणन संस्थांच्या सुसूत्रीकरणाची(rationalisation) प्रक्रिया असेल. या प्रक्रियेतून राहिलेल्या उर्वरित संस्थांनी मोठा आकार धारण करण्यासाठी धडपडले पाहिजे, सक्षम झाले पाहिजे. या प्रक्रियेमुळे उत्पादक शेतकऱ्यांचे काहीच नुकसान होणार नाही. उलट, ते कार्यरत नसलेल्या अथवा अयोग्य पध्दतीने कार्य करणाऱ्या संस्थेचे सभासद न राहता एखाद्या सक्षम संस्थेचे सभासद राहतील; यात त्यांचाच फायदा असेल. या सम्मीलनाच्या प्रक्रियेतून केवळ सक्षम अशा मोठ्या आकाराच्याच सहकारी विपणन संस्था अस्तित्वात येतील.

एकदा अस्तित्वातील विपणन संस्थांचे याप्रकारे पुनर्घटन झाले की, पुढचे पाऊल म्हणून, सर्व विपणन संस्थांना, आपले अंगीकृत कार्य म्हणून, शेतीमालाच्या विपणनावर लक्ष केन्द्रित करणे भाग पडेल. अशा संस्थांमध्ये जबाबदारीच्या जागांवर काम करणाऱ्या सहकारी कार्यकर्त्यांना आपला दृष्टिकोन बदलावा लागेल. कृषी उत्पादनांच्या निविष्टींचा पुरवठा करणे आणि ग्राहकोपयोगी वस्तूंचे वितरण करणे ही विपणन संस्थांची दुय्यम स्वरुपाची कामे राहावीत; त्यांचे प्रमाण थोडके असावे. ही कामे

उत्पन्नाची प्रमुख साधने होऊ नयेत. निविष्टींच्या पुरवठ्यात सध्या खतांच्या विक्रीवर सर्वात अधिक भर आहे. अपेक्षा आहे की कृषी मालाची खरेदी/प्रापण आणि विक्री हीच सहकारी विपणन संस्थेची प्रमुख कार्ये राहावीत. त्यामध्ये देखील शेतीमालांच्या खरेदीपेक्षा प्रापण (procurement) कार्यावर अधिक लक्ष देणे उचित होईल. कारण, अशा व्यवहारांत संस्थेवरील आर्थिक जोखीम कमीत कमी असते. वास्तव या संस्थांनी सभासदांचे अभिकर्ता (agent)म्हणून काम करणेच बरे होईल. काही विशेष परिस्थितीतच विपणन संस्थांनी सभासदाचा माल खरेदी करावा आणि कालांतराने योग्य दराने त्याची विक्री करावी. अशा प्रकारच्या खरेदी-विक्री व्यापारात जोखीम पत्करण्याचे धाडस करावे लागते. म्हणून विपणन संस्थांच्या एकंदर उलाढालीत अशा व्यवहारांचे प्रमाण कमीत कमी असावे. सहकारी संस्थांना नफ्यापेक्षा सेवा अधिक महत्त्वाची असते. एवढ्याचसाठी जास्तीत जास्त उलाढाल अभिकर्त्याच्या भूमिकेतून केल्यास ती सेवा सहकाराच्या चौकटीत चपखल बसते.

सहकारी विपणन संस्थांना मोठ्या आकाराच्या बनविण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या धुरंधरांना आपला दृष्टिकोनच बदलावा लागणार आहे. हे घडण्यासाठी त्याना प्रशासकीय व्यवस्थादेखील आमूलाग्र बदलावी लागेल. या संस्थांमध्ये शासनाने भाग भांडवल रुपाने निधी गुंतविला असला तरी त्यांच्या नियामक मंडळावर शासनाचा प्रतिनिधी असण्याची गरज नाही. कारण एवढेच की, शासन नियुक्त प्रतिनिधींना व्यापारी दृष्टिकोन कधीच नसतो अथवा ते संबंधित मालाच्या व्यापारातील तज्ज्ञही नसतात. दुसरे, व्यवस्थापनाचा नेता आणि कार्यवाह हे दोघेही संबंधित विपणन संस्थेचे नोकर असून व्यवस्थापन कार्यातील तज्ज्ञ असावेत. अनेकदा 'व्यावसायिक व्यवस्थापक' (Professional Managers) या शब्दांचा चुकीचा अर्थ लावून अशी माणसे म्हणजे व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रमाचे पदवीधर असे गृहीत धरले जाते. आपल्या संदर्भात औपचारिक शिक्षण ही बाब महत्त्वाची नसून संबंधित व्यक्तीचे कौशल्य, बुध्दीमत्ता आणि शेतीमालांची उलाढाल चांगल्या रीतीने हाताळण्याची क्षमता या गुणांना अधिक महत्त्व आहे. तेव्हा अशा पदांवर व्यक्तींची नेमणूक करतांना भविष्यात योग्य ती काळजी घेतली पाहिजे. तथापि, जोपर्यंत जुनी माणसे संस्थेच्या सेवेत असतील तोपर्यंत त्यांच्या कौशल्यवाढीसाठी खास प्रशिक्षणाची व्यवस्था वेळोवेळी करावी लागेल.

जर सहकारी विपणनाच्या कार्यात संस्थेला व्यवसायाभिमुख बनविण्यासाठी तिच्या व्यवस्थापन कार्यात सुधारणा केली तर संस्थांना यथाकाल आधुनिक व्यवस्थापनाचा अवलंब करता येईल. त्यांची वित्तीय बैठक पक्की करण्यासाठी त्यांना आता भांडवल बाजारात उतरावयाला मोकळीक द्यावयाला हवी. त्यामुळे कमी परिव्ययात(cost) त्याना आपली वित्तीय गरज भागविणे शक्य होईल. परिणामी, शासनाच्या वित्तीय साहाय्याच्या कुबड्यांवर जगण्याची परंपरागत पध्दती सोडून दिली जाईल. एकदा का स्वतःची पत वापरुन वित्तीय गरज भागविली जाऊ लागली की आपोआपच त्या पैशाचा दुरुपयोग होणार नाही याबद्दल संस्था सजग राहील.

हे सारे बदल घडवितांना त्याचबरोबर विपणन संस्थांना देशात आणि देशाबाहेर खुल्या स्पर्धेला परिणामकारकपणे तोंड देण्यासाठी आपल्या विपणन नीतीमध्ये आणि पध्दतीमध्ये बरेच काही बदल करावे लागतील. शेतीमालाचा दर्जा आणि त्यांचे आवेष्टन चांगले राहील याची सतत खातरजमा करुन घेतली पाहिजे. सध्या फळांच्या विपणनकार्यात हे घडते आहे. एका छापाच्या नावाने (brand name) सर्व उत्पादकांच्या मालाची विक्री होते. अशा तऱ्हेने

वेगवेगळ्या शेतीमालांसाठी छापाची नावे निर्माण करावी लागतील. पुढचे पाऊल म्हणून अशा उत्पादनांना आयएसओ यासारखी आंतरराष्ट्रीय दर्जा दाखविणारी मानकेही मिळविण्याचा प्रयत्न व्हावा. अशा मान्यतेमुळे आपल्या मालाचा जगाच्या बाजारात चांगलाच प्रभाव पडतो. शेतीमालाला आता वाढत्या प्रमाणात जगाच्या बाजारात शिरकाव करण्याची संधी मिळाली आहे तिचा शेतकऱ्यांच्या भल्यासाठी उपयोग व्हावयाचा असेल तर सहकारी विपणन संस्थांना नवा दृष्टिकोन स्वीकारुनच कार्यरत राहावे लागेल.

शेवटी, सहकारी विपणन संस्थांच्या भविष्यकालीन अस्तित्वासाठी काही सूचना इथे मांडल्या असल्या तरी त्या संदर्भात असे गृहीत धरले आहे की, या बदलांशी संबंधित असणारे कायदेकानूही योग्य पध्दतीने बदलले जातील; तसे न झाल्यास प्रचलित तरतुदी या बदलांच्या मार्गातील धोंड ठरण्याचा संभव आहे. सहकारी विपणन संस्थांनी आता मुक्तपणे संचार करुन आपली बाजारातील शक्ती दाखवून दिली पाहिजे. यासाठी वैधानिक बदलांचे महत्त्व आहे.

सारांशरुपाने, भारतातील सध्याची सहकारी विपणन व्यवस्था उत्पादक शेतकऱ्यांना विपणन सेवा पुरविण्याच्या बाबतीत दुर्बल, अकार्यदक्ष आणि परिणामशून्य आहे, याबद्दल दुमत असू नये. असे असले तरी या व्यवस्थेकडे दुर्लक्ष होता कामा नये अथवा तिला एकदम खुल्या स्पर्धेच्या तोंडाशी देऊनही चालणार नाही. सहकारी विपणन संस्था ही व्यवस्था भारताच्या कृषी क्षेत्रात दीर्घकाळ अस्तित्वात असून आजही तिच्यासाठी अधिक चांगली पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. नव्याने एखादी पर्यायी व्यवस्था उभी करण्याचा अव्यापारेषु व्यापार करण्याऐवजी याच प्रस्थापित व्यवस्थेत नवा जीव ओतून तिलाच पूर्णतया सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करणे कमी कष्टाचे होईल. आपल्याला गरज आहे ती मोठ्या आकाराची, शेतीमालांच्या विपणनाच्या विविध गरजा भागविणारी आणि शेतीमालाच्या विपणनाकरिता नवीन आणि अधिक शास्त्रशुध्द वित्तीय, व्यवस्थापकीय आणि विपणनविषयक पध्दतींचा अनुनय करणारी सहकारी विपणन व्यवस्थेच्या नव्या रचनेची. त्यासाठी सर्व संबंधितानी कंबर कसली पाहिजे.

## संदर्भ सूची


1. D' Mello, Sandhya(1997), 'The White Elephant of the White Revolution', The Economic Times, 6 October, 1997. P.10.

2. Doshi, R.R. (1990), 'Agricultural Marketing System in Maharashtra,' Arthasamwad, January-March, 1990, Vol. 13, No.4.

3. Indian Society of Agricultural Economics, Indian Journal of Agricultural Economics, January-March, 1997, Vol.52, No.1, Mumbai.

4. NABARD, Important Items of Data: Credit and Non-Credit Cooperative Societies, 1994-95(June, 1996), and 1995-96(July, 1997),Mumbai.

5. NABARD,Statistical Tables Relating to the Cooperative Movement in India, 1992-93, Part-II, Non-Credit Societies, Mumbai, June, 1996 and 1993-94, January, 1997.


●●●

चर्चा

# संघटित स्पर्धा की संघटित सहकार?

● श्रीनिवास खांदेवाले, नागपूर.
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद व मानद संचालक, रुईकर इन्स्टिट्यूट ऑफ लेबर अँड सोशिओ कल्चरल स्टडीज, नागपूर.*

धनंजयराव गाडगीळ जन्म शताब्दीच्या निमित्ताने स.ह.देशपांडे ह्यांनी 'गाडगीळ यांचे सहकारी लोकराज्य' हा समीक्षात्मक लेख लिहिला (अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर 2000 पृ.119-130) त्यात देशपांडेंनी सहकारी संस्था, गाडगीळांना अभिप्रेत असलेले सहकारी लोकराज्य, सहकार-सरकार सबंध, नैतिकता इत्यादींचे टीकात्मक परीक्षण केले आहे. ते विचारांना चालना देणारे आहे. म्हणून हे प्रस्तुत टिपण. ह्या प्रतिसादात्मक टिपणास काही अपरिहार्य कारणांमुळे उशीर झाला. परंतु चर्चेच्या विषयाचे स्वरूप व महत्त्व सर्वकालिक असल्याने हा उशीर जाणवणार नाही. प्रस्तुत टिपणात देशपांडेंच्या मतांचे प्रामुख्याने परीक्षण आहे. त्या अनुषंगाने गाडगीळांच्या मतांची काही प्रमाणात पुष्टि होत असली तरी मूळ हेतू गाडगीळांच्या मतांचे समर्थन करणे हा नाही. वाचकांना मात्र संदर्भ म्हणून स.ह.देशपांडेंचा लेख पुन्हा वाचावा लागेल ह्या तसदीबद्दल क्षमस्व. गाडगीळांच्या लिखाणातील जेवढ्या मुद्यांचा उल्लेख देशपांडेंच्या लेखात आला आहे तेवढ्याच मुद्यांचा उपयोग प्रस्तुत लेखकाने ह्या लेखात केला आहे.

देशपांडेंचे मुख्य प्रतिपादन असे आहे की "गाडगीळांचे सहकारी लोकराज्याचे चित्र पाहिले तर असे लक्षात येईल की, शेती आणि लहान उद्योगधंदे यांचे क्षेत्र सहकारी कक्षेत आले तरी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा एक लहान हिस्साच त्याने व्यापला जाईल आणि इतर क्षेत्र प्रत्यक्ष सरकारी नियंत्रणाखाली किंवा मालकीखाली आणि व्यवस्थापनाखाली असेल.... म्हणजेच गाडगीळांची अर्थव्यवस्था समाजवादी म्हटली नाही तरी बहुतांशी राज्यसंस्थावादी (Statist) असेल (तिच्यात नोकरशहांचे वर्चस्व असेल आणि अर्थातच भ्रष्टाचारही असेल.... स्पर्धेचे अपव्यय (Wastes of competition) असतात हे अमान्य करण्याचे कारण नाही परंतु प्रश्न सापेक्ष कार्यदक्षतेचा आणि विकासगामी अर्थव्यवस्थेचा आहे. स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या विकृती टाळीत आपल्याला पुढील वाटचाल करावयाची आहे. राज्यवादी प्रतिमान घ्यावयाचे की स्पर्धाशील बाजाराचे याचा निर्णय आज आपल्या देशाने बाजाराच्या बाजूने

जवळजवळ घेतल्यासारखाच आहे.'' पुढच्याच वाक्यात ते म्हणतात की ''.. आपण जरी आज नव्या मार्गावर प्रस्थान टाकले असले तरी नवे आर्थिक धोरण ही एक अंशत: अपरिहार्यता आणि अंशत: एक नवी वाट म्हणून स्वीकारल्याचे दिसते. तिचा मूलगामी आणि सर्वांगीण विचार होत असल्याचे दिसत नाही. तसा करताना गाडगीळांनी दाखविलेली विरोधी बाजू आणि पुढे केलेले अर्थव्यवस्थेचे प्रतिमानही लक्षात घ्यावी लागतील.'' असा चर्चेचा मार्ग जरी त्यांनी खुला ठेवला असला तरी स्पर्धेच्या विकृती टाळत पुढे जाण्याचे म्हटले आहे, सहकारातील विकृती टाळत पुढे जाण्याचे म्हटले नाही हे अधोरेखित व्हावे.

## स्पर्धा, एकाधिकार

ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांनी स्पर्धेचे जे परिपूर्ण (perfect) स्वरुप सिध्दान्तात मांडले ते तात्विक प्रयोगशाळेतील असते व एखाद्या देशातील किंवा आज जगातील प्रत्यक्ष परिस्थिती कशी आहे ते तपासून पाहण्यासाठीच तिचा उपयोग होऊ शकतो हे जरी मान्य असले तरी बाजाराची जी इतर प्रतिमाने मांडली गेली आहेत( उदाहरणार्थ, एकाधिकारवादी स्पर्धा (Monopolistic competition), अल्पजनाधिकार (Oligopoly) व्दयाधिकार (Duopoly)ती क्रमाने घटती स्पर्धा दर्शवितात. हे नोंदविणे आवश्यक आहे. पूर्वी बाजाराची मूळ स्थिती विशुध्द किंवा परिपूर्ण स्पर्धेसारखी असते असे गृहित धरुन त्यानुसार वस्तु उत्पादन परिमाण, उत्पादन संस्थेचा आकार, विक्रीव्यय, किंमत, नफ्याचे प्रमाण एकूण अर्थव्यवस्थेची संरचना व त्यावर आधारित समाजरचना, आदर्शवत् असते असे मानण्याकडे कल होता. त्या आधारावर स्पर्धेच्या प्रतिमानाला नैतिकतेची झालर होती. त्या प्रतिमानातील निष्कर्षापेक्षा वेगळी वास्तविक स्थिती असल्यास त्याचे कारण कुठल्यातरी घटकामुळे निर्माण झालेली बाजार अपरिपूर्णता (Market Imperfection) आहे आणि ती अपरिपूर्णता आर्थिक धोरणाव्दारे दूर झाल्यास त्या अर्थव्यवस्थेची स्थिती परिपूर्णतेकडे जाईल अशी विश्लेषणाची सामान्य पध्दती होती. 1929 च्या महामंदीपर्यंत तसा अर्थशास्त्रज्ञांचा विश्वासही होता. पण प्रत्यक्षात मूळस्थिती परिपूर्ण स्पर्धा असते का ह्या शंकेतून व नसते ह्या अनुभवातून, देशपांडे ज्यांचा उल्लेख करतात ती, नवी बाजार प्रतिमाने विकसित झाली. काही पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ असेही मत मांडू लागले की मूळ स्थिती एकाधिकाराचीच असते व जिथे, जेवढ्या प्रमाणात एकाधिकार प्रस्थापित होत नाही तिथे, तेवढ्या प्रमाणात स्पर्धा आढळते. हे मत सुध्दा एका टोकाचे आहे असे मानले तरी तात्विक प्रश्न असा उरतोच की नव्या आर्थिक धोरणानंतर भारतात निर्माण झालेल्या बाजाराचे प्रतिमान कोणते? एकाधिकारी स्पर्धेचे, अल्पजनाधिकाराचे, द्वयाधिकाराचे की एकाधिकाराचे? विशाल उत्पादनमानाचे नव्याने विकसित झालेले स्वयंचलित तंत्रज्ञान व त्याच्या यशस्वी कार्याकरिता लागणारे प्रचंड वित्तीय भांडवल हे ज्यांना उपलब्ध होते, ज्यांच्या नियंत्रणाखाली ते कार्य करते, त्यांचा अल्पजनाधिकार त्यावर असतो व तो व्दयाधिकार/एकाधिकार ह्या प्रतिमानांकडे झुकतो आहे असे म्हटल्यास ते यथार्थ ठरावे. ज्या कंपन्या बहुराष्ट्रीय व्यवहार करतात त्या वैश्विक अल्पजनाधिकार/द्वयाधिकार/एकाधिकार प्रतिमानाकडे प्रवास करीत आहेत हे जागतिकीकरणासंबंधीची आता उपलब्ध असलेली असंख्य पुस्तके, अहवाल इत्यादींमधील आकडेवारीवरुन सहज अनुभवता येते. भारतातील रिलायन्स कंपनी व अमेरिकेतील मायक्रोसॉफ्ट कंपनी

ह्यांच्या उदाहरणावरुन हे स्पष्ट होईल. विश्व व्यापार संघटनाच्या नियमान्तर्गत बहुपक्षी मुक्त व्यापार प्रणाली चालावी ह्याचा आग्रह धरणारे अमेरिका व युरोपीय देशच व्दिपक्षी करार व मुक्त व्यापाराचे आपसातील करार (Free Trade Agreements-FTAs) निर्माण करुन जागतिक व्यापारातही अल्पजनाधिकार/द्वयाधिकार/एकाधिकार सदृश स्थिती निर्माण करीत आहेत. एवढेच नव्हे तर क्रीडा सामग्री, पिण्याचे बाटलीबंद पाणी व रोजच्या वापरातील बॅगा सुध्दा त्या विशाल उत्पादनमानाच्या तंत्रज्ञानाने निर्माण करुन जगातील बाजारांवर कब्जा करण्याची रस्सीखेच आपण रोजच पाहू शकतो. ह्या नव्या स्थितीचे समर्थन करण्यासाठी असे म्हटले जात आहे की प्रत्यक्षात स्पर्धा नसली तरी चालेल, स्पर्धासदृश स्थिती (Competitiveness if not competition) असावी किंवा स्पर्धेचा कायदा (Competition Law) प्रत्येक देशाने पारित करुन (जसे मायक्रोसॉफ्टच्या बाबतीत अमेरिकेत घडत आहे तसे) निदान कायद्याच्या लेखी अवाढव्य कंपन्या तोडाव्या, त्यांचे विभाग करावे व त्यातून स्पर्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. नव्या तंत्रज्ञानावर आधारलेली उत्पादन क्षेत्रे ही राष्ट्रीय (व जागतिक) उत्पन्नाचा मोठा अंश निर्माण करीत आहेत. त्या क्षेत्रांच्या तांत्रिक एकाधिकारी प्रवृत्तीला प्रतिबंध बसावा म्हणून तिथे कायद्याच्या मदतीने स्पर्धा निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थांची जी नियंत्रक शिखरे (Commanding Heights)आहेत ती एकाधिकाराकडे झुकणारी आहेत हे मान्य करण्यात फारशी अडचण येऊ नये. अशा आर्थिक स्थितीतून समाजातील रोजगार, उत्पन्न वितरण, शिक्षण, साहित्य व्यवहार, संस्कृती इत्यादी सर्वांचा एक नवा घाट (Mould) तयार होत आहे असे अनुभवास येत आहे. गाडगीळांनी (त्या काळात) स्पर्धेचे जे दुष्परिणाम दाखविले होते त्यावर देशपांडे ह्यांचा अभिप्राय असा आहे की "पण तिच्या (म्हणजे स्पर्धेच्या) अंतर्गत असलेली गतीशीलता, स्वार्थसाधनातून प्राप्त होणारी जोरकस विकास प्रेरणा, व्यक्तिस्वातंत्र्यातून बहरणारे सर्वगामी कर्तृत्व यांची ते दखल घेत नाहीत." विचार करण्यासारखा मुद्दा असा की आपल्या देशातील व जगातीलही उत्पन्न विभाजनाची स्थिती व त्यात होणारे बदल लक्षात घेतले तर आणि चालक शक्ती (Driving-Force)एकाधिकाराकडे झुकत आहे हे मान्य केले तर स्पर्धेचे वर उल्लेखित गुण किती टक्के लोकसंख्येला लागू पडतात? देशपांडे स्वतः म्हणतात ते पुन्हा उधृत करण्याइतके खरे आहे की नव्या आर्थिक धोरणाची जी वाट आपण स्वीकारली " तिचा मुलगामी व सर्वांगीण विचार होत असल्याचे दिसत नाही. तसा करताना गाडगीळांनी दाखविलेली विरोधी बाजू आणि पुढे केलेले आर्थिक प्रतिमानही लक्षात घ्यावे लागेल.

आज अर्थव्यवस्थेचा घाट किंवा संरचना स्पर्धेची नाही. म्हणून तिला नुसतीच बाजार अर्थव्यवस्था (Market Economy) असे म्हटले जाते. मतितार्थ असा की त्यातून ज्याला जसा अर्थ काढावयाचा असेल तसा त्याने काढावा. अशा अर्थव्यवस्थेत राज्यसंस्था नियंत्रण करणार नाही किंवा करीत नाही हे दर्शविण्यासाठी तिला 'मुक्त' हे विशेषण जोडून 'मुक्त बाजार व्यवस्था' (Free Market Economy) असे म्हटले जाते. अशी अर्थव्यवस्था म्हणजे नेमकी कशी (स्पर्धात्मक, अल्पजनाधिकारी की एकाधिकारी) असते असा प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर असे असेल की जशी आहे तशी. ह्याचे उत्तम उदाहरण नुकतेच (7-1-2005) घडले. सध्या साखरेचे भाव अचानक खूप वाढलेले आहेत. कृत्रिम

टंचाई निर्माण केली गेली आहे असे वृत्त आहे. दूरचित्रवाणी मुलाखतीत पत्रकारांनी केंद्रीय वित्तमंत्र्यांना विचारले की ह्यावर तुम्ही काय उपाययोजना करणार, तेव्हा ते म्हणाले की ''मी काही नियामक नाही'' (I am not the Regulator). आणि त्याच दिवशी महाराष्ट्रातील महिलांच्या सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांचा (महिला अध्यक्ष म्हणून) सत्कार केला असतांना त्या सरळ म्हणाल्या की आजच्या एवढ्या किंमती असल्यास कोणताच साखर कारखाना तोट्यात जाणार नाही. सारांश, निर्माण होणाऱ्या परिस्थितीस जबाबदार कोण, उपाययोजना कोणी करावी, कशी असावी ह्याबद्दलच्या मुक्त बाजारातील आगामी गोंधळाच्या स्थितीचे हे केवळ एक उदाहरण आहे. ह्या व सर्व क्षेत्रांतील अशा स्थितीला आपण 'गतीशील' विकासगामी' असे आर्थिक-सामाजिक प्रतिमान समजावयाचे का हा महत्त्वाचा तात्विक मुद्दा आहे.

भारतासंबंधी प्रकाशित झालेल्या आकडेवारीने असे दर्शविले आहे की 1983 ते 1997 ह्या दरम्यान झालेल्या विकासातून तळाच्या 20 % लोकसंख्येचा एकूण राष्ट्रीय उत्पन्न किंवा उपभोग खर्च ह्यातील हिस्सा सुमारे 8.1% राहिला. मात्र सगळ्यात वरच्या 20 % जनसंखेचा हिस्सा 41.4 % पासून 46.1 % पर्यंत वाढला. सगळ्यात वरच्या 10 % जनसंख्येचा हिस्सा तर त्याहून अधिक 26.7 % पासून 33.5 % पर्यंत वाढला. 20 % च्या गटानुसार एकूण लोकसंख्येचे विभाजन केल्यास मधल्या तीन थरांचा हिस्सा कमी होऊन सर्वोच्च गटाचा वाढला. सारांश, गरीब गरीबच राहिलेत. आणि मध्यम वर्गीयांचा हिस्सा थोडा कमी होऊन श्रीमंत अधिक श्रीमंत झाले. विशेष म्हणजे ह्या 14 वर्षांच्या आकडेवारीपैकी विषमता वाढविणारे बदल 1990-97 या नव्या आर्थिक धोरणाच्या काळात घडून आले. नवे आर्थिक धोरण अंमलात आल्यापासून बेरोजगारी वाढली, विषमता वाढली, देशाच्या तेलासारख्या मुलभूत संसाधनांवरील खाजगी मालकीचे केंद्रीकरण वाढले आणि सामान्य माणसाच्या बाबतीत संविधानातील आर्थिक मार्गदर्शक तत्त्वांकडे सरळ दुर्लक्ष होत आहे. ह्या आर्थिक विकासाच्या प्रवाहाला जशी गती आहे तशी दिशा सुध्दा आहे व ती स्पर्धेच्या विकेंद्रीकरणा ऐवजी केंद्रीकरणाकडे (अल्पजनाधिकाराकडे) जात आहे. मग विकास होत असूनही बहुजनाधिकाराचे काय होत आहे? येथे आर्थिक विकासाच्या नैतिकतेचा प्रश्न निर्माण होतो.

### आर्थिक विकास व नैतिकता

ह्या लेखाच्या सुरुवातीस गाडगीळांच्या सहकारी लोकराज्य संकल्पनेस देशपांडे ह्यांनी राज्यव्यवस्थावादी, नोकरशहांचे वर्चस्व असलेली आणि ''अर्थातच भ्रष्टाचार'' असलेली असे संबोधिले त्याचा उल्लेख आला आहे. त्यांचे ते मत आपण ग्राह्य मानून फक्त एवढे मान्य करु या की भ्रष्टाचार हा सर्वच क्षेत्रात आहे. उदाहरणार्थ, देशात ज्या निवडणुका होतात त्यांचा खर्च उत्पादन संस्थांकडून मिळणाऱ्या पैशातूनच बहुतांश राजकीय पक्ष करतात हे सर्वश्रुत आहे पण ते त्या शीर्षकाखाली कंपन्यांच्या लेख्यांमध्ये जात नाही, उत्पादन खर्चाचे आकडेच फुगवून लिहिले जातात. हा भ्रष्टाचार नव्हे काय ? भारतात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून घेतलेली रु. सव्वा लक्ष कोटींची कर्जे खाजगी उद्योजकांनी परत न करता ती बँकांच्या खात्यांमध्ये अकार्यकारी मत्ता (Non-Performing Assets) म्हणून दाखविणे व ती आता चालू नफ्यातून वजा करणे हा भ्रष्टाचार नव्हे तर आणखी काय आहे? अमेरिकेत हिशेब तपासनीस कंपन्यांनी एन्रॉन व इतर

अनेक कंपन्यांच्या लेख्यांमधे अवैध फेरफार करुन तोट्याच्या ऐवजी नफे दाखविणे हा सुध्दा भ्रष्टाचारच आहे ना? म्हणून सारमुद्दा असा की राज्यव्यवस्थेवर आधारित व्यवस्था म्हणजे भ्रष्टाचार व बाजारावर आधारित व्यवस्था ही भष्टाचार मुक्त असे अतिसरलीकरण होऊ नये व गाडगीळांच्या सहकारी लोकराज्याची संकल्पना नाकारण्याचा तो निकष असू नये.

तसेच स्पर्धेवर आधारित अर्थव्यवस्था नाकारल्यास पर्याय उरतो तो केवळ सर्वंकष समाजसत्तेचा असे जे देशपांडे सुचवितात तेही आजच्या जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात तितकेसे बरोबर वाटत नाही. गाडगीळांना सर्वंकष समाजसत्ता अभिप्रेत नव्हती हे तर खरेच आहे. म्हणून त्यांनी सहकारी लोकराज्य सुचविले. परंतु आज जगभरचे लोक जागतिकीकृत भांडवलशाहीचा पर्याय म्हणून स्थानिक संसाधने स्थानिक लोकांच्या नियंत्रणाखाली असावीत व त्यातून स्थानिक समुहांचा विकेंद्रित विकास व्हावा ह्या आशयाची अनेक प्रतिमाने मांडत आहेत. गाडगीळांचे सहकारी लोकराज्याचे पूर्वी मांडलेले प्रतिमान हे त्यापैकी एक मानून त्याचा विचार होणे आवश्यक आहे. भारतात स्पर्धेच्या बाजारावर आधारित (थोड्या सार्वजनिक क्षेत्रासह) अर्थ व्यवस्था देशातील विषमता कमी करु शकली नाही, उलट त्यात वाढ झाली आहे. त्यामुळे आपण खरे तर स्पर्धेच्या पर्यायी प्रतिमानाचा शोध अधिक गंभीरपणे घ्यावयास पाहिजे.

माझ्या मते आपण शहरात राहणाऱ्या विचारकांच्या विचारप्रणालीत एक विसंगती अशी निर्माण होते की आपण शहरातील समस्या (विशेषत: स्वत:च्या व्यवहारांशी निगडीत) सोडविण्यासाठी सहकार्याचा उपयोग/विचार कमी करतो पण ग्रामीण भागांतील अल्पशिक्षित, अल्पकुशल, दारिद्रयपीडित लोकांनी त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उच्चतर अशा तत्त्वज्ञानाचा (म्हणजे सहकार्याचा) उपयोग करावा असे सुचवितो. त्यात त्यांना यश प्राप्त झाले नाही तर लागलीच आपण निष्कर्षाप्रत पोचतो की सहकाराचे तत्त्व यशस्वी होणे कठीण आहे. देशपांडेंनीही ग्रामीण भागात कोणकोणत्या गटांचा समावेश सहकारी चळवळीत होत नाही हे दर्शविले. (पृ. 124-125). परंतु बरेचसे लोक/गट इतरांच्या यशस्वी कार्यप्रणालीपासून अनुकरणाने शिकत असतात व त्यातून सहकाराचा दीर्घकालीन प्रक्रिया म्हणून प्रसार होतो. आज देशभर ग्रामीण श्रमिक महिलांच्या सहकारी बचत गटांच्या संघटित बँकांना हेवा वाटावा अशा रुपाने एक सशक्त आर्थिक चळवळ उभी राहिली आहे हे कोणीही मान्य करील. त्यामुळे सहकाराचे तत्त्व तळागाळाच्या लोकांपर्यंत पोचत नाही ह्या मताचा फेरविचार होणे आवश्यक आहे.

सहकार चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट एकाधिकारावर व नफ्यावर नियंत्रण ठेवणे हे आहे. त्यामुळे स्पर्धेच्या बाजारात व्यक्तीगत हिताच्या संकल्पनेला जे अनिर्बंध स्वातंत्र्य मिळते ते सहकारात मिळत नाही हे स्पष्टच आहे. हयाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे एक फायदा असा होतो की निर्णय प्रक्रियेत अधिक लोकांना सहभाग मिळू शकतो. हे एकाधिकाराकडे झुकणाऱ्या बाजारव्यवस्थेत शक्य होत नाही. म्हणून ही दोन प्रतिमाने तुलनेत आणल्यास सहकाराचे तत्त्व सरस सिध्द व्हावे.

एक महत्त्वाचा मुद्दा असा की स्पर्धात्मक बाजारव्यवस्था ही सतत नफा वाढत रहावा ह्या तत्त्वावर कार्य करते. तो नफा मिळविण्यासाठी पशुवत वृत्ती (म्हणजे इतर क्षेत्रांचे व उत्पादन घटकांचे

शोषण, पर्यावरण ऱ्हास, सामाजिक अशांती व विघटन इत्यादी) म्हणजे पशूप्रेरणा (Animal Spirit) आवश्यक आहे असे म्हटले जाते. त्यातून वर निर्देशिलेले दोष निर्माण होतात व त्यामुळे लोक बाजार प्रतिमानाचा विरोध करतात. म्हणून असे सांगितले जाते की स्पर्धेच्या प्रतिमानाला मानवी चेहरा (Human face) देण्यांत येईल. अर्थ असा की अल्प उत्पन्नाच्या गटांवर व सामाजिक संसाधनांवर होणारे आघात सुसह्य करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. परंतु त्या प्रक्रियेत फक्त मुखवटा लावून चेहरा बदलल्याचा भास निर्माण केला जातो, पशुवत् वृत्ती काही बदलत नाही. त्यामुळे देशपांडे जे म्हणतात की स्पर्धेच्या बाजारव्यवस्थेत व्यक्तीस्वातंत्र्याच्या वातावरणात कर्तृत्व बहरते, त्याचे तपशीलात व गांभीर्याने परीक्षण होणे आवश्यक आहे.

भारताला समाजवादी क्रांती न होता स्वातंत्र्य मिळाले व अर्धसामंती, अर्धभांडवली अर्थव्यवस्था आपण हाती घेतली व त्यातून समाजवादाचे उद्दिष्ट घोषित करुन फारतर बाजारव्यवस्थेच्या कक्षेत सार्वजनिक उद्योगांचे क्षेत्र निर्माण करु शकलो. त्याला संमिश्र अर्थव्यवस्था असे गाडगीळांनी संबोधिले. परंतु ''(या अर्थरचनेचे) प्रत्यक्ष कार्य आणि जीवनमूल्यांचा व वागणूकवर्तणूकीचा त्यातून व्यक्त होणारा दर्जा लक्षात घेता प्राथमिक अवस्थेतील असंस्कृत भांडवलदारी अर्थरचनेचाच हा प्रकार आहे असे म्हणावे लागते'' असे विधान गाडगीळांनी केले. त्याचा उल्लेख करुन देशपांडे टिप्पणी करतात की ''भारतातील समाजवादी म्हणविणारे शासन प्रत्यक्षात कशा प्रकारचे आहे हे गाडगीळांनीच सांगितले आहे'' आणि शंका व्यक्त करतात की ''सहकारी चळवळ तिच्या मूल्यांचा शासनावर कितपत प्रभाव टाकील याबद्दलही शंका वाटते.''

ह्या टिपणीत दोनतीन मुद्दे लपलेले आहेत: एक, देशपांडे शासन आणि अर्थरचना ह्यांना एकच मानताना दिसतात. परंतु शासनाने स्वत:ला समाजवादाचे उद्दिष्ट ठेवणारे असे म्हटल्याने पूर्ण अर्थरचना तर तत्क्षणी बदलत नाही. तो बदल एकतर क्रांतीने येतो किंवा दीर्घकाळ एका दिशेने बदल झाल्यास तसा परिणाम दिसून येतो किंवा मग द्वंद्वात्मक पध्दतीने केव्हा तरी घडून येतो. गाडगीळांनी 1959 मधील भाषणात, स्वातंत्र्य मिळून केवळ दहा वर्षे झालेल्या व पहिली पंचवार्षिक योजना नुकतीच पार पाडलेल्या, अर्धसामंती-अर्धभांडवली अर्थरचनेचे, त्यातील जीवनमूल्ये व वागणूक वर्तणुकीचे असंस्कृत भांडवलदारी असे वर्णन केले त्यात समाजवादाचा प्रत्यक्ष संबंध येतो असे वाटत नाही. दोन, समाजवादाची प्रक्रिया समजा सुरु झाली तरी जेवढ्या कार्य क्षेत्रात (भौगोलिक नव्हे) भांडवलदारी व्यवस्था कार्य करते तेवढ्या क्षेत्रात ती स्वत:च्या तत्कालीन सांस्कृतीक स्तर दर्शवील ह्यात नवल ते काय? उलट अशी भांडवलदारी व तिची संस्कृती नष्ट करण्यासाठीच तर लोक समाजवादाला आवाहन करतात. म्हणून काही क्षेत्रात समाजवादी मूल्ये असणे व काही क्षेत्रात असंस्कृत भांडवलदारी मूल्ये असणे हे ऐतिहासिक दृष्ट्या नैसर्गिक व अपरिहार्य आहे. तीन, अशा (शासनावर आणि) अर्थरचनेवर सहकारी चळवळ तिच्या मूल्यांचा कितपत प्रभाव टाकील ही जी शंका देशपांडेंना वाटते ती प्रस्तुत लेखकालाही वाटते. कारण इतिहास असे दर्शवितो की उच्चतर जीवनमूल्यांच्या कोणत्याही प्रयोगांशी (समाजवाद असो की सहकार) भांडवलशाही निकराचा सामना करुन त्यांना स्वत:च्या असंस्कृततेच्या पातळीवर आणते. पण त्यामुळे अशी जीवनमूल्येही बाळगू नयेत किंवा त्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी चळवळी व प्रयत्न होणार

नाहीत असे तर घडणे अशक्य आहे. अन्यथा चिखल आहे म्हणून कमळे उगविणेच बंद होईल.

आपण नवे आर्थिक धोरण म्हणजे स्पर्धात्मक बाजारव्यवस्था स्विकारल्यापासून त्याचे जे सामाजिक-सांस्कृतिक परिणाम झाले आहेत ते असे: टी.व्ही.च्या भारतीय वाहिन्यांवरील वाढती उत्तानता, विदेशातून आयात केलेल्या दारुच्या मागणीत (देशातील देशी-विदेशी प्रकारच्या दारुसाठी होणाऱ्या वाढत्या मागणी व्यतिरिक्त) होणारी दरसालची सुमारे 10 % ची वाढ, कौटुंबिक पातळीवरील वाढते तणाव-विघटन-हिंसा, राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण, समाजातील एकूण वाढलेली हिंसा, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे प्रवेश-देणग्या देण्यासाठी पालकांना करावा लागणारा भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या संकोचामुळे अल्प व मध्यम उत्पन्न गटांची आरोग्य सुविधां-बाबत वाढती वंचितता, आर्थिक विकासामुळे वाढणारे प्रदूषण शासन नियंत्रित करु शकत नसल्यामुळे न्यायपालिकेच्या क्रियाशीलतेची अनिवार्यता, सुनामी महालाटांच्या जागतिक व भारतीय भीषण प्रलयाच्या दु:खाच्या वेळी सुध्दा अख्रिश्चन धनिकांनी ख्रिश्चन नववर्षाचा मद्याची रेलचेल करीत आस्वाद घेणे इत्यादी. ह्या परिणामांचा स्पर्धात्मक बाजार व्यवस्थेतील व्यक्तीस्वातंत्र्याचा सामान्य अविष्कारच मानला जातो. त्यामुळे स्पर्धेवर आधारित भांडवलदारी प्रतिमानातील विकास आणि खरी सुसंस्कृतता ह्यांचा सहसंबंध धनात्मक आहे की ऋणात्मक आहे ह्याचा गांभीर्याने उचित विचार होणे आवश्यक आहे. त्या बाबतीत आर्थिक प्रतिमानाची निवड करताना व्यवसायांची नफा कमाविण्यातील कार्यदक्षता व त्याकरिता समाजात निर्माण होणारी (अनेक प्रकारची) व्यावसायिक कार्यदक्षता (Professional efficiency)एवढा मर्यादित निकष पर्याप्त असणार नाही. तसेच विकास कोणाच्या योगदानाने किती होतो आणि फळे कोणाला किती मिळतात ह्याचीही नीट मोजदाद भावी आर्थिक प्रतिमानात असणे अनिवार्य राहील. नाहीं तर मग विचारकांचे कामच काय?

## स्पर्धेतील संघटित भांडवलशाही व शासन

भांडवलशाही दोन स्तरांवर कार्य करते. खालच्या पातळीवर छोटे व मध्यम उद्योजक उपलब्ध शासकीय कायदे व नियमांच्या चौकटीत कार्य करतात, तर शिखरावरील मोठे उद्योजक कायदे व नियम बदलवून (अनुकूल करुन) घेण्यासाठी संघटित प्रयत्न करतात. त्यात उद्योजकांचे देशव्यापी महासंघ, वस्तू व उत्पादन क्षेत्रानुसारच्या संघटना सरकारातील मंत्री व नोकरशहांशी सतत संपर्क ठेवून, निवेदने देऊन शासकीय धोरणांमध्ये कोणते बदल किती प्रमाणात करावेत हे सतत समजावून सांगत असतात व तसा दबाव आणत राहतात. केंद्रीय अर्थसंकल्प सादर होताक्षणी दूरचित्र वाहिन्यांवर शिखरच्या उद्योजकांना बोलावून त्यांचे मत विचारले जाते. त्यांनी म्हटले तर अर्थसंकल्प चांगला, त्यांनी म्हटले तर तो वाईट, असे जनमत तयार केले जाते. कित्येक वेळा तर त्यांनी 2 दिवसांपूर्वी प्रकाशित केलेल्या निवेदनातील मागण्या अर्थसंकल्पात जशाच्या तशा समाविष्ट झालेल्या दिसतात त्यामुळे अर्थसंकल्प कोणी सुचविलेला, कोणाचा व कोणासाठी ह्याचे एक ठरलेले उत्तर दरवर्षी मिळते. त्यात सामान्यजनांच्या कल्याणाचे प्रतिबिंब अभावानेच आढळते. हे सगळे आर्थिक विकासाच्या नावानेच चालू असते. अशा रीतीने स्पर्धेच्या बाजारावर आधारित जी अर्थव्यवस्था आज देशात निर्माण झाली आहे तिच्या

शासन निर्णयांवरील, राजकारणावरील व सामाजिक-सांस्कृतिक परिणामांचे छोटे चलचित्र (Short Documentary)येथे सादर केले आहे.

**संघटित सहकार**

सहकार मात्र संघटितपणे होऊ लागल्यास देशपांडेंना त्यात (उत्स्फूर्तपणाचा अभाव व) कृत्रिमपणा वाटतो. ते म्हणतात ''एखाद्या सहकारी संस्थेचे सदस्य होणे म्हणजे त्या प्रकारच्या संस्थेसाठी प्रस्तुत असलेल्या सहकारी तत्त्वांच्या आधारावर तयार केलेल्या कायद्याने बांधलेल्या एका संस्थेचे सदस्य होणे. म्हणजे एक प्रकारची नैतिक शिस्त सदस्यांवर येथे लादलेली असणार; स्वेच्छेने स्विकारलेली नसणार. जी नैतिकता लादलेली असते ती खरी नैतिकता नसतेच हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. तिची सवय होऊन माणसे नैतिक आचरण करु लागतील असे समजणे वास्तवाला धरुन होणार नाही.'' नंतर ते निष्कर्ष सांगतात : '' मुद्दा असा की, शासकीय समाजवादाच्या चौकटीत किंवा त्याच्या गाडगीळप्रणीत आवृत्तीत नवा माणूस तयार होईल अशी अपेक्षा करता येत नाही.'' देशपांडेंचे हे मत आपण क्षणभराकरिता ग्राह्य मानले तरी आपण गाडगीळांच्याच निष्कर्षापर्यंत पोचतो, ते असे: नवा माणूस (देशपांडेंच्या म्हणण्यानुसार)सोव्हिएत रशियात सुध्दा झाला नाही. गाडगीळांनी ज्या आर्थिकेतर प्रेरणांचा उल्लेख (मानमान्यता, सेवाभाव) केला आहे त्या (देशपांडेंच्या मते) तात्कालिक उर्मी असतात व ''स्थायी संस्थाजीवनाची अशा अस्थिर आणि प्रासंगिक उर्मींच्या आधारावर बांधणी करता येत नाही'' असे ते म्हणतात. परंतु व्यक्तीला स्पर्धेतील अमर्याद आर्थिक स्वातंत्र्य असावे की सहकारातील मर्यादित आर्थिक स्वातंत्र्य असावे हाच येणाऱ्या काळातील महत्त्वाचा विषय असणार आहे. कारण उत्पादन वाढीसाठी खाजगी व्यवस्थापनाला पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे ही जी पूर्वीच्या उत्पादनप्रणालीत आवश्यकता होती ती, आताच्या स्वयंचलित मोठ्या व वेगवान यंत्रांमुळे, अनावश्यक होते. उलट उत्पादन प्रणालीला श्रमिकांची व व्यवस्थापकांची गरजच कमी होत असल्यामुळे लोकांचे काय करायचे हा मोठा प्रश्न बनणार आहे. वाढलेल्या शिक्षणस्तरामुळे श्रमिक व व्यवस्थापक ह्यांच्यातील शिक्षण, कौशल्य इत्यादींबद्दलचे भेद कमी होऊन त्यांच्यातील उदग्र अंतर कमी करणारी व सर्वांना जवळपास समान लेखणारी व्यवस्थापन प्रणाली अनिवार्य होणार आहे. येणाऱ्या काळात शुध्द खाजगी असलेली व अंध स्पर्धेवर आधारित असलेली प्रणाली टिकू शकणार नाही हे ध्यानात घेणे आवश्यक आहे.मग ती कुठल्यातरी प्रकारच्या सहकाराकडे झुकेल व त्यात सर्वांच्या आकांक्षांना पुरेसा वाव देण्यासाठी प्रत्येकाच्या आकांक्षांना थोडी तरी मुरड घालावीच लागेल. तीच भविष्यकाळाची नैतिकता ठरणार आहे. स्पर्धेच्या बाजारव्यवस्थेतील खाजगी उद्योगांमध्ये, देशपांडे म्हणतात तशी '' मतदानाचा हक्क भांडवलाच्या राशीवर अवलंबून असल्यामुळे ...एक नियंत्रण क्षमता (Controlling interest) निर्माण होते आणि या नियंत्रकांचा हेतू आणि कंपनीचा हेतू यांच्यात एकरुपता (identity)निर्माण होते...'' एवढे ठीक आहे पण ह्याच वाक्यातील त्यांचा पुढचा निष्कर्ष ...तशी परिस्थिती सहकारी संस्थेत निर्माण होत नाही. सर्वांचाच उपक्रम म्हणजे कुणाचाच उपक्रम नाही अशी स्थिती प्राप्त होते '' तितकासा वास्तवाला धरुन वाटत नाही. उलट खाजगी क्षेत्रात एकतर नियंत्रण क्षमता हिसकावून घेण्यासाठी धनवान गटांच्या मारामाऱ्या चालताना दिसतात किंवा कमी भांडवल गुंतवणारे व नियंत्रण क्षमतेत रस नसणारे असंख्य

छोटे गुंतवणुकदार केवळ भागांच्या घटत्यावाढत्या किंमतीनुसार खरेदीविक्री करीत नफा कमाविण्याचा प्रयत्न करतात. अशा असंख्य लोकांचा कंपन्यांच्या उद्दिष्टांशी कसल्याही प्रकारचा संबंध किंवा आपुलकी नसते. त्यामुळे वास्तविक पाहता संयुक्त भांडवली कंपन्या नियंत्रक गुंतवणुकदारच व्यक्तीगत साम्राज्यासारख्या चालवतात आणि भांडवलाचे इतर मालक बेपर्वा किंवा असंबंधितच राहतात. एखाद्या कंपनीने एखाद्या तिमाही-सहामाहीत चांगला नफा दाखविला नाही तर सामान्य गुंतवणुकदार ते व्यवस्थापन आपल्या हाती घेत नाहीत. फक्त भाग भांडवल विकून टाकतात. त्यामुळे अशा कंपन्यांमध्ये फक्त अर्थकारणच कार्य करताना दिसते. सहकारी संस्थामध्ये मात्र नफ्यावर कमाल मर्यादा असल्यामुळे आणि भागभांडवल इतरत्र विकता येत नसल्यामुळे, त्या संस्थेचा कारभार आपल्या हाती घेण्यासाठी चुरसही चालते. त्यामुळे व्यवस्थापक मंडळेही बदलत जातात व तितक्या जास्त लोकांना व्यवस्थापनात सहभाग घेण्याची संधीही मिळते. त्यामुळे सारासार विचार केल्यास सहकाराचे प्रतिमान उजवे ठरावे.

खाजगी क्षेत्रही शासनावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते व शासनाची मदत होते, सहकारी क्षेत्रात ही मात्रा जास्त असेल. पण लोकांनी संसाधनांचा उपयोग करुन घेण्याला आपण लोकराज्य संबोधिले तर सहकारी लोकराज्य व स्पर्धेवर आधारित लोकराज्य अशी दोन प्रतिमाने आपल्या समोर येतात. देशपांडे म्हणतात तसे "मूलगामी आणि सर्वांगीण" विश्लेषण करु गेल्यास सहकारी प्रतिमानातील लोक सहभाग, अमर्याद आर्थिक स्वार्थावर मर्यादा, आर्थिक उद्दिष्टांसोबत सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय उद्दिष्टांवर भर आणि शोध, संस्थांच्या उद्दिष्टांचा भागधारकांशी दीर्घकालीन संबंध इत्यादी आयाम सहकाराबाबत निश्चितच अधिक समाधानाचा आशेचा किरण दर्शवितात. अर्थात सहकारी प्रतिमानातील आजच्या न्यूनता दूर कराव्याच लागतील.

●●●

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## 'अर्थसंवाद च्या अंकांतील लेख'

अर्थसंवादच्या पूर्वीच्या अंकातील विशिष्ट लेख कोणाला हवे असतील तर ते मागणीनुसार झेरॉक्स करून देण्याची व्यवस्था केलेली आहे. संबंधिताना झेरॉक्स व टपालाचा खर्च द्यावा लागेल. आपली मागणी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार सर्जेराव ठोंबरे यांच्याकडे त्यांच्या औरंगाबाद वरील पत्त्यावर नोंदवावी.

**प्रमुख संपादक**
'अर्थसंवाद'

टिपण

# नागरी सहकारी बँकांसमोरील आव्हाने

● **विलास खंदारे**, देवगांव.

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री. आ. भां. महाविद्यालय, देवगांव.*

**भा**रताच्या आर्थिक विकासामध्ये इतर सहकारी संस्थांप्रमाणे नागरी सहकारी बँकांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शहरात व्यापारी बँका सामान्यपणे व्यापार आणि उद्योगांकरिता कर्जपुरवठा करतात. लहान व्यापारी, कारागीर, व्यावसायिक आणि पगारदार यांना भांडवल पुरवठा करण्यासाठी नागरी सहकारी बँका स्थापन करण्यात आल्या. नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र शहरापुरते मर्यादित असले तरी या बँका निमशहरी भागात आपल्या शाखा स्थापन करून बँक व्यवसाय करीत आहेत.

भारतामध्ये नागरी सहकारी बँक व्यवसायाला सुरूवात 1889 मध्ये अन्योन्य सहकारी मंडळ या नावाने स्थापन झालेल्या संस्थेद्वारे झाली. मद्रास येथील कांजीवरम या शहरात 1904 मध्ये पहिली नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली. त्यानंतर 1905 मध्ये मुंबई इलाख्याच्या धारवार जिल्ह्यात 'कंगिनहाळ' येथे व डिसेंबर 1905 मध्ये बंगलोर येथे नागरी सहकारी पतसंस्था नोंदविण्यात आली. नागरी सहकारी बँका या प्रामुख्याने शहरातील लहान उद्योजक, कारागीर, पगारदार यांना अर्थसहाय्य तसेच मध्यम व कनिष्ठ वर्गातील लोकांच्या बचतीस वाव मिळावा याकरीता स्थापन करण्यात आल्या. सन 1991 पासून भारतात उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरण सुरू झाले. भारतातील इतर क्षेत्राप्रमाणे बँक व्यवसाय क्षेत्रातही आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय मापदंडाप्रमाणे भारतातील बँक व्यवसायाचा दर्जा सुधारण्यासाठी नरसिंहम समिती स्थापन करण्यात आली. या समितीने देशातील वित्तीय पद्धतीची रचना, संघटन व कार्यप्रणालीचा अभ्यास करुन महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. मराठे समितीच्या शिफारशीनुसार नरसिंहम समितीच्या शिफारशी नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आल्या. सन 1991नंतर देशात नागरी सहकारी बँकांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली. नागरी सहकारी बँकांची संख्यात्मक वाढ पाहावयाचे झाल्यास 1990 मध्ये देशात केवळ 381 बँका कार्यरत होत्या आज देशात जवळपास 2090 नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँकांच्या एकूण 7084 इतक्या शाखा देशात कार्यरत आहेत. महाराष्ट्रात 658 नागरी सहकारी बँका, 3525 शाखांसह कार्यरत आहेत. देशातील एकूण नागरी सहकारी बँकांपैकी 31.8 टक्के बँका महाराष्ट्रात कार्यरत आहेत. या बँकांच्या एकूण

ठेवी 37,342 कोटी रुपये आहेत. देशात महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या राज्यांत 80 टक्के नागरी सहकारी बँका व 75 टक्के ठेवी एकवटल्या आहेत.

**नागरी सहकारी बँकांपुढील आव्हाने**

देशात 1991 पासून नवीन आर्थिक सुधारणांना वेग आला आहे. बँकिंग क्षेत्रासाठी नवीन आर्थिक सुधारणा काहीअंशी प्रेरणादायी तर काहीअंशी आव्हानात्मक ठरणार आहेत. नागरी सहकारी बँकांसह सर्वच व्यापारी बँकांना जनतेचा विश्वास संपादन करण्याबरोबरच आर्थिक स्थितीही योग्य ठेवावी लागणार आहे. अलीकडील काळात देशात दुर्बल नागरी सहकारी बँकांचे प्रमाण वाढत आहे. तसेच देशात बँकांचे रोखे घोटाळे, कर्जवाटप घोटाळे या कारणांमुळे बँका दुर्बल होत असून त्यांच्यावरील लोकांचा विश्वासही कमी होत चालला आहे.

**नवीन आर्थिक सुधारणा**

नरसिंहम समितीच्या शिफारशी लागू करुनही देशात दुर्बल नागरी सहकारी बँकांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार मार्च 2001 अखेर देशात 249 इतक्या दुर्बल नागरी सहकारी बँका होत्या. हीच संख्या मार्च 2002 पर्यंत 285 इतकी झाली. अलीकडील काळात नागरी सहकारी बँका दुर्बल होत असल्याचे दिसून येते. नवीन आर्थिक सुधारणांमुळे देशात बँकींग क्षेत्रामध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. नागरी सहकारी बँकांना आता देशातील राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकासोबतच खाजगी बँका व परदेशी बँकांबरोबर स्पर्धा करावी लागत आहे. इतर बँकांप्रमाणे नागरी सहकारी बँकांसमोर विविध आर्थिक स्वरुपाच्या सुविधा ग्राहकांना देण्याची जबाबदारी पार पाडण्याचे मोठे आव्हान आहे. यासाठी नागरी सहकारी बँकांना आपली आर्थिक स्थिती मजबूत करावी लागणार आहे. नागरी सहकारी बँकांतील गैरव्यवहार टाळण्यासाठी मध्यवर्ती बँक नवीन कठोर धोरण आखत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि शासनाच्या सहकार खात्याचे नियंत्रण नागरी सहकारी बँकांवर आहे. या दुहेरी नियंत्रणाऐवजी आता फक्त रिझर्व्ह बँकेचेच नियंत्रण नागरी सहकारी बँकांवर असणार आहे. यामुळे या बँकांची दुहेरी नियंत्रणातून मुक्तता झाली पण या बँकांना रिझर्व्ह बँकेच्या कठोर नियमांना सामोरे जावे लागणार आहे. इतर व्यापारी बँकांप्रमाणेच याही बँकांना रिझर्व्ह बँक वागणूक देणार असल्यामुळे सहकारी खात्याचे जे फायदे नागरी सहकारी बँकांना होत असतात, ते फायदे या बँकांना आता होणार नाहीत. यामुळे नागरी सहकारी बँकांच्या लाभक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**भांडवल बाजारातील व्यवहार**

रिझर्व्ह बँकेने 2001 मध्ये काढलेल्या आदेशानुसार नागरी सहकारी बँकांना त्यांच्या ठेवी इतर सहकारी बँकांमध्ये ठेवण्यास संमती दिली नाही. बँकांना या ठेवीवर जवळपास 11 टक्के व्याज मिळते. यामुळे व्यापारी बँकांच्या लाभावर परिणाम होईल. तसेच नागरी सहकारी बँकांना आपल्या ठेवी गुंतविण्यासाठी इतर वित्तीय संस्थांचा शोध घ्यावा लागेल. नागरी सहकारी बँकांना आपल्या ठेवी सहकारी रोख्यांमध्ये गुंतवाव्या लागतील. परंतु रोख्यांच्या किंमतीमध्ये चढउतार होत असल्यामुळे या बँकांना रोख्यापासून मिळणारे उत्पन्न देखील कमी जास्त होईल. रोख्यांच्या व्यवहारामध्ये होणारा नफा-तोटा पत्रकात दाखवावा असा निर्देश रिझर्व्ह बँकेने दिल्यामुळे या बँकांसमोर अडचण निर्माण झाली आहे. शिवाय रोख्यांमधील गुंतवणुकीची मर्यादा साधारणतः 10 टक्क्यांनी वाढविल्यामुळे नागरी सहकारी बँकांसाठी भांडवल गुंतवणुकीचे काम अधिकच अवघड झाले आहे. तेव्हा व्यापारी बँकांना ठेवीदारांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करुन भांडवलाचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे. तसेच 25 कोटी पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँकांना भांडवल बाजारात प्रवेश करणे अनिवार्य झाले आहे.

**भांडवल पूर्तता**

भांडवल पूर्तता प्रमाण बँकांची आर्थिक क्षमता दर्शविते. भांडवल पूर्तता प्रमाण काढण्यासाठी स्वनिधीचे एकूण ठेवीशी व एकूण संपत्तीशी प्रमाण काढले जाते. हे प्रमाण रिझर्व्ह बँकेने 16.20 टक्के आणि 7.0 टक्के क्रमशः निर्धारित केले आहे. देशातील नागरी सहकारी बँकांना हे प्रमाण टिकविण्यासाठी स्वतःचे भांडवल म्हणजे ठेवी आणि राखीव निधीचे प्रमाण वाढवावे लागणार आहे. रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना आपली भांडवल पूर्तता जोखीम दरवर्षी 1 ते 2 टक्याने वाढविल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ठेवीदारांना आकर्षित करणे आणि राखीव निधीची अधिकाधिक तरतूद करण्याचे काम नागरी सहकारी बँकांना करावे लागणार आहे.

**व्यापारी बँका आणि नागरी सहकारी बँका यांच्यातील स्पर्धा**

सध्याच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळात नागरी सहकारी बँकांना इतर व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागत असतांना काही व्यावसायिक बाबींच्या संदर्भात त्यांच्यावर मर्यादा घालून दिल्यामुळे त्यांच्या स्पर्धा क्षमतेवर विपरित परिणाम झाला आहे. उदा. मागताक्षणीच परत मिळणारे पैसे या कर्ज पद्धतीद्वारे नागरी सहकारी बँकांना केवळ 2 टक्के रकमेची मर्यादा घालून दिली आहे. अशी मर्यादा व्यापारी बँकांसाठी नाही. पत्रपत्रिकेपासून (Credit Card) देखील नागरी सहकारी बँकांना दूर ठेवण्यात आले आहे. नागरी सहकारी बँका प्राथमिक कर्ज रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या कर्ज दरापेक्षा कमी दराने देऊ शकत नाहीत. सध्याचा प्राथमिक कर्जदर 12.5 टक्के असल्याने नागरी सहकारी बँकांना कुठल्याही कर्जावरील व्याजदर यापेक्षा कमी ठेवता येत नाही. व्यापारी बँका मात्र 11.5 टक्के दराने गृहकर्ज देतात. अशाप्रकारे नागरी सहकारी बँकांना सुरक्षित व्यवसायाला मुकावे लागते. नागरी सहकारी बँकांच्या स्पर्धाशक्तीवर वरील कारणांमुळे विपरित परिणाम होतो. यावर मात करण्यासाठी नागरी सहकारी बँकांना इतर बाबतीत म्हणजेच उत्तम ग्राहकसेवा व कार्यतत्परता अंगीकारुन व्यापारी बँकांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. मुक्त अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँकांना गळेकापू स्पर्धा, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, महिन्याला करावी लागणारी व्याज आकारणी, काही बाबींवर घालून दिलेली मर्यादा या सर्व बाबींवर मात करण्यासाठी व सेवक वर्गाची कार्यक्षमता वाढावी म्हणून विविध पातळ्यांवर प्रशिक्षण देण्याची जबाबदारी या बँकांना पार पाडावी लागणार आहे.

**ग्राहक प्रबोधन**

नागरी सहकारी बँकांना वित्तीय कार्यक्षमता टिकवून ठेवण्याबरोबरच आपल्या कर्जदारांचाही विचार करावा लागणार आहे. आपले कर्जदार बाजारामध्ये उत्पादक किंवा विक्रेते या गटातील असतील, त्यांना बाजारात टिकवायचे असेल तर त्यांना मालाचा उत्तम दर्जा आणि दर्जेदार ग्राहक सेवा देणे आवश्यक आहे. यात जर ते कमी पडले तर ते अडचणीत येतील आणि त्यामुळे पर्यायाने या बँका अडचणीत येतील. त्यामुळे ग्राहक प्रबोधनाची जबाबदारी नागरी सहकारी बँकांना स्वीकारावी लागणार आहे. यासाठी बँकांना कर्जदार आणि आपण व्यावसायिक साथीदार आहोत अशी वृत्ती स्वीकारावी लागणार आहे. बँकांना कर्जदारांना व्यवसायातील चढउतारांची वेळोवेळी माहिती देणे आवश्यक ठरणार आहे. तसेच कर्मचारी पातळीवर आणि संस्थात्मक पातळीवर प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. कारण कर्जदाराच्या उत्पादनक्षमतेवर बँकांची कर्जवसुली अवलंबून असते. याकरीता नागरी सहकारी बँकांना आपण ज्या व्यवसायाकरिता कर्ज देतो त्या व्यवसायाची, त्यातील चढउताराची, अडचणीची, उपलब्धतेची माहिती असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे वेळेवर कर्ज परत करु शकतील असे कार्यक्षम ग्राहक शोधण्याची जबाबदारीही नागरी सहकारी बँकांवर पडली आहे. यासाठी कर्जदाराला दिलेले कर्ज तो उत्पादक कामासाठीच उपयोगात आणेल यादृष्टिने

सर्वतोपरी प्रयत्न नागरी सहकारी बँकांना करावे लागणार आहेत.

**कार्यक्षम व्यवस्थापन**

नागरी सहकारी बँकांना देण्यात आलेल्या खास सोयी खुल्या अर्थव्यवस्थेमुळे काढून घेतल्या गेल्या आहेत. शिवाय व्यापारी बँकांच्या तुलनेत काही बाबतीत नागरी सहकारी बँकांवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे या बँकांना कार्यक्षम व्यवस्थापनाची नितांत आवश्यकता आहे. कर्ज देणे व ठेवी जमा करणे ही पारंपरिक कामे करुन या बँकांना आता बँक व्यवसायात आपला दबदबा निर्माण करता येणार नाही. व्यवसायवाढीसाठी या बँकांना ठेवी प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, बँकेच्या सेवेमध्ये आपुलकी निर्माण करणे, इतर बँकांच्या व्याजदराशी मिळतेजुळते व्याजदर ठेवणे आवश्यक झाले आहे. कर्ज वितरणाच्या विविध सुविधा ग्राहकांना मिळणे गरजेचे आहे. कर्जासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शन, कर्जांचा योग्य प्रकारे विनियोग, कर्ज वापरातील अडचणी, बाजारपेठा इत्यादी सेवा देवून बँकिंग सेवामध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. खुल्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा, प्रक्रिया मार्गात होणारे बदल, मालाचा दर्जा व अपेक्षित नफा याकडे सातत्याने लक्ष दिले तर कर्ज परत फेड वेळेवर होऊ शकते. याकरीता कार्यक्षम व्यवस्थापनाची बँकांना गरज आहे.

**नवीन व्याजदर रचना**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणानुसार ठेवी व कर्जावरील व्याजदर निश्चित होतात. यापुर्वी व्याजदर हे नियंत्रित स्वरुपात होते. नरसिंहम समितीच्या शिफारशीमुळे व्याजदर हे विनियंत्रित झाले आहेत. प्रथमत: ठेवीवरील व्याजदरामध्ये कालावधीनुसार वेगवेगळे व्याजाचे स्तर होते. हळूहळू हे दर लुप्त होऊन कमाल व्याजदराचा एकच व्याजदर ठेवीवर निर्धारित करण्यात आला. ठेवीवरील उच्चतम व्याजदराची मर्यादा घालून देण्यात आली आणि त्यापेक्षा जास्त व्याजदर दिल्यास ते नियम उल्लंघन समजण्यात येईल असे रिझर्व्ह बँकेने निर्धारित केले आहे. यामुळे नागरी सहकारी बँकांना आता अधिक व्याज देऊन ठेवी आकर्षित करता येणार नाहीत. बचत ठेवी व चालू ठेवीवरील व्याजदरामध्ये मात्र विशेष बदल करण्यात आला नाही. नागरी सहकारी बँकांना बचत खात्यावर 1 टक्का व चालू खात्यावर अर्धा टक्का जास्तीचा व्याजदर देण्याची प्रथा सुरू ठेवण्यात आली आहे. नुकतेच भारतीय रिझर्व्ह बँकेने मुदत ठेवीवरील व्याजदरामध्ये आमुलाग्र बदल केले आहेत. एका वर्षावरील मुदत ठेवीवरील व्याजदर पूर्णत: मुक्त केले असून मुदत ठेवी म्हणून गणल्या जातील. यापुर्वी ही मर्यादा 46 दिवसांची होती. यामुळे नागरी सहकारी बँकांना खालील आव्हानांना तोंड द्यावे लागेल.

1. नवीन ठेवी जमा होण्याऐवजी ग्राहक बचत खात्यावरील ठेवीचे मुदत ठेवीत रूपांतर करतील. यामुळे बँकांच्या बचत ठेवी कमी होतील व बचत ठेवीचे मुदत ठेवीत रूपांतर झाल्यामुळे व्याजरूपाने देणे वाढेल. परिणामी बँकांची नफाशक्ती कमी होईल.
2. एका वर्षाखालील मुदत ठेवीवरील व्याजदर मुक्त केल्यामुळे जास्तीत जास्त व्याजदराची स्पर्धा, राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका, खाजगी बँका, परदेशी बँका, सहकारी बँका, यांच्या सोबत नागरी सहकारी बँकांना करावी लागेल. म्हणजे एक वर्षाखालील व्याजदर ठरविताना बँकेची क्षमता व स्पर्धा या दोन्ही गोष्टींना नागरी सहकारी बँकांना तोंड द्यावे लागणार आहे. सध्या ठेवीवरील व्याजदर 3.5 टक्के पर्यंत कमी झाला आहे. यामुळे ठेवीदारांचे प्रमाणही कमी होत आहे. तेव्हा ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी नागरी सहकारी बँकांना नवा मार्ग शोधावा लागणार आहे.

मार्च 2002 मध्ये देशात 225 दुर्बल बँका होत्या. नवीन आर्थिक सुधारणांमुळे नागरी सहकारी बँकांना देशातील राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका व खाजगी बँका यांच्या सोबतच परदेशी बँकासोबतही स्पर्धा करावी लागत आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी या बँकांना आपली

आर्थिक स्थिती सक्षम करुन ग्राहकांना विविध आर्थिक सुविधा पुरवाव्या लागणार आहे. यातच देशातील काही नागरी सहकारी बँकांचे गैरव्यवहार उघड झाल्यामुळे ठेवीदारांना आपणाकडे कायम ठेवण्याचे व त्यांचा या बँकांवरील विश्वास कमी होणार नाही, यासाठी या बँकांना खास प्रयत्न करावे लागणार आहेत. दुहेरी नियंत्रणातून रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांची मुक्तता केली व एकेरी परंतु कठोर नियंत्रण लादले. रोख्यांमधील गुंतवणुकीची मर्यादा साधारणत: 10 टक्क्यांने वाढल्यामुळे या बँकांसाठी भांडवल गुंतवणुकीचे काम अधिकच अवघड झाले आहे. रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना भांडवल पूर्तता प्रमाण दरवर्षी 1 ते 2 टक्क्यांनी वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी या बँकांना अधिकाधिक ठेवीदारांना आकर्षित करुन राखीव निधीचे प्रमाण वाढवावे लागणार आहे. प्राथमिक कर्जदार ठरवून दिल्यामुळे या बँकांना सुरक्षित व्यवसायाला मुकावे लागणार आहे. विविध बंधने व स्पर्धा याला तोंड देण्यासाठी नागरी सहकारी बँकांना प्रशिक्षणाद्वारे आपली कार्यक्षमता वाढवावी लागणार आहे. नागरी सहकारी बँकांना वित्तीय कार्यक्षमता टिकवून ठेवण्याबरोबरच कर्जदारांच्या हिताचाही विचार करावा लागेल. या बँकांना कर्जदारांचा व्यावसायिक साथीदार म्हणून काम करावे लागणार आहे. उत्पादक कर्जदार शोधण्याचे मोठे आव्हान या बँकांसमोर आहे. या स्पर्धेच्या युगात कार्यक्षम व्यवस्थापनाची नागरी सहकारी बँकांना नितांत आवश्यकता आहे. यासाठी सभासद, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारी यांना अधिक कार्यक्षम व प्रशिक्षित बनविणे या बँकांसाठी आवश्यक आहे. एक वर्षाखालील मुदत ठेवीवरील व्याजदर मुक्त केल्यामुळे नागरी सहकारी बँकांना इतर बँकांबरोबर व्याजदराची स्पर्धा करावी लागणार आहे व या स्पर्धा सोबतच आपली आर्थिक क्षमताही मजबूत ठेवावी लागेल. अपालन संपत्ती विषयक तरतुदीमुळे नागरी सहकारी बँकांना थकीत कर्जावरील व्याज आपल्या उत्पन्नात समाविष्ट करता येणार नाही. यामुळे बँकांचा नफा कमी दिसणार आहे व त्याचा परिणाम भागधारक व ठेवीदार यांच्यावर होणार नाही याची काळजी नागरी सहकारी बँकांना घ्यावी लागणारी आहे. कार्यक्षम व उत्पादक कर्जदारांच्या अभावामुळे नागरी सहकारी बँकांना आपला अतिरिक्त निधी गुंतविण्यासाठी नवीन व्यावसायिक क्षेत्रांचा शोध घ्यावा लागणार आहे. तात्पर्य नागरी सहकारी बँकांसमोर अनेक आव्हाने आहेत परंतु ही आव्हाने कार्यक्षम व्यवस्थापन व ठेविदार आणि कर्जदारांशी आपुलकीचे नाते जोडून सहजपणे पेलता येतील.

### संदर्भ सूची


1. कुलकर्णी एस.आर. : नागरी सहकारी बँका - एक दृष्टीक्षेप अनमोल प्रकाशन, नवी दिल्ली, 1996.

2. मुंकणे हेमंत, नागरी सहकारी बँकांची दुखणी व उपाय, योजना, फेब्रुवारी, 2003.

3. सदामते मोहन, नागरी सहकारी बँका एका नव्या वळणावर, योजना, मे, 2004.

4. माथूर बी. एच., भारतातील सहकार चळवळ, साहित्य भवन, आग्रा, 1974.

5. वाडकर बी. एन. आणि पाटील एस. डी. आगामी दशकातील राष्ट्रीयकृत बँकांपुढील आव्हाने, योजना, मार्च, 2004.


●●●


हे त्रैमासिक सर्जेराव आसाराम ठोंबरे यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली, नागपूर - 440012. येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 42, रंजन 1 सोसायटी एन-9 सिडको, औरंगाबाद-431003 येथे प्रसिद्ध केले.